जुलै–ऑगस्ट २०२४/पाने १००/किंमत ₹१०

# लोकराज्य



महाराष्ट्र गाठतोय प्रगतीचं शिखर... ६
गतिमान विकास १०
लोकहिताचे निर्णय वेगवान १४
सर्वसामान्यांना न्याय १८
सहकार चळवळीचे बळकटीकरण २०
योजनांची यशस्वी अंमलबजावणी २२
लोकाभिमुख निर्णय २४
वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात अग्रेसर २६
दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य २८
आदिवासी समाजाचा विकास ३०
पर्यटनवृद्धीसह गावांचा विकास ३२
आरोग्यदायी जीवनासाठी पुढचे पाऊल ३४
दळणवळण सुविधांची उभारणी ३६
जलसंवर्धनातून शाश्वत समृद्धीकडे ३८
शेतकरी हितासाठी... ४०
कामगारांच्या उत्थानासाठी... ४२
उद्योगराष्ट्र...महाराष्ट्र ४४
दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा ४६
पायाभूत सुविधांचा विकास ४८
लोककल्याणकारी शासन ५०
विद्यार्थीहिताला प्राधान्य ५२
आधुनिक सुविधांनी सज्ज ५४
सर्वसामान्यांच्या घराची स्वप्नपूर्ती ५६
सक्षमीकरणाला आधुनिकतेची जोड ५८
पर्व महिला सक्षमीकरणाचे ६०
आर्थिक विकासासह रोजगार निर्मिती ६२
कुशल व रोजगारक्षम ६४
मदतीसाठी सदैव तत्पर... ६६
लोकाभिमुख आणि लोकहित ६८-७३
वचनपूर्ती सोहळा... ७५
आनंद, अश्रू आणि आभार... ७७-८३
नवे पर्व : लखपती दीदी ८४
प्रेरणादायी प्रवास ८७
जलसंपत्तीचा शाश्वत विकास ८९
मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण ९१
टिळक युग ९३
बहुआयामी व्यक्तिमत्त्व ९५
अखंड जनसेवेचा वारसा ९६
क्रांतिसिंह नाना पाटील ९८


# अंतरंग


## महाराष्ट्र गाठतोय प्रगतीचं शिखर... ६


आम्हाला सत्तेत येऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. एखाद्या शासनाच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी हा कालावधी पुरेसा नाही; पण ज्या तडफेने आणि वेगाने आम्ही निर्णय घेत आहोत, ते पाहता आमचे शासन पुढील काळात राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी किती दमदार पावले टाकत आहे, त्याची प्रचिती आली.


## गतिमान विकास १०


राज्याने गेल्या अडीच वर्षांत एक विकासाभिमुख आणि लोकाभिमुख सरकार पाहिले. पाच वर्षांचे काम आम्हाला अडीच वर्षांत पूर्ण करावे लागणार होते; परंतु असंख्य अडचणींना सामोरे जाऊन आम्ही शेतकरी, युवा, कामगार आणि महिलांच्या सबलीकरणासह राज्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतला आहे. महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर अग्रेसर होत आहे.


## लोकहिताचे निर्णय वेगवान १४


महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शासनाला नुकतीच दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. राज्याचा गतीने विकास करण्यासाठी, लोकहिताच्या कामांना वेग देण्यासाठी आम्हीदेखील त्यांच्याबरोबर सामील होऊन एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे.


## वचनपूर्ती सोहळा... ७५


महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद, मंचासमोरील रांगोळीत साकारण्यात आलेली बहीण-भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेली भव्य राखी आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा अशा उत्साहपूर्ण वातावरणात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.


## आनंद, अश्रू आणि आभार... ७७


मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस राज्यातून उदंड प्रतिसाद लाभला. या योजनेचा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील सर्व महिला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त करत आहेत. राज्यातील महिलांच्या काही निवडक प्रतिक्रिया...

वर्ष ७५ वे | अंक ७ | जुलै-ऑगस्ट २०२४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

■ मुख्य संपादक ब्रिजेश सिंह
■ व्यवस्थापकीय संपादक हेमराज बागुल
डॉ. राहुल तिडके
■ संपादक दयानंद कांबळे
■ सहसंपादक दत्तात्रय कोकरे
अश्विनी पुजारी
पवन राठोड
गजानन पाटील
■ मुखपृष्ठ सीमा रनाळकर
सुशिम कांबळे
■ मांडणी, सजावट शैलेश कदम
■ मुद्रितशोधन भाग्यश्री पेठकर
■ मुद्रण मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# महाराष्ट्राच्या राज्यपालपदी सी. पी. राधाकृष्णन

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यपालपदाची नुकतीच शपथ घेतली. राजभवन येथील दरबार हॉलमध्ये झालेल्या समारंभात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी त्यांना शपथ दिली.

राज्यपाल यांच्या पत्नी सुमथी आर., मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मंत्रिमंडळाचे सदस्य, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अपर मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांचे कुटुंबीय आदी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी राज्यपालांच्या नियुक्तीबाबतचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा आदेश वाचून दाखवला. शपथसोहळ्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यपालांना शुभेच्छा दिल्या.



## संक्षिप्त परिचय

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ३१ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. महाराष्ट्रात राज्यपालपदी नियुक्ती होण्यापूर्वी ते झारखंडचे राज्यपाल होते. आपल्या राज्यपालपदाच्या कालावधीत त्यांनी तेलंगणाचे राज्यपाल आणि पुद्दुचेरीचे नायब राज्यपाल म्हणूनदेखील अतिरिक्त कार्यभार सांभाळला आहे. श्री. राधाकृष्णन हे चार दशकांपासून तामिळनाडूचे राजकारण; तसेच सार्वजनिक जीवनातील एक सुपरिचित व्यक्तिमत्त्व राहिले आहेत. त्यांचा जन्म ४ मे १९५७ रोजी तिरुपूर, तामिळनाडू येथे झाला आणि त्यांनी व्यवसाय प्रशासनात पदवी प्राप्त केली. सन १९९८ मध्ये ते पहिल्यांदा कोईम्बतूरमधून लोकसभेवर निवडून गेले. त्यानंतर १९९९ साली ते तेथूनच पुन्हा एकदा लोकसभेवर निवडून गेले. आपल्या खासदारकीच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी वस्त्रोद्योगसंबंधी संसदीय स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषवले. सार्वजनिक उपक्रमांसाठी (पीएसयू) संसदीय समितीचे आणि अर्थविषयक संसदीय सल्लागार समितीचेदेखील ते सदस्य होते. स्टॉक एक्स्चेंज घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या संसदीय विशेष समितीचेदेखील ते सदस्य होते.

सन २००४ मध्ये श्री.राधाकृष्णन यांनी संसदीय शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून संयुक्त राष्ट्र महासभेला संबोधित केले. तैवानच्या दौऱ्यावर गेलेल्या पहिल्या भारतीय संसदीय शिष्टमंडळाचेदेखील ते सदस्य होते. सन २०१६ मध्ये श्री. राधाकृष्णन यांची कॉयर बोर्ड, कोचीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. हे पद त्यांनी चार वर्षे सांभाळले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली देशातील कॉयरची निर्यात २५३२ कोटी रुपये या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचली. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी श्री. राधाकृष्णन यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली. श्री. राधाकृष्णन यांनी अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन, पोर्तुगाल, नॉर्वे, डेन्मार्क, स्वीडन, फिनलंड, बेल्जियम, हॉलंड, तुर्की, चीन, मलेशिया, सिंगापूर, तैवान, थायलंड, इजिप्त, संयुक्त अरब अमिरात, बांग्लादेश, इंडोनेशिया आणि जपान या देशांना भेटी दिल्या आहेत.

# महाराष्ट्राची महाभरारी

राज्य शासनाची आजवरची वाटचाल म्हणजे स्वराज्याकडून सुराज्याकडे नेणारा गतिमान प्रवास आहे. महाराष्ट्राच्या समृद्धीचा दस्तऐवज म्हणता येईल, असा हा कालखंड आहे. विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. शासन लोकांच्या हिताचे निर्णय घेऊन विविध कल्याणकारी योजना राबवत असते. या योजनांच्या अंमलबजावणीत लोकांचा सहभाग हा महत्त्वाचा घटक ठरतो. महाराष्ट्र राज्याची ज्या दिशेने वेगाने पावले पडत आहेत, ती प्रगती पाहता येणारा काळ हा सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासाचा असणार आहे. राज्याचा हा प्रगतीचा आलेख असाच उंचावत राहावा, यासाठी शासन सदैव प्रयत्नशील असणार आहे. सामान्य माणसाला डोळ्यासमोर ठेवून शासनाने कल्याणकारी निर्णय घेतले आहेत. शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, कामगार यांच्या श्रमाचे मूल्य जाणून त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी ठोस पावले उचलण्यात आली आहेत. देशभरात महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल बोलले जात असताना बचतगटांच्या चळवळीचा संदर्भ अपरिहार्यपणे येतो. महिलांचे आर्थिक आणि सामाजिक स्थान उंचावणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे महिलांचा आत्मसन्मान वाढण्यास मदत झाली आहे. राज्यभरात ठिकठिकाणी महिलांचा मिळालेला प्रतिसाद याची साक्ष देतो. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा जपत या सरकारने महिलांना केंद्रस्थानी ठेवून विकासाची वाटचाल गतिमान केली आहे.

विकासाच्या बाबतीत जागतिक पातळीवरील संकल्पना आता बदलत चालल्या आहेत. निव्वळ आर्थिक विकास म्हणजे विकास नव्हे, तर बदललेल्या संकल्पनेत आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्याच्या सोयीसुविधा, रोजगार निर्मिती, ग्रामीण रस्ते, महामार्ग, रेल्वे मार्ग, मेट्रो, विमानतळ, जलमार्ग यांसारख्या सुविधांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी दिला जाणारा निधी हा केवळ खर्च नसून ती भविष्यासाठी केलेली गुंतवणूक बनली आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्याला लोककल्याणकारी राज्य म्हणून देशात ओळख प्राप्त झाली आहे. या लोककल्याणकारी राज्यात जनतेच्या हिताच्या, त्यांच्या प्रगतीला प्रोत्साहन देणाऱ्या लोककल्याणकारी योजना राबवण्याचे काम या शासनाने केले आहे.

राज्यात रोजगारक्षम युवा पिढी घडवण्याचे शासनाचे धोरण असून युवकांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरिता ५,५०० कोटींची तरतूद केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्याबरोबरच विद्यार्थीहिताला प्राधान्य देऊन शासनामार्फत विविध योजना राबवल्या जात आहेत. राज्यातील युवकांना परदेशात रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यादृष्टीने जर्मनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठीदेखील आवश्यक ती पावले उचलण्यात येत आहेत.

राज्याची अर्थव्यवस्था ही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. बळीराजाच्या उत्पन्न वाढीसाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत ९१,९३,००० इतक्या शेतकरी कुटुंबांना ७,१३४.६६ कोटी रुपयांचे अनुदानही देण्यात आले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासींच्या विकासासाठी यावर्षी १५,३३६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सामाजिक मागासलेपण दूर करण्याच्या कार्यक्रमाला गती देण्यासाठी या शासनाची नेहमीच ठोस भूमिका राहिलेली आहे.

मुंबईचा कायापालट हे सर्वसामान्य मुंबईकरांचे स्वप्न आहे. ते स्वप्न साकार करण्यासाठी शासनाने कंबर कसली आहे. मुंबई मेट्रो, मुंबईचे सुशोभीकरण, मुंबई नागरी पायाभूत प्रकल्प, मरीन लाईन, फ्लाय ओव्हर, कोस्टल रोड, मुंबई ट्रान्सहार्बर लिंक (न्हावा-शिवडी) हे प्रकल्प हाती घेऊन ते जवळपास पूर्णही करण्यात आले आहेत. महापूर, दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस, शेतमालाचे नुकसान अशा विविध नैसर्गिक समस्यांशी लढत असताना विकासाचा दोर हातातून सुटू द्यायचा नाही, याचे भान शासनाने ठेवले आहे. राज्य शासनाच्या गेल्या दोन वर्षांच्या कारकिर्दीत महाराष्ट्राने विविध क्षेत्रात आपले अग्रस्थान कायम ठेवले आहे. गेल्या दोन वर्षांत औद्योगिक विकास आणि देशी-परदेशी गुंतवणुकीच्या बाबतीत शासनाने देदीप्यमान कामगिरी केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे उद्योगांसाठी जागतिक पातळीवरचे एक महत्त्वाचे डेस्टिनेशन बनले आहे. विद्यमान शासनाच्या कारकिर्दीत प्रत्येक विभागाने केलेल्या कार्याचा लेखा-जोखा मांडण्याचा प्रयत्न 'लोकराज्य'च्या या अंकात घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रगतीचे दर्शन त्याद्वारे घडू शकेल. हा अंक आपणास नक्की आवडेल, अशी खात्री आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

आम्हाला सत्तेत येऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. एखाद्या शासनाच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी हा कालावधी पुरेसा नाही; पण ज्या तडफेने आणि वेगाने आम्ही निर्णय घेतले आहेत, ते पाहता आमचे शासन पुढील काळात राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी किती दमदार पावले टाकत आहे, त्याची प्रचिती आली. केवळ पायाभूत सुविधा नव्हे, तर समाजातल्या सर्व दुर्बल, महिला, युवा, शेतकरी, कामगार आणि वंचितांसाठी आमचे सरकार आहे, हे आमच्या निर्णयांवरून दिसते. निश्चितच महाराष्ट्र वेगाने प्रगतीचे शिखर गाठतोय.

# महाराष्ट्र गाठतोय प्रगतीचं शिखर...

**एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



आज एका गोष्टीचे समाधान आहे. ज्या उद्दिष्टाने आमचे सरकार दोन सव्वा दोन वर्षांपूर्वी सत्तेवर आले, त्या दिशेने आम्ही काही दमदार पावले टाकली आहेत. विशेष म्हणजे जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद आहे. एखाद्या राज्याच्या आर्थिक शक्तीविषयी बोलायचे तर उद्योग-गुंतवणुकीचा उल्लेख करावा लागतो. मात्र शेतकरी, कष्टकरी, महिला, युवा, कामगार यांच्या श्रमाचे मूल्य कितीतरी पटीने मोठे आहे. आपल्या राज्याचे हे घटकच खरे आधार आहेत आणि म्हणूनच त्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणण्याची संधी मला, मुख्यमंत्री झालो तेव्हा मिळाली आणि फार वर्षांपासून काही चांगल्या गोष्टी करण्याचे माझ्या मनात होते, त्या सुरू करता आल्या. अर्थातच माझ्याबरोबर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासारखे दूरदृष्टी असलेले अनुभवी सहकारी आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशाला एका उंचीवर नेणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासारख्या नेत्याची मार्गदर्शक म्हणून आम्हाला साथ आहे.

### महिलांचे कल्याण

गेल्या काही दिवसांपासून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला कसा मोठा प्रतिसाद मिळतोय ते अवघा देश पाहतो आहे. आमचा हा निर्णय आम्ही नक्की कुणाच्या हितासाठी काम करत आहोत, त्याचे हे उदाहरण आहे. खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी हे घटक आमच्या डोळ्यासमोर आहेत. दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्ज्वल कसे होईल, हे आम्ही पाहिले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत रक्षाबंधनानिमित्त पुण्याला झालेल्या राज्याच्या मुख्य कार्यक्रमात १ कोटीपेक्षा जास्त भगिनींना आम्ही दोन महिन्यांच्या हप्त्यापोटी तीन हजार रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा केले आणि आम्ही कर्तव्याला चुकत नाही हे दाखवून दिले. गेल्या महिनाभरात १ कोटी ४० लाखांपेक्षा जास्त भगिनींनी यासाठी नोंदणी





## दुर्बलांना शक्ती देणारे निर्णय

आज जीवनमानाचा विचार करतो तेव्हा आरोग्य महत्त्वाचे आहे. 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करत असून, त्यापैकी ३४७ दवाखाने सुरू झाले आहेत. येथे रुग्णांना विनामूल्य उपचार दिले जात आहेत. लाखो रुग्णांनी याचा फायदा घेतला आहे. आज राज्यात दीड कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत. 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करून या वृद्धांना आवश्यक ती उपकरणे आणि साधने देत आहोत. एसटीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आहे. खेड्यापाड्यातील लाखो लोक याचा फायदा घेत आहेत. मोदी आवास योजनेत ३ वर्षांत १० लाख घरे बांधणार आहोत. त्यासाठी १२ हजार कोटी देत असून अडीच कोटी लाभार्थींना ३७५ कोटींचा पहिला हप्ता दिला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत ग्रामीण आणि शहरी भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी घरे बांधणे सुरू आहे. ११ लाख घरे बांधून पूर्ण आहेत. कोलाम, कातकरी व माडीया गोंड अशा अगदी आदिम समाजातील लोकांनासुद्धा हक्काची घरे देण्यासाठी आपण त्यांना अर्थसाहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील विविध दुर्बल समाज घटकांना आम्ही शक्ती देत आहोत. अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था' म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा निर्णयही महत्त्वाचा आहे. असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करत आहोत. त्याचा करोडो कामगारांना लाभ मिळणार आहे. गरीब आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार योजना सुरू केली आहे. निराधारांच्या अर्थसाहाय्यात वाढ, विविध घटकांसाठी मोठ्या प्रमाणावर घरे बांधणे अशा योजनांमुळे निश्चितच सर्वसामान्यांचे जीवनमान बदलणारे आहे.

केली आहे, त्यांना दरमहा दीड हजार रुपये मिळायला सुरुवात झाली आहे.

महाविद्यालयीन प्रवेश शुल्क भरता येत नाही म्हणून एक-दोन मुलींनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे व्यथित होऊन मी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना दूरध्वनीवरून संपर्क केला आणि मोफत शिक्षणाची योजना आखली. आता राज्यातल्या मुलींना अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, वैद्यकीय; तसेच कृषीविषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी मोफत शिक्षण देत आहोत. याशिवाय गरीब कुटुंबाला वर्षाला तीन सिलिंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना', शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी १५ हजार कोटींचा प्रकल्प, शेतीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्ण वीज माफी देणारी 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना', सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम, दरवर्षी ५० हजार युवकांना प्रशिक्षण देणारी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' अशा आमच्या योजनांमुळे राज्य शासनाची बांधिलकी दिसते.




पायाभूत सुविधा आणि वाहतूक यंत्रणा अद्ययावत करण्यावर आमचा नेहमीच भर राहिला आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांमध्ये ४५० किलोमीटर लांबीचा मेट्रो मार्ग सुरू करणार आहोत. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत २३ हजार कि.मी. रस्त्यांची कामे, महापालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबवणे; तसेच इतर पायाभूत सुविधांची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येत आहेत. मात्र विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल, बोगदे, इमारती उभारणे नव्हे असे माझे नेहमी सांगणे असते. दुर्गम भागात एखाद्या आदिवासी आश्रमशाळेत शिक्षण घेणारा विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेऊन एखाद्या नामांकित कंपनीत वरिष्ठ पदावर जाते किंवा सरकारी नोकरीत मोठे पद मिळवते तेव्हा तो खरा विकास असतो. एखादी धुणीभांडी करणारी महिला स्वयंसहायता बचतगटातून सगळ्या कुटुंबाचा चरितार्थ चालवते तेव्हा ती फक्त तिची प्रगती नसते, हीच गोष्ट नेमकी लक्षात ठेवून आम्ही ७ लाख नवीन बचतगटांची स्थापना करून त्यांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये वाढ करण्याचा निर्णयही घेतला आहे. या बचतगटांच्या वस्तूंना उमेद मार्ट आणि ई-कॉमर्स ऑनलाइन प्लॅटफॉर्ममधून महिलांना लखपती करण्याचे आम्ही ठरवले आहे.

### रोजगार आणि स्वयंरोजगाराला गती

युवकांसमोर शिक्षणापाठोपाठ रोजगार, स्वयंरोजगाराचे आव्हान असते. अशा परिस्थितीत या युवकांचा हात हातात घेऊन त्यांना करिअरसाठी मदत करण्याचे ठरवले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सरकारी नोकरीचे युवकांना आकर्षण असते, त्यासाठी ते स्पर्धा परीक्षा देऊन प्रयत्न करत असतात. आम्ही शासनाच्या रिक्त पदांची भरती सुरू केली आहे. ७५ हजार रिक्त पदे भरण्याचे ठरवले आणि जवळजवळ ५८ हजार पदे भरली आहेत आणि २० हजार जणांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरू आहे. इतर मागास प्रवर्गाच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तींची संख्या १० वरून ५० केली. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उच्च शिष्यवृत्तीची रक्कम ५० हजारापर्यंत वाढवली.

### शेती आणि शेतकऱ्याला समर्थ करणे

शेतकरी तर अन्नदाता आहे. एकीकडे त्याला निसर्गाच्या अवकृपेतून वाचवणे आणि दुसरीकडे त्याचे उत्पन्न वाढवून अधिक मजबूत करणे अशा दुहेरी पातळीवर आम्ही कामाला सुरुवात केली. सत्तेवर आल्यापासून सरकार शेतकऱ्यांच्या मागे पूर्ण ताकदीने उभे आहे. गाव तेथे गोदाम या नवीन योजनेमुळे धान्य साठवणुकीचा प्रश्न निकाली निघेल. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार रुपये अर्थसाहाय्य, सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम, मागेल त्याला सौरऊर्जा पंप या योजनादेखील शेतकऱ्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवून आणतील. केवळ शेतीवर लक्ष केंद्रित केलेले नाही. शेतीपूरक व्यवसाय उदाहरणादाखल दुग्धव्यवसायाचा विकास कसा होईल हे पाहिले आहे. आम्ही विदर्भ आणि मराठवाड्यात १९ जिल्ह्यात दुग्ध विकासाला प्रोत्साहन देणारा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

आज मला सांगायला आनंद वाटतो की, गेल्या दोन वर्षांत सुमारे ४४ हजार कोटींपेक्षा जास्त निधी शेतीसाठी आम्ही देत आहोत. यात कृषी, सहकार व पणन, पशुसंवर्धन, दुग्धविकास, अन्न व नागरी पुरवठा असे सगळे विभाग आहेत जे शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवत आहेत. सततच्या पावसामुळे होणाऱ्या नुकसानासाठी आजपर्यंत कुणी मदत करत नव्हते. मात्र आम्ही नैसर्गिक आपत्ती घोषित करून ही मदत दिली. शेतकऱ्यांना नुकसानासाठी आम्ही १५ हजार कोटींपेक्षा जास्त मदत केली आहे. १ रुपयात पीक विमा,

नमो महासन्मान निधी योजनेत शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये, १२३ सिंचन प्रकल्पांना सुधारित मान्यता, काजू, संत्री, हळद अशा उत्पादनांवर प्रक्रिया केंद्रे, विविध शेतमालांच्या मूल्य साखळ्या विकसित करणे अशा माध्यमातून शेतकऱ्याला बळकट करतो आहोत.

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातील शेतीला समृद्ध करणाऱ्या महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. ८८ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे पावणेचार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार आहे. सिंचनाच्या १२३ प्रकल्पांना आम्ही सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन गती दिली आहे.

## उद्योगात मोठी घोडदौड

गेल्या सरकारमध्ये महाराष्ट्र हा देशातल्या राज्यांच्या विकासाच्या क्रमवारीत खाली घसरताना दिसत होता. मला पूर्वीच्या कारभारावर काही टीका करायची नाही, पण अशा आव्हानात्मक परिस्थितीत राज्याची अर्थव्यवस्था परत ताळ्यावर आणणे, गुंतवणूकदार असोत, उद्योजक किंवा सर्वसामान्य लोक असोत, त्यांच्यात आत्मविश्वास जागा करणे हे शिवधनुष्य होते. आज देशाच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के आहे, तर दुसऱ्या क्रमांकावरील तामिळनाडूचा वाटा ८.७ टक्के आहे. परदेशी गुंतवणुकीत देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. उद्योगात आणि सेवा क्षेत्रात राज्य क्रमांक एकवर आहे. विदेशी पर्यटकांची पसंतीही महाराष्ट्र आहे. राज्याचे स्थूल उत्पन्न ४० लाख ५० हजार कोटी इतके आहे.

जगभरातल्या उद्योग आणि गुंतवणुकदारांनी गेल्या दोन वर्षांत ५ लाख कोटींच्या गुंतवणुकीचे करार केल्याने आमचा उत्साह द्विगुणित झाला आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत त्याची प्रचिती आली आहे.

महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण - २०२४ आम्ही आखले आहे. या धोरणामुळे राज्यात सुमारे ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. यातून सुमारे ३०,५७३ कोटी उत्पन्न मिळणार आहे. गेल्या महिन्यातच छत्रपती संभाजीनगरमध्ये हायब्रीड कार्स उत्पादनाच्या २० हजार कोटींच्या गुंतवणूक टोयाटो किर्लोस्कर कंपनीच्या प्रकल्पासाठी आम्ही करार केला. विदर्भात सुरजागडसारख्या दुर्गम ठिकाणी १० हजार कोटींचा ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टिल प्रकल्प सुरू होत आहे. प्राधान्य क्षेत्रात आणि हरित हायड्रोजन क्षेत्रात संपूर्ण देशात झालेली नाही, अशी मोठी गुंतवणूक आम्ही करत आहोत. यात गुंतवणूक तर येईलच, पण मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळेल. मुंबई, पुणे, नागपूरच नाही, तर आकांक्षित जिल्ह्यांच्या प्रगतीकडे आमचे लक्ष आहे. गडचिरोलीसारख्या दूरवरील भागातल्या नागरिकांना महानगरातल्या नागरिकांप्रमाणे सेवा सुविधा मिळाल्या पाहिजेत, ही अपेक्षा व्यक्त करणे अतिरंजित नाही. राज्यातल्या तळागाळातल्या व्यक्तीचे उत्पन्न वाढावे, त्याचा सामाजिक स्तर वाढणे महत्त्वाचे आहे. शेवटी बदल घडवण्याची मानसिकता असणे गरजेचे आहे. आमचा अर्थसंकल्प म्हणजे काही फक्त पैशाचे आणि निधीचे नियोजन नाही, तर राज्यातल्या नागरिकांच्या सुख, समाधान आणि आनंदी जीवनमानाचे नियोजन आहे.



**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,** मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**राज्याने गेल्या अडीच वर्षांत एक विकासाभिमुख आणि लोकाभिमुख सरकार पाहिले. सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून आम्ही थांबलेला विकासरथ जोमाने पुढे नेला. पाच वर्षांचे काम आम्हाला अडीच वर्षांत पूर्ण करावे लागणार होते; परंतु असंख्य अडचणींना सामोरे जाऊन आम्ही शेतकरी, युवा, कामगार आणि महिलांच्या सबलीकरणासह राज्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतला आहे. महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर अग्रेसर होत आहे.**

# गतिमान विकास

**देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



सर्वसामान्य नागरिकांसाठी लोककल्याणकारी योजना राबवत असताना कृषी, सिंचन, उद्योग, ऊर्जा आदी क्षेत्रातही राज्य आघाडीवर आहे. राज्यात माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या २०१४-१९ या काळात अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांची पायाभरणी करता आली. दरम्यान महायुतीच्या या अडीच वर्षांत आम्ही पाच वर्षांचे काम करून दाखवू, असा निर्धार आम्ही केला होता. अवघ्या दोन वर्षांत देशात झालेल्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी सर्वाधिक गुंतवणूक राज्यात आणण्यात आम्हाला यश आले आहे. सलग दोन वर्षे महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत क्रमांक एकवर आहे.

मागील कार्यकाळात २०१८ मध्ये मराठा समाजासाठी आरक्षणाचा कायदा केला होता. कोर्टातही जोरदार लढा दिल्यामुळे हे आरक्षण वैध ठरले होते, मात्र मध्यंतरी अडीच वर्षांत अपुऱ्या समन्वयामुळे आरक्षण कोर्टात टिकले नाही. त्यानंतर या सरकारने अधिसंख्य पदांच्या माध्यमातून शासकीय सेवेत भरतीचा निर्णय घेतला. सुमारे ३,५५३ अधिसंख्य पदे निर्माण करून मराठा उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेतले. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. मराठा आरक्षणाबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या १ लाख लाभार्थ्यांचा टप्पा पूर्ण झाला आहे. या महामंडळामुळे मराठा समाजातील बांधवांना स्वतःचा उद्योग उभा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत झाली आहे. सारथीमुळे युपीएससी परीक्षेतील मराठा समाजाचा टक्का वाढला असून या संस्थेमार्फत उच्च शिक्षणासाठी फेलोशीप, शिष्यवृत्ती, एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जात आहे. सारथीच्या ८ विभागीय कार्यालयांसाठी १,०१५ कोटी रुपये देण्यात आले आहेत.



## सामाजिक संतुलन

वित्त मंत्री म्हणून पहिला अर्थसंकल्प मांडण्याची संधी मिळाली, तेव्हा विविध महामंडळांच्या स्थापनेतून समाजातील विविध घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. यामध्ये लिंगायत समाजासाठी 'जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ', गुरव समाजासाठी 'संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ', रामोशी समाजासाठी 'राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ', वडार समाजासाठी 'पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ' आदी मंडळांचा यात समावेश आहे.

## अर्थव्यवस्थेला भरारी देणारे प्रकल्प

राज्याच्याच नव्हे, तर देशाच्या विकासात योगदान देणारे प्रकल्प राज्यात उभे राहत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच भूमिपूजन झालेले वाढवण बंदर हे राज्यासह देशाच्या प्रगतीचे मोठे साधन ठरणार आहे. ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या या बंदरात जगातील कितीही मोठे जहाज येऊ शकेल. महाराष्ट्र आतापर्यंत मुंबई आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टमुळे प्रथम क्रमांकावर राहिले आहे; परंतु पुढील ५० वर्षे वाढवण बंदरामुळे महाराष्ट्र अव्वल राहील एवढी क्षमता या बंदरात आहे. जगातील १० मोठ्या बंदरांतील हे मोठे बंदर असून १२ लाखांपेक्षा जास्त तरुणांना यातून रोजगार मिळणार आहे. शिवाय मुंबईला वसई-विरारशी जोडण्याकरिताही हे बंदर मुख्य भूमिका बजावेल. दिघी बंदराच्या विकासासाठी ५,५०० कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारने मंजूर केला असून ६ हजार एकरावरील या बंदाराच्या माध्यमातून एक लाखाहून अधिक रोजगार निर्मिती होणार आहे.

गडचिरोलीसारखा नक्षलग्रस्त जिल्हा विकासाच्या मुख्य प्रवाहात आला असून १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असणाऱ्या सुरजागड इस्पात प्रकल्पामुळे येथे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ७ हजार रोजगार तयार होणार आहे. स्टिल सिटी म्हणून उदयास येत असलेल्या या जिल्ह्यातील तरुणांनी विकासाची कास धरली आहे. सुरजागड इस्पात व लॉइड प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर महाराष्ट्रात ३० टक्के पोलाद उत्पादन एकट्या गडचिरोलीतून होईल. लातूर येथे सुरू झालेल्या मराठवाडा रेल्वे कोच कारखान्यामुळे मराठवाड्यातील हजारो तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. पुढील १० वर्षांतील विकासाला समोर ठेवून लॉजिस्टिक धोरण तयार करण्यात आले आहे. यातून पाच वर्षांत ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल तसेच राज्याला ३० हजार कोटींचे उत्पन्न मिळेल.

राज्याच्या विकासाची भाग्यरेषा असलेला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा पूर्ण होऊन नागपूर ते मुंबई पूर्ण वाहतूक लवकरच सुरू होणार आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी रस्ता - (कोस्टल रोड) मुंबईचे जीवन सुसह्य करत आहे. मुंबई महानगरक्षेत्रासह पुणे व नागपूर या शहरांमध्ये मेट्रोचे जाळे उभे करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असून त्यातील काही प्रकल्पांचे लोकार्पण झाले आहे, तर उर्वरित पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. अटल सेतू व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे तिसऱ्या मुंबईच्या विकासात मोठे योगदान असणार आहे. त्याचबरोबर दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर, पुरंदर विमानतळ, २७ हजार कोटी रुपयांचा पुण्याचा रिंगरोड, १२६ किलोमीटर लांबीची विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका, ग्रीनफिल्ड एअरपोर्ट शिर्डी, बुलेट ट्रेन, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे मिसिंग लिंक आदी प्रकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणार असून राज्याला वन ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे घेऊन जाणारे आहेत.

## सर्व घटकांचा विकास

राज्याच्या पायाभूत विकासाचे प्रकल्प राबवत असताना सर्वसामान्य घटकांच्या विकासाला प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. शेतकरी, विद्यार्थी, महिला, कामगार आदी घटकांच्या कल्याणासाठीच्या योजना जेवढ्या लोकप्रिय ठरत आहेत, तेवढ्याच त्या त्यांचा गुणात्मक विकास घडवून आणणाऱ्या आहेत.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'मुळे राज्यातील भगिनींना हक्काच्या आधारासह आर्थिक बळ मिळाले आहे. या योजनेशिवाय महिलांच्या उत्कर्षाच्या अनेक योजना राबवत आहेत. एसटी बस प्रवासात ५० टक्के सवलतीमुळे महिलांना मोठा आधार मिळाला आहे. आठ लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थिनींना शैक्षणिक व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ केले असल्याने कुठलीही बहीण शिक्षण शुल्काअभावी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. युवक-युवतींच्या हाताला काम मिळावे, यासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेमुळे युवकांना रोजगार व उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण होत आहे.

७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवास मोफत करण्यात आला. ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबवली जात असून एकवेळ एकरकमी मदत ३,००० रुपये त्यांच्या खात्यात थेट वितरण करण्यात येत आहे. दिव्यांगांसाठी दिव्यांग कल्याण विभागाची स्थापना करण्यात आली. प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेमुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना आर्थिक व नैतिक बळ मिळत आहे.

जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत ५० हजारांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. या योजनेमुळे शेतकरी आता दोन ते तीन पिके घेऊ शकत आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेंतर्गत ३३८ हून अधिक जलाशयांतून गाळ काढण्याचे काम सुरू असून लोकसहभागातून आतापर्यंत ८३ लाख घनमीटरहून अधिक गाळ काढण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना राबवण्यात येत आहेत. 'नमो शेतकरी सन्मान' योजनेमध्ये केंद्र शासनाच्या ६,००० रुपयांव्यतिरिक्त राज्य शासनाचे ६,००० रुपयांची आणखी भर घालण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांना आता १२,००० रुपये मिळत आहे. मागेल त्याला सोलर पंप मिळत आहे. एक रुपयात पीकविमा उतरवला जात आहे.

## ऐतिहासिक नोकरभरती

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने राज्यात ७५ हजार नोकरभरतीचा संकल्प घेतला होता. आतापर्यंत ५७ हजारांहून अधिक

उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. तर १९ हजारांहून अधिक उमेदवारांना आदेश देण्याची प्रक्रिया सुरू असून ३१ हजार पदांच्या भरतीबाबत कार्यवाही सुरू आहे. या माध्यमातून सरकारी नोकर भरती एक लाखाच्या वर गेली आहे. गृह खात्यात १७ हजार पदभरती यापूर्वी झाली असून, नव्याने १७ हजार पदभरतीची कार्यवाही सुरू आहे. राज्यात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या 'नमो महारोजगार मेळाव्या'च्या माध्यमातूनदेखील खासगी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळवून देण्यात आले.

## ऊर्जा पर्व

राज्याने शेतकरी व सर्वसामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवून ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज मिळावी म्हणून 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' जाहीर करण्यात आली असून राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना एप्रिलपासून पुढील पाच वर्ष मोफत वीज दिली जात आहे.

राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. येत्या दीड वर्षांमध्ये राज्यात सौर ऊर्जेद्वारे १२ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. त्यासाठी डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प राज्यात उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे आगामी २५ वर्षे राज्याला सौरऊर्जेचा वापर करून निर्माण केलेली स्वस्तातील वीज मिळणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करणे आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करणे ही दोन उद्दिष्टे या योजनेमुळे साध्य होत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असल्याने त्यांना सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही.



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत ऊर्जा प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी होईल. यामध्ये खासगी क्षेत्राची सुमारे ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे. यामुळे राज्यात २० हजार रोजगारनिर्मिती होईल. तसेच राज्य सरकारची हजारो कोटी रुपयांची सबसिडी वाचेल. या प्रकल्पासाठी सद्य:स्थितीत राज्यातील २३,७९९ एकर सार्वजनिक जमीन उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचबरोबर शेतकरी आपली पडीक जमीन भाड्याने देऊ शकतात. शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये वार्षिक भाडे मिळेल व त्यामध्ये दरवर्षी तीन टक्के वाढ होईल. २८ जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा निर्मितीसाठी खासगी विकासकांना ९,१५५ मेगावॅट क्षमतेचे कार्यादेशही देण्यात आले असून काही महिन्यातच प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरू होऊन त्याचा शेतकऱ्यांना लाभ होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र हे केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील प्रमुख सौर ऊर्जानिर्मिती केंद्र ठरेल.

**हरित हायड्रोजन :** हरित हायड्रोजन निर्मिती आणि विकासासाठी 'महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण २०२३' ठरवण्यात आले असून महाऊर्जामार्फत ८ हरित हायड्रोजन विकासकांसोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या सर्व प्रकल्पांची क्षमता १०१० केटीपीए असून यामध्ये २ लाख ९१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. यातून ६८ हजार रोजगार निर्मिती होईल व प्रतिवर्ष ५.६७ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जनात कपात होईल.

**मागेल त्याला सौर कृषी पंप :** शेतकऱ्यांना सिंचनासाठी हक्काची व स्वतंत्र सुविधा मिळावी, यासाठी ही योजना सुरू केली आहे. यामध्ये ९० टक्के अनुदान दिले जात असून शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा मिळत आहे.

**घरघुती वीज मोफत :** 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' राज्यात प्रभावीपणे राबवली जात असून वीज ग्राहकांना घराच्या छतावर सोलर पॅनेल बसवून वीजनिर्मिती करण्यासाठी अनुदान दिले जात आहे. यामुळे वीजबिल शून्य होत असून अतिरिक्त वीज शासन विकत घेत असल्याने त्यातून ग्राहकांना पैसेही मिळत आहे. आतापर्यंत दीड लाखांहून अधिक ग्राहकांनी असे सोलर प्रकल्प बसवले आहेत. राज्यात मान्याचीवाडीचे हे पहिले सौर ग्राम बनले असून प्राथमिक स्तरावर राज्यातील १०० गावे १०० टक्के सौरऊर्जेवर आणली जात आहेत.

**सर्वसामान्यांच्या हितासाठी :** राज्यात दोन वर्षांत २३ लाखांहून अधिक नवीन वीज जोडण्या दिल्या गेल्या. कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे वाट पाहावी लागत होती. पेड पेंडिंगवर मार्ग काढत गेल्या सव्वा दोन वर्षांत २ लाख ९५ हजार कृषिपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या. ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीला गती देण्यात आली. ग्राहकांसाठी ऊर्जा चॅट बॉटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. डिजिटल पेमेंटला चालना देण्यात आली असून उद्योगांसाठी स्वागत सेल कक्षाची स्थापना केली आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी राज्यात मोठ्या प्रमाणावर चार्जिंग स्टेशन उभारली जात आहेत.

## न्यायाचे राज्य

राज्य शासन सर्वसामान्यांच्या हितासाठी अहोरात्र झटत आहे. निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात उपचार मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री कार्यालयांतर्गत विशेष वैद्यकीय मदत कक्ष तत्परपणे कार्य करत आहे. प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयातील एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सेवेचा लाभ मिळवण्यासाठी

निर्धनांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा १,८०,००० रुपये, तर दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी ३,६०,००० रुपये एवढी वाढवण्यात आली आहे.

राज्यात १२ जिल्ह्यांमध्ये १४ जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालये, ११ जिल्ह्यांमध्ये १३ दिवाणी न्यायालये वरिष्ठस्तर, ५ जिल्ह्यांमध्ये ५ ग्राम न्यायालये स्थापन केली जात आहेत. न्यायिक अधिकाऱ्यांची २८६३ पदांची; तसेच त्यांच्यासाठी साहाय्यभूत कर्मचाऱ्यांची ११,०६४ नवीन पदांची निर्मिती करण्यास व बाह्ययंत्रणेद्वारे ५,८०३ इतके मनुष्यबळ घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## कायदा व सुव्यवस्थेला प्राधान्य

राज्यात पोलीस दलाचे बळकटीकरण केले जात आहे. राज्यात सुरक्षेच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहे. यामध्ये मुंबई शहरात पहिल्या टप्प्यात ५,२६० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, दुसऱ्या टप्प्यात ५,८३७ कॅमेरे बसवण्यात येत आहेत. ठाणे येथे ६,०५१, पुणे व पिंपरी चिंचवड शहरात १,३४१ कॅमेरे बसवण्यात आले असून १,४०६ कॅमेरे बसवले जात आहेत. त्याचबरोबर राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये; तसेच शहरांतील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू आहे.

राज्यात ८३७.८६ कोटी रुपयांचा सायबर सुरक्षा प्रकल्प राबवला जात आहे. यामुळे सायबर गुन्हांची जलद गतीने उकल होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच सायबर विभागातील थकित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी सेमी ऑटोमेटेड प्रोसेसिंग फॉर पेंडन्सी रिमूव्हल प्रकल्प राबवला जात आहे. ७५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सुमारे ६० हजार मोबाइल; तसेच ८ हजार हार्ड डिस्क एवढ्या मुद्देमालाचे विश्लेषण करणे शक्य होणार आहे. राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर वाढवण्यात येत आहे.

राज्यातील पोलीस पाटील यांचे मानधन ६,५०० रुपयांवरून १५,००० रुपये करण्यात आले. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पोलिसांना शासकीय नियमित घरबांधणी अग्रीम योजना लागू करण्यात आली आहे. तसेच पोलिसांना वर्षाला १२ ऐवजी २० सुट्या देण्याचा निर्णय घेण्यात आला. नक्षलवादी कारवाईसह अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी, संघटित गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपत्कालीन काळात मदत करताना मृत झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या विधवा पत्नीस पुनर्विवाह केल्यानंतरही कुटुंब निवृत्तिवेतनाचा लाभ देण्याचा निर्णय घेतला.

नवीन कारागृह व कर्मचारी निवासस्थाने बांधली जात आहेत. यामध्ये तळोजा मध्यवर्ती कारागृह, नारायणडोह (जि. अहमदनगर) व उमरोळी (जि. पालघर) कारागृह व कर्मचारी निवासस्थानांचा समावेश आहे. कारागृह विभागात २,००० नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांचे संगणकीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी ३७७ कोटी रुपये खर्च केला जाणार असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाने या प्रयोगशाळा सज्ज होणार आहेत. पुणे येथील प्रादेशिक न्याय सहायक प्रयोगशाळेत सर्व सुविधांनी युक्त असे 'संगणकीय न्याय सहायक विज्ञान उत्कृष्टता केंद्र' स्थापन केले जात असून, त्यासाठी ४३.६६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे.

गुन्ह्यांमध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ज्ञांकडून घटनास्थळांना भेट देऊन परिस्थितीजन्य पुरावे गोळा करण्यासाठी २५४ मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन्स खरेदी केल्या जाणार असून या वाहनांसाठी आवश्यक मनुष्यबळ, फॉरेन्सिक किट्स व आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर २१ मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन्स प्रकल्पास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाकरिता १,३७६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

प्रादेशिक न्यायसहायक प्रयोगशाळा कोल्हापूर नवीन इमारतीचे काम पूर्ण झाले असून मुंबई, नागपूर, नांदेड येथील प्रयोगशाळा इमारती व निवासस्थानांचे काम प्रगतिपथावर आहे.

### सिंचन समृद्धी

राज्यात जुलै २०२२ पासून विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्रातील सिंचनाशी संबंधित १.९६५ लाख कोटी रुपयांच्या १३६ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे सुमारे २१.०४ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्ह्यातील गोसिखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून तापी खोऱ्यातील बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळवण्यात येणार आहे. त्यासाठी ४२६.५२ कि.मी. लांबीच्या जोड कालव्याची निर्मिती केली जाणार आहे. या प्रकल्पामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा या जिल्ह्यांतील १५ तालुक्यांमधील एकूण ३,७१,२७७ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी या पाण्याचा उपयोग करण्याचे नियोजित आहे. यासाठी ८८,५७४.९२ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उत्तर महाराष्ट्रातील उर्ध्व गोदावरी प्रकल्प, नांदूर मधमेश्वर प्रकल्प, निम्न तापी प्रकल्प, पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना, टेंभू उपसा सिंचन योजना, मराठवाड्यातील कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, गंगापूर उपसा सिंचन योजना, बाभळी मध्यम प्रकल्पांच्या माध्यमातून सिंचन समृद्धी निर्माण होत आहे.

**शब्दांकन : कीर्ती पांडे,** मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या जनसंपर्क अधिकारी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शासनाला नुकतीच दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. राज्याचा गतीने विकास करण्यासाठी, लोकहिताच्या कामांना वेग देण्यासाठी आम्हीदेखील त्यांच्याबरोबर सामील होऊन एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. या कालावधीत राज्याच्या सर्वांगीण, समतोल, सर्वसमावेशक आणि पर्यावरणपूरक विकासासाठी विविध प्रकल्प राबवतानाच नागरिकांना लाभ आणि बळ देणाऱ्या महत्त्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. भविष्यात या विकास प्रक्रियेला आणखी गती दिली जाणार आहे.

# लोकहिताचे निर्णय वेगवान

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



अन्नदाता शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, युवा, वंचित-उपेक्षित, अल्पसंख्याक घटकांच्या प्रगतीसाठी अर्थसंकल्पात महत्त्वाच्या योजना घोषित करून त्याचे प्रत्यक्ष लाभ देण्यास सुरुवात झाली आहे. राज्याची अर्थव्यवस्था वर्ष २०२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार विविध धोरणे, योजना, अभियाने, उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. देशाला महासत्ता बनवण्याच्या दिशेने जाताना महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. आपला देश ज्यावेळी 'विकसित भारत' म्हणून स्वातंत्र्याचा शतकमहोत्सव साजरा करत असेल, त्यावेळी आपला महाराष्ट्र देशातील पहिले 'विकसित राज्य' झालेले असेल, असा मला विश्वास आहे.

## सामाजिक न्याय हाच विकासाचा पाया

महाराष्ट्राचे आराध्यदैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांनी घालून दिलेल्या 'कल्याणकारी राजा'च्या संकल्पनेनुसार राज्य शासन प्रभावीपणे काम करत आहे. क्रांतिसूर्य महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण या महामानवांच्या विचारांवरच महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून या महापुरुषांचा वारसा आणि विचार सक्षमपणे पुढे नेण्यात येत आहेत.

सामाजिक न्याय हाच महाराष्ट्राच्या विकासप्रक्रियेचा पाया तसेच प्रमुख आधार राहिला आहे.



## महिलांच्या सक्षमीकरणास प्राधान्य

देशाच्या स्वातंत्र्यासाठीची लढाई असो की, सामाजिक सुधारणा असोत, आपल्या महाराष्ट्राचा त्यात नेहमीच सक्रिय पुढाकार राहिला आहे. महाराष्ट्राने नेहमीच महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले आहे. देशातील महिलांची पहिली शाळा याच राज्यात सुरू झाली. बहुजनांना शिक्षणाची संधी-अधिकार देणारे, महिलांना शिक्षण, नोकरी, राजकीय क्षेत्रात आरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातले पहिले राज्य आहे. महिलांना वडिलोपार्जित संपत्तीत समान हक्क, शासकीय सेवेत ३३ टक्के राखीव जागा, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण असे अनेक क्रांतिकारी निर्णय महाराष्ट्राने देशात पहिल्यांदा घेतल्याचे पाहायला मिळते. राज्याने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात वेळोवेळी कालसुसंगत सुधारणा केल्या. राज्याचे चौथे अष्टसूत्री महिला धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे.

### सामाजिक प्रगतीला चालना

राज्यातील प्रत्येक युवकाच्या हाताला काम मिळाले पाहिजे, एकही युवक बेरोजगार राहता कामा नये. रोजगारातून युवकांची आणि त्याच्या कुटुंबाची प्रगती झाली पाहिजे, या विचाराने आम्ही काम करत आहोत. त्यामुळेच राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणारी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा देणारी 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना', ज्येष्ठ नागरिकांना देवदर्शनाचा, तीर्थक्षेत्र प्रदक्षिणेचा लाभ देणारी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना', ६५ वर्षांवरील नागरिकांसाठीची 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' अशा वैयक्तिक लाभाच्या योजनांमुळे जनतेचा विकासप्रक्रियेतील सहभाग वाढणार आहे. सामाजिक प्रगतीला चालना मिळणार आहे.

देशाच्या लोकसंख्येत ५० टक्क्यांचा वाटा असणाऱ्या महिला वर्गाचा विकास झाल्याशिवाय समाजाचा आणि देशाचा विकास होऊ शकत नाही, याची आम्हाला जाणीव आहे. देशाच्या प्रगतीत महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. महिलांना राजकीय, सामाजिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्याशिवाय देशाचे सक्षमीकरण पूर्ण होऊ शकत नाही. सुदैवाने, महाराष्ट्राची भूमी ही संत-महात्म्यांची, समाजसुधारकांची भूमी आहे. या भूमीने महिलांचा नेहमीच सन्मान केला आहे. महिलांच्या सन्मानाचा हा पुरोगामी वारसा पुढे नेण्याचे काम आम्ही करत आहोत. आपली आई, बहीण, मुलगी या स्त्रीशक्तीबद्दल राज्य शासनाने केवळ शब्दातून कृतज्ञता व्यक्त केली नाही, तर महिलांना लाभ आणि बळ देणाऱ्या, विकासाची समान संधी देणाऱ्या, सुरक्षिततेचा विश्वास देणाऱ्या विविध योजना आखल्या आहेत. त्याचे प्रतिबिंब आपल्याला अर्थसंकल्पात निश्चितपणे दिसून येईल.

राज्यातल्या माता-भगिनी आर्थिक स्वावलंबी व्हाव्यात, त्यातून त्यांचे सक्षमीकरण व्हावे, स्वत:च्या आणि मुलांच्या आरोग्य-पोषणाकडे त्यांना लक्ष देता यावे, यादृष्टीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही महत्त्वाकांक्षी योजना रक्षाबंधन सणापासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत २१ ते ६५ वर्षापर्यंतच्या वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये देण्यात येत आहेत. या योजनेसाठी वर्षाला ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सुमारे पावणे दोन कोटी महिलांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे, त्यातील सव्वा कोटी महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा झाले आहेत. उर्वरित महिलांनादेखील लवकरच पैसे मिळणार आहेत. या योजनेमुळे महिलांचा सर्वसमावेशक विकास होणार असून त्यांच्या आर्थिक-सामाजिक-मानसिक सक्षमीकरणाला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे. त्यांना घरात, समाजात मान, सन्मान, आदर, प्रतिष्ठा मिळणार आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक नवीन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक मदत देणारी 'पिंक ई-रिक्षा' योजना, राज्यातील ५२ लाख कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना', महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना' सुरू करण्यात आली आहे. महिला बचतगटांच्या चळवळीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. महिलांच्या स्वयंसाहाय्यता गटांना देण्यात येणाऱ्या फिरत्या निधीत दुपटीने वाढ करून ३० हजार रुपये निधी प्रत्येक गटाला देण्यात येत आहे. बचतगट चळवळीतील संसाधन व्यक्तींच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे. १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्याचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव या क्रमाने करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना या वर्षापासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वैद्यकीय, शेतीविषयक सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती देण्यात येणार आहे.

## शाश्वत विकासाचे ध्येय

दारिद्र्य निर्मूलन आणि जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून अविरतपणे सामाजिक विकासाचे प्रयत्न सुरू आहेत. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील घटकांच्या उन्नतीकरिता विविध योजना राबवण्यात येत आहेत. राज्यातील बौद्ध, जैन, शीख, पारसी, ख्रिश्चन व मुस्लीम या अल्पसंख्याक समुदायातील घटकांच्या विकासासाठी आमचे सरकार वचनबद्ध आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजना परिणामकारकपणे राबवणे, नवीन योजना आखणे आणि त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे या धोरणातून 'सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य नाहीसे करणे' हे शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्याचा आमचा निश्चय आहे.

राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी नवनवीन योजना, संकल्पना राबवण्यावर भर देण्यात येत आहे. त्यांच्यासाठीच्या विकास योजनांना गती देण्यासाठी

आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. शासनाने अल्पसंख्याक आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला असून त्याची कार्यवाही सध्या अंतिम टप्प्यात आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'टार्टी', 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे.

## निर्मल वारीसाठी निधी

विठुरायाची भक्ती आणि पंढरपूरची पायी वारी ही महाराष्ट्राची शेकडो वर्षांची गौरवशाली आध्यात्मिक, संतपरंपरा, भक्तिपरंपरा आहे. साधारण एक हजार वर्षांची परंपरा असलेल्या या वारीशी, वारकरी भक्तिमार्गाशी महाराष्ट्राची नाळ जोडलेली आहे. महाराष्ट्राची ओळख म्हणून वारीची जगभर दखल घेतली जाते. वारीतील भक्तिरस, शिस्त, व्यवस्थापन यांचा विशेष अभ्यास केला जातो. आपल्या विठ्ठलभक्तीच्या परंपरेची पताका खांद्यावर घेऊन जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांविषयी कृतज्ञता म्हणून यावर्षीपासून प्रतिदिंडी २० हजार रुपये निधी देण्यात आला आहे. पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्यात येत आहे. कीर्तनकार, वारकरी, भजनीमंडळ यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी; तसेच पालखी मार्गांचे व्यवस्थापन करण्यासाठी, मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये निर्मल वारीसाठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.



महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ९ ते १० टक्के लोकसंख्या ही आदिवासी समाजाची आहे. देशातील पूर्वेकडील राज्ये वगळता मध्यप्रदेश राज्याच्या पाठोपाठ महाराष्ट्रात आदिवासी समाजाची संख्या मोठी आहे. सामुहिक जीवनपद्धती, सामूहिक निर्णय, आवश्यक तेवढेच पिकवणे, जंगलाचे संरक्षण करणे अशा अनेक अनुकरणीय प्रथा-परंपरा आदिवासी बांधवांकडे आहेत. महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी निसर्गपुत्र असणाऱ्या आदिवासी बांधवांना सोबत घ्यावेच लागेल. आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी त्यांच्यासाठीच्या विविध योजनांना पुरेसा निधी उपलब्ध करून दिला आहे. आदिवासी कलांचे प्रदर्शन, वृद्धी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी नाशिक जिल्ह्याच्या सुरगाणा तालुक्यातील हतगड येथे कलादालन स्थापन करण्यात येत आहे.

आदिवासी संस्कृतीचे जतन-संवर्धन करण्यासह घनदाट जंगलांचे, इथल्या वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्याला राज्य शासनाचे प्राधान्य आहे. राज्यातील वनक्षेत्रात वाढ करून पर्यावरणाचा समतोल राखणे, त्यातून ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्येवर उपाययोजना, कार्बन क्रेडिटची निर्मिती यांसारख्या बाबींवर आमचा भर आहे. अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खासगी क्षेत्रावर बांबूची लागवड करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना बांबू रोपे; तसेच इतर आवश्यक बाबींकरिता प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान देण्यात येत आहे. राज्यातील पडिक जमिनीवर मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड करण्यात येणार आहे. नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूची लागवड करून या योजनेची सुरुवात करण्यात येत आहे.

## क्रांतिकारी निर्णय

भविष्यातील विकसित, प्रगत, पुरोगामी, विज्ञानवादी महाराष्ट्राची पायाभरणी करण्यासाठी क्रांतिकारी निर्णय आम्ही घेतले आहेत. शिवकालीन १२ किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन प्राप्त व्हावे, म्हणून युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठवण्यात येत आहेत. शासनाकडून रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करण्याचे ठरवले आहे. दिव्यांगांसाठी शिक्षण, क्रीडा, कौशल्य विकास, प्रशिक्षण, रोजगार, उद्योग या क्षेत्रातील विविध योजना राबवून त्यांना स्वावलंबी व सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट आहे. दिव्यांग व्यक्तींचे स्वतःचे हक्काचे घर व्हावे, यासाठी 'धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना' राबवण्यात येत असून पहिल्या टप्प्यात ३४,४०० घरकुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. राज्याने याचवर्षी तृतीयपंथीयांबाबतचे आपले धोरण जाहीर केले आहे. शासन आणि सार्वजनिक प्राधिकरणांकडून होणाऱ्या भरती प्रक्रियेमध्ये; तसेच सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री-पुरुषांसोबतच 'तृतीयपंथी' हा लिंग पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे तृतीयपंथी समुदायाला राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

राज्याच्या मागास भागासह मानव विकास निर्देशांकात मागे असणाऱ्या जिल्ह्यांच्या जलद विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात

येत आहेत. मागास जिल्ह्यांमध्ये उद्योग-व्यवसाय यावेत, यासाठी राज्य सरकार पोषक वातावरण निर्माण करत आहे. त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यातून आकांक्षित जिल्हे, तालुक्यांत गतिमान विकासास नव्याने सुरुवात होणार आहे. त्याचा राज्य सकल उत्पादनातील वाटा वाढण्यासाठी उपयोग होणार आहे.

## पायाभूत सुविधांची उभारणी

दर्जेदार पायाभूत सुविधांची निर्मिती करून राज्याचा मानव विकास निर्देशांक उंचावण्यात येत आहे. वर्तमानातील समस्यांवर मात करतानाच भविष्यातील संधींचा वेध घेऊन नियोजन केले जात आहे. पुढील १०० वर्षांचा विचार करून उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांसाठी केंद्र शासनाचे जास्तीत जास्त आर्थिक सहकार्य मिळवण्यात येत आहे. राज्य शासनानेही अर्थसंकल्प आणि पुरवणी मागण्यांद्वारे यासाठी भरीव निधीची तरतूद केली आहे. राज्याच्या गतिमान विकासात ग्रामीण रस्ते, महामार्ग, रेल्वेमार्ग, मेट्रो, विमानतळ, जलमार्गांसारख्या पायाभूत सुविधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, याचा विचार करून प्रसंगी कर्ज उभारून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात येत आहेत. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी दिला जाणारा निधी हा केवळ खर्च नसून ती भविष्यासाठीची गुंतवणूक आहे. त्यामुळेच भांडवली खर्चावर भर देण्यास आमचे प्राधान्य आहे.



देशाच्या विकासप्रक्रियेतही आपला महाराष्ट्र नेतृत्त्व करत असून प्रत्येक बाबतीत अग्रेसरत्व राखत आहे. थेट परकीय गुंतवणूक, सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार, केंद्र शासनाचे स्वच्छ सर्वेक्षण अभियान, जलसंधारण योजनांची अंमलबजावणी, शेतकऱ्यांना सौर कृषी पंपांची उपलब्धता अशा क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच कृषी, उद्योग, सेवा, सहकार, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा या क्षेत्रांत राज्य अग्रेसर राहिले आहे.

## रोजगारनिर्मितीवर भर

महाराष्ट्राला उद्योजकतेची समृद्ध परंपरा लाभली आहे. औद्योगिक गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे जगभरातील उद्योजकांचे पसंतीचे राज्य ठरले आहे. थेट परकीय गुंतवणुकीत, देशात महाराष्ट्र हेच आघाडीवरील राज्य आहे. गेल्या दोन वर्षांत २ लाख ४३ हजार कोटींची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देतानाच त्याद्वारे रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येत आहे. कौशल्य विकास केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्यात जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खाण अशा उद्योगांसह डेटा सेंटर, इन्फ्रास्ट्रक्चर अशा विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक होताना दिसत आहे. जेम्स आणि ज्वेलरी उद्योगात १ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण होणार आहेत.

वर्ष २०२८ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्स करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने एक ट्रिलियन डॉलर्सचे ध्येय ठेवले आहे. निश्चित वेळेत ध्येय प्राप्त करण्यासाठी राज्याचा कृतिआराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार वार्षिक योजनांची आखणी करताना प्रशासकीय विभाग आणि जिल्ह्यांनी त्यासंदर्भातील योजना-प्रकल्पांना प्राधान्य देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. कृषी, उद्योग, सेवा, पर्यटन यासारख्या क्षेत्रांसह आकांक्षित जिल्हे-तालुक्यांच्या विकासावर भर देण्यात येत आहे. मित्रा संस्थेच्या सहकार्याने उद्दिष्टप्राप्तीचे नियोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा विकास या एकमेव अजेंड्यावर आम्ही काम करत आहोत. विकासाशिवाय दुसरा कुठलाही मुद्दा आमच्यासमोर नाही. राज्यातील नागरिकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहोत. शहरांतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटला पाहिजे, नागरिकांना कमीत कमी वेळेत आपल्या इच्छित ठिकाणी पोहोचता आले पाहिजे, यासाठी बहुआयामी कष्ट घेत आहोत. राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांचा मॉनिटरिंग कक्ष कार्यान्वित केला आहे. दर १५ दिवसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन माझ्या अध्यक्षतेखाली या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो. ज्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील, त्या दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि सौंदर्यपूर्ण असायलाच पाहिजेत. त्याबाबतीत कुठलाही हलगर्जीपणा खपवून घेतला जात नाही. कामगारांच्या, प्रवाशांच्या, नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असून कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना करण्यासाठी कायम आग्रही असतो. निधीअभावी कोणताही प्रकल्प रखडला जाऊ नये, जनहिताच्या प्रकल्पांना वेळीच पुरेसा निधी मिळेल, याची विशेष काळजी घेण्यात येत आहे.

आपल्या महाराष्ट्राला लोककल्याणकारी राज्य म्हणून देशात ओळख प्राप्त झाली आहे. लोककल्याणकारी राज्यात फक्त रस्ते, पूल, प्रशासकीय इमारती बांधणे, दळणवळण उभारणे एवढेच महत्त्वाचे नाही, तर जनतेच्या हिताच्या, त्यांच्या प्रगतीला प्रोत्साहन देणाऱ्या लोककल्याणकारी योजना राबवणेही महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने यापुढील काळात देखील राज्यातील प्रत्येक घटकाला विकासाची संधी प्राप्त करून देणाऱ्या महत्त्वाकांक्षी योजना आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

**शब्दांकन : संतोष तोडकर,** मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**शेतकरी, कष्टकरी यांच्यासाठी राज्य शासन घेत असलेल्या अनेक कल्याणकारी निर्णयांना प्रशासनाचा नेहमीच पाठिंबा असतो. त्यांच्या या पाठिंब्यामुळे आणि धोरणीपणामुळे राज्यातील जनतेच्या जीवनामध्ये सकारात्मक बदल पाहावयास मिळत आहेत. शेतकरी, कष्टकरी, मजूर, कामगार आदी घटकांसाठी गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय अन्न व नागरी पुरवठा विभागाने घेतले आहेत. या निर्णयांमुळे राज्यातील कष्टकरी जनतेचे जीवन आनंदाने भरण्याचे काम राज्य शासनाने केले आहे.**

# सर्वसामान्यांना न्याय

**छगन भुजबळ,** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री



राज्य शासन जनतेच्या भल्यासाठी अनेक योजना राबवत आहे. त्यामध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाचा महत्त्वाचा सहभाग आहे. राज्यातील महिलांचे आरोग्य चांगले राहावे; तसेच महिला सक्षमीकरणासाठी 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना' ही महत्त्वाकांक्षी योजना लागू केली आहे. या योजनेमध्ये उज्ज्वला योजनांच्या राज्यातील सुमारे ५२ लाख महिला लाभार्थींना वर्षाला तीन गॅस सिलिंडर पुनर्भरण मोफत मिळणार आहे. तसेच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तील पात्र लाभार्थ्यांनाही या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. यामध्ये उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या प्रति सिलिंडर ३०० रुपयांच्या अनुदानाव्यतिरिक्त ५३० रुपयांचे अनुदान राज्य शासन तीन गॅस सिलिंडर पुनर्भरणासाठी देणार आहे. तसेच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तील पात्र लाभार्थ्यांना ८३० रुपये इतके अनुदान राज्य शासन देणार आहे.



## आनंदाचा शिधा

राज्यातील कष्टकरी, गोरगरीब जनतेला सण साजरे करता यावेत, यासाठी आनंदाचा शिधा वाटप केला जातो. यंदाच्या गणेशोत्सवासाठीही राज्यातील पात्र लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर खाद्यतेल यांचे १०० रुपयात वितरण करण्यात येणार आहे. या आनंदाचा शिधा वाटपाचा राज्यातील सुमारे १ कोटी ६० लाखांपेक्षा जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. तसेच यापूर्वीही दिवाळी, गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी-गणपती उत्सव यासोबतच अयोध्या येथील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा आणि शिवजयंती या निमित्तही राज्यातील पात्र लाभार्थींना आनंदाचा शिधा संचाचे वाटप करण्यात आले आहे.

अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब; तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हा व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी यांना सन २०२२ ची दिवाळी; तसेच सन २०२३ चा गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी गणपती सणानिमित्त ई-पॉस प्रणालीद्वारे १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर खाद्यतेल असे चार जिन्नसांचा समावेश असलेले आनंदाचा शिधा संच केवळ १०० रुपयात वाटप करण्यात आले.

सन २०२३ सालातील दिवाळी सणानिमित्त या संचामध्ये प्रत्येकी अर्धाकिलो पोहे व मैदा यांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल, अर्धाकिलो रवा, अर्धाकिलो चनाडाळ, अर्धाकिलो मैदा आणि अर्धाकिलो पोहे असे ६ जिन्नस समाविष्ट असलेला आनंदाचा शिधा संचाचे वाटप करण्यात आले. राज्यातील १ कोटी ५८ लक्ष लाभार्थ्यांना या आनंदाचा शिधा संचाचे वाटप करण्यात आले.

अयोध्या येथील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा व शिवजयंतीनिमित्त राज्यातील १ कोटी ६८ लाख ५० हजार ७३५ पात्र शिधापत्रिकाधारकांना केवळ १००

रुपयांमध्ये आनंदाचा शिधा संचाचे वाटप करण्यात आले.

'आनंदाचा शिधा'सोबतच राज्य शासन कष्टकरी, मोलमजुरी करणाऱ्यांना किमान एकवेळचे पोटभर जेवण माफक दरात मिळावे, या उद्देशाने शिवभोजन योजना राबवत आहे. या योजनेसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ४४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिवभोजन योजनेमध्ये कष्टकरी, मोलमजुरी करणाऱ्यांना अवघ्या १० रुपयांमध्ये दोन चपाती, एक मुद भात, एक वाटी डाळ आणि भाजी असे जेवण शिवभोजन केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध करून दिले जाते. राज्यातील लाखो कष्टकरी जनतेला या योजनेचा लाभ झाला आहे. प्रति ग्राहकाकडून प्राप्त झालेल्या १० रुपयांव्यतिरिक्त उर्वरित रक्कम म्हणजेच ग्रामीण भागासाठी २५ रुपये आणि शहरी भागासाठी ४० रुपये इतके अनुदान शासन शिवभोजन केंद्र चालकांना देते.

## शिधापत्रिका वितरणासाठी विशेष मोहीम

राज्यातील तृतीयपंथीयांना नवीन शिधापत्रिका मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा सहानभूतीपूर्वक विचार करून त्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी सुलभ कार्यपद्धती अनुसरून त्यांना पात्रतेनुसार शिधापत्रिका देऊन त्यावरील लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना व राज्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिका धारकांना ऑनलाइन सेवेद्वारे ई-शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच राज्यातील स्थलांतरित, असंघटित कामगारांना शिधापत्रिका वितरणासाठी विशेष मोहीम राज्यात राबवण्यात येत आहे.

राज्यातील जास्तीत जास्त दिव्यांग नागरिकांना शिधापत्रिका वितरण करण्याच्या दृष्टीने विशेष अभियान राबवण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून अंत्योदय योजना व प्राधान्य कुटुंब गटात पात्र असणाऱ्या दिव्यांग नागरिकांना शिधापत्रिकेवरील लाभ तत्काळ देण्याच्या सूचना देण्यात आल्या. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात अंत्योदय अन्न योजनेच्या १० हजार ४७४ व प्राधान्य कुटुंब गटअंतर्गत १७ हजार ११२ अशा एकूण २७ हजार ५८६ शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.

राज्यातील भटके विमुक्त समाजाच्या नाकरिकांना शिधापत्रिका मिळण्यासाठी ओळखीचा पुरावा व वास्तव्याचा पुरावा सादर करण्यामध्ये येणाऱ्या अडचणींचा विचार करून त्यांना ओळखीचा पुरावा व वास्तव्याचा पुरावा सादर करण्यामध्ये सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच त्यांनी स्वतः केलेल्या स्वयंघोषणापत्राच्या माध्यमातून आता त्यांना शिधापत्रिका मिळवता येणार आहेत. आतापर्यंत अंत्योदय अन्न योजना अंतर्गत १,११८ आणि प्राधान्य कुटुंब गटअंतर्गत ४,८१६ शिधापत्रिकांचे वितरण भटके विमुक्त समाजातील नागरिकांना करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, बीड, धाराशिव, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना जानेवारी २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रतिलाभार्थी १५० रुपये रोख रक्कम थेट हस्तांतरणाची (डीबीटी) योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामध्ये एप्रिल २०२४ पासून वाढ करून सध्या ही रक्कम प्रतिमाह प्रतिलाभार्थी १७० रुपये केली आहे. या निर्णयाच्या माध्यमातून ११ लाख ८४ हजार ८४७ लाभार्थ्यांना एकूण ११३ कोटी ५८ लाख ६५ हजार ५१२ रुपये इतकी रोख रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

देशात 'एक देश, एक शिधापत्रिका' धोरण राबवण्यात येत आहे. या धोरणामुळे शिधापत्रिकाधारकांना कोणत्याही राज्यात आणि राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात मंजूर शिधा घेता येणार आहे. यासाठी ई-पॉस प्रणाली प्रभावी ठरत आहे. या प्रणालीमुळे बोगस लाभार्थी योजनेतून बाहेर काढण्यास मोठ्या प्रमाणावर यश आले असून त्यामुळे शिधा बचतसुद्धा झाली आहे. शासनाचा निधी वाचल्याने त्याचा वापर कल्याणकारी योजनांवर करणे शक्य झाले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राज्यात पोषणतत्त्व गुणसंवर्धित तांदूळ (फोर्टिफाईड राईस) वितरण करण्यात येत आहे. फोर्टिफाईड तांदळामध्ये 'अ' आणि 'ब' - ९, 'बी' - १२ जीवनसत्वे व फॉलेट या पोषणतत्त्वांचा समावेश असतो. राज्यात तिसऱ्या टप्प्यात २ लाख ६० हजार ५७९ मेट्रिक टन फोर्टिफाईड तांदळाचे वाटप करण्यात आले आहे.

राज्यात केंद्र पणन व्यवस्थेंतर्गत ३,७८० कोटी पेक्षा जास्त रकमेचे १ कोटी ८६ लाख ४८ हजार २०२.०१ क्विंटल धान्य खरेदी केली आहे. त्यामध्ये धान, मका, ज्वारी, बाजरी, रागी या धान्यांचा समावेश आहे. यंदाच्या वर्षी धान, भरडधान्य विक्रीकरिता एकूण ६ लाख ४५ हजार ३८० शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंद केली होती. त्यामध्ये ४ लाख ८२ हजार ४७८ खरीप आणि १ लाख ६२ हजार ९०२ रब्बी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश आहे.

## गोदाम उभारणीसाठी निधी

सन २०२३-२४ मध्ये धान उत्पादक नोंदणीकृत शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपये (दोन हेक्टरच्या मर्यादित) प्रोत्साहन पर अनुदान देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. राज्यातील जनतेला अन्न धान्याचे वितरण करणे; तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले अन्नधान्य यांची साठवणूक करणे महत्त्वाचे आहे. या दृष्टीने राज्यात गोदामे उभारणे गरजेचे असते. याचा विचार करून राज्यात गोदामे बांधणी व दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ८ कोटी ७० लाख व राज्य वखार महामंडळासाठी ११ कोटी ३३ लाख असे २० कोटी ४ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. यापूर्वीच गोदामे बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास १४ कोटी ८१ लाखांपेक्षा जास्त आणि वखार महामंडळास ३९ कोटी ७४ लाख रुपयांपेक्षा जास्त निधी वितरित करण्यात आला आहे.

**शब्दांकन : हेमंत चव्हाण,** विभागीय संपर्क अधिकारी

**महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासामध्ये सहकार चळवळीचा मोठा वाटा आहे. ग्रामीण भागातील सहकारी संस्थांच्या माध्यमातून सर्वसामान्यांचा आर्थिक आधार बळकट करण्याचे काम केले आहे. त्यामुळेच सहकार चळवळीला बळकटी देणे, त्यांना सध्याच्या स्पर्धेचा सामना करण्यासाठी सक्षम करणे, त्यांच्या माध्यमातून या सहकार चळवळीवर विश्वास असलेल्या नागरिकांच्या जीवनात परिवर्तन आणणे, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.**

# सहकार चळवळीचे बळकटीकरण

**दिलीप वळसे-पाटील,** सहकार मंत्री



महाराष्ट्र ही सहकार चळवळीची जननी आहे. सहकाराच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना बळ देण्याचे काम गेल्या दोन वर्षांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. सहकार संस्थांच्या बळकटीकरणासाठी आणि केंद्र शासनाने आणलेल्या नवीन सहकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी येथील संस्थांना आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

राज्यातील बहुतांशी अर्थकारण हे सहकारी संस्थांच्या माध्यमातून होत आहे. त्यामध्ये राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँका, पतसंस्था, नागरी सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या अशा माध्यमातून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा या सहकारी संस्था राहिल्या आहेत. शेतकऱ्यांना विविध हंगामातील शेतकामासाठी आवश्यक असणारे अर्थसाहाय्य या सहकारी संस्थांच्या माध्यमातूनच उपलब्ध होते. त्यामुळेच राज्य शासनाने या संस्था तांत्रिकदृष्ट्या सक्षम असाव्यात, यादृष्टीने निर्णय घेतले आहेत.

## प्रोत्साहनपर लाभ

पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना सहकार विभागाने आणली. सन २०१७-१८, सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करून नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत कमाल रुपये ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत आहे. पात्र अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यावर वर्ग करण्यात येत आहे. आतापर्यंत आधार प्रमाणीकरण झालेल्या जवळपास १४.३८ लाख पात्र खातेदारांना कर्जखात्यावर ५ हजार २१६ कोटी ७५ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. या योजनेत पात्र ठरलेल्या आणि आधार प्रमाणीकरण राहिलेल्या ३३,३५६ खातेदारांना आधार प्रमाणीकरणानंतर ही रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग केली जाणार आहे.



## शेतकऱ्यांवरील बोजा कमी

भूविकास बँक अवसायनात निघाल्यानंतर कर्जमाफीच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची कर्जाची परतफेड बाकी होती. त्यामुळे त्यांच्या सातबाऱ्यावर या कर्जाचा बोजा कायम होता. राज्य शासनाने भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४,७८८ शेतकऱ्यांच्या ९६४.१५ कोटी रुपये इतक्या थकीत कर्जाची रक्कम माफ करण्याचा निर्णय

घेतला. त्यानुसार कर्जदार शेतकऱ्यांच्या साधारणत: ६९,००० हेक्टर क्षेत्रावरील बोजा कमी करण्यात आला आहे. याचा लाभ शेतकऱ्यांना झाला आहे. शेतपिकासाठी नवीन अर्थसाहाय्य घेताना आता सातबारावरील बोजा कमी झाल्याने त्यांना कोणतीही अडचण भासणार नाही.

## सहकारी संस्थांचे संगणकीकरण

राज्य शासनाने केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. याचा लाभ राज्यातील १२ हजार सहकारी संस्थांना होणार आहे. केंद्र सरकारच्या या योजनेची अंमलबजावणी व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या हिश्शातील रकमेची तरतूदही करण्यात आली आहे. सध्या जिल्हा सहकारी बँकांमध्ये संगणकीकरण झाले आहे. मात्र गावपातळीवरील कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांमध्ये संगणक प्रणाली नाही. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांना आणि सभासदांना विविध प्रकारच्या सेवा सक्षमपणे पुरवणे आता शक्य होणार आहे.



राज्यातील सहकार चळवळ बळकट करणे व सहकार चळवळ लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य स्तरावर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सहकार विकास समिती व जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सहकार विकास समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. राज्य सहकार विकास समितीच्या तीन बैठका आतापर्यंत झाल्या आहेत. केंद्र शासनाच्या सहकार से समृद्धीअंतर्गत सुरू असलेल्या विविध योजनांचा आढावा वेळोवेळी घेण्यात येत आहे.

प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेंतर्गत ८,००० संस्थांचे संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ४,००० संस्थांसाठी संगणक खरेदीसाठी निविदा जेम पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. जगातील सर्वात मोठ्या धान्य साठवणूक योजनेंतर्गत २५ गोदामांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. जनऔषधी केंद्र या योजनेंतर्गत ३६ जनऔषधी केंद्रे प्रत्यक्ष कार्यरत झाली आहेत. पी.एम. किसान समृद्धी केंद्र स्थापन करणे या योजनेंतर्गत ८२५ केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. भारतीय बीज सहकारी समितीमध्ये ७७१ संस्था सदस्य म्हणून सामील झाल्या आहेत.

## भागमर्यादा वाढवण्याबाबत

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २८ मध्ये, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे सभासदांच्या वैयक्तिक भाग मर्यादेमध्ये सुधारणा करण्याचा शासनास अधिकार आहे. त्यानुषंगाने नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्था यामधील सभासदाने धारण करावयाची भागमर्यादा २ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्याबाबत अधिसूचना २५ एप्रिल २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्याचा लाभ भागधारकांना होणार आहे.

## उपसा जलसिंचन योजनेची कर्जमाफी

कुंडलवाडी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड या संस्थेच्या दोन उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज (मुद्दल) २०५.२७ लाख रुपये व श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्या., ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या चार योजनांचे थकीत कर्ज (मुद्दल) ६,४२६.५९ लाख रुपये माफ करण्याचा निर्णय आपण घेतला. याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे.

## पतसंस्थेची तरलता निधी

राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी स्थिरीकरण व तरलता साहाय्य निधी योजनेसाठी १०० कोटी रुपये इतका निधी परतफेडीच्या अटीवर बिनव्याजी भांडवल स्वरूपात मंजूर करण्याचा निर्णय सहकार विभागाने घेतला. याबाबतचा शासन निर्णयही १ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला.

याशिवाय संस्थांच्या व्यवसाय वृद्धीसाठी राज्य शासनाने सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसाहाय्य योजनेस २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षासाठी आपण मुदतवाढ दिली होती. त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ सहकारी संस्थांना झाला. स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण एक महिन्यात करण्याचा निर्णय आपण घेतला. राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीमध्ये संबंधित को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशनच्या प्रतिनिधींचा समावेश करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊसतोडणी यंत्रांना अनुदान देण्याच्या योजनेची अंमलबजावणी केली. महाराष्ट्र ॲग्रोबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता करून दिली.



महाराष्ट्र हे कायमच सहकाराचे केंद्र राहिले आहे. त्यामुळे येथील सहकारी चळवळीला बळ देऊन त्याला सशक्त करण्याचा आणि पर्यायाने येथील शेतकरी समृद्ध करण्याचा प्रयत्न राज्य शासनाच्या माध्यमातून होत आहे.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,** विभागीय संपर्क अधिकारी

**राज्य शासन जनतेसाठी अहोरात्र काम करत असते. शासकीय यंत्रणांचा समन्वयक म्हणून महसूल विभागाकडे पाहिले जाते. महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचा मंत्री म्हणून काम करताना दोन्ही विभागांच्या माध्यमातून सादर केलेल्या अनेक प्रस्तावांवर मंत्रिमंडळाने क्रांतिकारक बदल घडवणारे निर्णय घेतले आहेत. राज्यातील पशुधनाच्या उत्पादक क्षमतेचा पुरेपूर वापर करून पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाद्वारे राष्ट्रीय सकल उत्पादनात भर टाकण्यासाठी पावले टाकली आहेत. या काळात राज्याच्या विकासात भर टाकणाऱ्या कामांचा आढावा या लेखाच्या माध्यमातून समोर ठेवण्यात येत आहे.**

# योजनांची यशस्वी अंमलबजावणी

**राधाकृष्ण विखे-पाटील,**
महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री



महसूल विभाग हा शासन-प्रशासनातील कणा असून शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्याची जबाबदारी पार पाडत आहे. सर्व विभाग व यंत्रणांच्या सहकार्याने गावपातळीवरील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पारदर्शक पद्धतीने लाभ पोहोचवण्यात महसूल विभागाला यश मिळाले आहे. माझ्याकडील या विभागाच्या पारदर्शक व अग्रेसर ई-गव्हर्नन्स कार्यपद्धतीमुळे नागरिकांची शासकीय कार्यालयात येण्याची गरज कमी झाली आहे. विविध योजनांचे लाभ ऑनलाइन पद्धतीने दिले जात आहेत. 'डिजिटल इंडिया'च्या माध्यमातून ५,१३७ गावांत ४जी इंटरनेट सेवांसाठी जमीन दिली आहे. दूरक्षेत्रामधील गावांमध्ये ४जी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी भारत संचार निगम लि. यांना मागणी प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत २०० चौ.मी.पर्यंतची जागा विनाशुल्क देण्याचा निर्णय घेण्यात आला. नोंदणी व मुद्रांक विभागाने मागच्या वर्षी ४१,६०,१९७ दस्त नोंदणी हाताळल्या होत्या. यात ऑनलाइन ८,६०,००० व ऑफलाइन ३३,००,१३७ अशी नोंदणीची संख्या आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत १३,४०,४६४ दस्त नोंदणी केली आहे.

आतापर्यंत ३५,८५८ कोटी रुपयांचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे. राज्याच्या विकासाचा वेग मोठा आहे. राज्याच्या महसुली उत्पन्नातदेखील मोठी वाढ झाली आहे, याचा महसूल मंत्री म्हणून मला मोठा आनंद आहे.

नागरिकांच्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी सीआरएम पोर्टल, मोबाइल ॲप्लिकेशन, फेसबुक, व्हॉट्सॲप आदी समाजमाध्यम व ध्वनी संदेश प्रणाली वापरून प्राप्त तक्रारींवर कार्यवाही केली आहे. महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजनेस दोन्ही टप्प्यांत नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. भूमिअभिलेख विभागाकडून १,९०,११,९०८ गाव नमुना सातबारा, ५९,१७,४४१ जमीनधारक माहितीपत्रक नमुना ८अ, ७,४६,०७९ फेरफार नोंदी, १४,८८,८९४ मिळकत पत्रिका देण्याची कार्यवाही केली आहे.

## मराठवाड्यातील इनाम जमिनींचा प्रश्न मार्गी

राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे मराठवाड्यातील इनाम मिळकतीची ६० वर्षांपासून जुनी मागणी निकाली निघत आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये खालसा झालेल्या इनाम जमिनींच्या हस्तांतरणाचा मार्ग मोकळा झाल्याने जवळपास ५५ हजार हेक्टर जमिनी खुल्या होतील. या अनुषंगाने हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम १९५४ आणि हैद्राबाद अतियात चौकशी अधिनियम १९५२ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत.

## महसूल पंधरवडा

१ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत महसूल पंधरवडा-२०२४ उपक्रम राबवण्यात आला. समाजातील सर्व घटकांसाठी असलेल्या शासकीय उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीमधून शासनाची प्रतिमा निर्माण होते असे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महसूल पंधरवड्याच्या शुभारंभाप्रसंगी काढले. महसूल मंत्रिपदाच्या कार्यकाळात जुलै २०२२ पासून आजपर्यंत अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत, त्यावर दृष्टिक्षेप टाकणे, मी महत्त्वाचे समजतो.

## जनहिताचे निर्णय

मागील वर्षी 'शासन आपल्या दारी' उपक्रमातून कोट्यवधी लाभार्थ्यांपर्यंत थेट लाभ पोहोचवण्यात आले. सलोखा योजनेंतर्गत सवलतीमुळे वहिवाटीच्या असंख्य वादांवर तोडगा निघाला. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीच्या नुकसानभरपाईसाठी ई-पीक पाहणी प्रकल्प राबवण्यास सुरुवात झाली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी वतन किंवा इनाम जमिनी आणि महार वतन जमिनीवरील आकारावयाच्या नजराणा रकमेबाबत दिलासा देणारा निर्णय घेतला. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींना निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्राधान्याने व सवलतीने देण्याचा निर्णय घेतला. शासनाने वाटप केलेल्या जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये ५ टक्के आरक्षण ठेवण्यात येणार आहे.

राज्याच्या औद्योगिक विकासासाठी नाशिक जिल्ह्यात अंबड येथे एमआयडीसी विस्तारीकरणासाठी २४ कोटी २ लाख ४० हजार रुपये किमतीची १६ हेक्टर शासकीय जमीन विनामूल्य दरात देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वातंत्र्यसैनिकांना निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन देण्याबाबत सुधारित कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा वाढवण्यात आली.

कोतवालांच्या मानधनात दुप्पट वाढ करून १५ हजार रुपये महिना केले. महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक विकासासाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्यामध्ये १४ सेवांतील ६६,०८१ हजार अर्ज निकाली काढण्यात आले.

## सुधारित वाळू धोरण

महसूल विभागाने सुधारित वाळू/रेती धोरण आणले आहे. या धोरणानुसार लिलाव बंद होऊन एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रतिब्रास ६०० रुपये (१३३ रुपये प्रति मेट्रिक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आला आहे. वाळू डेपोतूनच ६०० रुपयांमध्ये वाळू उपलब्ध करण्यात आली.

राज्याच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचा मंत्री म्हणून काम करताना या विभागात मागच्या काळात अनेक सुधारणा केल्या आहेत. पशुसंवर्धन क्षेत्रात आर्थिक विकासाची मोठी संधी आहे. या दृष्टिकोनातून काही महत्त्वाचे निर्णय नमूद करता येतील.

## पशुपालन व्यवसायाची पंचसूत्री

राज्यात पशुउद्योजकता निर्माण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून उच्च उत्पादन व प्रजननक्षमता असलेल्या वंशावळीची पैदास, पशुस्वास्थ, पशुखाद्य, पशुचारा व व्यवस्थापन या पंचसूत्रीचे महत्त्व पशुपालकांपर्यंत पोहोचवण्यात येते आहे. चारा स्वयंपूर्ण गाव संकल्पना राबवण्यास प्रोत्साहन देण्यात येते आहे. पशुधनाच्या विकासासाठी राज्यात पहिल्यांदाच 'पशुसंवर्धन पंधरवडा-२०२४'चे आयोजन केले.

## पशुपालक व शेतकऱ्यांना दुधासाठी अनुदान

पशुसंवर्धन आयुक्तालय व दुग्धव्यवसाय आयुक्तालयाचे एकत्रिकरण करण्यास व १५,७८१ पदांच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता दिली. पशुपालक व शेतकऱ्यांना दुधासाठी प्रति लिटर ५ रुपये अनुदान दिले. १ जुलै २०२४ पासून सहकारी दूध संघ व दूध प्रक्रिया उद्योगांनी पशुपालकांकडून प्रतिलिटर ३० रुपये दराने दूध खरेदीचा निर्णय घेतला. दूध उत्पादकांच्या हितासाठी दूध भुकटीस निर्यात अनुदान देण्यात येणार आहे. लाल कंधारी, देवणी गोवंश जतन व संवर्धनासाठी साकुड जि.बीड येथे पशुपैदास प्रक्षेत्र उभारणीस मान्यता दिली. पशुपालक व शेतकऱ्यांच्या हितासाठी १० वर्षांपासून तोट्यात असलेल्या महानंद संस्थेस २५३ कोटी रुपये इतका निधी भाग भांडवल देण्याचा व राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत पाच वर्षांसाठी व्यवस्थापन व प्रचालन करण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १६० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाच्या भागभांडवलात भरीव वाढ केली. भागभांडवल २५ कोटी रुपये होते ते आता ९९ कोटी ९९ लाख इतके करण्यात येणार आहे. राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवण्याचा आणि मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील ढवळपुरी येथे लोकर प्रक्रिया केंद्र व उत्पादने निर्मिती केंद्र होणार आहे.



## पशुवैद्यकीय महाविद्यालयास मान्यता

पशुवैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता भत्त्यात वाढ करून ११ हजार करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. खासगी पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता आली आहे. अहमदनगर व अकोला जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली. पशुवैद्यकीय दवाखाने कमी असलेल्या तालुक्यांमध्ये ८० फिरते पशुचिकित्सा पथके व ३२९ वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्यातील २,८४१ पशुवैद्यकीय दवाखान्यांचे श्रेणी-१ मध्ये श्रेणीवाढ करण्यात येणार आहे.

## दीड कोटी पशुधनाचे मोफत लसीकरण

महाराष्ट्र हे दीड कोटी पशुधनाचे मोफत लसीकरण करणारे देशातील एकमेव राज्य ठरले. लम्पी रोग प्रादुर्भावाने पशुधन गमावलेल्या शेतकऱ्यांना प्रति गाय ३० हजार रुपये, प्रति बैल २५ हजार रुपये व प्रति वासरू १६ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याबाबत कार्यवाही केली गेली. राज्यात २१ व्या पशुगणनेचे आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्र गौसेवा आयोग २०२३ मध्ये स्थापन करण्यात आला आहे. आयोगासाठी येणाऱ्या १ कोटी २७ लाख ५८ हजार रुपये खर्चास व एकूण १६ पदांच्या निर्मितीसदेखील मान्यता दिली आहे.

आमच्या सरकारच्या कार्यकाळात मोठे काम झाले असून विभागाने घेतलेल्या निर्णयांची मोठी उपलब्धी आहे. शहरी व ग्रामीण भागात राज्य शासनाच्या महसूल व पशुसंवर्धन विभागांकडून लाभ पोहोचविण्यासाठी योजनांची यशस्वी अंमलबजावणी होते आहे. या अंमलबजावणीतून होणाऱ्या विकासाचे चांगले परिणाम राज्याला भविष्यात मिळतील, हे आनंददायी आहे.

**शब्दांकन : किरण वाघ,** विभागीय संपर्क अधिकारी

**साहित्य, कला, संस्कृती, इतिहास अशा क्षेत्रांत महाराष्ट्राला समृद्ध वारसा लाभला आहे. हा वारसा जपण्यासह अधिक समृद्ध करण्यासाठी गेल्या दोन वर्षांत राज्य शासनाने सातत्याने प्रयत्न केले. याशिवाय, वन आणि मत्स्यव्यवसाय विभागाची जबाबदारी सांभाळताना या विभागांना अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासोबतच या क्षेत्रातील घटकांच्या समस्या सोडवण्याकडे आणि त्यांच्या सबलीकरणाकडे विशेष लक्ष देता आले. हरित महाराष्ट्राचे स्वप्न घेऊन वाटचाल सुरू असताना मत्स्यव्यवसाय विभागाच्या माध्यमातून मच्छीमारांना सुरक्षा देणे, त्यांना आर्थिक आधार देण्याचे काम होत आहे.**

# लोकाभिमुख निर्णय

**सुधीर मुनगंटीवार,**
वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री



राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाला नुकतीच दोन वर्ष पूर्ण झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला पायाभूत क्षेत्राच्या विकासाबरोबरच कला-साहित्य-संस्कृती-नाट्य अशा क्षेत्रातही नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न या दोन वर्षांच्या कालावधीत झाला. वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय विभागाची जबाबदारी पार पाडताना नावीन्यपूर्ण गोष्टी या विभागात करता आल्या. अनेक संकल्पनांना मूर्त स्वरूप देता आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित भारत २०४७' ही संकल्पना घेऊन काम सुरू आहे.

## सांस्कृतिक कार्य

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनाचा ३५० वा वर्ष सोहळा आपण राज्यभर साजरा केला. याची सुरुवात दुर्गराज रायगडावर साजरा झालेल्या राज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमाने झाली. विविध १००८ ठिकाणच्या पवित्र स्थानांहून आणलेले 'जलकलश' ही संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

- जागतिक वारसा स्थळांच्या यादीत महाराष्ट्रातील लष्करी भूप्रदेश या वैशिष्ट्यपूर्ण वारशाचा समावेश व्हावा, यासाठी आपल्या देशाच्या वतीने युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.
- जिल्हा वार्षिक योजनेत यासाठी तीन टक्के निधीची तरतूद.
- किल्ले रायगड विकास प्राधिकरण स्थापन.
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनापासून म्हणजेच १९ फेब्रुवारी २०२३ पासून राज्यगीत म्हणून 'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत स्वीकारले.
- भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या निमित्ताने 'आझादी का अमृत महोत्सव'अंतर्गत आपण विशेष समारंभ, उपक्रम, योजना व विविध कार्यक्रमांचे आयोजन केले.
- 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून मनामनात देशभक्तीचे स्फुल्लिंग चेतवण्याचे काम.
- पुणे येथील आंबेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यानासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद.
- मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथे दृकश्राव्य माध्यम सुविधेसह शिवचरित्रावरील उद्याने निर्मित करण्यासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद.
- शिवनेरी किल्ल्यावर शिवछत्रपतींच्या जीवनचरित्रावर संग्रहालय तयार करण्यात येणार आहे. शिवकालीन किल्ल्यांचे संवर्धन यासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद.
- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मराठवाडा विभागाच्या आठ जिल्ह्यांमध्ये त्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन.
- सांस्कृतिक कार्य विभागामार्फत २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ करण्यात आला. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी आणि नदीचे संवर्धन करण्यासाठी 'चला जाणू या नदीला' हे अभियान सुरू केले.
- नाट्यनिर्मिती संस्थांना नवीन नाट्यनिर्मितीसाठी अनुदान योजनेस मान्यता देण्यात आली आहे. अनुदान योजनेंतर्गत नाट्य परीक्षण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.
- जीवनगौरव पुरस्कारांच्या रकमेत गतवर्षीपासून दुप्पट वाढ करण्यात आली आहे. आता त्याची रक्कम पाच लाख रुपयांवरून १० लाख रुपये इतकी करण्यात आली आहे. राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची रक्कमही एक लाख रुपयांवरून तीन लाख रुपये इतकी करण्यात आली आहे.
- ज्येष्ठ गायिका आशा भोसले, पद्मभूषण आप्पासाहेब धर्माधिकारी, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण देऊन त्यांच्या कार्याचा गौरव.
- मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून एक खिडकी योजना.
- राज्यात ७५ नवे नाट्य-चित्रगृह उभारण्यासाठी निधीची तरतूद.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिन सोहळ्याचे औचित्य साधून शिवकालीन 'सुवर्ण होन' या नाण्याचे टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले. गेट वे ऑफ इंडियाच्या गाभाऱ्यात सांस्कृतिक विभागाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयातर्फे ऐतिहासिक शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त एक बोधचिन्ह तयार केले. या बोधचिन्हातून राज्याभिषेकाचे महत्त्व आपण सर्वदूर घेऊन गेलो. रायगडावर दरवर्षी हा सोहळा राज्य शासनाच्या माध्यमातून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय शिवकालीन वाघनखे आपण महाराष्ट्रात आणली. त्यासाठी लंडनच्या व्हिक्टोरिया अल्बर्ट वस्तुसंग्रहालयाशी करार करण्यात आला. ऐतिहासिक अशी ही वाघनखे आपण सर्व नागरिकांना पाहता यावीत, यासाठी सातारा येथील वस्तुसंग्रहालयात ठेवली. त्यानंतर तीन वर्षांच्या काळात राज्यातील विविध ठिकाणी ती नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत.

## गणेशोत्सव मंडळांसाठी स्पर्धा

राज्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची मोठी परंपरा आहे. राज्यातील गणेशोत्सवाने नेहमीच नागरिकांना जागरूक करण्याचे काम केले आहे. त्यांच्या या प्रयत्नांना प्रोत्साहन म्हणून राज्य शासन उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी स्पर्धा घेते. राज्य शासनाच्या विविध योजनांना नागरिकांपर्यंत नेण्याचे माध्यम; तसेच पर्यावरण, कायदा व सुव्यवस्था, महिला व बालविकास, शिक्षण, आरोग्य संदर्भातील जनजागृती या माध्यमातून होते. त्यामुळेच राज्य शासनाने यासाठी असलेल्या पारितोषिक रकमेत वाढ केली आणि बक्षिसांच्या संख्येतही वाढ केली.

## वन संवर्धन

राज्यात वन व वन्यजीव संवर्धनाच्या अनुषंगाने १८ नवीन संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात संवर्धन राखीव क्षेत्रांची संख्या ५२ होणार आहे. वन विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचा वनांचे किंवा वन्य जीवांचे संरक्षण करतेवेळी वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू ओढवल्यास त्यांच्या वारसांना २५ लाख रुपये आणि कायमचे अपंगत्व आल्यास ३ लाख रुपये इतके आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्यहानी झाल्यास त्याबाबतीत प्रदान करावयाच्या आर्थिक साहाय्याच्या रकमेत १५ लाख रुपयांवरून २० लाख रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे.

## मत्स्यव्यवसायास चालना

मत्स्यव्यवसाय विकासाला चालना देणारे आणि मत्स्य उत्पादनात महाराष्ट्राला आघाडीवर ठेवेल असे समग्र मत्स्यविकास धोरण आणण्याचे काम राज्य शासनाच्या माध्यमातून होत आहे. त्यासाठी उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली असून तिचे काम सुरू आहे.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा उपयोग मच्छीमार बांधवांच्या विकासासाठी होत आहे. मत्स्य उत्पादन अधिक काळ टिकण्यासाठी शीतगृह सुविधा, मत्स्य संगोपन व संवर्धनासाठी मच्छीमार बांधवांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. मासे हे नाशीवंत प्रकारात येत असल्याने ते त्वरित विकण्यासाठीची एक साखळी प्रक्रिया तयार करणे, मत्स्यव्यवसाय उद्योगाला चालना देणारे पूरक जोडधंदे आणि रोजगार उपलब्ध होणे यावर भर देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेत मत्स्यपालन क्षेत्राचे योगदान मोठे असणार आहे. आजवर शेततळ्यात व्यावसायिक मत्स्यपालन करण्यासाठी विविध परवानग्या घेणे आवश्यक होते. मात्र यापुढे त्यात बदल करत शेतकऱ्याला स्वतःच्या शेततळ्यात मत्स्यपालन करण्यासाठी परवानगीची आवश्यकता लागू नये, अशी शासनाची कल्पना आहे.

### महत्त्वपूर्ण निर्णय

- रामसर परिषदेने, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून रामसर क्षेत्र घोषित केले आहे.
- वन्य प्राण्यांचे आणि वनस्पतींचे व त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ राज्यात ११ नवीन संवर्धन राखीव क्षेत्रे अधिसूचित.
- राज्याचा मुख्यतः हरित ऊर्जा क्षेत्रावर भर असून त्याकरिता सौर, जल आणि पवनऊर्जा या क्षेत्रामध्ये ३० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार.
- एक पेड माँ के नाम या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार राज्यातही अमृतवन ही संकल्पना राबवली.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी व पक्षी उद्यान आणि पुण्यातील शिवनेरी येथे बिबट सफारी सुरू करण्याचा निर्णय.
- राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज असून, यासंदर्भात जैवविविधता प्रशिक्षण केंद्र चंद्रपूर येथे सुरू करण्यात येणार.
- लोणार सरोवर जतन, संवर्धन आणि विकास करण्यासाठी ३६९ कोटी ७५ लाख रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी.

- निमखाऱ्या पाण्यात मत्स्यसंवर्धनाच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय क्षेत्रात रोजगार आणि उद्योगवाढीसाठी मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रॅकिश वॉटर अँक्वाकल्चर यांच्यात सामंजस्य करार.
- डिझेल परतावा देण्याबाबत शासन अत्यंत सकारात्मक असून १२० हॉर्स पॉवरपर्यंतच्या बोटींना डिझेल परतावा दिला जाणार.
- राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांसाठी राज्यस्तरीय नुकसानभरपाई धोरण आणण्यात आले आहे. यामध्ये मच्छीमारांना जवळपास ६ लाख रुपयांपर्यंत मदत मिळणार.
- मत्स्य उत्पादन विक्री करण्यासाठी मच्छीमार बांधवांना हक्काची बाजारपेठ आवश्यक असल्याने पालघर जिल्ह्यातील साटपाटी येथे सर्व सुविधांनी युक्त आदर्श मच्छी बाजारपेठ उभारली जाणार.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,** विभागीय संपर्क अधिकारी

**महाराष्ट्र राज्य हे देशातील शैक्षणिक क्षेत्रात विशेषतः वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य राज्य मानले जाते. राज्याच्या निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेस आरोग्यविषयक प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सुविधेबाबत निर्माण झालेली जागरूकता लक्षात घेता नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करण्याची सुरुवात केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन होत आहेत.**

# वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात अग्रेसर

**हसन मुश्रीफ,** वैद्यकीय शिक्षण, विशेष साहाय्य मंत्री



वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत राज्यातील पालघर, ठाणे (अंबरनाथ), जालना, अमरावती, बुलडाणा, वाशिम, वर्धा, भंडारा, गडचिरोली या शासकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ निवासी संवर्गातील डॉक्टरांना २ डिसेंबर २०१३ च्या शासन निर्णयान्वये २५,००० रुपये व त्यावर ६व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता असे मानधन सुनिश्चित करण्यात आले आहे. आता राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी संवर्गातील डॉक्टरांना सरसकट ८५,००० रुपये प्रतिमाह एवढे मानधन पुढील ५ वर्षांसाठी निश्चित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांप्रमाणे १,००० लोकसंख्येसाठी एक डॉक्टर असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य हे भारतातील प्रगत राज्य असून शैक्षणिक क्षेत्रात विशेषतः वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रगण्य राज्य मानले जाते. तथापि महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०२०-२०२१ नुसार महाराष्ट्र राज्यात प्रति १,००० लोकसंख्येमागे डॉक्टरांचे प्रमाण ०.८४ इतके आहे. देशपातळीवरील सरासरीच्या (०.९०) दृष्टीने सदर प्रमाण कमी असून जागतिक आरोग्य संघटनेची मानके विचारात घेता हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. राज्यात सध्या डॉक्टरांची कमतरता असल्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागातील व सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टरांची बहुतांश पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्याच्या निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेस आरोग्यविषयक प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण होतात. राज्याच्या लोकसंख्येत झालेली वाढ आणि वैद्यकीय शिक्षणाबाबत; तसेच आरोग्य सुविधेबाबत निर्माण झालेली जागरूकता लक्षात घेता नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करणे आवश्यक आहे.

राज्यातील पालघर, ठाणे (अंबरनाथ), जालना, अमरावती, बुलडाणा, वाशिम, वर्धा, भंडारा आणि गडचिरोली या जिल्ह्यांचा बराचसा भाग ग्रामीण असल्यामुळे या जिल्ह्यांत दर्जेदार व परवडण्याजोग्या वैद्यकीय सुविधांचा अभाव जाणवत आहे. सद्यःस्थितीत उक्त जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालये आहेत; परंतु सदर मर्यादित वैद्यकीय सेवा संबंधित जिल्ह्यास आरोग्य व्यवस्था पुरवण्यास अपुरी पडत आहे. यास्तव पालघर, ठाणे (अंबरनाथ), जालना, अमरावती, बुलडाणा, वाशिम, वर्धा, भंडारा आणि गडचिरोली या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



राज्यात नवीन वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम, कार्यान्वयन व संलग्नित रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनाकरिता आशियाई विकास बँकेमार्फत निधी उपलब्ध करून घेण्यात येत आहे. हा निधी उपलब्ध करून घेण्याकरिता राज्यातील शासकीय

वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक; तसेच होमिओपॅथिक महाविद्यालयांना वैद्यकीय शिक्षण, संशोधन व रुग्णोपचाराकरिता जागतिक दर्जाच्या संस्थांमध्ये रुपांतरित करून राज्यातील आरोग्यसेवेची गुणवत्ता सुधारण्याकरिता उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर, नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय परिचर्या महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## सुधारित आकृतिबंध

राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दंतशास्त्र विभागातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, साहाय्यक प्राध्यापक दंतशल्य चिकित्सक संवर्गाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. राज्यात चंद्रपूर, जळगाव, बारामती, नंदूरबार, अलिबाग, सिंधुदुर्ग, सातारा, धाराशिव आणि परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची नव्याने निर्मिती झाली असल्याने राज्यातील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयांतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, साहाय्यक प्राध्यापक दंतशल्य चिकित्सक संवर्गाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला. तसेच शासकीय दंत महाविद्यालयातील व दंतशास्त्र विभागातील करार तत्त्वावर कार्यरत प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे मानधन दरमहा ५०,००० रुपये व ४०,००० रुपयांवरून अनुक्रमे १,२०,००० रुपये व १,३०,००० रुपये करण्यात आले आहे. याचबरोबर शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयातील मानसेवी अध्यापकांना १९९७ पासून १,५०० रुपये इतके मासिक मानधन निश्चित करण्यात आले होते. १९९७ पासून २६ वर्षांच्या कालावधीत या मानधनात कोणतीही वाढ करण्यात आलेली नव्हती. ही बाब विचारात घेता मानसेवी अध्यापकांच्या मानधनात वाढ करून आता मानसेवी प्राध्यापकांना ३०,००० रुपये व मानसेवी सहयोगी प्राध्यापक/ साहाय्यक प्राध्यापक यांना २५,००० रुपये इतके सुधारित मासिक मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील अभिमत विद्यापीठातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता शासनाच्या प्रचलित शिष्यवृत्ती प्रतिपूर्ती योजनेस मान्यता देण्यात आली.

राज्यातील शासकीय/शासन अनुदानित वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी महाविद्यालयातील उमेदवारांना; तसेच परदेशातून वैद्यकीय पदवी धारण केलेल्या उमेदवारांना १८,००० रुपयांप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी (कनिष्ठ निवासी-१/२/३ व वरिष्ठ निवासी-१/२/३) यांच्या विद्यावेतनात १ मार्च २०२४ पासून वेळोवेळी अनुज्ञेय महागाई भत्त्यासह प्रतिमाह १०,००० रुपये इतकी ठोक वाढ मंजूर करण्यात आली.

शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये जेनरिक औषधे दुकाने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली. शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये रुग्णालयामधील सर्व शैक्षणिक बाबींमध्ये; तसेच सर्व कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता एन.आय.सी.ने विकसित केलेली नेक्स्ट झेन ई-हॉस्पिटल ही आरोग्यसेवा व्यवस्थापन प्रणाली एच.एम.आय.एस. कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली.

आरोग्य क्षेत्रात शिक्षण घेत असलेले बरेच विद्यार्थी नैराश्य, भीती या मानसिक स्थितीतून जात असताना आत्महत्या करत असल्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले असल्याने अशा विद्यार्थ्यांना मानसिक आधार देण्याच्या आनुषंगाने तज्ज्ञ व्यक्तींकडून समुपदेशन सदर संवाद या मानसिक आरोग्य हेल्पलाइनमार्फत केले जाणार आहे.

### महत्त्वाचे निर्णय

- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा या संस्थेचे छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा असे नामाधिकरण करण्यात आले.
- शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेदिक/होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील गट-क व गट-ड ची पदे बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थेला/एजन्सीला मान्यता देण्यात आली.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांच्या सुरक्षांकरिता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून घेण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांच्या मानधन वाढीबाबत शासन निर्णय घेण्यात आला.
- १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांकरिता महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाकडून एकूण १,०८८ सुरक्षा रक्षक उपलब्ध करून घेण्यात आले आहे. या सुरक्षा रक्षकांच्या मानधनात ३,००० रुपये मासिक इतकी वाढ.
- पायाभूत सुविधा, उपकरणे आणि आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढवणे; तसेच मालमत्तेचा टिकाऊपणा वाढवणे.
- शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत/होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे यांत्रिक साफसफाई सेवा सुरू करण्यासाठी मान्यता.
- शासकीय वैद्यकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा पुरवण्याचा निर्णय.
- शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालय व रुग्णालयामध्ये ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य चाचणी करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.
- ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीकरिता डॉक्टर व संबंधित चाचणीकरिता आठवड्यातील दोन दिवस राखीव ठेवण्यात येत आहेत.
- धर्मादाय रुग्णालयांनी गरीब व निर्धन रुग्णांकरिता एकूण खाटांच्या २० टक्के इतक्या खाटा राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या सवलतीचा फायदा घेण्याकरिता शासनाने विहित केलेल्या अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

**शब्दांकन : राजू धोत्रे,** विभागीय संपर्क अधिकारी

देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे. यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. भारताची अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला महत्त्व देऊन विद्यार्थीहिताला प्राधान्य देत अनेक गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० तयार केले आहे. या योजनेत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर बहुमुखी तंत्रज्ञानावर आधारित सामाजिक, भावनिक प्रगती साधण्याचा प्रयत्न होत आहे.

# दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य

**चंद्रकांत पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्ये मंत्री



नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढवण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्यात; तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यापासून राज्यातील मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी ही योजना सुरू केली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये संस्थात्मक व संस्थाबाह्य या वर्गवारीत समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुद्धा लाभ देण्यात येत आहे.

## मराठी विद्यापीठ स्थापना

मराठी भाषेचा सर्वांगीण विकास, मराठी भाषेची प्रतिष्ठा, आणि अस्तित्व मजबूत राहावे, यासाठी अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र सुरू करण्यात आले.

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऑटोमोबाइल, ऑटोमेशन, टेलिकम्युनिकेशन, ऊर्जा निर्मिती इत्यादी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक विस्तार झालेला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील उपलब्ध असलेली औद्योगिक क्षेत्रे विचारात घेऊन शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापुरातील शैक्षणिक संकुलामधील उपलब्ध जागेमध्ये एकूण ५ अभ्यासक्रमांकरिता ३०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

## परीस स्पर्श योजना

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवण्याच्या दृष्टीने नॅक, एनबीए मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मार्गदर्शन व्हावे म्हणून 'परीस स्पर्श' योजना सुरू करण्यात आली आहे. यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे एनबीए मूल्यांकन व एनएएसी मानांकन प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांना गती मिळणार आहे.

## सचिवांच्या मानधनात वाढ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती सदस्य सचिवांच्या मानधनात वाढ करून सदस्य सचिवांना १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये मानधन; तसेच इतर सोयीसुविधांसह आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या ५ लाख

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची आवड निर्माण व्हावी, सामाजिक प्रश्नांची जाणीव व्हावी, राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, यासाठी या योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या ५ लाख केली आहे.

## कला महाविद्यालयास अभिमत विद्यापीठाचा दर्जा

मुंबईतील सर जे. जे. कला महाविद्यालय, उपयोजित कला महाविद्यालय, वास्तुशास्त्र महाविद्यालय या महाविद्यालयांचे मिळून डी-नोव्हो प्रकारांतर्गत अभिमत विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. देशातील पहिलेच अभिमत विद्यापीठ असणार आहे

## सामंजस्य करार

राज्यातील प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. युनिसेफ आणि उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग यांच्यात जलसंधारण आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. तसेच महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या ३४ नवीन ग्रंथ प्रकाशनास मान्यता देण्यात आली आहे. अभियांत्रिकी पदविका व पदवी अभ्यासक्रमांच्या मराठी भाषेतील २० पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

## मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय

- सारथी संस्थेमार्फत अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्ती (पीएच.डी. करिता) योजनेंतर्गत मराठा समाजाच्या २,१०९ विद्यार्थ्यांना ९७ कोटी रुपये वितरित करण्यात आले.
- सारथीकडून प्रशिक्षण घेतलेल्या ५१ विद्यार्थ्यांची युपीएससी (१२ आयएएस, १८ आयपीएस, ८ आयआरएस, १ आयएफएस, २ इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस) व इतर सेवा १०) तर ३०४ विद्यार्थ्यांची एमपीएससी मार्फत निवड.
- मराठा समाजाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृतीचा लाभ व २१ कोटी रुपयांची तरतूद.
- छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी या वर्षी ४४,१०२ विद्यार्थ्यांना ४२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.
- सारथीमार्फत ३५,७२६ विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले.
- सारथी संस्थेचे पुणे येथील मुख्यालय आणि ६ विभागीय कार्यालये; तसेच लातूर व कोल्हापूर येथील उपकेंद्रात वसतिगृहासाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करून दिली. तसेच बांधकामासाठी १,०२४ कोटी रुपये मंजूर.
- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेंतर्गत ३,७९,३७३ विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता १,२९३ कोटी रुपये वितरित.
- मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेप्रमाणे निर्वाहभत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय. प्रति विद्यार्थी, प्रति वर्ष ६० हजार रुपये महानगराच्या ठिकाणी, ५१ हजार रुपये विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी, ४३ हजार रुपये जिल्ह्याचे ठिकाणी आणि ३८ हजार रुपये निर्वाहभत्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे वितरित करणार.
- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १७,५४,४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी ९,२६२ कोटी रुपये मंजूर.
- ईडब्ल्यूएसअंतर्गत १० टक्के आरक्षणातून विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये ३१,००० विद्यार्थ्यांपैकी ७८ टक्के मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश; तसेच एमपीएससीमार्फत शासकीय सेवेत ६५० उमेदवारांपैकी ८५ टक्के मराठा समाजाच्या उमेदवारांना नियुक्ती.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत वैयक्तिक आणि गट कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत ७०,००० लाभार्थ्यांना ५,१६० कोटी रुपये मंजूर.
- महामंडळाकडून ३५ गट प्रकल्पांना ३.३५ कोटी रुपये कर्ज वितरित.
- मराठा आरक्षण कायदा मा. सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरवल्यामुळे शासकीय सेवेत निवड होऊन नियुक्ती न मिळालेल्या १,५५३ उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आली.
- न्यायालयीन प्रकरणात नोकरभरती प्रक्रिया रखडलेल्या उमेदवारांसाठी धोरणात्मक निर्णय घेऊन एमपीएससी व अन्य शासकीय सेवेत २,४०० उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या. एसईबीसीमधून ईडब्ल्यूएस व खुला (ओपन) प्रवर्गाचा विकल्प देऊन उमेदवारांना नियुक्त्या देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला.
- मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या ३६ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत दिली. तसेच २० व्यक्तींच्या वारसांना एस.टी. महामंडळात नियुक्त्या दिल्या.
- कोणत्याही राष्ट्राचे भविष्य शैक्षणिक धोरणावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहत असते, यासाठी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री म्हणून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

## कॅप्टिव्ह मार्केट योजना

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणानुसार राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबाला दरवर्षी एक साडी मोफत देण्यासाठी 'कॅप्टिव्ह मार्केट योजना' राबवण्यात येत आहे. ही योजना २०२३ ते २०२८ या पाच वर्षांसाठी निश्चित करण्यात आली असून, राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना वस्त्रोद्योग विभागामार्फत यंत्रमागावर विणलेली प्रतिकुटुंब एक साडीचे रेशन दुकानावर मोफत वाटप करण्यात आली.

## सूतगिरण्यांना वीज सवलतीस मुदतवाढ

राज्यातील सहकारी सूतगिरण्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन सहकारी सूतगिरण्यांना नवसंजीवनी देण्यासाठी सहकारी सूतगिरण्यांना प्रतियुनिट ३ रुपयांप्रमाणे ३ वर्षांकरिता वीज अनुदान व खासगी सूतगिरण्यांना प्रतियुनिट २ रुपयांप्रमाणे वीज अनुदान देण्याचा शासनाने यापूर्वी धोरणात्मक निर्णय घेतला.

## कोष खरेदी विक्री बाजारपेठ

राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोषाला हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून जालना व सोलापूर येथे शासकीय कोष खरेदी-विक्री बाजारपेठ उभारण्यात आली आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्यामार्फत बीड, अमरावती, बारामती, पुणे, कोल्हापूर ठिकाणी कोष खरेदी विक्री व्यवस्था उपलब्ध करून दिली.

## यंत्रमागांना अतिरिक्त वीज सवलत

वस्त्रोद्योगात कमी गुंतवणुकीत अधिक रोजगार निर्मितीची क्षमता आहे. २७ एचपीपेक्षा कमी दाबाच्या यंत्रमागधारकांचे प्रतियुनिट वीजदर हे २७ एचपीपेक्षा जास्त; परंतु २०१ एचपीपेक्षा कमी दाबाच्या युनिट धारकापेक्षा जास्त दिसते. ती विसंगती दूर करण्यासाठी २७ एचपीपेक्षा जास्त; परंतु २०१ एचपीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना; तसेच २७ एचपीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना अतिरिक्त वीज सवलत लागू करण्यात आली आहे. २७ एचपीपेक्षा जास्त; परंतु २०१ एचपीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना प्रतियुनिट ०.७५ रुपये अतिरिक्त वीज सवलत लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. २७ पेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना प्रतियुनिट १ रुपये अतिरीक्त वीज सवलत लागू करण्यास मान्यता. सौरऊर्जा प्रकल्प किमतीच्या २० टक्के किंवा ४.८० कोटी रुपयांपैकी जे कमी असेल, तेवढे भांडवली अनुदान सर्व सहकारी वस्त्रोद्योग घटकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात-धायगुडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**देशातील आदिवासी समाजातील नागरिकांचा विकास करून आदिवासी जमातीचे जीवनमान उंचावण्यासह त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजना, विकासाचे कार्यक्रम आखून नावीन्यपूर्ण योजना राबवत आहे. यामध्ये आदिवासी जमातींचे दारिद्र्य, मागासलेपणा, विकासामधील प्रचंड विषमता, सामाजिक-आर्थिक विषमता अशा सर्व बाबींचा अभ्यास करून आदिवासी समाजातील प्रत्येक घटकांच्या विकासासाठी शासन विविध माध्यमांद्वारे प्रयत्नशील राहिले आहे.**

# आदिवासी समाजाचा विकास

**डॉ. विजयकुमार गावित,** आदिवासी विकास मंत्री



आदिवासी समाजातील विकासाच्या दृष्टिकोनातून शिक्षण, रस्ते, त्यांना घरकूल, प्रामुख्याने उपजीविका यावर आम्ही कार्य करत आहोत. आदिवासींच्या केवळ सामाजिक व सांस्कृतिक उत्थानासाठी प्रयत्न न करता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

## पीएम-जनमन' महाअभियान

आदिवासी समूहांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा घडवून त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र सरकारने मंजूर केलेला २४ हजार कोटींपैकी १५,३३६ कोटी रुपये निधी राज्य शासनाला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. देशातील २०० जिल्हे या योजनेसाठी निवडलेले असून राज्यातील १७ जिल्ह्यांचा समावेश या योजनेमध्ये करण्यात आला आहे.

## भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना

आदिवासी पाडे जोड रस्त्यांच्या माध्यमातून जोडण्यासाठी बिरसा मुंडा जोडरस्ते ही नवी योजना राज्यात पहिल्यांदा राबवली जात आहे. दळणवळणाच्या साधनांपासून शेकडो दूर राहिलेले आदिवासी पाडे या योजनेमुळे बारमाही रस्त्यांनी जोडले जाणार आहेत. यामुळे आदिवासी वाडे/पाडे यांना मूलभूत सोयीसुविधा पुरवणे सुलभ होणार आहे. या योजनेमुळे या घटनांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात या योजनेसाठी १,४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## आदर्श आश्रमशाळा

आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये या आश्रमशाळांची महत्त्वाची भूमिका असून आश्रमशाळांचे योगदानही उल्लेखनीय आहे. आधुनिक काळातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी या शाळांमध्ये आमूलाग्र बदल केले जात आहेत. राज्यात २५० शासकीय आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याच्या योजनेस सुरुवात करण्यात आली आहे.

## शबरी आदिवासी घरकूल योजना

राज्यातील ज्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची घरे कुडा-मातीची आहेत, अशा अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर १०० टक्के राज्य पुरस्कृत शबरी आदिवासी घरकूल योजना राबवण्यात येते. आदिवासी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी; तसेच बाह्य क्षेत्रातील जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत २६९ चौ.फूट.चटई क्षेत्र असलेली पक्की घरकुले बांधून दिली आहेत. २०२३-२४ या वर्षात १,२१,१२५ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केले आले. 'आदिवासी घरकूल योजना' आता शहरातही लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत घराच्या बांधकामासाठी २.५ लाख रुपयांचे अनुदान मिळते.

## पीएचडीसाठी मिळणार अधिछात्रवृत्ती

राज्यातील १०० आदिवासी विद्यार्थ्यांना दरवर्षी संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती दिली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा ३७ हजार रुपये पहिल्या दोन वर्षांसाठी व ४२ हजार रुपये मूल्यांकन अहवाल प्राप्तीनंतर अधिछात्रवृत्ती दिली जाते. दिव्यांगांना अतिरिक्त दोन हजार रुपये साहाय्य अनुदान दिले जाते. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना घरभाडे भत्ता वर्गवारीप्रमाणे दिला जातो. पीएचडी अभ्यासक्रमासाठी २०२२-२३ मध्ये १८० आणि २०२३-२४ मध्ये २८० विद्यार्थ्यांनी अधिछात्रवृत्तीसाठी प्रवेश निश्चित केला आहे.

## वनहक्क कायद्याची अंमलबजावणी

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ दिनांक ३१ डिसेंबर २००७ पासून राज्यात लागू झाला आहे. या अधिनियमाच्या कलम-३ (१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी राज्यात वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून वैयक्तिक स्वरूपाचे व सामूहिक स्वरूपाचे दावे मंजूर करून राज्याने आदिवासी बांधवांच्या उत्कर्षासाठीचा एक नवा आदर्श सर्वांसमोर घालून दिला आहे. जून २०२४ अखेरपर्यंत राज्यात २,००,२४७ वैयक्तिक दावे व ८,६४८ एवढे सामूहिक वनहक्क दावे मान्य करण्यात आले आहेत.

## विनाविलंब योजनांचा लाभ मिळणार

ज्या योजनांचे लाभ वनहक्कधारकांना त्यांच्या मागणीनुसार वैयक्तिकरीत्या देणे शक्य आहे, अशा योजनांचा लाभ विनाविलंब वनहक्क धारकांना देण्यात येणार आहे. सामूहिकरीत्या शासकीय योजनांचे लाभ वनहक्कधारकांना मिळण्याच्या दृष्टीने वनपट्टे दिलेल्या वनहक्कधारकांचे क्षेत्रनिहाय समूह (क्लस्टर) तयार करण्यात येते.

## ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना

ही योजना राज्य/जिल्हास्तरावर न राबवता सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती सुधारणा योजना पूर्वीची दलित वस्ती सुधार योजना व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना या योजनांप्रमाणे राज्यस्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तरावर राबवण्यात येत आहे.

ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना सुधारित करून या योजनेची व्याप्ती वाढवून मूलभूत सुविधांच्या कमतरता दूर करण्यासाठी योजनेचे आर्थिक निकष वाढवण्यात आले आहेत.

## बांबू लागवड

बांबू लागवडीतून आदिवासी भागाची नवी ओळख निर्माण व्हावी, यासाठी आदिवासी भागातील सामूहिक वनहक्काच्या जमिनीवर बांबू लागवड करण्यात येणार आहे. बांबू व त्यावर आधारित प्रक्रिया उद्योगाला चालना दिल्यास आदिवासी परिसरातील स्थलांतर थांबेल. स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल.

## अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ

राज्यातील ६१ अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करण्यास मान्यता देण्यात आली. १७ अनुदानित प्राथमिक आश्रमशाळांना माध्यमिक आश्रमशाळा म्हणून २०२४-२५ पासून श्रेणीवाढ करण्यात येईल. तसेच २०२४-२५ पासून इयत्ता ८ वी, पुढील दोन वर्षांत ९ ते १० चे वर्ग सुरू होणार आहेत. ४४ माध्यमिक आश्रमशाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालय (कला व विज्ञान) सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

## प्रकल्प कार्यालयातच मिळणार रहिवासी दाखला

अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गातील सरळसेवेची पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सरळसेवेच्या पद भरतीसाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) रहिवासी दाखला एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातच मिळणार आहे. जेणेकरून उमेदवारांना विहित कालमर्यादेत अर्ज सादर करणे शक्य होणार आहे.

## रोजगार, स्वयंरोजगार योजना

राज्यातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार या दोन योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यातील पहिल्या योजनेत राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या धर्तीवर स्वयंरोजगारासाठी प्रवासी वाहन, मिनी ट्रक, ट्रक व ट्रॅक्टर, मालवाहू इलेक्ट्रिक रिक्षा त्याचप्रमाणे कृषी संलग्न व्यवसाय, ऑटोमोबाईल, हॉटेल, धाबा सुरू करण्यासाठी ५ लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. यावरील व्याजदर एनएसटीएफडीसी यांनी निश्चित केल्याप्रमाणे असतो, तर दुसऱ्या योजनेत पुढील ३ वर्षांत ६० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात येत आहेत.

## सुधारित आकृतिबंधानुसार भरती

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्थ असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला असून त्यानुसार १४,३५९ इतकी नियमित पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच ६,०८८ पदांच्या सेवा बाह्यस्रोताद्वारे भरण्यात आल्या आहेत. तसेच गट-'अ', गट-'ब', व गट-'क' (लिपिकवर्गीय पदे) मधील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे.

## जोडधंद्यासाठी मदत

आदिवासी बांधवांच्या उत्पन्न वाढीसाठी कृषी साहित्य, बी-बियाणे उपलब्ध करून देणे, विहीर बांधण्यासाठी अर्थसाहाय्य करणे, मच्छीमारी व्यवसाय, केज फिशिंग सुविधा उपलब्ध करून देणे, दुग्धव्यवसायासाठी दुधाळ जनावरे उपलब्ध करून देणे, कृषी व कृषीविषयाशी संबंधित विविध योजना, आदिवासी विभागामार्फत विविध योजना सुरू करण्यात आल्या असून आदिवासी बांधवांचे उत्पन्न वाढवणे हा उद्देश आहे.

## डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

या योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना देण्यात येणाऱ्या एक वेळच्या चौरस आहारासाठी प्रतिलाभार्थी प्रतिदिन सरासरी खर्च हा ३५ रुपयांवरून ४५ रुपये केला आहे. गरोदर स्त्रिया व स्तनदा आदिवासी महिलांना आठवड्यातून सहा दिवस रविवार सोडून एक वेळ चौरस आहार देणे, त्यांच्या आहारातील उष्मांक व प्रथिनांची कमतरता दूर करून कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी करणे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## कोर्ट फीमध्ये सवलत

राज्यातील अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना फौजदारी किंवा दिवाणी न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी भराव्या लागणाऱ्या कोर्ट फीमधून पाच वर्षांसाठी सवलत देण्यात आली आहे. आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये वाढ करण्यात आली आहे. जमीन मोजणीसाठी येणाऱ्या शासकीय शुल्कामध्ये सवलत देण्यात आली आहे.

## कलादालनाची स्थापना

आदिवासी कलांचे प्रदर्शन, वृद्धी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी हतगड तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक येथे कलादालन स्थापन करण्यात येणार आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगार अर्थसाहाय्याच्या योजनांसाठी १०० कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे.

**शब्दांकन : शैलजा पाटील,** विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यातील ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजना गावस्तरावर प्रभावीपणे राबवण्यासाठी ग्रामविकास विभाग सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. ग्रामविकास विभागासह माझ्याकडे असलेल्या पर्यटन विभागाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटन क्षेत्रात वृद्धी आणण्याचा प्रयत्न करत आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना राज्याच्या ग्रामीण विकास आणि पर्यटनवृद्धीला गती देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.**

# पर्यटनवृद्धीसह गावांचा विकास

**गिरीश महाजन,** ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री



ग्रामविकास विभागाच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत गतिमानता व गुणवत्ता आणण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये ४ लाख ३५ हजार ७२४; तसेच राज्य पुरस्कृत विविध आवास योजनेतून २ लाख ६ हजार ७५० आणि मोदी आवास घरकूल योजनेंतर्गत ३७,५६४ असे एकूण ६ लाख ८० हजार ३८ घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. येत्या काळात १० लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. ९२,०३३ लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## 'उमेद'चा महिलांना आधार

'उमेद' या अभियानांतर्गत राज्यात एकूण ६ लाख ४८ हजार स्वयंसाहाय्यता समूह निर्माण करण्यात आले असून, त्यामध्ये ६३ लाख ८१ हजार कुटुंबांचा समावेश आहे. गत दोन वर्षांमध्ये एक लाख २५ हजार बचतगटांची नव्याने स्थापना करण्यात आली असून यामध्ये १२ लाख ५० हजार कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे. स्वयंसाहाय्यता बचतगटांचे अनुदान १५ हजारांवरून ३० हजार रुपये करण्यात आले आहे. त्यासाठी ९१३ कोटींची तरतूद केली आहे. या अभियानांतर्गत १ हजार ७३३ कोटी रुपयांचे खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे. व्यवसाय उद्योग करण्यासाठी १,४१३ कोटी रुपयांचा गुंतवणूक निधी स्वयंसाहाय्यता समूहांना वितरित करण्यात आला असून त्यांना त्यांच्या उद्योग व्यवसायासाठी विविध बँकांमार्फत २८,७१२ कोटी रुपयांचा पतपुरवठा करण्यात आला आहे. तसेच सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेत प्रति समूहाला ४ लाखप्रमाणे ६१ कोटी ८४ लाख रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. 'उमेद' अभियानातील समूह संसाधन व्यक्तींचे मानधन दरमहा ६,००० रुपये करण्यात आले आहे.

## 'महालक्ष्मी सरस' हक्काचे व्यासपीठ

स्वयंसाहाय्यता बचतगटांनी तयार केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी, यासाठी मुंबईसह आता प्रत्येक विभागस्तरावरही 'महालक्ष्मी सरस' आयोजित करण्यात येत आहे. मुंबईसह नागपूर, पुणे, नाशिक, अमरावती, सोलापूर, रत्नागिरी, ठाणे व छत्रपती संभाजीनगरमधील महालक्ष्मी सरसमध्ये २१ कोटींची उलाढाल झाली आहे. उमेद अभियानात सन २०२३-२४ मध्ये १३ लाख ११ हजार महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. ग्रामीण कुटुंबातील १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यात येत असून आतापर्यंत २ लाख ७८ हजार युवक-युवतींनी याचा लाभ घेतला आहे.



## रस्ते विकास व ग्रामपंचायत बांधणी

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत जून २०२२ पासून २,८२८ कि.मी. लांबीच्या ४६२ रस्त्यांची कामे मंजूर आहेत. तसेच २२३ पुलांची कामे प्रगतिपथावर आहेत. या

योजनेंतर्गत आतापर्यंत २,२७२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत जून २०२२ पासून ४०,००० कि.मी. रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली असून, यासाठी ४३,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कार्यालयासाठी स्वत:ची इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत सन २०२२ ते २०२४ या कालावधीत १९८८ ग्रामपंचायत कार्यालयांच्या बांधकामांना मंजुरी मिळाली आहे.

## ‘स्वच्छ वारी, निर्मल वारी’

‘स्वच्छ वारी, निर्मल वारी’साठी सन २०२२-२३ साठी १४ कोटी १७ लाख, सन २०२३-२४ साठी २६ कोटी ८४ लाख, तर सन २०२४-२५ मध्ये ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. संत मुक्ताई पालखी वारीसाठी २ कोटी ४१ लाख व संत निवृत्तीनाथ यांच्या पालखी वारी सोहळ्यासाठी पहिल्यांदा २ कोटी २४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. उपलब्ध निधीतून भाविकांना तात्पुरते स्वच्छता गृह, जागोजागी स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, आरोग्य सुविधा, वारीच्या ठिकाणी निवाऱ्याची सोय आदी कामे करण्यात आली आहेत.



## तांडा समृद्धी योजना

राज्यातील बंजारा व लमाण समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण समृद्धी योजनेंतर्गत स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी दोन गावांमधील ३ कि.मी. अंतराची अट शिथिल करण्यात आली आहे. या योजनेसाठी ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

## ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेत ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्राच्या प्रमाणात २४ टक्के तीर्थक्षेत्रांना नव्याने ‘ब’ वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. १५० तीर्थक्षेत्रांची कामे सुरू होणार आहे. या योजनेसाठी निधीची मर्यादा ५ कोटींपर्यंत वाढवली आहे. श्री संत सेवालाल महाराज, पोहरादेवी व उमरी या तीर्थक्षेत्रांसाठी ७२३ कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## पर्यटन महोत्सव

राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी गणेशोत्सव, मिनी पर्यटन महोत्सव, प्रादेशिक पर्यटन परिषदेसह वर्षा पर्यटनासाठी भंडारदरा, आंबोली वर्षा पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी मुंबई महोत्सव, हिंदवी स्वराज्य महोत्सवाचे देखील आयोजन करण्यात आले.

## शिवसृष्टी उभारणार

नव्या पिढीला आणि पर्यटकांना छत्रपती शिवरायांसह राज्याच्या प्रेरणादायी इतिहासाची माहिती व्हावी, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत राज्यात शिवनेरी, गोराई, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व रामटेक या सहा ठिकाणी शिवसृष्टी, उद्यान, संग्रहालय व शिवकालीन थीम पार्क उभारणार आहे. या सर्व कामांसाठी ४१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून वर्षभरात सर्व कामे पूर्ण करण्याचा मानस आहे.

## राज्याचे पर्यटन धोरण जाहीर

राज्याचे नवीन पर्यटन धोरण तयार करण्यात आले आहे. या पर्यटन धोरणाद्वारे राज्यात अंदाजे एक लाख कोटींची गुंतवणूक, तर १८ लाख रोजगार निर्मिती करून पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे. पर्यटन क्षेत्रात महिला उद्योजकांचा सहभाग वाढवण्यासाठी महिलांनी पर्यटन व्यवसाय उभारणीसाठी घेतलेल्या १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाच्या रकमेवरील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. आतापर्यंत ११५ महिला उद्योजिकांना उद्देशपत्र निर्गमित करण्यात आले असून, त्यापैकी १० उद्योजिकांना बँकेमार्फत कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

## गडकिल्ल्यांचा विकास

राज्यातील हरिहर, राजगड किल्ल्यांच्या पायथ्याशी पायऱ्यांची दुरुस्ती व नूतनीकरण; तसेच अंजिनरी येथे साहसी पर्यटन केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. माहुली किल्ला, होटगी तलाव, प्रतापगड, मुक्ताईनगर, टेंबू, पंढरपूर मंदिर, वैतरणा पर्यटनस्थळ, मंगळग्रह मंदिर या ठिकाणी विश्रांती कक्ष, उपाहारगृह, प्रसाधन गृह, बाग इ. पायाभूत सेवा सुविधांची निर्मिती करण्यात आली आहे. लोहगड, राजगड, आंबोली घाट, राजधरवाडी, हरिहर, अलंग-मलंग-कुलंग, रतनगड, रामेश्वर मंदिर, पारगड आणि चवदार तळे येथे जैव शौचालयांच्या उभारणीसह तोरणमाळ, साल्हेर-मुल्हेर आणि चिखलदरा पर्यटन प्रकल्पांचा विकास करण्यावर भर देण्यात येत आहे.

एकंदरीतच ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाला, तरच राज्याच्या विकासाला गती मिळू शकते हे लक्षात घेऊन गावातील प्रत्येकाचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासन सर्वातोपरी प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर पर्यटनाची बलस्थाने लक्षात घेऊन पर्यटनालाही चालना देण्यात येत आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे-खंडारे,** विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील जनतेला पायाभूत सुविधा पुरविताना त्यांना शुद्ध पेयजल पोहोचवण्यासह स्वच्छतेच्या दृष्टीने राज्यात काम होत आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राज्यातील प्रत्येक नागरिकाला पिण्याचे शुद्ध पाणी देण्यासह ग्रामीण भागातील जनतेपर्यंत स्वच्छतेविषयी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. या दिशेने वाटचाल करताना जलजीवन मिशन व स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा – २ या प्रमुख योजनांसह अनेक प्रकल्प व योजनांद्वारे आमच्या सरकारच्या काळात मोठे काम होत आहे, याचा राज्याच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा मंत्री म्हणून मला आनंद आहे.

# आरोग्यदायी जीवनासाठी पुढचे पाऊल

**गुलाबराव पाटील,** पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री



राज्यातील केंद्र पुरस्कृत जलजीवन अभियान, स्वच्छ भारत अभियान (ग्रा), अटल भूजल योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम यांसह मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, शिवकालीन पाणी साठवण योजना, संत गाडगेबाबा नागरी ग्रामीण स्वच्छता अभियान, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प, जलविज्ञान प्रकल्प, जलस्वराज्य टप्पा - २, सुजल निर्मल अभियान अशा विविध महत्त्वाकांक्षी योजनांनी बदलत्या आधुनिक महाराष्ट्राला पायाभूत सुविधांमध्ये मजबूत करत आहे.

नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीसाठी स्वच्छ भारत अभियान टप्पा - १च्या यशाला बळकटी देणे, व्यापक लोकचळवळीच्या माध्यमातून शाश्वत स्वच्छतेचे लक्ष्य गाठण्यासाठी वाटचाल होत आहे. स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा - २ राबवताना सन २०२४-२५ पर्यंत संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त अधिक (ODF+) मॉडेल बनवणे हा मुख्य उद्देश समोर ठेवला आहे.

## हर घर नल से जल

ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत 'हर घर नल से जल'प्रमाणे पाणीपुरवठा करण्यास शासन कटिबद्ध आहे. यात ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन, गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे हे जलजीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या अभियानात मोठे काम केले आहे. सद्य:स्थितीत राज्यातील एकूण १ कोटी ४६ लाख ७२ हजार ५० कुटुंबांपैकी १ कोटी २६ लाख ७५ हजार ८०७ कुटुंबांना नळजोडणीद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. हे प्रमाण ८६.३९ टक्के आहे. राज्यातील २०,९१८ गावांना १०० टक्के घरगुती नळजोडणी पूर्ण करण्यात आली आहे. राज्यातील एकूण ८१,५३० शाळांपैकी ८०,८८१ शाळांना (९९.२०%) नळजोडणी देण्यात आली आहे. राज्यातील एकूण ९०,६६५ अंगणवाड्यांपैकी ८९,३७८ अंगणवाड्यांना (९८.५८%) नळजोडणी देण्यात आली आहे. राज्यातील एकूण १७,३६२ गावे 'हर घर जल' म्हणून घोषित करण्यात आली आहेत.



## जल जीवन मिशन

जल जीवन मिशन ही योजना ६०:४० टक्के केंद्र व राज्य सरकारच्या हिश्शाने राबवण्यात येते आहे. या आर्थिक वर्षापर्यंत एकूण २,७२४ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. एकूण ५,२५२ कोटी रुपये राज्य सरकारकडून देण्यात येत आहेत. आतापर्यंत ५,५४० गाव खेड्यातील ३,१७१ योजनांतील कामे पूर्ण झाली आहेत. जल जीवन मिशन हा एक कालमर्यादित कार्यक्रम आहे.

**जल जीवन मिशन राबविल्या जाणाऱ्या गावांची माहिती - राज्यातील एकूण ग्रामपंचायती -** २७,८४४, **गावे -** ४०,१९९, **वाड्या -** १,००,२९३.

## प्रयोगशाळांची निर्मिती

मागील आर्थिक वर्षात राज्यातील पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर या सहा विभागीय तपासणी प्रयोगशाळा इमारतींना मंजुरी देण्यात आली. राज्यातील नवीन मंजूर असलेल्या राज्यस्तरीय प्रयोगशाळा इमारतीचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. २७ जिल्हा प्रयोगशाळा इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी सध्या १४३ उपविभागीय प्रयोगशाळांसह एकूण १७७ प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणामार्फत कार्यरत आहेत.

## महिलांना पाणी तपासणीचे प्रशिक्षण

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीत एकूण २,८६,७७३ पाणीस्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले. या वर्षामध्ये, क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे, रासायनिक घटकांसाठी २,४६,१८७ पाणी नमुने तपासण्यात आले. सद्य:स्थितीमध्ये ४०,१९९ गावांमधून निवड केलेल्या २,००,९९५ महिलांपैकी एकूण १,९९,७४३ महिलांना पाणी तपासणीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## अटल भूजल योजना

राज्यातील अति उपसा झालेल्या, तीव्र व अंशत: तीव्र पाणलोट क्षेत्रातील १३ जिल्ह्यांच्या ४३ तालुक्यांमधील १,४४२ गावांमध्ये अटल भूजल योजना राबवत आहे. लोकसहभागातून १,१३३ जल सुरक्षा आराखडे तयार करण्यात आले असून त्यांची अंमलबजावणी प्रगतिपथावर आहे.

## महाराष्ट्र भूजल विज्ञान प्रकल्प

जलविज्ञान प्रकल्पचा पुढील टप्पा म्हणजेच राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प टप्पा - २ आहे. राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प हा जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने राबवण्यात येत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ही अंमलबजावणी यंत्रणा आहे. हा प्रकल्प ८ वर्षांच्या कालावधीसाठी असून त्यास २७ कोटी रुपयांच्या निधीस केंद्र शासनाची मान्यता मिळालेली आहे.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा – २

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा - २ राबवण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सन २०२४-२५ पर्यंत संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त अधिक (ODF+) मॉडेल बनवणे हा मुख्य उद्देश आहे. या अभियानासाठी कृतिआराखड्यामध्ये वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान, सार्वजनिक शौचालय बांधकाम, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन आदी कामांसोबतच इतर कामे समाविष्ट करण्यात आली आहेत.

आतापर्यंत घनकचरा व्यवस्थापन गावे १४,२४१, सांडपाणी व्यवस्थापन गावे ११,५०४, हागणदारीमुक्त (अधिक) झालेली गावे १९,२४८, गोबरधन प्रकल्प १४, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प ६२, मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प १५, वैयक्तिक शौचालय २८,६९२ आणि सार्वजनिक शौचालय १,०४४ एवढी कामे पूर्ण झाली आहेत. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), १५वा वित्त आयोग, मनरेगा व इतर योजनांच्या कृतिसंगमाने निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## गोबरधन आणि मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प



स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील ग्रामपंचायत अंदरसुल येथे राज्यातील पहिला गोबरधन प्रकल्प आपण पूर्ण केला असून अमरावती, पुणे, सातारा, जळगाव जिल्ह्यातील प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यावर्षी एकूण १४ प्रकल्प पूर्ण झाले. रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामपंचायत नाचणे येथे राज्यातील पहिला मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प आपण पूर्ण केला. यावर्षी आतापर्यंत १५ मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प पूर्ण केले. मागील वर्षात राज्यात ४,००७ गावे हागणदारीमुक्त + मॉडेल म्हणून घोषित करण्यात आली होती. तसेच १५,५५,३२९ वैयक्तिक शौचालयांचे रेट्रोफेटिंग करण्यात आले आहे. राज्यातील ३,५५६ गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाची कामे पूर्ण झाली आहेत, तर राज्यातील ३,४९९ गावातील सांडपाणी व्यवस्थापनाची कामे पूर्ण झाली आहेत.

## महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन यंत्रणा

राज्यातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण व तांत्रिक समन्वयाची जबाबदारी महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन यंत्रणेकडे सोपवण्यात आली आहे. मूळ पाणलोट क्षेत्र शोधून काढणे व त्यांचा आराखडा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे प्रभाव क्षेत्र शोधणे व त्याचा आराखडा तयार करणे, भूजल वापर योजना तयार करणे, एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे व सर्वस्तरीय समित्यांना तांत्रिक साहाय्य करणे व यंत्रणेकडील कामे पूर्ण होण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला आवश्यकतेनुसार अनुदान व आगाऊ निधीची तरतूद केली जात आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६,७७,५१५ पाणी नमुने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत तपासण्यात आले आहेत.

पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रात होत असलेल्या महत्त्वपूर्ण योजना व प्रकल्पांमुळे राज्याच्या अगदी ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेपर्यंत शुद्ध पेयजल पोहोचण्यास मदत मिळणार आहे. स्वच्छतेसाठी निर्माण केल्या जाणाऱ्या सोयीसुविधा नागरिकांना आरोग्यपूर्ण जीवनाच्या आणि महाराष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर नेतील, हे नक्की.

**शब्दांकन : किरण वाघ,** विभागीय संपर्क अधिकारी

**राज्याची गतिमान प्रगती करण्यात दळणवळण सुविधांची व्यापक उभारणी महत्त्वाची बाब आहे. त्याला प्राधान्य देताना शासनाने अनेक मोठे आणि उपयुक्त उपक्रम राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरू केले आहेत. नागरिकांच्या प्रवास सुविधेच्या दृष्टीने अनेक प्रकल्प राज्यात निर्धारित वेळेत गतीने पूर्ण झाले आहेत; तसेच अनेक प्रकल्प वेगाने पूर्ण होत आहेत.**

# दळणवळण सुविधांची उभारणी


**दादाजी भुसे,** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री



नागपूर ते मुंबई प्रवास अवघ्या आठ तासांमध्ये पूर्ण करणे शक्य करणारा समृद्धी महामार्ग हा राज्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून भरवीर ते इगतपुरी तिसऱ्या टप्प्याच्या लोकार्पणानंतर ६२५ कि.मी. रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला आहे. पूर्ण महामार्गाचे तिसऱ्या टप्प्यातील उर्वरित ७६ कि.मी.ची लांबी नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याची एकूण प्रकल्प किंमत ५५,३३५.३२ कोटी रुपये आहे. यावरून ऑगस्ट २०२४ पर्यंत १२२ लाख वाहनांनी सुरक्षित प्रवास केलेला आहे.

१० जिल्ह्यांना जोडणाऱ्या या महामार्गाचे काम गतीने पूर्ण करण्यात आले असून प्रवाशांसाठी अतिशय उपुयक्त सुविधा उपलब्ध झाली आहे. सद्य:स्थितीत या प्रकल्पासाठी लागणारी ८,८६१.०२ हेक्टर जमीन (रस्त्याची रुंदी इंटरचेंज) संपादित करण्यात आली आहे. त्यापोटी मोबदला म्हणून ८,०१७.७० कोटी रुपये इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

प्रकल्पामध्ये वन्यजीव संरक्षणासाठी एकूण १०० बांधकामे प्रस्तावित केली आहेत. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी 'ध्वनी रोधक'ची तरतूद केली आहे. प्रकल्पाच्या बांधकामांमध्ये येणारी २ लक्ष ३६ हजार झाडे बाधित होत असली तरी समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा ११ लाख ३१ हजार झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये एकूण १३८.४७ मेगा व्हॅट सौरऊर्जा निर्मिती प्रस्तावित आहे.



## भंडारा–गडचिरोली प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग

महाराष्ट्र राज्याच्या पूर्व व पश्चिम सीमा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडण्याच्या दृष्टीने, नागपूर येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गास गोंदिया आणि गडचिरोली प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार महामार्ग विकसित करण्याचे; तसेच गोंदिया ते गडचिरोली दरम्यान प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग विकसित करणे प्रस्तावित आहे.

राज्यातील पूर्व विभागातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यातील नैसर्गिक खनिज साधनांनी समृद्ध असलेल्या अल्पविकसित भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भंडारा-गडचिरोली (पॅकेज २) अंतर्गत प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम एमएसआरडीसीद्वारे हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी क्षेत्र मुख्य प्रवाहाशी जोडले जाऊन त्या परिसराचा सामाजिक व आर्थिक विकास होण्यास मदत होईल व नवीन उद्योगास चालना मिळून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे.

सदरचा प्रकल्प हा २ जिल्ह्यांतील एकूण ६ तालुक्यांतील ७८ गावांमधून जात आहे, तर सावरखेडा इंटरचेंजपासून गाडेगावपर्यंत मार्गाकरिता कुही व भंडारा तालुक्यांतील १७ गावांमधून जात आहे. तसेच गडचिरोली कनेक्टरकरिता गडचिरोली तालुक्यांतील गडचिरोली गावांमधून जात आहे.

## जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाच्या बांधकामास मान्यता

नांदेड ते जालना या १८० कि.मी. लांबीच्या द्रुतगती महामार्गाचे नवीन काम हाती घेण्यात आले असून प्रकल्प रस्ता समृद्धी द्रुतगती मार्गाच्या कि.मी. ३५२+५००

(जालना) पासून सुरू होतो आणि नांदेड देगलूर राष्ट्रीय महामार्ग (रा.म १६१) च्या कि.मी. ३२+२०० येथे संपतो. हा प्रकल्प महामार्ग जालना, परतूर, मंठा, सेलू, जिंतूर, परभणी, पूर्णा आणि नांदेड या तालुक्यांमधून जातो व त्याची लांबी १७९.८५ किमी इतकी आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी महामंडळाने २३७.४८ कोटी रुपये निधी उपलब्ध केला आहे. त्यापैकी बाधित शेतकऱ्यांना ३९.०८ कोटी रुपये इतका निधी भूसंपादनापोटी अदा केलेला आहे.

## नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग

राज्यातील पूर्व विभागातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यातील नैसर्गिक खनिज साधनांनी समृद्ध असलेल्या अल्पविकसित भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नागपूर ते गोंदिया (पॅकेज १) अंतर्गत प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम एमएसआरडीतर्फे हाती घेण्यात आले आहे.

## सिंदखेडराजा ते शेगाव भक्तिमार्गाचे बांधकाम

शेगाव हे विदर्भातील एक पवित्र धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. शेगावला कापसाची मोठी बाजारपेठ आहे. शेगावच्या परिसरात कापूस जिनिंग आणि प्रेसिंगचे मोठे जाळे असून मिलमधील उत्पादन राज्यातील अन्य ठिकाणी कापड निर्मितीसाठी माल गाड्यांद्वारे नेले जाते. सद्य:स्थितीत शेगाव हे विभाजकासह चौपदरी मार्गिका व दुपदरी मार्गिका असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या नेटवर्कने जोडलेले आहे. प्रस्तावित प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग १०९.५२७ कि.मी.मुळे सिंदखेड राजा ते शेगाव हे अंतर १ तास या वेळेत पार करणे शक्य होईल व वाहन इंधन, देखभाल व दुरुस्तीवरील खर्च कमी होईल; तसेच नवीन ग्रीनफिल्ड आखणीवर दोन्ही बाजूस सुविधा केंद्र, टोल प्लाझा व प्रवेश नियंत्रित प्रणाली प्रस्तावित आहेत. सदरचा प्रकल्प हा बुलडाणा जिल्ह्यातून ४ तालुक्यांतील ४९ गावांमधून जात आहे.

## विरार अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प

(मौजे नवघर ता.वसई ते मौजे बळवली ता. पेण (९८.५० कि.मी.) विरार ते अलिबाग १२८ कि.मी. लांबीची बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका ही वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण व अलिबाग या तालुक्यातून जात आहे. राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील मौजे नवघर, ता. वसई येथून सुरू होऊन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील मौजे बळवली, ता. पेणपर्यंतचा ९८.५०० कि.मी. लांबीचा पहिला टप्पा हाती घेतला आहे. प्रस्तावित मार्गिका ही मुख्यत: जे.एन.पी.टी, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंकला जोडणार आहे. तसेच ही मार्गिका मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८४८, कल्याण-मुरबाड-निर्मळ राष्ट्रीय महामार्ग क्र.६१, तळोजा बायपास, मुंबई वडोदरा एक्सप्रेस वे, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग-४८, पनवेल-उरण राष्ट्रीय महामार्ग क्र.०४ब व मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ या महत्त्वाच्या रस्त्यांना जोडणारा शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग आहे.

विरार अलिबाग प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी महामंडळाने १,६०८ कोटी रुपये निधी उपलब्ध केला आहे. त्यापैकी बाधित शेतकऱ्यांना २६२.९८ कोटी रुपये इतका निधी भूसंपादनापोटी अदा केलेला असून त्या बदल्यात महामंडळाकडे ६५.४४ हे.आर क्षेत्राचा ताबा मिळालेला आहे.

## महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग

समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर सर्व धार्मिक स्थळांच्या सर्वांगीण विकासासाठी; तसेच पर्यटनांच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील पवनार जि. वर्धा ते पत्रादेवी जि. सिंधुदुर्ग ते महाराष्ट्र-गोवा सरहद्द जोडणाऱ्या या महामार्गात येणाऱ्या जिल्ह्याच्या सामाजिक तथा आर्थिक विकासासाठी महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास या प्रकल्पाचा तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अहवाल तयार करण्याबाबतचे निर्देश दिले असून अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च २०२३ मध्ये महामार्गाची घोषणा केली आहे.

## पुणे चक्राकार मार्ग

पुणे चक्राकार मार्गाच्या १७०.१२ कि.मी. लांबीच्या संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजे १,४४७.०६ हेक्टर इतकी खासगी जमीन संपादित करण्यात येत आहे. पुणे चक्राकार मार्गाच्या भूसंपादनासाठी महामंडळाने आतापर्यंत ४,१३२.८५ कोटी रुपये निधी उपलब्ध केला आहे. त्यापैकी बाधित शेतकऱ्यांना ३,२८९.७७ कोटी रुपये इतका निधी भूसंपादनापोटी अदा केला आहे.

## नवेगाव मोर ते सुरजागड खाणीपर्यंत जाणारा ग्रीनफिल्ड मार्ग

गडचिरोली जिल्ह्यातील खनिज वाहतुकीसाठी नवेगाव मोर-कोनसरी-मूळचेरा-हेदरी ते सुरजागड माईन्स रस्त्यांच्या बांधकामामुळे गडचिरोलीसारखा खनिज संपत्तीने संपन्न असलेला भूभाग राज्याच्या विकसित भागाशी प्रस्तावित सेमाडोह-नवेगाव मोर प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग व महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे राज्यातील अन्य भागाशी जोडला जाईल. तसेच केंद्र शासनाकडून प्रस्तावित दुर्ग-हैद्राबाद प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गामुळे देशाच्या अन्य भागांशीही जोडला जाईल. हा मार्ग २ जिल्ह्यांतून ४ तालुक्यांतील ४५ गावांमधून जात आहे.

## पुणे–नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाचे बांधकाम

रेल्वे मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत संसदेमध्ये व्हिजन २०२० सादर करण्यात आले आहे. त्यात देशातील विविध राज्यांत द्रुतगती रेल्वे मार्गाच्या जाळ्याने विविध वाणिज्यक, औद्योगिक, धार्मिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची शहरे व निमशहरे जोडणे प्रस्तावित आहे. पुणे-नाशिक दरम्यान द्रुतगती रेल्वेमार्ग बांधण्याचे व्हिजन २०२२ मध्ये नियोजित आहे. पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्ग महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, व नाशिक या ३ प्रमुख जिल्ह्यातून प्रस्तावित आहे. या महामार्गामुळे पुणे-नाशिक प्रवास सद्य:स्थितीत ५ तासांवरून साधारणत: २ ते २.५ तासावर येईल.

**शब्दांकन : वंदना थोरात–वारेगावकर,** विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यात मृद् व जलसंधारण विभागामार्फत जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत ऑगस्ट २०२४ अखेर ६४,४९१ कामे पूर्ण झाली. या वर्षी ६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेंतर्गत राज्यातील जलाशयांमधून गाळ काढण्याचे काम सुरू आहे. लोकसहभागातून आतापर्यंत ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. जलस्रोतांमधून गाळ काढणे ही मृद् व जलसंधारण विभागाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेस लोकचळवळीचे स्वरूप आल्यामुळे अधिकाधिक उत्तम दर्जाची कामे लोकसहभागातून करण्यात येत आहेत.**

# जलसंवर्धनातून शाश्वत समृद्धीकडे

**संजय राठोड,** मृद् व जलसंधारण मंत्री



महाराष्ट्र राज्य हे देशात सर्वात जास्त धरणे, जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट होत आहे. या धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करून शेतात पसरवल्यास धरणांची मूळ साठवण क्षमता पुनर्स्थापित होण्याबरोबरच जमिनीची सुपीकता सुधारून कृषी उत्पन्नातदेखील भरीव वाढ होत आहे. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाद्वारे धरणामधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे, यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबवण्यात येत आहे. 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' ही योजना पुढील तीन वर्षांपर्यंत मर्यादित न राहता ती कायमस्वरूपी राज्यात राबवण्याचा निर्णय मृद् व जलसंधारण विभागामार्फत घेण्यात आला आहे.

धरणांमध्ये / बंधाऱ्यांमध्ये / तलावांमध्ये साचलेला गाळ काढल्यामुळे जलसाठ्यांची पुनर्स्थापना होत असून, त्यामुळे जलस्रोतांच्या उपलब्धतेत शाश्वत स्वरूपाची वाढ होत आहे. यामुळे शेतीकरिता पाणी उपलब्ध होण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याच्या समस्येवरही उपाययोजना होत आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट साध्य होत असल्याने राज्यामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

जलसंधारण विभागाच्या माध्यमातून सन २०२३-२४ या वर्षात जलाशयांतून सुमारे ८० लाख घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. लोकसहभागाच्या माध्यमातूनही गाळ काढण्यासाठी मदत झाली आहे. हा गाळ सुमारे ६ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी शेतात पसरवलेला आहे. या योजनेसाठी ४३.२३ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत १८८२ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून एकूण ४.५ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी १.२४ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. उर्वरित जलस्रोतांमधून सद्य:स्थितीत गाळ काढण्याचे काम मोहीम स्वरूपात सुरू आहे.

श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग सोशल प्रोजेक्ट्स आणि महाराष्ट्र सरकारच्या मृद् व जलसंधारण विभाग यांच्यात २६ नोव्हेंबर २०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. यासोबतच नाम फाऊंडेशन, टाटा मोटर्स यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये ३५० जलसंधारण प्रकल्प राबवण्यासाठी ११ मार्च २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. संबंधित स्वयंसेवी संस्थांनी धडाक्यात कामालाही सुरुवात केली आहे.



## जलयुक्त शिवार अभियान २.०

महाराष्ट्र राज्यामध्ये जवळपास ७८-८० टक्के क्षेत्र कोरडवाहू असून पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे सतत टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होऊन त्याचा परिणाम कृषी क्षेत्रावर होतो. मर्यादित सिंचन सुविधा, राज्यभर अवर्षणप्रवण क्षेत्राची असलेली मोठी व्याप्ती, पावसाची अनिश्चितता लक्षात घेता या परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यात जलयुक्त शिवार अभियान



राबवण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियान १.० या योजनेचे यश पाहता राज्यातील जलयुक्त शिवार अभियानाचा प्रथम टप्पा, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबवलेल्या गावांमध्ये, पाण्याची गरज असलेल्या व जलसंधारणाची कामे होऊ शकणाऱ्या सुमारे ५,८०० गावांमध्ये विविध मृद् व जलसंधारण कामांच्या माध्यमातून पाणीसाठा क्षमता निर्माण करून पाणलोट क्षेत्राचा शाश्वत विकास करणे, याकरिता राज्यात जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्याचा निर्णय घेऊन कामांना सुरुवात झाली आहे.

पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी संरक्षित करणे, विकेंद्रित जलसाठे निर्माण करणे, देखभाल-दुरुस्ती करून जलस्रोतांची साठवणक्षमता पुनर्स्थापित करणे, पिकांसाठी संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करणे, गावे जलपरिपूर्ण करून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे, गावांमध्ये जलसाक्षरता अभियानाद्वारे जनजागृती करणे आदी बाबींचा समावेश आहे.

या योजनेंतर्गत ५,८३९ गावांची निवड करण्यात आली असून गाव आराखड्याप्रमाणे प्रस्तावित कामांची संख्या १,४८,३३१ आहे. माहे मे २०२४ अखेर सुमारे ५४,८४५ कामे (३७ टक्के) पूर्ण झाली आहेत. माहे मे-२०२४ अखेर विविध योजनांच्या निधीतून आणि जलयुक्त शिवार अभियानाच्या लेखाशिर्षांतर्गत एकूण ९७९ कोटी रुपये खर्च झाला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये जलयुक्त शिवार अभियान २.० साठी ६५० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० ही योजना राज्यात राबवण्यात येत आहे. या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण ६०:४० टक्के आहे. मातीची धूप कमी करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हे या योजनेचे उद्दिष्ट असून राज्यात सन २०२१-२२ पासून कार्यक्रम अंमलबजावणी सुरू झाली आहे. राज्याकरिता या योजनेंतर्गत १४० प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत, तर १४० प्रकल्पांपैकी १३८ सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता प्राप्त झाली आहे.

सद्य:स्थितीत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत रक्कम ४९,१७०.०५ लाख रुपयांच्या २२,३५३ कामांना तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. तसेच रक्कम ४८,५११.७७ लाख रुपयांच्या २१,४८१ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी रक्कम २२,५५२.४२ लाख रुपयांची ९,८०४ कामे सुरू झाली असून १६,७५१.४५ लाख रुपये रकमेची ७,७३३ कामे पूर्ण झाली आहेत. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनांतर्गत आतापर्यंत १५,१०८.२४ लाख रुपये इतका खर्च झाला आहे. या प्रकल्पाचा कालावधी सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ असा आहे. यासोबतच राज्यातील जलसंधारणाचे प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्यासाठी व जलसंवर्धनातून राज्याची शाश्वत समृद्धी साधण्यासाठी मृद् व जलसंधारण विभागामार्फत अनेक संकल्पनांना अमलात आणण्यात येत आहे.

मृद् व जलसंधारण विभागासोबतच यवतमाळ व वाशिम जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना मी दिग्रस, दारव्हा, नेर या तालुक्यांमध्ये प्रामुख्याने नांदगव्हाण धरण, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नाट्यगृह, अत्याधुनिक क्रीडा संकुल, मोक्षधाम, सुसज्ज अभ्यासिका, महिलांसाठी अगरबत्ती प्रकल्प, प्रशासकीय इमारती, व्यापारी संकुल, अत्याधुनिक सुसज्ज बसस्थानके, डिजिटल शाळा अशा अनेक उपक्रमांसह पायाभूत सुविधांसाठी अनेक कामे केली आहेत.

यासोबतच स्वखर्चातून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून शिकवणी व मासिक मानधन, पोहरादेवी - उमरी तीर्थक्षेत्र विकास, श्री संत सेवालाल महाराज तीर्थक्षेत्र व नंगारा म्युझियम, नवी मुंबई येथे सुसज्ज बंजारा समाज भवन निर्मितीची संकल्पना, संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजना, महाराष्ट्र राज्य गोर बंजारा साहित्य अकादमीची स्थापना केली आहे.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी

‘स्वावलंबी शेतकरी, संपन्न शेतकरी’ हे ब्रीद जपत शेतकऱ्यांना विविध पातळ्यांवर साहाय्य करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाची प्रभावीपणे वाटचाल सुरू आहे. या दोन वर्षांच्या कालावधीत केवळ कृषी विभागाच्या नव्हे, तर कृषी अनुषंगिक विविध विभागांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ताकद देण्यात आली आहे. शेतकरी हिताच्या अनेक निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली आहे.

# शेतकरी हितासाठी...

**धनंजय मुंडे,** कृषी मंत्री



शेतकऱ्यांसाठी बी-बियाणांकरिता थेट अनुदान, सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन, शेतमालाचे मूल्यवर्धन, शेतमाल साठवणूक, बाजारपेठेची उपलब्धता इत्यादीबाबत विविध योजना राबवण्यात येत आहेत. शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य करण्यासाठी ‘नमो शेतकरी महासन्मान निधी’, ‘एक रुपयात पीक विमा’, ‘गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान’ अशा विविध योजना सुरू केल्या आहेत.

## नमो शेतकरी महासन्मान निधी

अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी प्रधानमंत्र्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ‘प्रधानमंत्री किसान सन्मान निधी’ योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी ‘नमो शेतकरी महासन्मान निधी’ ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेत केंद्र सरकारच्या प्रतिवर्ष, प्रतिशेतकरी ६ हजार रुपयांमध्ये राज्य सरकार आणखी ६ हजार रुपयांची भर घालेल. यामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना १२ हजार रुपये प्रतिवर्षी मिळतील. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत ९१,९३,००० शेतकरी कुटुंबांना ७,१३४.६६ कोटी रुपये अनुदान दिले.

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत राज्यात ११६.६५ लाख शेतकरी कुटुंब पात्र आहेत. त्यांच्या बँक खात्यात एकूण १७ हफ्त्यांमध्ये आजपर्यंत ३१ हजार ५११ कोटी ९० लाख रुपयांचा लाभ जमा करण्यात आला आहे.



## सर्वसमावेशक पीकविमा योजना

शेतकऱ्यांना आपल्या अधिसूचित पिकांचा विमा भरण्यासाठी केवळ १ रुपया भरावा लागतो. प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील वर्षी १ कोटी ७० लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपला पीकविमा भरून या योजनेत सहभाग घेतला होता. या योजनेंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत पात्र शेतकरी अर्ज संख्या ९२ लाख आहे. आतापर्यंत ५०८१.५६ कोटी रुपये नुकसानभरपाई वाटप करण्यात आली आहे. तसेच खरीप २०२४ साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही १४ पिके विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक आणि अपघाती धोक्यापासून संरक्षण देण्यासाठी शासनाने ही योजना सुरू केली आहे. या योजनेत शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साहाय्य देण्यात येते. ‘गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान’ योजनेंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. या वर्षी एकूण १२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषी योजना

राज्यातील शेतकऱ्यांना उद्भवणाऱ्या अडचणींतून येणारे नैराश्य दूर करण्याच्या अनुषंगाने कृषी विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलद्वारे मिळणारे विविध घटकांचे लाभ मागणी केल्यावर तातडीने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून मागेल त्याला फळबाग, ठिबक/तुषार सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणीयंत्रे व कॉटन श्रेडर हे घटक संबंधित योजनांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून तात्काळ उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता या योजनेंतर्गत घटकांशी संबंधित विभागाच्या विविध योजनांमधून प्राप्त निधीच्या मर्यादित ३३९२.३१ लाख रुपये निधी वितरित केला आहे.

## डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन

राज्यात नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनला सन २०२२-२३ ते सन २०२७-२८ या कालावधीकरिता मुदतवाढ देऊन 'डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन' या नावाने संबोधण्यास; तसेच या योजनेची व्याप्ती दुसऱ्या टप्प्यात राज्यभर वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्य योजनेमध्ये १०८३.२९ कोटी रुपये इतक्या आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत याच कालावधीत परंपरागत कृषी विकास योजना, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान व मोठ्या क्षेत्राचे प्रमाणीकरण या योजना समांतररीत्या राबवण्यात येणार आहेत. त्यासाठी राज्य व केंद्र पुरस्कृत योजनेत १९२०.९९ कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीस मान्यता दिली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राज्यातील अनुसूचित जाती / नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी सिंचनाची शाश्वत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यातील मुंबई वगळता इतर सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नवीन विहीर (रु. २.५० लाख), जुनी विहीर दुरुस्ती (रु. ५० हजार), इनवेल बोअरिंग (रु. २० हजार), पंप संच (रु. २० हजार), वीज जोडणी आकार (रु. १० हजार), शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण (रु. १ लाख), सूक्ष्म सिंचन संच (ठिबक सिंचन संच रु. ५० हजार व तुषार सिंचन संच रु. २५ हजार) या बाबींवर अनुदान अनुज्ञेय आहे. सन २०२३-२४ मध्ये १८९२३.०७ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी ३५२८.१० लाख रुपये इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

## बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना राज्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी सिंचनाची शाश्वत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यातील मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली व कोल्हापूर हे जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नवीन विहीर (रु. २.५० लाख), जुनी विहीर दुरुस्ती (रु. ५० हजार), इनवेल बोअरिंग (रु. २० हजार), पंप संच (रु. २० हजार), वीज जोडणी आकार (रु. १० हजार), शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण (रु. १ लाख), सूक्ष्म सिंचन संच (ठिबक सिंचन संच रु. ५० हजार व तुषार सिंचन संच रु. २५ हजार), पीव्हीसी/एचडीपीई पाईप (रु. ३० हजार), परसबाग (रु. ५००/-) या बाबींवर अनुदान अनुज्ञेय आहे.

## मूल्यसाखळी विकास योजना

कापूस व सोयाबीन पिकाची उत्पादकता वाढवणे; तसेच या पिकांच्या दरातील चढ-उतार लक्षात घेता शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची वाजवी किंमत मिळण्याकरिता मूल्यसाखळी विकसित करणे, यासाठी राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया पिके उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकास योजना सुरू करण्यात आली. तेलबिया / गळीतधान्ये पिकाच्या सरासरी क्षेत्राच्या तुलनेत सन २०२२-२३ मध्ये ७.१८ लाख हेक्टरने (१५%) वाढ. सरासरी उत्पादनाच्या तुलनेत १८.०९ लाख मे.टनाने (३४%) वाढ. सोयाबीन आणि इतर तेलबियांतर्गत ९५२ शेतकरी समूहांची स्थापना. या विशेष कृती योजनेकरिता ५२०.८६ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टरी ५,००० रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## आंतरराष्ट्रीय सुविधा केंद्र, नागपूर

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलांतर्गत कृषी महाविद्यालय, नागपूर येथील कृषी विद्यापीठाच्या दाभा येथील जागेवर आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून या आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्राकरिता एकूण २३५ कोटी ६२ लाख रुपये इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास साहाय्य करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये अंदाजित ६ हजार कोटी किमतीचा दुसरा टप्पा राबवण्यास शासनाने जून २०२३ मध्ये तत्त्वतः मान्यता दिली आहे. दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येणार आहे. यासाठी जागतिक बँक अर्थसाहाय्य प्राप्त होणार आहे.

## प्रति थेंब अधिक पीक

सूक्ष्म सिंचन योजनेत राज्य देशात अग्रेसर असून ३० लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ वर्षात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक या योजनेतून; तसेच मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना व अटल भूजल योजना या योजनांच्या माधमातून सूक्ष्म सिंचनासाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ८० टक्के व इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्यात येत आहे. सन २०२४-२५ या वर्षात रक्कम रुपये ६६७.५० कोटी रकमेचा कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे. या अनुदानातून सुमारे १.९१ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना

या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचनासाठी पूरक अनुदान देण्यात येते. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येते. सन २०२३ - २४ मध्ये ५९३.१५ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला असून ३ लाख ९५ हजार ४३३ लाभार्थ्यांना हे पूरक अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. सन २०२४-२५ मध्ये ३०० कोटी रुपये रकमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील प्रत्येक कामगाराचा प्रश्न निकाली काढून त्यांच्या उन्नतीचा ध्यास राज्य शासनाने घेतला आहे. जगातील श्रमिक, कष्टकरी आणि कामगारांच्या तळहातावरच या धरतीचा सर्व भार आहे. कर्मचाऱ्यांच्या कष्टाचा आणि त्यांच्या हिताच्या सर्वांगीण विकासासाठी हे सरकार झटत आहे. कामगार मंत्री म्हणून माझी मोठी जबाबदारी आहे आणि यासाठी मी आजपर्यंत कामगारांच्या हिताचे निर्णय घेतलेले आहेत.

# कामगारांच्या उत्थानासाठी...

**डॉ. सुरेश खाडे,** कामगार मंत्री



कारखान्यांशी निगडित विविध बाबीपैकी कामगारांची सुरक्षितता याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कामगार म्हटले की, जोखमीची जबाबदारी घेऊन फळ देणारे हात आहे. ही कामे करताना निष्काळजीपणामुळे एखाद्या कामगाराचा अपघात झाल्यास पैशाच्या स्वरूपात कितीही मदत केली तरी त्या कामगाराचे नुकसान भरून निघत नाही. त्यामुळे कामाच्या ठिकाणी शून्य अपघात धोरण अवलंबून उद्योजक, मालक, बांधकाम व इतर क्षेत्रातील कंपन्यांनी कामगारांना दर्जेदार अत्याधुनिक सुरक्षासाधने पुरवणे ही काळाची गरज आहे. कारखान्यात काम करताना हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, गॉगल, हातमोजे, सेफ्टी शूज गमबूट, जॅकेट, टोपी अशी सुरक्षिततेची साधने पुरवली जातात. शून्य अपघाताचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सुरक्षित तंत्रज्ञान, उत्पादन व संशोधनाने हे धोरण ठरवण्यात आले आहे. कामगार विभाग अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासन कार्यरत आहे. उद्योग सुरू राहिले तर कामगार जगेल, यासाठी कामगार केंद्रस्थानी ठेवून कामगारांच्या कल्याणासाठी निर्णय घेण्यात आले आणि त्याची प्रभावी अंमलबजावणीसुद्धा करण्यात येत आहे.

## कामगारांना किमान वेतन

सफाई कामगार, आरोग्य खात्याचे कामगार, माथाडी कामगार, घरकामगार, विडी कामगार, विक्रेते, रिक्षाचालक, यंत्र, ऊसतोड कामगार, स्थलांतरित कामगार, कंत्राटी कामगार अशांना त्यांच्या कामांच्या बदल्यात त्यांना हक्कांचे आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबांचे सर्वांग पालनपोषण व्हावे, एवढे किमान वेतन मिळायला हवे. कोणत्याही कामगारावर वेतनासंदर्भात अन्याय होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे. त्याचबरोबर राज्यातील जो असंघटित कामगार आहे, त्यांचाही किमान वेतनावर पूर्ण अधिकार आहे. यासाठी असंघटित कामगारांची नोंदणी करून घेण्यावर माझा भर आहे. यासाठी कामगार विभागातील रिक्त पदे तातडीने भरून या कामगारांची नोंदणी करण्यात येत आहे.

## कामगार विभागाचे सक्षमीकरण

असंघटित कामगारांची नोंदणी मोठ्या प्रमाणात आणि सहज व्हावी, यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर नोंदणी कार्यालय उभारण्यात येत आहे. या केंद्रांतर्गत कामगारांना देण्यात येणाऱ्या इतर सुविधाही पुरवण्यात येतील. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन उभारण्याचा माझा मानस असून तो आता पूर्णत्वास जात आहे. त्याचबरोबर कामगार सुरक्षा विमा महामंडळ, कामगार कल्याण मंडळ, बॉयलर वर्कशॉप सुरू करण्यात येणार आहे. कामगार विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.



भाजी व फळविक्रेत्या महिलांना छत्री वाटप.

## कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ

असंघटित कामगार हे विविध क्षेत्रात काम करतात; परंतु ते कुठल्याही संघटनेचे सदस्य



सांगली येथे आयोजित 'प्लास्टिक-कचरामुक्त शहर' चळवळ.



नसतात. जसे की, शेतकरी, शेतमजूर, बांधकाम क्षेत्रात काम करणारे कामगार, लहान उद्योग/कारखान्यामध्ये काम करणारे मजूर, सेवा, घरकाम काम करणारे कामगार, विक्री करणारे, रिक्षाचालक, फेरीवाले असंघटित कामगारांना अनेकदा कमी वेतन, कमी सुरक्षा आणि कमी फायदे मिळतात. त्यांना कामाच्या ठिकाणी वाईट वागणूक आणि मालकाकडून शोषणाचा सामना करावा लागतो. असंघटित कामगारांना समाजाच्या मुख्य धारेत समाविष्ट करण्याची गरज ओळखून शासनाने अपंगांकरिता, मागासवर्गीय व्यक्तींकरिता; तसेच महिला व अल्पसंख्याकांकरिता विविध विकास योजना चालवलेल्या आहेत, परंतु या योजनांमध्ये असंघटित क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील कामगारांचा समावेश नाही. याचा विचार करून राज्य शासनाने उच्चाधिकार प्राधिकरण स्थापना केले आहे. हे प्राधिकरण बांधकाम कामगार, विटभट्टी कामगार, बिडी कामगार, हातमाग कामगार, यंत्रमाग कामगार, दगड फोडणी व क्रशिंग कामगार, घरगुती कामगार, रिक्षा ओढणारे, इत्यादी व्यवसायातील, असंघटित कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष देत आहे. असंघटित कामगारांना संघटित करण्यासाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया सुरू असून, जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करण्यात येत आहे. त्याचबरोबर हे प्राधिकरण इतर असंघटित क्षेत्रातील कामगारांकरितादेखील कल्याणकारी योजना राबवत आहेत. याअंतर्गत असंघटित क्षेत्रातील कामगारांची आकडेवारी गोळा करणे, सर्वेक्षण करणे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठीही राबवणे अशा अनेक बाबी परिणामकारकरीत्या राबवण्याचा माझा हेतू आहे.

## नवीन कामगार कायदा

केंद्र शासनाने सर्व २९ कामगार कायदे एकत्र करून ४ कामगार संहिता तयार केल्या आहेत. व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता-२०२० या चौथ्या संहितेसाठी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असल्याने यामध्ये लाखो कामगारांचे हित जोपासले जात आहे. या कायद्यानुसार १०० पेक्षा जास्त कामगारांना कारखान्यांमध्ये उपाहारगृह, २५० पेक्षा जास्त कामगारांना कारखान्यात कल्याण अधिकारी, ५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यात पाळणाघर अशा काही तरतुदी लागू आहेत. त्याचबरोबर वेतन संहिता-२०१९, औद्योगिक संबंध संहिता-२०२०, सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० या ३ संहितांच्या नियमांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. कामगार हा विषय समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट असल्याने केंद्र शासनाने सर्व राज्यांसाठी एकत्रित संहिता तयार केली आहे. केंद्र शासनाच्या व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता अधिनियम २०२० नुसार राज्यांना समुचित शासन व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती (कामगार) संहिता नियम तयार करण्याचे अधिकार देण्यात आले. त्यानुसार या संहितेस मान्यता देण्यात आली आहे.

कामगार संतुष्ट असला तर देशाच्या आर्थिक विकासालाही गती मिळते. त्यामुळे कामगारांचे वेतन व इतर सुविधांचा असमतोल दूर करणे गरजेचे आहे. कामगारांचे हित संरक्षित करणे, त्यांची सुरक्षा अधिक बळकट करणे, त्यांना रोजगाराची हमी, वर्तमान महागाईनुसार वेतन, पगारी रजा, आरोग्यविषयक अधिक हमी, भविष्य निर्वाह निधी अशा विविध बाबींवर सरकार म्हणून गांभीर्याने विचार करत आहोत.

**शब्दांकन : संजय डी. ओरके,** विभागीय संपर्क अधिकारी

**उद्योगाची भरभराट होण्यासाठी महाराष्ट्राची भूमी योग्य असल्याने देशविदेशातील उद्योजक हे महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी नेहमी आग्रही असतात. महाराष्ट्रात उद्योग व्यवसाय करण्यासाठी अनुकूल वातावरण असल्याने दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्याने उद्योग खेचून आणत नवीन विक्रम केला आहे. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र सलग दोन वेळा अव्वल राहिला आहे. त्याचबरोबर एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना आपण अर्धा ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे लक्ष्य पार केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र हा उद्योगात उंच भरारी घेत युवा उद्योजकांना आकर्षित करून राज्याचा उद्योग मंत्री म्हणून महाराष्ट्राला उद्योगराष्ट्र बनवण्याचा माझा मानस आहे.**

# उद्योगराष्ट्र...महाराष्ट्र

**उदय सामंत,** उद्योग मंत्री



महाराष्ट्रावर उद्योजकांचा विश्वास असल्याचे दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत पाहायला मिळाले. जानेवारी २०२४ मध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ३ लाख ७२ हजार कोटी डॉलर्सचे सामंजस्य करार यामुळे उद्योगक्षेत्रात २ लाख रोजगार निर्माण होतील. गेल्या वर्षी दावोस येथे १ लाख ३७ हजार ६६६ कोटी रुपयांचे गुंतवणुकीसाठी १९ सामंजस्य करार झाले. त्यापैकी ८७ हजार कोटींच्या प्रकल्प उभारणीस सुरुवात व भूखंड वाटप करण्यात आले आहे. जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खार उद्योग, डेटा सेंटर, इन्फ्रास्ट्रक्चर अशा विविध सेक्टरमध्ये उद्योजकांनी गुंतवणूक केली आहे. त्याचबरोबर अर्शिया, मित्तल, जिंदाल, गोदरेज, अदानी या कंपन्यांनीसुद्धा महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली आहे. मागील सहा महिन्यांमध्ये देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक राज्यात आली आहे आणि ती गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली या तीन राज्यांच्या एकत्रित गुंतवणुकीपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्राने औद्योगिक उद्याने, माहिती तंत्रज्ञान पार्क, लॉजिस्टिक पार्क, मेगा टेक्सटाइल हब, स्मार्ट औद्योगिक शहरे, प्लग ॲण्ड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर, औद्योगिक समूहांसाठी दळणवळण सुविधा आणि स्टार्टअपसाठी इन्क्युबेटर केंद्रे विकसित केली आहेत. उद्योगांसाठी वरदान ठरणाऱ्या विविध सुविधाही राज्य सरकारने दिल्या आहेत.



यामध्ये व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करून गुंतवणूकदारांसाठी एक खिडकी सुविधा केंद्र अशा सुविधांचा समावेश आहे.

## सूरजागड इस्पात पोलाद प्रकल्प

गडचिरोली येथे प्रस्तावित सूरजागड इस्पात पोलाद प्रकल्पाचे भूमिपूजन झाले असून या प्रकल्पातून आठ दशलक्ष टन, तर लॉइड प्रकल्पातून चार दशलक्ष टन पोलाद उत्पादन होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर महाराष्ट्रात ३० टक्के पोलाद उत्पादन एकट्या गडचिरोलीतून होईल. त्यामुळे गडचिरोलीमध्ये उद्योग व रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होऊन येथील सामान्य माणूस समृद्धीकडे जात असल्याचे चित्र पाहायला मिळणार आहे. १० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून होणाऱ्या या प्रकल्पातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ७ हजार रोजगार निर्माण होतील. या उद्योगात ८० टक्के रोजगार स्थानिकांना उपलब्ध करून देण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत. त्याचा स्थानिक नागरिकांना लाभ होणार आहे. दावोस कराराच्या अंमलबजावणीचे उदाहरण म्हणजे सूरजागड इस्पात पोलाद प्रकल्प आहे. पुढील एक ते दोन महिन्यांत गडचिरोली जिल्ह्यात दीड लाख कोटींचे प्रकल्प येणार आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती

शहरी व ग्रामीण भागात सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या स्थापनेद्वारे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राज्यातर्फे राबवण्यात येत आहे. अधिकाधिक युवकांनी या योजनेचा लाभ घेऊन स्वावलंबी बनावे, यासाठी उद्योग विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणांतर्गत उद्योग संचालनालयामार्फत या योजनेचे निरीक्षण आणि अंमलबजावणी केली जात आहे. त्याचप्रमाणे उद्योग संचालनालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) व महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग बोर्ड (केव्हीआयबी) व बँकेद्वारेही या योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. या वर्षी नियोजनबद्ध कार्यक्रम आखून जास्तीत जास्त युवा उद्योजकांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवून

त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सद्य:स्थितीत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत २ लाख ५९ हजार ३६ ऑनलाइन अर्ज मंजूर झाले आहेत. सन २०१९ पासून आजपावेतो १ लाख ८३ हजार २९० उमेदवारांनी बँकेकडे अर्ज सादर केले आहेत.

## इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर

देशात इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी केंद्र शासनाने देशात सुधारित इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (ईएमसी २.०) अंमलबजावणी सुरू केली आहे. यासाठी रांजणगाव येथे १९७.११ एकर जागेवर 'इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर' उभारणीस ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी केंद्राने मान्यता दिली आहे. या प्रकल्पाची किंमत ४९२ कोटी ८५ लाख १९ हजार रुपये असून त्यात केंद्र शासनाकडून २०७ कोटी ९८ लाख रुपये वित्तीय साहाय्य उपलब्ध होणार आहे. यातील ६२ कोटी ३९ लाख रुपयांचा पहिला हप्ता केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने एमआयडीसीकडे वर्ग केला आहे. रांजणगाव येथे उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात आयएफबी, एलजी आणि गोगोरो ईव्ही स्कूटर यांसारख्या कंपन्यांचा सहभाग असेल. या प्रकल्पामुळे हा परिसर 'इलेक्ट्रॉनिक क्लस्टर' म्हणून नावारूपास येईल, अधिक उद्योजक, कंपन्या तेथे आकर्षित होऊन त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## पायाभूत सुविधा

राज्याच्या पहिल्या निर्यात प्रोत्साहन धोरणास सुमारे २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ४० हजार रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. निर्यात क्षेत्राला गती देऊन थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात येणार आहे आणि रोजगारसंधी निर्माण करण्यात येणार आहेत. या धोरणासाठी ४,२५० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली असून ते २०२७-२८ पर्यंत राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कायद्यामुळे उद्योगासाठी ११९ सेवा सुलभ आणि अधिक वेगवान करण्यात आल्या असून नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, भिवंडी, पुणे येथे ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येत आहेत. जालना येथे 'मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क' उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे.

## मधाचे गाव

राज्यातील डोंगराळ व जंगली भागात राहणाऱ्या रहिवाशांना रोजगार, शुद्ध व दर्जेदार मधाची उत्पत्ती, निर्सगातील अन्न साखळी कायम राखण्यास सहकार्य, आणि पीक उत्पादनात होणारी वाढ अशा अनेक कारणांमुळे मध केंद्र योजनेचा विस्तार करून 'मधाचे गाव' ही योजना संपूर्ण राज्यात राबवण्यात येत आहे. राज्यातील अशा घनदाट जंगल व डोंगराळ भागांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. तेथील रहिवाशांना मधमाशा पालनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानुसार मधपेटी तयार करणाऱ्या रहिवाशांना २० टक्के, तर शासनाचा ८० टक्के हिस्सा राहणार आहे.

## शाश्वत वस्त्रोद्योग धोरण

वस्त्रोद्योग क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे वस्त्रोद्योग क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. वस्त्रोद्योग क्षेत्राची सकल घरेलू उत्पादन, औद्योगिक उत्पादन, रोजगार निर्मिती, निर्यात त्याचप्रमाणे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. या वस्त्रोद्योगात अंदाजे ४५ दशलक्ष लोक थेट गुंतलेले आहेत. त्यामुळे या धोरणासोबतच त्यातील सर्व संबंधित योजनांचा कालावधी ३१ मार्च २०२८ पर्यंत आहे. या धोरणाच्या उद्दिष्टांनुसार राज्यातील उत्पादित कापसावर प्रक्रियाक्षमता ८० टक्क्यांपर्यंत वाढवणे. पुढील ५ वर्षांत २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि ५ लाखांपर्यंत रोजगार निर्मितीची कल्पना आहे. महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन महिला सक्षमीकरण करण्याचे या धोरणात अंतर्भूत आहे.

## ब्लॉकचेन जात प्रमाणीकरण

महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, एटापल्ली उपविभाग व झुपल लॅब्जच्या संयुक्त विद्यमाने एटापल्ली येथे जात प्रमाणपत्र ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर निर्गमित करण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. हा प्रकल्प देशातील एक विशेष आणि एकमेव ब्लॉकचेन प्रकल्प असून नीति आयोगाने त्याला मॉडेल ई-गव्हर्नन्स प्रकल्प म्हणून घोषित केले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली उपविभागात राबवण्यात आलेला हा प्रकल्प, आदिवासी रहिवाशांना जात प्रमाणपत्रे देण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करतो. ज्यामुळे या प्रमाणपत्रासोबत छेडछाड करणे शक्य होत नाही आणि हे प्रमाणपत्र काही सेकंदात पडताळता येते. यामुळे आदिवासी रहिवाशांना शासकीय सेवांचा लाभ मिळणे सोपे झाल्यामुळे या प्रकल्पाचा महत्त्वपूर्ण सामाजिक परिणामही झाला आहे. महाराष्ट्रातील ब्लॉकचेन जात प्रमाणीकरण प्रकल्पाचे यश हे भारतातील ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी एक पथदर्शक टप्पा मानला जात आहे. या प्रकल्पाने शासकीय सेवांची कार्यक्षमता आणि पारदर्शकता सुधारण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची क्षमता दाखवून दिली.

## हरित हायड्रोजन

महाराष्ट्रात २ लाख ७६ हजार ३०० कोटी रुपये एवढी आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या सात प्रकल्पांसाठी विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. या माध्यमातून ६४ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीदेखील हरित हायड्रोजनवर लक्ष केंद्रित केले आहे. केंद्र सरकारच्या हरित हायड्रोजन मिशनच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य शासनाने हरित हायड्रोजन धोरण-२०२३ प्रकाशित केले आहे. त्याद्वारे २०३० पर्यंत ५०० केटीपीए इतक्या हरित हायड्रोजन निर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी राज्य शासनातर्फे हरित हायड्रोजन विकासकांना विविध अनुदान सवलती देऊ केलेल्या आहेत. त्यामुळे हरित हायड्रोजन काळाची गरज बनली आहे.

राज्याच्या, देशाच्या विकासाबरोबर प्रत्येक व्यक्तीचा विकास होत असतो, हाच मूलमंत्र केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राचा उद्योग विभाग आणि माझे कार्य अविरतपणे सुरू आहे.

**शब्दांकन : संजय डी. ओरके,** विभागीय संपर्क अधिकारी

**रुग्णसेवा हे ईश्वरीय कार्य आहे. राज्यातील जनतेला अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी आरोग्य विभागाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. वेगवेगळ्या लोकोपयोगी अभियानाच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.**

# दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा

**प्रा. डॉ. तानाजी सावंत,**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री



महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेत विमा संरक्षण दीड लाखांहून ५ लाख रुपये करण्यात आले आहे. या योजनेत सध्या ९९७ रुग्णालयांचा समावेश होता. योजनेची व्याप्ती १९०० रुग्णालयापर्यंत करण्यात येणार आहे. कर्नाटक सीमा भागात ८६५ गावांमध्ये मराठी भाषिकांना ही योजना लागू करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी

दिंडीमधील वारकऱ्यांना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, गरजू वारकऱ्यांची आरोग्य तपासणी व्हावी, वैद्यकीय सेवा तात्काळ मिळावी, या उद्देशाने आरोग्य उपक्रम राबवण्यात येत आहे. या वर्षी एकूण १४ लाख २८ हजार १२० वारकऱ्यांना विनामूल्य आरोग्य सेवा -सुविधा देण्यात आल्या आहेत.

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

सामान्य नागरिकांना अगदी सहज आरोग्य सुविधा मिळाव्या, त्यांच्या आरोग्याची कुठेही हेळसांड होऊ नये, यासाठी ही योजना सुरू केली आहे. शहरी भागातील दवाखाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाने स्मार्ट बनवणे, सातत्यपूर्ण आरोग्य सेवा देणे, जागतिक दर्जाची दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करून आरोग्य निर्देशांक वाढविण्यासाठी 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'ची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात ३४७ आपला दवाखाना कार्यरत आहेत.

## माता सुरक्षित, तर घर सुरक्षित

या विशेष मोहिमेत राज्यातील १८ वर्षांवरील महिला, माता, गरोदर स्त्रियांना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्याचे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. या मोहिमेंतर्गत स्तन कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग आदीं आजारांचे निदान करण्यात येणार आहे. राज्यात ३० वर्षांवरील ४ कोटी ३९ लाख २४ हजार १०० महिलांची आरोग्य तपासणी, तर दुसऱ्या टप्प्यात ३ लाख १३ हजार ९६५ गर्भवती मातांवर उपचार करण्यात आले आहेत.



## जागरूक पालक-सुदृढ बालक अभियान

राज्यभरात शून्य ते १८ वर्षांपर्यंतची मुले; तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्याची तपासणी या अभियानांतर्गत करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातील सुमारे १,८०० शाळांमधील १८ वर्षांखालील दोन कोटी ४९ लाख ५४ हजार २५७ मुलांच्या आरोग्याची तपासणी केली आहे.

## 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे'

या अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे ३ कोटींपेक्षा अधिक पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत आरोग्याची तपासणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे.

## स्वतंत्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण

राज्य शासनाच्या विविध विभागांसह महापालिका, जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी राज्यात 'महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण' स्थापन करण्यात आले आहे. या प्राधिकरणात एक आयएएस दर्जाचा अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. याशिवाय आरोग्य सहसंचालक दर्जाचा जनरल मॅनेजर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य प्रशासकीय अधिकारी अशी एकूण १४ पदे आहेत.

## कार्डियाक कॅथलॅब, एमआरआय सुविधा

हृदयरोगींसाठी राज्यात १२ ठिकाणी कॅथलॅबची सुविधा देण्यात आली आहे, तर १७ ठिकाणी एमआरआयची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## मानसिक उपचाराची सुविधा

जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ठाणे व कोल्हापूर जिल्ह्यातील उदेगाव येथे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ ॲण्ड न्युरोसायन्सेस'च्या धर्तीवर अत्याधुनिक मनोरुग्णालय असणार आहे. यामध्ये अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग, संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, योगा व मनन चिंतन या सेवांचा समावेश असणार आहे.

## मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र

मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सध्या लाखांच्यावर शस्त्रक्रिया केल्या आहेत. या अभियानातून तीन वर्षात २७ लाख मोतिबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट ठेवले आहे.

## कर्करोगाच्या उपचारासाठी जनजागृती

सध्या कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. कर्करोगावरील उपचार सुलभ व्हावे, यासाठी जिल्हा रुग्णालयात ३४ केमोथेरपी डे केअर केंद्रांची सुविधा देण्यात आली आहे. कर्करोगाचे निदान लवकर होण्यासाठी ८ मोबाइल कॅन्सर डायग्नोस्टिकची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## डायलिसीस सेवा

मुत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी २३४ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात डायलिसीस सेवा; तसेच हिमोफिलीया आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात 'हिमोफिलिया डे' केअर केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वात्सल्य, माहेरघर योजना, गर्भवती महिला व बालकांचे आरोग्य सुधारावे, यासाठी 'वात्सल्य' विशेष योजना राबवण्यात येत आहे. जननक्षम माता (गर्भधारणेपूर्वीच्या), प्रसूतीपश्चात माता व २ वर्षांपर्यंतच्या बालकांच्या आरोग्य सेवांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. यामुळे कमी वजनाच्या बालकाच्या जन्माचे प्रमाण आणि जन्मत: व्यंग असलेल्या बालकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

## नवीन शववाहिका-रुग्णवाहिका

सर्वसामान्य नागरिकांना जलद उपचार मिळावे, यासाठी आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह १७५६ ॲम्ब्युलन्स खरेदी केल्या आहेत. सध्या ३६ ठिकाणी उपलब्ध शववाहिका असून त्या ३५२ ठिकाणी लवकरच देण्यात येणार आहे.

## मेळघाटसाठी ४३ कलमी कार्यक्रम

मेळघाट या दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी ४३ कलमी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या भागात १६ सामान्य व नवजात बालकांसाठी २ रुग्णवाहिका देण्यात आल्या आहे. या भागातील मातांना २४० दिवसांची बुडित मजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अंगणवाडीच्या माध्यमातून माता व बालकांना देण्यात येणाऱ्या आहारावर नियंत्रण ठेवणे, सर्व कंत्राटी स्वरूपाची पदे तातडीने भरणे, मेळघाटातून माता व बालकांचे स्थलांतरण झाल्यास त्यांना शोधून आरोग्य सुविधा देणे, कर्मचाऱ्यांना जलद संपर्कासाठी वॉकी टॉकी देणे आदी निर्णयही या कार्यक्रमांतर्गत घेतले आहे.

माता व बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी गर्भवती मातांना ३०० रुपये भत्ता देण्यात येत आहे. अशा प्रकारे मेळघाटमधील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## आयुष रुग्णालयांची निर्मिती

पुणे, अहमदनगर, नंदुरबार, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये ३० खाटांच्या आयुष रुग्णालयाची निर्मिती करण्यात येत आहे. ठाणे, जालना, धाराशिव आणि नागपूर येथे आयुष रुग्णालयांचे भूमिपूजनही करण्यात येणार आहे.

## आभा कार्डची निर्मिती

राज्यात सुमारे ४ कोटी १८ लाख ९२ हजार ३०७ जनतेची आभा कार्डची निर्मिती करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून सर्वोच्च कामगिरी करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राला सन्मानित करण्यात आले आहे.

## आशा स्वयंसेविका यांच्या मानधनात वाढ

आरोग्य यंत्रणेच्या सक्षमतेसाठी ८५ आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. आता राज्य शासनाकडून १० हजार रुपये व केंद्र शासनाचे तीन हजार असे एकूण १३ हजार रुपये मानधन आशांना देण्यात येत आहे. राज्यात ३,६६४ गट प्रवर्तक कार्यरत असून शासनाकडून ६,२०० रुपये मानधन देण्यात येत होते. त्यामध्ये १,००० रुपयांची वाढ केली आहे.

## आरोग्य विभागात मेगा भरती

आरोग्य विभागाच्या गट 'क'मधील एकूण ५५ संवर्गातील ६,९४९ रिक्त पदे असून 'ड' गटातील ४ हजार १० रिक्त पदे होती. रिक्त पदांच्या भरतीसाठी एकूण १०,९४९ पदांसाठी मेगा भरती मोहीम राबवली आहे. विभागाद्वारे १,४४६ उमेदवारांना पदस्थापनेचे ऑनलाइन आदेशही दिले आहेत.

## बदली प्रक्रियेत पारदर्शकता आणणे

विभागांतर्गत बदल्यांमध्ये पारदर्शकता, यासाठी ऑनलाइन बदल्यांचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागातील बदल्यांसाठी ऑनलाइन प्रक्रिया विकसित केली आहे.

## बाळासाहेब ठाकरे सुंदर माझा दवाखाना मोहीम

राज्यातील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालयामध्ये बाळासाहेब ठाकरे सुंदर माझा दवाखाना मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेमुळे शासकीय रुग्णालयांमध्ये कर्मचारीवर्ग रुग्णालय स्वच्छता ठेवत आहे.

**शब्दांकन : निलेश तायडे,** विभागीय संपर्क अधिकारी

**राज्याच्या दळणवळण सुविधांची दर्जेदार उभारणी करण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचा वाटा नेहमीच महत्त्वाचा राहिलेला आहे. या विभागामार्फत राज्यातील सर्व भागांना एकमेकांसोबत जोडत राज्यांतर्गत असणारे रस्ते, पूल; तसेच राज्याला इतर भागांसोबत जोडण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्गाची कामे सुव्यवस्थित करण्यावर शासनाचा भर आहे. गेल्या दोन वर्षांत सार्वजनिक बांधकाम विभागाने अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची, रस्त्यांची, शासकीय इमारतींची बांधणी निर्धारित वेळेत गतीने करत राज्याच्या पायाभूत सुविधांमध्ये भर टाकली आहे. विविध योजनांतर्गत कामे सध्या वेगाने पूर्ण करण्यात येत आहेत. जलदगतीने निर्णय घेण्याच्या प्रक्रियेबरोबरच जबाबदारी, देखरेख, पारदर्शकतेवरही राज्य शासन भर देत आहे.**

# पायाभूत सुविधांचा विकास

**रवींद्र चव्हाण,** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री



उत्पादनक्षमता वाढवून आणि जीवनाचा दर्जा वाढवणाऱ्या सुविधा प्रदान करून, प्रमाण आणि गुणवत्ता या दोन्ही दृष्टीने पुरेशा पायाभूत सुविधांची तरतूद करणे, शाश्वत आर्थिक विकासाच्या जलद यशासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा-१, २ व ३

आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा-१ मध्ये १,७५० कोटी रुपये किमतीची ४५१.५१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत, ती सर्व कामे पूर्ण झाली आहेत. या योजनेच्या टप्पा- २ मध्ये ३,९३९ कोटी रुपये किमतीची एकूण ४६८.३२ कि.मी. लांबीच्या रस्ते सुधारणेची कामे हाती घेण्यात आली असून ही कामे ५० टक्के पूर्ण झाली आहेत. या योजनेच्या टप्पा-३ अंतर्गत डिसेंबर २०२३च्या अधिवेशनामध्ये १२,७८६ कोटी रुपये किमतीची एकूण १,५६३ कि.मी. लांबीची ४४ कामे अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

## हायब्रीड अन्युईटी प्रकल्प

या योजनेंतर्गत २७,०९६.१२ कोटी रुपये किमतीची सुमारे ८,६५४ कि.मी. लांबीची कामे हाती घेण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत सुमारे ६,७०० कि.मी. लांबीची कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.

**सुधारित हायब्रीड अन्युईटी प्रकल्प :** रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळे इ. विविध २२ पायाभूत सुविधा क्षेत्रांतील प्रकल्प राबवणे व त्यासाठी निधी उभारण्यासाठी शासन निर्णय २२ मे २०२३ अन्वये महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.



मंत्रिमंडळाच्या ५ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या बैठकीत सुधारित हायब्रीड ॲन्युईटी योजना हाती घेणे व योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत एकूण ३६,९६४ कोटी रुपये किमतीचे ५,९७७ कि.मी. लांबीचे रस्ते सिमेंट काँक्रिटीकरण (PQC / White Topping इ.) पद्धतीने हाती घेण्यात येणार आहेत. या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून लवकरच कामे कार्यान्वित करण्यात येत आहेत.

## नाबार्ड (ग्रामीण पायाभूत विकास निधी)

नाबार्ड कर्जसाहाय्य योजनेंतर्गत टप्पा-२२ ते २८ अंतर्गत एकूण १,८८० कामे मंजूर



झाली असून, त्यापैकी १,१०४ कामे पूर्ण झाली आहेत, तर नाबार्ड टप्पा क्र.-२९ मध्ये एकूण ६३१ कोटी रुपये किमतीची २४२ कामे मंजूर करण्यात आली असून या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून लवकरच कामे कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

## काश्मिरमध्ये 'महाराष्ट्र सदन'

राज्य शासनाच्या वतीने काश्मिरमध्ये लवकरच महाराष्ट्र सदन उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. त्या दृष्टीने काश्मिरमध्ये जमीन खरेदी करण्यासाठी विभागाच्या वतीने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. जम्मू आणि काश्मिर सरकारने बडगाम जिल्ह्यातील इच्चगाम तालुक्यातील २.५० एकर (२० कॅनल) जमीन राज्य सरकारला तेथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी प्रदान केलेली आहे. जमीन खरेदीची प्रक्रिया महाराष्ट्र व जम्मू-काश्मिर सरकार यांच्यावतीने पूर्ण झाली आहे. महाराष्ट्र सदन उभारण्यासाठी दोन्ही राज्यात आवश्यक प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आता या भूखंडावरील त्या जागेवर उभे राहणारे महाराष्ट्र सदन कसे असावे व त्यामध्ये कोणत्या सोयी-सुविधा असतील, याचे नियोजन व आराखड्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष महाराष्ट्र सदन उभारणीच्या कामाला सुरुवात होईल व लवकरच काश्मिरमध्ये महाराष्ट्र सदन उभे राहील. बडगाम येथे राज्य सरकारच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या महाराष्ट्र सदनासाठी आवश्यक असलेल्या २.५० एकर जमिनीसाठी राज्य सरकारने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे.

## अयोध्येत उभारणार 'महाराष्ट्र सदन'

उत्तर प्रदेश सरकारने अयोध्येत महाराष्ट्र सदन उभारण्यासाठी २.३२७ एकरचा भूखंड मंजूर केला असून, अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या दर्शनासाठी महाराष्ट्र राज्यातील अतिथी, भाविक व पर्यटकांच्या सोयी-सुविधांसाठी उभारण्यात येणारे हे महाराष्ट्र सदन येत्या २ वर्षांमध्ये पूर्ण होणार आहे.

उत्तर प्रदेश सरकारच्या नियोजन विभागाच्या वतीने अयोध्या येथे राष्ट्रीय राजमार्ग, शरयू नदीजवळ ग्रीनफिल्ड टाऊनशिप विकसित करण्यात येत आहे. या ठिकाणी हा भूखंड उत्तर प्रदेश सरकारने मंजूर केला आहे. भूखंड अधिग्रहित करण्यासाठी ६७.१४ कोटी रुपयांची तरतूद सार्वजनिक विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच या इमारतीचे बांधकाम, विद्युतीकरण व अन्य सोयीसुविधांसाठी सुमारे २६० कोटींच्या निधीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित जागेची अयोध्या येथे पाहणी केली आहे.

अयोध्या श्रीराम जन्मभूमी मंदिरापासून सुमारे ७.५ कि.मी., तर अयोध्या धाम रेल्वे स्टेशनपासून ४.५ कि.मी. अंतरावर हे प्रस्तावित महाराष्ट सदन उभारण्यात येणार आहे. अयोध्येमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळापासून सुमारे ११ कि.मी. अंतरावर हे महाराष्ट्र सदन उभे राहणार आहे.

राज्य शासनाने अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याचा मंत्रिमंडळ निर्णय घेतला होता. त्यासाठी यापूर्वी अयोध्येत प्रत्यक्ष स्थळी जाऊन जागाही निश्चित केली होती. त्याच अनुषंगाने २.३२७ एकर जागेच्या व्यवहाराचा पहिला टप्पा म्हणून उत्तर प्रदेश सरकारला १० टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे. पुढील दोन महिन्यांत जागेचा पूर्ण मोबदला अदा करून लवकरात लवकर भक्त सदन बांधण्याची कार्यवाही सुरू होणार आहे.

**शब्दांकन : वंदना थोरात-वारेगावकर,** विभागीय संपर्क अधिकारी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दोन वर्षांत राज्य शासनाने अनेक समाजोपयोगी निर्णय घेतले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे अत्यंत वेगाने निर्णय प्रक्रिया राबवण्याचे काम करत आहेत. जी कामे वर्षानुवर्षे निर्णयाअभावी रखडली होती, ती आमच्या सरकारने अत्यंत कमी वेळेत पूर्ण केली. शासन लोककल्याणकारी काम करत आहे. पणन आणि अल्पसंख्याक विकास विभागामार्फतही अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.**

# लोककल्याणकारी शासन

**अब्दुल सत्तार,** पणन, अल्पसंख्याक विकास मंत्री




गाव तेथे गोदाम या नवीन योजनेत पहिल्या टप्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम करण्यात येणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेंतर्गत ११६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी 'अ' आणि 'ब' वर्ग बाजार समित्यांना ५० टक्के व 'क' आणि 'ड' वर्ग बाजार समित्यांना ७० टक्के शासन अनुदान देण्यास तसेच, १९० बाजार समित्यांमध्ये असलेल्या शेतकरी भवनाच्या दुरुस्तीसाठी अंदाजित खर्चाच्या २५ टक्के, तथापि जास्तीत जास्त १५ लाखांच्या मर्यादित शासन अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सध्याच्या शेतकरी भवनांची पण दुरुस्ती करणार असून त्यासाठी १३२ कोटी ४८ लाख खर्च अपेक्षित आहे.

## महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची स्थापना

राज्यातील काजूच्या विकासाकरिता महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. त्यांचे मुख्यालय - वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग, तर विभागीय कार्यालय-रत्नागिरी, चंदगड (जि. कोल्हापूर) येथे असणार आहे. काजू मंडळासाठी सन २०२४-२५ आर्थिक वर्षासाठी १२ कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित केला आहे. तसेच राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना, काजू बीसाठी प्रतिकिलो रुपये १० याप्रमाणे किमान ५० किलो व कमाल २,००० किलो या मर्यादेत प्रतिशेतकरी शासन अनुदान देण्याचा व त्यासाठी एकूण अंदाजे रुपये २७९ कोटी इतक्या खर्चास मंजुरी दिली आहे.

## आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे

नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल व कळमेश्वर आणि अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व बुलडाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्राथमिक, दुय्यम व उपपदार्थांवरील प्रक्रिया असे एकूण २९ प्रकल्प उभारण्यात येणार असून या एकूण प्रकल्पांची किंमत ४० कोटी रुपये आहे. या प्रकल्पांकरिता ५० टक्के अनुदान शासन देणार आहे.



## मॅग्नेट प्रकल्प

महाराष्ट्र राज्यात आशियायी विकास बँकेच्या साहाय्याने डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची (हिरवी व लाल), आंबा, काजू, लिंबू, पडवळ व फुलपिके या १५ पिकांची उत्पादने ग्राहकांपर्यंत वितरण करण्यासाठी एकात्मिक मूल्य साखळ्यांचा विकास करण्याकरिता मॅग्नेट (महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क) प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी आतापर्यंत ४१६.७१ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

## ई-नाम योजना

प्रचलित लिलाव पद्धतीमध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आणून शेतमालास रास्त भाव मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

मार्च २०२४ अखेर महाराष्ट्रातील एकूण १३३ बाजार समित्या ई-नामला जोडलेल्या आहेत. ई-नामद्वारे प्रामुख्याने सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर व उडीद या शेतमालाची विक्री होते.

## कांदा अनुदान

कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत विक्री केलेल्या कांद्यासाठी रुपये ३५० प्रतिक्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रतिशेतकरी याप्रमाणे अनुदान, त्यासाठी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात ८५१ कोटी ६७ लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

राज्यभर महामंडळाची २०५ ठिकाणी गोदामे असून त्यांची साठवणूक क्षमता २२.३५ लाख मे.टन आहे. वखार महामंडळाकडून शेतकऱ्यांना वखार भाड्यात ५० टक्के सवलत; तसेच गोदामांमध्ये २५ टक्के आरक्षण व १०० टक्के विमा संरक्षण दिले जाते. महामंडळाकडून पारंपरिक शेतमाल तारण योजना व ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे ऑनलाइन तारण कर्ज योजना राबवण्यात येत आहे.

## कायद्यातील सुधारणा

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत बाजार क्षेत्रात राहणारे व किमान १० आर क्षेत्र धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना निवडणूक लढवता येणार आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी पाच कामाच्या दिवसांच्या आत त्यांचा अंतिम मतदार यादीत समावेश करणे शक्य झाले आहे. बाजार समितीच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना थेट मतदान करता येणार आहे.

## शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ

अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिपत्याखाली छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय व जिल्हास्तरावर प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेच्या अनुदानात २ लाख रुपयांवरून १० लाख रुपयांपर्यंत सन २०२४-२५ पासून वाढ करण्यात आली आहे. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजनेमध्ये अल्पसंख्याक समुदायातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये अशी वाढ करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक समुदायातील मुलांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून अल्पसंख्याक समुदायातील २७ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी सन २०२४-२५ पासून करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील मराठवाड्यातून हजयात्रेला जाणाऱ्या हज यात्रेकरूंच्या सुविधेसाठी छत्रपती संभाजीनगर येथे प्रशस्त हज हाऊसचे बांधकाम करण्यात आले आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास तथा वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने विविध कर्ज योजना राबवण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास तथा वित्त निगम, नवी दिल्ली यांच्याकडून कर्ज घेण्यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची शासन हमी ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक महिलांसाठी विविध योजना राबवण्यात येतात. राज्यातील अल्पसंख्याक मुलींसाठी वसतिगृह योजना, अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या वसतिगृहासाठी सहायक अनुदान योजना, स्वयंसहायता बचतगट योजना; तसेच मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र जलद विकास कार्यक्रमांतर्गत बचतगट निर्माण करून त्यातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे, अशा विशेष योजना राबवण्यात येतात.

## मिलेट महोत्सव



संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले होते. या संदर्भात २२ ते २४ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे मिलेट महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्याचबरोबर तृणधान्यांची विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

## अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (एमआरटीआय)

राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था' म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. या संस्थेसाठी एकूण ११ पदे निर्माण करण्यात येतील. त्याचप्रमाणे या संस्थेच्या वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. राज्यातील अल्पसंख्याक समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासाशी संबंधित समस्यांचा या संस्थेमार्फत अभ्यास करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यासह विद्यार्थीहिताला प्राधान्य देऊन शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यालादेखील प्राधान्य देण्यात आले आहे. राज्यातील युवकांना परदेशात रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यादृष्टीने जर्मनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे, तर मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठीदेखील विविध उपाययोजना केल्या जात आहेत.**

# विद्यार्थीहिताला प्राधान्य

**दीपक केसरकर,** शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री



शालेय शिक्षण विभागामार्फत मागील दोन वर्षांच्या काळात विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी पाठ्यपुस्तकांमध्ये सरावासाठी वह्यांची कोरी पाने समाविष्ट करण्यात आली. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात अंडी अथवा केळीचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचबरोबर विद्यार्थ्यांना आवडेल अशा रुचकर पदार्थांच्या रेसिपी तयार करून दिल्या जाणार आहेत.

विद्यार्थ्यांनी स्वतः उत्पादित केलेल्या पौष्टिक भाजीपाल्याचा आहारामध्ये समावेश असावा, या उद्देशाने शाळांमध्ये परसबागा निर्माण केल्या गेल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये तृणधान्य (मिलेट) जागरूकता निर्माण व्हावी व त्यांच्या दैनंदिन आहारात तृणधान्यांच्या समावेशाचे फायदे कळावेत, या दृष्टीनेही विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

## पहिले पाऊल उपक्रम

राज्यातील शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत दोन गणवेश योजनेचा लाभ देण्यात येत आहे. याचबरोबर एक जोडी बूट आणि दोन जोडी पायमोजे देखील दिले जात आहेत. इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. आता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना ५,००० रुपये, तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना ७,५०० रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या मुलांच्या स्वागतासाठी 'पहिले पाऊल' उपक्रम राबवण्यात येत आहे.



## महावाचन महोत्सव अभियान

मानसिक विकासासाठी वाचन हे अत्यंत गरजेचे असते. जेथे अधिक वाचन केले जाते तेथे गुणवत्ता वाढते. तेथे विविध क्षेत्रातील विद्वान, शास्त्रज्ञ घडतात, यासाठी रिड महाराष्ट्र उपक्रम राबवून; तसेच ग्रंथालयांची संख्या वाढवून अधिक चांगले शिक्षण दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी, वाचनामध्ये गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने 'महावाचन महोत्सव' अभियान राबवले जात आहे.

## एक राज्य, एक गणवेश

शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना दोन गणवेश, बूट आणि पायमोजे देण्यात येत आहेत. या वर्षापासून सर्व शासकीय शाळांना समान गणवेश असेल. नवीन डिझाईनचा एक गणवेश स्काऊट गाईडच्या गणवेशाशी साधर्म्य साधणारा असल्याने तो त्यासाठीही वापरता येईल.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. या माध्यमातून मातृभाषेतून शिक्षणावर अधिक भर देण्यात येत आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांमध्येही शिक्षण सुलभ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यावर भर दिला जात आहे.

## कौशल्य विकास आणि रोजगार

पुढील पिढीला रोजगार आणि स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी कौशल्य शिक्षण अत्यावश्यक ठरणार असून कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा; तसेच कौशल्य विकास विद्यापीठ सुरू करण्यात येत आहे. यासाठी मुंबईत भव्य इमारत उभारण्यात येणार असून त्यात 'सेंटर फॉर एक्सलन्स' सुद्धा सुरू करण्यात येणार आहे. व्यावसायिक

शिक्षणावरही भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नामांकित शिक्षण संस्थांसोबत करार करण्यात आले आहेत. जर्मनीला विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. महाराष्ट्र या कामी सहकार्य करण्यास उत्सुक आहे. याच अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला असून, जर्मनीला आवश्यक असलेल्या क्षेत्रात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन जर्मनीमध्ये रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. पुढील टप्प्यात आपण जगाला कुशल मनुष्यबळ पुरवणारे राज्य बनू, असा मला विश्वास आहे.

## शालेय खेळांना प्रोत्साहन

विद्यार्थ्यांना शेतीचे ज्ञान मिळावे आणि शेतीचे महत्त्व समजावे, यासाठी अभ्यासक्रमात शेती हा विषय शिकवण्यात येणार आहे. इंजिनीअरिंग व मेडिकलचे विषय मातृभाषेतून शिकवले जाणार आहेत. सर्वांगीण विकासासाठी खेळ अत्यावश्यक असल्याने यास प्रोत्साहन देऊन आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडावेत, यासाठी पाठबळ दिले जात आहे.

## कर्मचाऱ्यांच्या मानधनात सुधारणा

विद्यार्थ्यांसोबतच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीसुद्धा शासनाने विविध निर्णय घेतले आहेत. शिक्षकांची भरतीप्रक्रिया पवित्र प्रणालीद्वारे पारदर्शकपणे राबवण्यात येत आहे. मागील वर्षी ६१ हजार शिक्षकांच्या अनुदानाचा प्रश्न सोडवण्यात आला. शिक्षण सेवकांच्या मानधनात भरीव वाढ केली आहे. अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदी उन्नयन करण्यात येऊन त्यांच्यासह प्रयोगशाळा सहायक, कनिष्ठ लिपिकांसह चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या मानधनात सुधारणा करण्यात आली आहे.

राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात दोन, चार व सहा हजारांऐवजी भरघोस वाढ केली आहे. आता प्राथमिक विद्यालयातील शिक्षण सेवकांना १६ हजार, माध्यमिकसाठी १८ हजार, तर उच्च माध्यमिकसाठी ते २० हजार रुपये इतके करण्यात आले आहे. खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पहिल्या तीन वर्षांसाठी ग्रंथपालांना १४ हजार रुपये, प्रयोगशाळा सहायकांना १२ हजार रुपये, कनिष्ठ लिपिकांना १० हजार रुपये, तर केवळ अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती असलेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आठ हजार रुपये मानधन देण्यात येत आहे.

## शाळांच्या विकासासाठी

राज्यातील घोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील त्रुटीत असलेल्या शाळांना अनुदानासाठी निधीसह पात्र करणे, यापूर्वी अनुदान घेत असलेल्या शाळांना अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा मंजूर करणे; तसेच अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्याचे निर्णय घेण्यात आले आहेत. उत्कृष्ट शाळा म्हणून 'पीएमश्री' योजनेंतर्गत शाळा विकसित करण्यात येत आहेत. या शाळा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे विविध पैलू दर्शवणाऱ्या आदर्श शाळा म्हणून उदयास येणार आहेत. या प्रत्येक शाळेवर १.५ कोटींपेक्षा अधिक खर्च करण्यात येईल. चाकोरीबाहेरील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना बाह्य जगाची ओळख व्हावी व त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास हातभार लागावा, या हेतूने सर्व शाळांमध्ये 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राबवण्यात येत आहे.

शासनाने 'पवित्र' या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येणाऱ्या शिक्षक पदभरतीच्या अनुषंगाने विद्यमान तरतुदी सुधारित करणे/वगळणे व नवीन तरतुदी समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे खासगी शाळांतील नियमावलीमधील तरतुदी लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांसाठी दिव्यांगांसाठी पदे सुनिश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या दूर करून पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यामुळे विद्यार्थी केंद्रबिंदू मानून दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. शिक्षण हा शासनाचा प्राधान्याचा विषय असून गुणवत्ता वाढ होण्यासाठी पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने मिशन मोडवर काम केले जात आहे.

## मराठी भाषेच्या संवर्धनासाठी

मराठी भाषेचे संरक्षण, संवर्धन व विकास होऊन मराठी भाषेच्या वापराची व्याप्ती व गुणवत्ता वाढावी, यासाठी विभागामार्फत विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मराठी भाषा धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. भाषेचे जतन, प्रचार, प्रसार व विकास होण्यासाठी; तसेच मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त चार कार्यालयांना समन्वयाच्या दृष्टीने मुंबई शहरात एका छताखाली आणण्याकरिता महाराष्ट्राचे मानबिंदू ठरणारे 'मराठी भाषा भवन' उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे. या माध्यमातून मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये एकाच इमारतीत आणण्याचा मानस आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्यास व त्यांना अनुदान देण्यास मान्यता देण्यात येणार आहे. मागील वर्षापासून मराठी भाषकांच्या विश्वसंमेलनाचे मुंबईत जानेवारीमध्ये आयोजन करण्यात येत आहे. राज्यात 'पुस्तकाचे गाव' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेचा विस्तार करण्यात येऊन ती अधिक व्यापक केली जाणार आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषिकांसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी २५ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकासासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र विविध क्षेत्रात अग्रस्थानी आहे. शिक्षण क्षेत्रातही अग्रस्थानी राहण्यासाठी; तसेच मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी शासनाच्यावतीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. यासाठी आपण सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करू या, असे आवाहन मी या निमित्ताने करतो.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,** विभागीय संपर्क अधिकारी

**अन्न व औषध प्रशासन विभाग हा जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला महत्त्वाचा विभाग आहे. या विभागांतर्गत गत दोन वर्षांत राज्य शासनाने अनेक लोककेंद्रित निर्णय घेतले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खंबीर नेतृत्व आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जनतेच्या हिताचे निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग नेहमी तत्पर राहिला आहे.**

# आधुनिक सुविधांनी सज्ज

**धर्मरावबाबा आत्राम,** अन्न व औषध प्रशासन मंत्री



अन्न सुरक्षा व मानके अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आधुनिक सुविधांनी सज्ज असलेली राज्यातील पहिली सूक्ष्म जीवशास्त्र प्रयोगशाळा मुंबईत नुकतीच सुरू करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. दुसरी प्रयोगशाळा छत्रपती संभाजीनगर येथे होत आहे. अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग सज्ज असून आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत विभागाच्या कामांना गती दिली जात आहे.

जनतेला सुरक्षित, निर्भेळ व उच्च दर्जाचे अन्न आणि औषधी उपलब्ध होण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न सुरू असून त्यासाठी राज्यात विविध उपक्रम, मोहीम राबवल्या जात आहेत. याअंतर्गत अन्नपदार्थ उत्पादन करणाऱ्या कंपन्या, वितरक, उपाहारगृहे, स्टॉल, मॉल यांची नियमित तपासणी केली जाते. ग्राहकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ उपलब्ध व्हावे, हा मुख्य उद्देश असून अन्न पदार्थांप्रमाणेच औषधेही प्रमाणित व उच्च दर्जाची असावीत, यासाठी विभाग दक्ष आहे. अन्न सुरक्षा व मानके अधिनियमानुसार विविध खाद्यपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेतले जातात. विश्लेषण अहवालानुसार कमी दर्जाच्या व असुरक्षित अन्नपदार्थांचे उत्पादन आणि विक्री करणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य राखण्याच्या दृष्टिकोनातून ग्राहक, अन्न व औषध व्यावसायिकांसाठी वेळोवेळी सार्वजनिक जनजागृती कार्यक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जात आहेत. अन्न व्यावसायिकांसाठी फोस्टॅक ट्रेनिंग, फोस्कोरिस हे ॲप वापरून सर्व तपासणी आणि नमुने चाचणी ऑनलाइन केली जाते.

## क्लिन स्ट्रिट फूड हब

गर्दी आणि रहदारीच्या ठिकाणी लोकांना स्वच्छ, निर्भेळ, सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्नपदार्थ देण्यासाठी 'क्लिन स्ट्रिट फूड हब' सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील ११ ठिकाणांची निवड करून त्या ठिकाणांना सर्व मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत राज्यामध्ये एकूण ११ ठिकाणांना 'क्लिन स्ट्रिट फूड हब' म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

## स्वच्छ, ताजी फळे आणि भाजीपाला मार्केट



देशभरातील फळे आणि भाजीपाला मार्केटची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि ग्राहकांना सुरक्षित व निर्भेळ अन्नपदार्थ देण्यासाठी भारतीय खाद्य संस्था आणि मानक प्राधिकरणाने स्वच्छता आणि सुरक्षाविषयक मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. याशिवाय कोल्ड रूम, राईपनिंग चेंबर्स, विक्रेत्यांसाठी कॉमन हायजीन स्टेशन, कचऱ्याची विल्हेवाट इ. पायाभूत सुविधा पुरवणेदेखील या उपक्रमाचा भाग असणार आहे. मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण, प्रमाणन आणि विक्रेत्यांची क्षमता वाढवणे हा या उपक्रमाचा अविभाज्य आधारस्तंभ असेल. स्वच्छ, ताजी फळे आणि भाजीपाला मार्केट अशा बाजारपेठांना मान्यता देऊन विश्वासार्हता प्रदान करणे शक्य होणार

आहे. या प्रकल्पांतर्गत स्थानिक बाजार किंवा फळ व भाजीपाला विक्रेत्यांची स्थानिक प्राधिकरणाद्वारे भारतीय खाद्य संस्था आणि मानक प्राधिकरणाकडे शिफारस केली जाते. स्वच्छता आणि अन्न पदार्थांचा दर्जा व सुरक्षितता राखण्यासाठी सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. स्वच्छ, ताजी फळे आणि भाजीपाला मार्केटसाठी सहा ठिकाणे प्रमाणित करण्यात आले आहेत.

## इट राईट कॅम्पस

भारतीय खाद्य संस्था आणि मानक प्राधिकरणाच्या इट राईट कॅम्पस या उपक्रमाचा उद्देश देशभरातील शाळा, विद्यापीठे, महाविद्यालये, कामाची ठिकाणे, रुग्णालये इत्यादी कॅम्पसमध्ये सुरक्षित, निर्भेळ आणि स्वच्छ अन्नपदार्थ पोहोचवणे हा आहे.



तसेच ग्राहकांचे आरोग्य सुधारणे आणि राष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देणे हा उद्देश आहे. या कार्यक्रमात नोंदणी केल्यानंतर कॅम्पस प्रथम एक स्वयंमूल्यांकन किंवा तृतीय-पक्ष लेखापरीक्षण केले जाते. त्यानंतर कॅम्पसमध्ये सुधारणा करण्यासाठी या विभागामार्फत पावले उचलली जातात. सद्य:स्थितीत ६५ ठिकाणे 'इट राइट कॅम्पस' म्हणून प्रमाणित करण्यात आले आहेत.

## स्वच्छता मूल्यांकन योजना

स्वच्छता मूल्यांकन योजना ही सुरक्षित, निर्भेळ आणि स्वच्छ अन्न पदार्थाचे ठिकाण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सुमारे ३,५०० हॉटेल्स प्रमाणित करण्यात आले आहेत.

## भोग प्रकल्प

राज्यातील प्रार्थनास्थळांवरील प्रसादाचा दर्जा आणि गुणवत्ता राखण्यासाठी भोग (BHOG) प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत, विविध प्रार्थनास्थळांमधील खाद्यपदार्थ हाताळणारे; तसेच आजूबाजूच्या परिसरातील अन्न व्यावसायिकांना प्रशिक्षित, लेखापरीक्षण आणि प्रमाणित केले जाते. सध्या राज्यातील १३ प्रार्थनास्थळे या प्रकल्पांतर्गत प्रमाणित करण्यात आली आहेत.

## सण-उत्सवातील मोहीम

सणासुदीच्या दिवसात प्रशासनाकडून दरवर्षीप्रमाणे अन्नपदार्थ तपासणी मोहीम राबवली जाते. अन्नपदार्थांचे उत्पादक, घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेत्यांकडून खाद्यपदार्थांचे नमुने नियमितपणे विश्लेषणासाठी घेतले जातात. अन्न नमुना विश्लेषण अहवालाच्या आधारे कायद्यातील तरतुदींनुसार संबंधितांवर कारवाई केली जाते. यासह फास्ट फूड रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सची विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येते. या मोहिमेंतर्गत परिसराची स्वच्छता आणि स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या तयार खाद्य पदार्थ आणि कच्च्या मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत विशेष तपासणी करण्यात आली. यामध्ये एकूण १४३२ आस्थापनांची तपासणी करून ४२३ नमुने घेण्यात आले. ८०३ आस्थापनांना सुधारणाविषयक सूचना देण्यात आल्या. ३० आस्थापनांना व्यावसायिक क्रिया थांबवण्याच्या सूचना देण्यात आल्या, तर १५७ आस्थापनांवर कंपाऊंडिंग दाखल करण्यात आले. यातील दोषींकडून सुमारे १३ लाख ९५ हजार १०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

## प्रशासनाचे बळकटीकरण

राज्यातील अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) प्रयोगशाळा आणि कार्यालयांचे नागरी काम पूर्ण झाले. पुणे कार्यालय स्वतःच्या इमारतीत स्थलांतरित झाले आहे. पुणे आणि नाशिक प्रयोगशाळेचे काम प्रगतिपथावर आहे. छत्रपती संभाजीनगर येथील सूक्ष्म जीवशास्त्र प्रयोगशाळेचा विकास पूर्ण झाला आहे. राज्य औषध नियामक यंत्रणेच्या बळकटीकरणाच्या प्रस्तावाला गती देण्यात आली आहे. धोरणात्मक निर्णय आणि राज्याच्या सरकारी विश्लेषकांकडून बनावट, भेसळयुक्त, मानक गुणवत्ता नसल्याचे घोषित केलेल्या औषधांच्या किंवा सौंदर्य प्रसाधनांच्या नमुन्यांवर कारवाई करण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे आणि ड्रग्जसाठी रिकॉल व रॅपिड अलर्ट सिस्टिमबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे, ही कामे केली जात आहेत.

## अमली पदार्थ, अवैध तस्करी रोखण्यासाठी मोहीम

लहान मुलांमधील अमली व मादक पदार्थांचे सेवन, अवैध तस्करी रोखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येत आहे. 'लॅब ऑन व्हिल्स' या उपक्रमांतर्गत विविध अन्नपदार्थांची प्रात्यक्षिके दाखवली जातात. तसेच अन्नपदार्थांची तपासणीदेखील केली जाते. औषधांतील भेसळ तात्काळ ओळखण्यासाठी 'ट्रू स्कॅन'; तसेच दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी 'मिल्कोस्कॅन' यंत्र खरेदीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

एकंदरीत अन्न व औषध प्रशासन विभागाकडील सर्वच कामे गतिमान, पारदर्शक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून विभागाला नवी ओळख देण्याचा प्रयत्न आहे.

**शब्दांकन : एकनाथ पोवार,** विभागीय संपर्क अधिकारी

आपले स्वत:चे हक्काचे घर असावे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. गरीब, सर्वसामान्यांची ही स्वप्नपूर्ती करण्याचा संकल्प राज्य शासनाने केलेला आहे. गत काही वर्षांत परवडणारी घरे तयार करून अनेकांना स्वत:च्या हक्काचे घर देण्याच्या राज्य शासनाच्या प्रयत्नांना अभूतपूर्व यश मिळत आहे. तसेच इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत वंचित घटकांच्या विकासासाठी आम्ही विविध योजना प्रभावीपणे राबवत आहोत. राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी राज्य शासन कटिबद्ध राहिले आहे.

# सर्वसामान्यांच्या घराची स्वप्नपूर्ती

**अतुल सावे,**
गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री



महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण अर्थात म्हाडाअंतर्गत विविध गृहनिर्मिती प्रकल्प राबवले जात आहेत. राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट किंवा मध्यम उत्पन्न गटातील ज्या व्यक्तीचे कुठेही पक्के घर नाही, अशा व्यक्ती या योजनेंतर्गत लाभास पात्र ठरल्याने सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात विविध गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून घरकुलांचे अनेक प्रकल्प राबवण्यात येत आहेत. उपकर प्राप्त इमारतीची पुनर्बांधणी, गोरेगावमधील पत्रा चाळचा पुनर्विकास, झोपडपट्टी पुनर्वसन, बीडीडी चाळींचा पुनर्विकास आदी गृह प्रकल्पांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या घराचे स्वप्न साकार होत आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गिरणी कामगारांना १५,८७० सदनिका वितरित करण्यात आल्या आहेत.

### रे नगर गृहप्रकल्पाविषयी

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील रे-नगर येथे असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी हा प्रकल्प म्हाडा राबवत आहे, ज्याला केंद्र सरकारच्या पीएमएवायचेदेखील साहाय्य देण्यात आले आहे. संपूर्ण आयुष्य झोपडपट्टीत घालवणाऱ्या या कामगारांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न या प्रकल्पातून साकार झाले आहे. देशातील सर्वात मोठी कामगार वसाहत सोलापुरातील रे नगर येथे साकारली आहे. हा गृह प्रकल्प देशातील सर्वात मोठा गृहप्रकल्प आहे. रे नगर, कुंभारी येथील असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकूल प्रकल्पातील ३० हजार घरांपैकी पहिल्या टप्प्यात १५,०२४ घरांचे लोकार्पण १९ जानेवारी २०२४ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आहे.

### झोपडीधारकांना हस्तांतरणाच्या अधिकाराबाबत सकारात्मक

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी परिशिष्ट-२ पारित करण्यात येते. परिशिष्ट-२ मध्ये नावे असलेल्या झोपडीधारकांना झोपडी हस्तांतरणाचे अधिकार नाहीत. एखाद्या झोपडीधारकाचा मृत्यू झाल्यास किंवा आपत्कालीन स्थितीत हस्तांतरणाचा अधिकार झोपडीधारकाला असला पाहिजे. यासाठी परिशिष्ट-२ मधील झोपडीधारकाला एकदा हस्तांतरणाचा अधिकार देण्याबाबत शासन सकारात्मक आहे.

### ना–हरकत प्रमाणपत्र ऑनलाइन

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरे विकण्यासाठीच्या अनेक अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. तसेच ना-हरकत प्रमाणपत्र लवकरच ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.



### पाच वर्षांनंतर घराची विक्री करता येणार

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत (एसआरए) पुनर्वसन करण्यात आलेली घरे यापुढे पाच वर्षांनी विकता येणार आहेत. प्राधिकरणांतर्गत येणारी घरे यापूर्वी १० वर्षांनंतर विकत देण्याचा नियम होता. हा नियम बदलून आता पाच वर्ष करण्यात आला आहे. राज्यातील व प्रामुख्याने मुंबईतील सुमारे अडीच लाख सदनिकाधारकांना याचा मोठा फायदा होणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसनमधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हस्तांतरण शुल्क

१ लाख रुपये इतके होते आता ते ५० हजार रुपये घेतले जाईल.

## मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीच्या १० योजना राबवल्या जातात. या योजनेंतर्गत ५ लाख विद्यार्थ्यांना लाभ होतो. इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी असलेल्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेच्या लाभ रकमेत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार इयत्ता ५ वी ते ७ वीच्या शिष्यवृत्तीत दरमहा ६० रुपयांवरून २५० रुपये, तर इयत्ता ८ वी ते १० वी च्या शिष्यवृत्तीत दरमहा १०० रुपयांवरून ३०० रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ९ योजना राबवण्यात येतात. त्याचा लाभ ७८२ अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या सुमारे १० लाख विद्यार्थ्यांना होतो. या योजनेसाठी यावर्षी २,९१० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

## परदेश शिष्यवृत्तीच्या विद्यार्थीसंख्येत वाढ

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती; तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तींची विद्यार्थी संख्या १० वरून ५० करण्यात आली होती. त्यामध्ये पुन्हा नव्याने वाढ करून ती ५० वरून ७५ विद्यार्थी संख्या करण्यात आली आहे. आतापर्यंत या योजनेंतर्गत १२५ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.



## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना

वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठीचा भत्ता थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. याकरिता १०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारची धनगर समाजासाठी असलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजनेसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## मोदी आवास घरकूल योजना

इतर मागास, भटक्या जमाती, विमुक्त जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी ३ वर्षांत १० लाख घरे बांधण्यासाठी मोदी आवास घरकूल योजना राबवण्यात येत आहे. योजनेंतर्गत १२ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## पीएचडी अधिछात्रवृत्ती योजना

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत विद्यार्थ्यांना संशोधनासाठी साहाय्य व्हावे, त्यांना संशोधन क्षेत्रात संधी मिळावी, त्यांचा विकास व्हावा, या हेतूने पीएचडी अधिछात्रवृत्ती योजना राबवण्यात येते. मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पीएचडी अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत लाभ घेता येतो. सन २०२२ या वर्षात १२३६ उमेदवारांना अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. पीएचडी अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत प्रति विद्यार्थी वार्षिक अर्थसाहाय्य २४ लाख ५३ हजार ५२० वरून २९ लाख ६८ हजार ८०० इतके करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत सन २०२४-२५ पासून विद्यार्थी संख्या २०० वरून ३०० करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण व अर्थसाहाय्य

'महाज्योती'मार्फत २०२१-२२ या वर्षात संघ लोकसेवा आयोग (युपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी); तसेच युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन (युजीसी) मधील एकूण ५,९९५ विद्यार्थ्यांनी विविध प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. यातील विविध प्रशिक्षणांचा आणि योजनांचा लाभ घेणाऱ्या एकूण ११० प्रशिक्षणार्थ्यांनी एमपीएससीच्या अंतिम निकालात स्थान प्राप्त केले आहे. सन २०२२ वर्षातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदाच्या अंतिम निकालात महाज्योतीचा अमोल घुटूकडे याने राज्यात प्रथम स्थान प्राप्त केले आहे.

इतर मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना या वर्षापासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, फार्मसी, वैद्यकीय, शेतीविषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी ८ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के संपूर्ण परिपूर्ती करण्यात येणार आहे. या निर्णयाचा सुमारे २ लाख ५ हजार मुलींना लाभ होणार आहे.

धनगर समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमासाठी खारघर, नवी मुंबई येथे चार हजार चौरस मीटरचा भूखंड उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच बंजारा, लमाण तांडे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोडरस्ता योजना व धनगर वस्त्यांसाठी यशवंतराव होळकर जोडरस्ते योजना लवकरच सुरू करण्यात येईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजनेंतर्गत घरकूल संख्या १० हजारांवरून २५ हजार करण्यात आली आहे.

महाआवास योजनेतून सर्वसामान्यांच्या जीवनात मालकी हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होताना दिसत आहे. प्रत्येकाला हक्काचे पक्के घर मिळावे, हेच राज्य शासनाचे धोरण आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभाग कायम सर्वसामान्यांच्या हिताचे उपक्रम राबवत आहे. विभागांतर्गत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे. या योजनांच्या माध्यमातून वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : शैलजा पाटील,** विभागीय संपर्क अधिकारी

राज्य उत्पादन शुल्क हा राज्य शासनाच्या महसुलात मोठा वाटा उचलणारा विभाग आहे. हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीवर बंदी आणण्यासाठी हातभट्टीमुक्त गाव मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेमुळे गावागावांत अनेक सकारात्मक बदल दिसून येत आहेत. बनावट मद्यनिर्मिती व विक्री, हातभट्टी मद्यनिर्मिती आदींवर आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून कारवाई करण्यात येत आहे. हा गणवेशधारी विभाग असल्यामुळे पोलिसांप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना गणवेश भत्ता, बँड पथक, स्वतंत्र ध्वज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची आवश्यकता लक्षात घेता साताऱ्यातील पाटण तालुक्यातील वाटोळे येथे प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. मागील दोन वर्षांत सकारात्मक निर्णय घेत विभागाचा चेहरामोहरा बदलण्यावर भर दिला आहे.

# सक्षमीकरणाला आधुनिकतेची जोड

**शंभूराज देसाई,** राज्य उत्पादन शुल्क मंत्री



राज्य उत्पादन शुल्क विभाग हा शासनाला महसूल मिळवून देणाऱ्या महत्त्वाच्या विभागांपैकी एक आहे. विभागाच्या महसुलात गतवर्षीच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये १७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. राज्यात मद्य निर्मिती, घाऊक विक्री, किरकोळ विक्री अनुज्ञप्त्या देणे व त्यांची तपासणी करून नियमन करणे, मद्यावरील कर गोळा करणे आदी कार्ये विभागामार्फत करण्यात येतात. तसेच राज्यातील अवैध मद्यनिर्मिती विक्री, वाहतूक, बनावट मद्य, परराज्यातून होणारी अवैध मद्याची तस्करी याविरुद्ध सज्ज राहून महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करून त्याचे उच्चाटन व नियंत्रणाचे कामकाज करत असतो. महसुलाचे संवर्धन करण्याबरोबरच अवैध मद्यनिर्मिती व वाहतूक याला आळा बसावा, म्हणून आधुनिक तंत्रज्ञान व अत्याधुनिक साधनसामग्रीचा वापर करण्यात येत आहे.

## अद्ययावत प्रशिक्षण केंद्राची निर्मिती

राज्यात उत्पादन शुल्क विभागासाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र नव्हते. विभागामध्ये प्रशिक्षणासाठी अशाप्रकारे कुठेही सुविधा नाहीत. त्यामुळे विभागात प्रशिक्षणावर मर्यादा येत आहेत. प्रशिक्षणाअभावी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्षमता बांधणीवरसुद्धा परिणाम होतो. तरी विभागांतर्गत प्रशिक्षण केंद्राची निकड लक्षात घेता साताऱ्यातील पाटण तालुक्यातील वाटोळे येथे उत्पादन शुल्क विभागाचे पहिले अद्ययावत व सुविधांनी युक्त प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे. अवैध मद्यविक्री व निर्मितीवर नियंत्रण मिळवून प्रतिबंधात्मक कारवाया व गुन्हे नोंद करण्यात येतात. हे गुन्हे नोंदवणे, त्याचा तपास करून गुन्हे सिद्ध करण्यास्तव कायदेशीर तरतुदींचे; तसेच तपासकामी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे आदी बाबींचे ज्ञान आवश्यक असते. यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची शारीरिक क्षमता वृद्धिंगत करून शारीरिक व कायदेविषयक प्रशिक्षण देण्याकरिता विभागाचे अद्ययावत प्रशिक्षण केंद्राचे लवकरच भूमीपूजन होत आहे.



## 'हातभट्टी दारूमुक्त गाव' मोहीम

राज्यात हातभट्टी दारू निर्मूलनासाठी विशेष मोहीम मे २०२३ पासून राबवण्यात येत आहे. त्यामध्ये हातभट्टी दारूनिर्मितीच्या मोठ्या केंद्रावर धाडी घालण्यात आल्या. हातभट्टी दारूनिर्मिती व्यवसाय करणाऱ्या गावात स्थानिक लोकप्रतिनिधी व पोलीस विभाग यांच्या समन्वयाने जनजागृती करून हातभट्टी दारूमुक्त गाव करण्याचा संकल्प पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न आहे. या मोहिमेमुळे राज्यात हातभट्टीविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कारवाई झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये १०.६३ लाख लिटर इतकी हातभट्टी

दारू व २००.०२ लाख लिटर इतके त्यासाठी लागणारे रसायन जप्त करून नाश केले आहे. या काळात ३,५६० इतकी वाहने व त्यापैकी १,६६२ वाहने हातभट्टींच्या गुन्ह्यात जप्त केली आहे. तसेच या मोहिमेमुळे हातभट्टीच्या गुन्हे अन्वेषणात ७ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## विभागाचे सक्षमीकरण

राज्यातील मळी, मद्यार्क, मद्य निर्मिती घटकातील व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी घटकाच्या खर्चाने अनुज्ञप्तीच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात येत आहे. या सीसीटीव्हीचे फिड्स मुंबई येथील मुख्यालयाच्या इंटेलिजंट कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर येथे घेण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तपासी अंमलदार आरोपीची चौकशी सीसीटीव्हीच्या निगराणीखाली करण्यासाठी यंत्रणा बसवण्यात येत आहे. मद्यार्क वाहतुकीच्या टँकर डिजिटल लॉकने सीलबंद केले जातील. तसेच व्हेईकल ट्रॅकिंग यंत्रणा बसवून त्याचे नियंत्रण मुख्यालयात केले जाईल. नदी, नाले, खाडी किनारी नियमित होणाऱ्या हातभट्टी केंद्रावर प्रभावीपणे छापे टाकण्याकरिता ड्रोनचा वापर करण्यात येत आहे. खाडी व तलावलगतच्या भागात हातभट्टी निर्मिती केंद्रांवर कारवाई करण्यासाठी बोटींची खरेदी करण्यात येत आहे. विभागाच्या आधुनिकीकरणासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. मद्य, मद्यार्क व मळीचे नमुने पडताळण्यासाठी राज्य, विभागस्तरावर प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. मद्य, मद्यार्कची वाहतूक करताना वाहनांस डिजिटल लॉक, ई लॉक वापरण्यात येत आहे. यामुळे पथरक्षण कामी जाणाऱ्या जवान संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या मनुष्यबळाची बचत होणार आहे.

## ऑनलाइन सेवा



सेवा हमी कायद्यांतर्गत एकूण ५२ सेवा पुरविल्या जात असून त्यात सर्व महत्त्वाच्या अबकारी अनुज्ञप्ती संबंधित सेवा घेतलेल्या आहेत. यापैकी ३८ सेवा ऑनलाइन पद्धतीने दिल्या जातात. उर्वरित १४ सेवा ऑनलाइन करण्याचे काम सुरू आहे. (अनुज्ञप्ती मंजुरी व नूतनीकरणाच्या संबंधी आहेत) मळी, मद्यार्क, मद्यनिर्मिती घटकांच्या ठिकाणचे सर्व व्यवहार संगणकीकरणाद्वारे करण्यात येतात. तसेच घाऊक विक्रेते यांचे व्यवहार सप्लाय चेन मॅनेजमेंट या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येतात.

## टोल फ्री नंबरची सुविधा

नागरिकांना अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीबाबत तक्रार करण्यासाठी आयुक्त कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तक्रार करणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. तक्रार नोंदवण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ व व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## गणवेश भत्त्यात वाढ

राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान ते उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना गणवेश विहित केलेला असून त्यासाठी २००४ सालापासून गणवेश भत्ता दिला जात आहे. परंतु त्यानंतरच्या काळात गणवेश आणि आनुषंगिक साहित्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. मात्र गणवेश भत्त्यात वाढ झालेली नव्हती. गणवेश भत्त्यात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून विचाराधीन होता. गणवेश भत्तावाढ करण्याचा निर्णय घेतला असून आता राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान ते उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुधारित दराने गणवेश भत्ता देण्यात येत आहे. याअंतर्गत गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना दर चार वर्षांनी ५ हजार रुपये भत्तावाढ, तर गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना दर चार वर्षांनी आणि गट-क मधील कर्मचाऱ्यांना दर दोन वर्षांनी ५ हजार १६७ रुपये भत्तावाढ देण्यात आली आहे.

## कडक आणि प्रभावी कारवाई

राज्यात अवैध व्यवसायात गुंतलेल्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९चे कलम ९३ अन्वये कारवाई करण्यात आली. या कलमान्वये गुन्हे अन्वेषणात १७५.६० टक्के वाढ झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये मागील ४ वर्षातील अशा प्रकारच्या कारवाईमध्ये सरासरीच्या तीनपटपेक्षा अधिक प्रकरणे दाखल होऊन ५२ टक्के प्रकरणात बंधपत्रे घेण्यात आली आहे. तसेच एमपीडीए (महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, अंमली पदार्थविरोधी कायदा) अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये ४८ गुन्हेगारांविरुद्ध कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत, तर सन २०२४-२५ मध्ये राज्यात आतापर्यंत ७ प्रकरणात कारवाईचे आदेश झाले आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या व्यवसायात गुंतलेल्या सराईत गुन्हेगारांवर वचक बसण्यास मदत झाली आहे. मागील ४ वर्षांचा विचार करता मागील २ वर्षांत दारूबंदी गुन्ह्यांमध्ये १५ टक्के इतकी वाढ झाली आहे. ढाब्यावरील अवैध दारूविक्री व संबंधित गुन्हेविषयक कारवाईमध्ये ६२ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. तसेच गोवा व परराज्यातील मद्याची राज्यात अवैधरीत्या विक्री, वाहतूक व साठा केल्याप्रकरणी मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून यामध्ये १०.४ टक्के वाढ झाली आहे.

## बक्षीस व क्रीडा स्पर्धांचे आयोजन

विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेली गुणवत्तापूर्ण सेवा, कर्तृत्व, धाडस, योग्य तपास आदीं कामगिरीकरिता पदक व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. याबाबत यावर्षी प्रत्यक्ष पदक जाहीर करून सन्मान करण्याचे नियोजित आहे. तसेच अधिकारी व कर्मचारी यांची शारिरीक तंदुरुस्ती, मनाची एकाग्रता वाढवण्यासाठी, एकोपा व नेतृत्वगुण वाढीस लागावे म्हणून राज्य आणि विभागस्तरावर क्रीडा स्पर्धा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शब्दांकन : निलेश तायडे,** विभागीय संपर्क अधिकारी

**महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवण्यात आल्या आहेत. आज महिला प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करत आहेत. शिक्षण, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, सहकार, मनोरंजन, प्रशासन, अर्थकारण, सामाजिक कार्य यांसारख्या विविधांगी क्षेत्रात आपल्या क्षमतेला न्याय देत आहेत. महिला सक्षमीकरण हा विषय केवळ चर्चा करण्याइतपत मर्यादित न ठेवता, त्यासाठी राज्य शासनाने प्रत्यक्ष कृतीतून कार्य केले आहे.**

# पर्व महिला सक्षमीकरणाचे

**कु. आदिती तटकरे,** महिला व बालविकास मंत्री



भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना दिलेल्या समानतेच्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील महिला व मुलींना आवश्यक संधी आणि सुविधा उपलब्ध करून देणे; तसेच त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि अन्य क्षेत्रातील विकास साधणे, आरोग्य, पोषण, आहार व स्वास्थ्य, शिक्षण व कौशल्य, महिलांप्रति होणारा सर्व प्रकारचा हिंसाचार समाप्त करणे, रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास इत्यादी उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे, आवश्यक पायाभूत सुविधांमध्ये विकास करणे, प्रशासन व राजकीय सहभाग, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन; तसेच अन्य महत्त्वाची क्षेत्रे यांचा समावेश करून महिला सक्षमीकरण व विकासासाठीचे सर्वांगीण, सर्वंकष आणि सर्वसमावेशक असे महाराष्ट्राचे चौथे अष्टसूत्री महिला धोरण-२०२४ जाहीर करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

महाराष्ट्रातील माता-भगिनी आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील महिलांची निर्णायक भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी मदत होत आहे.

राज्यातील महिला व मुलींना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर रोजगार निर्मितीस चालना देणे, महिलांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, राज्यातील महिला व मुलींच्या सशक्तीकरणास चालना देणे, महिला व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषणस्थितीत सुधारणा करणे, हे या योजनेचे मुख्य उद्देश आहेत. या योजनेंतर्गत प्रत्येक पात्र महिलेच्या आधार लिंक बँक खात्यात दर महिन्याला १,५०० रुपयांचा थेट लाभ हस्तांतरित करण्यात येत आहे. तसेच केंद/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १,५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल, तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येत आहे. वय वर्ष २१ ते ६५ या वयोगटातील पात्र महिलांना १ वर्षात १८ हजार रुपये मिळणार आहेत.

## महिलांचा सन्मान वाढवण्यासाठी...

महिलांचा सन्मान वाढावा, यासाठी 'लेक लाडकी' ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींच्या जन्मानंतर पाच हजार रुपये, इयत्ता पहिलीत सहा हजार रुपये, सहावीत सात हजार रुपये, अकरावीत आठ हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. लाभार्थी मुलींचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये रोख देण्यात येतील. याप्रमाणे एकूण १ लाख १ हजार रुपये असा लाभ देण्यात येत आहे.

## मनोधैर्य योजना

ॲसिड हल्ल्यामध्ये बळी पडलेल्या महिला व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन व त्यांना अर्थसाहाय्य करण्यासाठी मनोधैर्य योजना राबवण्यात येते. या योजनेच्या निकषात बदल करून आता पेट्रोल, डिझेल, रॉकेल आणि स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारा गॅस यांसारख्या ज्वलनशील पदार्थांच्या हल्ल्यातील पीडितांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अशा पीडित महिलांनासुद्धा मदत होत आहे.

## पिंक ई- रिक्षा

या योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे महिलावर्ग नव्या आत्मविश्वासाने समाजात वावरेल. राज्यातील मुंबई शहर, नवी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती अशा महानगरांमध्ये पिंक ई-रिक्षा योजना सुरू करून १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य देण्यात



येणार आहे. यासाठी ८० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यामध्ये विशेष म्हणजे एकल महिला, विधवा, परित्यक्ता यांना प्राधान्य देण्यात येत आहे.

### मातृशक्तीचा सन्मान

आतापर्यंत मुलगा किंवा मुलीला आपल्या नावापुढे केवळ वडिलांच्या नावाचा उल्लेख बंधनकारक होते; पण जन्मदात्या आईच्या नावाचा उल्लेख करणे सक्तीचे नव्हते. मातृशक्तीचा सन्मान व्हावा, म्हणून आता मुलांच्या नावापुढे आईचे नाव लावणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या मुलांच्या नावाची नोंद शासकीय दस्ताऐवजांमध्ये त्यांचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव या क्रमाने करण्याचे बंधनकारक आहे.

### वन स्टॉप सेंटर

महिलांवर होणारे शारीरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक, समाजाकडून होणारा त्रास, अवहेलना, अशा संकटातील महिलांना वन स्टॉप सेंटरमध्ये वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीस साहाय्य, मानसोपचार, विधि साहाय्य, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इत्यादी स्वरूपाची संकटात असलेल्या महिलांना जलद आणि सर्वसमावेशक मदत करण्यात येते. या सर्व सुविधा एकाच छताखाली मिळण्यासाठी वन स्टॉप सेंटर योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत हिंसाचाराचा सामना करणाऱ्या महिलांना तत्काळ मदत मिळावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात वन स्टॉप सेंटर उभारण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत महिलांची सुरक्षितता, सशक्तीकरण आणि संकटाच्या काळात आवश्यक मदत होते.

### नवीन शक्ती सदनची निर्मिती

शहरी भागात नोकरीसाठी आलेल्या महिलांसाठी केंद्राच्या मदतीने ५० वसतिगृहांची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यातील निराधार, निराश्रित; तसेच कौटुंबिक हिंसाचारात बळी पडलेल्या बेघर आणि लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी व सक्षमीकरणासाठी स्वाधार आणि उज्ज्वला या दोन योजनांचे एकत्रिकरण करून केंद्राच्या मदतीने 'शक्ती सदन' ही नवीन योजना राज्य सरकारमार्फत राबवण्यात येत आहे. या योजनेत राज्यात ५० नवीन शक्ती सदनांची निर्मिती करण्यात येत आहे.

### ग्रामीण महिला उद्यम विकास योजना

आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (आयफॅड) यांच्या साहाय्यतेने नव-तेजस्विनी महिला उद्यम विकास प्रकल्पाची अंमलबजावणी महिला विकास आर्थिक महामंडळ करत आहे. या प्रकल्पांतर्गत महिलांनी मोठ्या प्रमाणात उद्योग-व्यवसाय सुरू करणे अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या मुदतीत एक वर्षाची वाढ देण्यात आली आहे. तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील मंजूर कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीकडून आणि राज्य शासनाचा हिस्सा असा एकूण ५२३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

### महत्त्वाचे निर्णय

- बालसंगोपन योजनेंतर्गत परिपोषण अनुदानात १,१०० रुपयांवरून २,२५० रुपये इतकी वाढ.
- मिशन वात्सल्य योजनेसाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता ९२२ कोटी रुपयांची मान्यता.
- २०२४-२५ या वर्षाकरिता वात्सल्य सदन बांधण्याकरिता ठाणे, अहमदनगर, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, सिंधुदुर्ग, जळगाव, परभणी, सांगली, सोलापूर, लातूर व बीड या १२ जिल्ह्यांची निवड.
- बचतगटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये वाढ.
- मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ लाख महिलांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्याचा निर्णय.
- एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत १९,५७७ अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची भरती प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता.
- अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना दिवाळीला भाऊबीज देण्याचा निर्णय घेतला. यासाठी ३७ कोटी ३३ लाख निधी उपलब्ध.
- एकात्मिक बालविकास सेवा योजनेत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटीचा धोरणात्मक निर्णय होईपर्यंत त्यांना एकरकमी लाभ देण्याचा निर्णय.
- कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी नागरी बालविकास केंद्र सुरू करण्याचा निर्णय.

या प्रकल्पासाठी कृतिसंगम म्हणून ४३५ कोटी ५० लाख, लोकसहभागाचे ३२ कोटी १७ लाख, वित्तीय संस्थांच्या सहभागाचे १६३० कोटी ४६ लाख, खासगी संस्थांच्या सहभागाचे ६४ कोटी ६५ लाख याप्रमाणे प्रकल्पाच्या एकूण किमतीत २ हजार ६८५ कोटी ४६ लाख रुपये अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय आयफॅडमार्फत जेंडर ट्रान्सफॉरमेटिव्ह मॅकॅनिझम उपक्रमाकरिता ४२ कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार हा उपक्रम आता महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबवण्यास मान्यता देण्यात आली.

### अंगणवाडी मदतनीसांच्या मानधनात वाढ

राज्यातील १३ हजार मिनी अंगणवाड्यांचे श्रेणीवर्धन करून अंगणवाडी केंद्रामध्ये रूपांतर; तसेच अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्यात आली. अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा ८,३२५ रुपयांवरून १० हजार रुपये करण्यात आले, तर मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा ५,९७५ रुपयांवरून ७,२०० रुपये आणि अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनात दरमहा ४,४२५ रुपयांवरून ५,५०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात-धायगुडे,** विभागीय संपर्क अधिकारी

**देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांत बंदरे विभागामार्फत अनेक महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली आहेत. यात महाराष्ट्र सागरी विकास धोरणाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बंदरांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सर्वच बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. राज्याच्या आर्थिक विकासासह रोजगार निर्मितीलादेखील चालना मिळत आहे. राज्याच्या व्यापार आणि औद्योगिक विकासात बंदरे विकास विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.**

# आर्थिक विकासासह रोजगार निर्मिती

**संजय बनसोडे,** क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री



अरबी समुद्राची किनारपट्टी लाभलेले महाराष्ट्र हे देशातील एक प्रमुख राज्य आहे. महाराष्ट्रात जवळपास ४८ छोटी बंदरे आणि दोन मोठी बंदरे आहेत. त्यात मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर होय. नुकतेच पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे बंदराच्या उभारणीसाठी ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे. राज्याच्या विकासासाठी ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. जगातील १० मोठ्या बंदरांपैकी महाराष्ट्रातील वाढवण हे एकमेव मोठे बंदर असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकासाला चालना मिळणार असून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या प्रकल्पातून सुमारे १२ लाख रोजगार निर्मिती होईल, अशी अपेक्षा आहे.

बंदरे विकास विभागाची प्रलंबित कामे एका वर्षात पूर्णत्वास येत आहेत. यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून किनारा विकासाची कामे केली जात आहेत. सागरी सुरक्षा आणि संवर्धनही करण्यात येत आहे. बंदरे विकास विभागाने धोरण जाहीर केले असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आराखडा तयार करण्यात आला आहे.



प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने कुलाब्यातील रेडिओ क्लब येथे नवीन जेट्टीचे काम प्रगतिपथावर असून एकाच वेळी २० बोटी उभ्या राहणार आहेत. रेडिओ क्लब येथील प्रस्तावित जेट्टीमध्ये १० तराफे असणार आहेत. यामध्ये एकाचवेळी २० फेरी बोटी प्रवासी वाहतुकीसाठी उभ्या राहू शकतील. सध्या गेट वे ऑफ इंडिया येथे फक्त तीन तराफे असल्याने एलिफंटा आणि अलिबागला जाणाऱ्या पर्यटकांना दिलासा मिळणार आहे.

उद्योग, व्यापार आणि तांत्रिक प्रगतीच्या बाबतीत महाराष्ट्र हे भारतातील सर्वात प्रगत राज्यांपैकी एक आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) १४ टक्के वाटा असलेले महाराष्ट्र हे एकमेव सर्वात मोठे योगदानकर्ता राज्य आहे. राज्याच्या विस्तारित किनारपट्टीवर अनेक बंदरे आहेत. सागरी क्षेत्रासाठी बंदरे महत्त्वाची असून राज्याच्या व्यापार आणि उद्योगाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. महाराष्ट्रातील मोठी आणि लहान बंदरे राज्यासाठी महत्त्वपूर्ण असून देशाच्या सर्वांगीण विकासाला आणि व्यापाराला चालना देतात.

बंदरे सामान्यतः शहरांमध्ये किंवा समुद्र किनारी वसलेल्या शहरांमध्ये असतात. बंदरे हे देशाच्या व्यावसायिक कल्याण आणि आर्थिक परिस्थितीला चालना देतात. महाराष्ट्रात दोन मोठी बंदरे आहेत आणि दोन्ही मुंबईत आहेत. मुंबई बंदराला नैसर्गिकरीत्या खोल बंदराचे स्वरूप लाभले आहे. यामुळे मालवाहू जहाजांना संरक्षण मिळते. जवाहरलाल नेहरू बंदर हे मुंबई बंदरापेक्षा तुलनेने नवीन असले तरी, देशातील महत्त्वाचे बंदर म्हणून उदयास आले आहे. राज्यातील लहान मालवाहू बंदरांमध्ये डहाणू, तारापूर, धरमतर, उलवा-बेलापूर, ट्रॉम्बे, रेवदंडा, दिघी, दाभोळ, बाणकोट, केळशी, रत्नागिरी, जयगड, विजयदुर्ग इत्यादींचा समावेश होतो. लहान बंदरांमुळे कोळसा, सिमेंट, लोह खनिज इत्यादी मालाची मोठ्या प्रमाणात हाताळणी होते. या लहान बंदरांवर राज्य शासनाचे नियंत्रण आणि व्यवस्थापन असते. दरवर्षी लहान बंदरे केवळ १० लाख मेट्रिक टन व्यापार हाताळतात. तसेच किनारपट्टीवरील व्यापार आणि मासेमारीला मदत करतात.

**शब्दांकन : राजू धोत्रे,** विभागीय संपर्क अधिकारी

## दोन वर्षांतील बंदरे विकास विभागाची कामे

- राज्याच्या नवीन महाराष्ट्र सागरी विकास धोरण-२०२३ ला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्याच्या बंदरे क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने या धोरणामध्ये बंदरे विकास, जेट्टी, शिपयार्ड, कोस्टल शिपिंग, आंतरदेशीय जलमार्ग विकास, प्रवासी वाहतूक, सागरी पर्यटन, कौशल्य विकास, बंदरांमध्ये हरित उपाययोजना इत्यादी सर्वच बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या धोरणाच्या माध्यमातून बंदरे क्षेत्रात खासगी गुंतवणुकीस आकर्षित करण्यासाठी विविध सवलती देण्यात आल्या आहेत.
- महाराष्ट्र सागरी मंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. यामध्ये, राज्याच्या बंदरे क्षेत्रात माल वाहतूक व प्रवासी वाहतुकीला चालना देणे, बंदरे क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कामकाजास गती देणे हा दृष्टिकोन ठेवून अनेक निर्णय घेण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या प्रवासी जेट्टी आनुषंगिक पायाभूत सुविधांच्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रक्रियेस गती देण्यात आली.
- मच्छिमारांना सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागाने महाराष्ट्र सागरी मंडळाकडे अंमलबजावणीसाठी सोपवलेल्या हर्णे, जि. रत्नागिरी व जीवना, जि. रायगड येथील मत्स्यबंदरांचे काम प्रगतिपथावर आहे.
- १७ ते १९ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत मुंबई येथे संपन्न झालेल्या मेरीटाईम इंडिया समिट या कार्यक्रमात जगभरातील जवळपास ८० देशांनी सहभाग घेतला होता. या समिटमध्ये महाराष्ट्र सागरी मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी संयुक्तरीत्या सहभाग घेऊन राज्याच्या सागरी व औद्योगिक क्षेत्रात गुंतवणुकीसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी प्रदर्शित करण्यात आल्या.
- महाराष्ट्र सागरी विकास धोरण - २०२३ मधील तरतुदीस अनुसरून, जिंदाल समूहाच्या जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी सुमारे ४,२०० कोटी रुपये इतकी गुंतवणूक प्रस्तावित केली असून पालघर जिल्ह्यात मौजे मुरबे येथे नियोजित बंदर प्रकल्पास मेगा पोर्ट म्हणून मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत कामे प्रगतिपथावर आहेत.
- याशिवाय, बाणकोट खाडीमध्ये दोन मायक्रो पोर्ट प्रकल्प, रत्नागिरी जिल्ह्यात स्क्वेअर पोर्ट आणि योमेन मरीन यांचे अनुक्रमे दाभोळ व रत्नागिरी येथील शिपयार्ड प्रकल्प आणि रायगड जिल्ह्यात करंजा टर्मिनल यांच्या जेट्टी प्रकल्प विस्तारास मान्यता देण्यात आली आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात खासगी गुंतवणुकीसह प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत आहेत.
- किनारी पर्यटनाला चालना देण्यासाठी एनसीपीए, मुंबई येथे समुद्रात आणि नवी मुंबईतील बेलापूर खाडीत फ्लोटेल प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे.
- महाराष्ट्र सागरी मंडळाच्या मालमत्तांचा वापर करून त्याद्वारे महसुलात वाढ व्हावी, या उद्देशाने मंडळाच्या जेट्टी, प्रवासी टर्मिनल, वाहनतळ इत्यादींचे परिचालन व देखभाल खासगी संस्थांमार्फत करण्यासाठी निविदा मागवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.
- मुंबईच्या नजीक असलेल्या ठाणे, वसई, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली या शहरांपर्यंत जलवाहतूक सुरू करण्याकरिता राष्ट्रीय जलमार्ग-५३ मध्ये डोंबिवली, कोलेशेत, काल्हेर आणि मीरा-भाईंदर येथे जेट्टी बांधण्याच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे विविध महत्त्वाचे निर्णय शासनाच्या बंदरे विभागांतर्गत घेण्यात आले. या महत्त्वाकांक्षी निर्णयांमुळे राज्याच्या अर्थचक्राला नक्कीच गती प्राप्त होत असून कौशल्ययुक्त नवयुवकांना हक्काच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील युवा पिढीला कौशल्यक्षम बनवण्यासाठी मागील १० वर्षांत विविध नावीन्यपूर्ण योजना राबवल्या आहेत. त्याच धर्तीवर राज्यात गेल्या दोन वर्षांत कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या जात आहेत. राज्यातील युवक व युवतींना अधिकाधिक चांगले प्रशिक्षण घेतल्यानंतर रोजगार प्राप्त व्हावा हा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी कौशल्य विकास विभागाचा पदभार स्वीकारल्यापासून गेल्या दोन वर्षांत कुशल व रोजगारक्षम राज्य बनवण्यासाठी विविध निर्णय आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.**

# कुशल व रोजगारक्षम

**मंगल प्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री



प्रत्येक क्षेत्रात अनुभवी, कार्यक्षम, सर्जनशील कुशल मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता असते. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग; तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे, काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे आदी बाबींसह केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विभागांमार्फत राबवण्यात येणाऱ्या शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जाणार आहे. या योजनेकरिता ५,५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठी १८ ते ३५ वर्ष वयोगटातील उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत १२ वी उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांसाठी ६,००० रुपये, आय.टी.आय व पदविका उत्तीर्ण उमेदवारांसाठी ८,००० रुपये, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांसाठी १०,००० रुपये दरमहा विद्यावेतन मिळणार आहे. या उमेदवारांचा कार्य प्रशिक्षण किंवा आंतरवासिता (इंटर्नशिप) कालावधी सहा महिने असणार आहे. इच्छुक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. शासकीय व खासगी आस्थापनांनी ऑनलाइन नोंदवणे गरजेचे आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप)च्या संधी उपलब्ध होणार असून या योजनेत प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक व शहरी भागात ५,००० लोकसंख्येसाठी एक असे एकूण ५०,००० योजनादूत नेमण्यात येणार आहेत.

## स्टार्टअप योजना

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनवणे, देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे, हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेसाठी १०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून, सुमारे ५०० स्टार्टअप्सना २५ लाखांपर्यंत आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे.

## कौशल्य सन्मान योजना

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या माध्यमातून पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांची व्यवसायवृद्धी व्हावी, यासाठी १८ प्रकारचे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या विश्वकर्मांना पाच दिवसांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. पात्र लाभार्थ्यांना संबंधित व्यवसायाच्या टूलकिटसाठी १५,००० रुपये रकमेचे ई-व्हाऊचर दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्याला प्रतिदिवस ५०० रुपयेप्रमाणे असे एकूण ३,००० रुपये विद्यावेतन दिले जाते. प्रशिक्षणानंतर पात्र लाभार्थ्यांना व्यवसायवृद्धीसाठी विनातारण एक लाख रुपये रकमेचे पाच टक्के व्याजदराने कर्ज मिळेल. पहिल्या हप्त्याच्या कर्जाची नियमित परतफेड केल्यास, लाभार्थ्यांना पुढील दोन लाख रुपये रकमेचे पाच टक्के व्याजदराने विनातारण कर्ज मिळेल. जून २०२४ पर्यंत राज्यामध्ये एकूण ३६,०४३ विश्वकर्मांनी यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

## कौशल्य विकास केंद्र योजना

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणींतर्गत 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र' ही नावीन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत १,००० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण

देण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण राज्यात १५ ते ४५ वयोगटातील दरवर्षी साधारण १ लाख ५० हजार युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.

## शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५,००० रुपये यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे देण्यात येते. महाराष्ट्र राज्यात एकूण ४७,६१४ उद्योग व इतर आस्थापना शिकाऊ उमेदवारीसाठी नोंदणीकृत असून, सद्य:स्थितीत एकूण ८,५३६ उद्योग व इतर आस्थापना शिकाऊ उमेदवारी योजेनेची अंमलबजावणी करत आहेत. सद्य:स्थितीत एकूण २,५४,८३९ शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत.

## व्हर्चुअल क्लासरूम

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यामार्फत स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त राज्यात ७५ व्हर्चुअल क्लासरूम सुरू करण्यात आल्या आहेत. व्हर्चुअल क्लासरूममध्ये इंटरॅक्टिव्ह पॅनल, संगणक सेवा, उत्तम बैठक व्यवस्था असणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'स्किल इंडिया' व 'डिजिटल इंडिया' या उपक्रमांतर्गत राज्यातील ४१९ या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये व ५४७ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहकार्य करून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर या महापुरुषांचे कौशल्यविषयक विचार 'महापुरुषांचे कौशल्य विचार' या पुस्तकात समावेश करण्यात आले आहेत. आयटीआयच्या सद्य:स्थितीतील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त हा विषय विद्यार्थ्यांना शिकवला जाणार आहे. तसेच राज्यातील ४१९ आयटीआयमध्ये रात्र अभ्यासिका सुरू करण्यात आल्या आहेत.



## रोजगार मेळावे

कौशल्य विकास विभागामार्फत उद्योजक आणि रोजगार इच्छुक उमेदवारामध्ये दुवा साधून रोजगार मेळावे आयोजित केले जातात. सन २०२३-२४ मध्ये माहे मार्च २०२४ अखेरपर्यंत एकूण ५८१ रोजगार मेळावे पार पडले. यामध्ये ९५,४७८ उमेदवारांची नोकरीसाठी निवड झाली आहे. या रोजगार मेळाव्यांमध्ये पाच नमो महारोजगार मेळावे व ३४ महिला रोजगार मेळावे यांचा समावेश आहे. नागपूर, लातूर, अहमदनगर, बारामती, पुणे, ठाणे येथे नमो महारोजगार मेळावे पार पडले आहेत. या मेळाव्यांमध्ये १,४९५ उद्योजकांनी सहभाग नोंदवला, तर १,५७,१३९ उमेदवार या मेळाव्यांसाठी उपस्थित होते. यामध्ये ६०,६९१ उमेदवारांची नोकरीकरिता निवड करण्यात आली आहे.

### महत्त्वपूर्ण निर्णय

- कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून विभागामार्फत एक वर्षाकरिता असे एकूण १,१७५ सामंजस्य करारनामे करण्यात आले.
- स्वच्छ भारत अभियानात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातर्फे ठाण्यात संत गाडगेबाबा स्वच्छता अकादमीची निर्मिती.
- महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठांतर्गत स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनीची गोंवडी विद्याविहार येथे स्थापना करण्यात येणार आहे.
- महाराष्ट्र स्टार्टअप विकअंतर्गत विजेत्या स्टार्टअप्सना पाच आवृत्त्यांच्या १२० विजेत्या स्टार्टअप्सचे काम विविध विभागांसोबत चालू आहे.
- कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभाग, व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षण संचालनालय आणि लाइटहाऊस कम्युनिटिज फाऊंडेशन यांच्यामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड येथे मुंबईतील पहिले लाइटहाऊस सुरू.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर युवकांना रोजगार मिळण्यासाठी महाराष्ट्र शासन व विभागामार्फत महाराष्ट्र इंटरनॅशनल हा स्वतंत्र कक्ष महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटींतर्गत स्थापन.

राज्यातील विद्यार्थ्यांना, युवक-युवतींना कौशल्य शिक्षणाचे व रोजगाराचे मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हास्तरावर ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १,७४,६३८ युवक-युवतींनी सहभाग घेतला, तर १५,४१३ पालकांनी सहभाग घेतला.

## महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात १८ अभ्यासक्रम शिकवले जातात. विद्यापीठाने विविध उद्योगसमूहांबरोबर ५५ करार केले आहेत. सगळ्या अभ्यासक्रमात उद्योगसमूह विद्यार्थ्यांना ऑन द जॉब ट्रेनिंग देणार आहेत. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्ससाठी एनएसडीसी इंटरनॅशनलबरोबर करार केला आहे. तसेच विद्यापीठाने यावर्षी युरोपच्या नामवंत डिझाइन संस्था रुबिकबरोबर करार करून जागतिक दर्जाचा बीडीईएस इंडस्ट्रियल डिझाईन, इन्टरॅक्शन डिझाईन अशा कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे. विद्यापीठांनी आय-स्पार्क फाऊंडेशनची स्थापना केली आहे. यात नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, मेन्टॉरिंग करणे, सीड फंड देणे इत्यादी काम चालू आहे. विद्यापीठांनी २० महाविद्यालयांमध्ये प्रि इनक्युबेशन केंद्रांची स्थापना केली असून, १०० नवसंशोधकांनी आपले प्रस्ताव विद्यापीठात सादर केले आहेत.

**शब्दांकन : संध्या गरवारे-खंडारे,** विभागीय संपर्क अधिकारी

**अतिवृष्टी, पूरस्थिती, दुष्काळ, गारपीट, सततचा पाऊस अशा अनेक नैसर्गिक; तसेच मानवनिर्मित आपत्तींमध्ये राज्याचा मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग जनतेच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहिला आहे. नैसर्गिक आपत्तींचा खंबीरपणे सामना करून उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात राज्य शासनाने आखडता हात न घेता भरीव मदत दिली आहे.**

# मदतीसाठी सदैव तत्पर...

**अनिल पाटील,**
मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री



गत दोन वर्षांत नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात देऊन त्यांच्या पाठीशी राज्य शासन भक्कमपणे उभे राहिले आहे. राज्य शासनामार्फत सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या पिकांच्या नुकसानभरपाईसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे निकष न पाहता बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यात आली आहे. जिरायती, बागायती आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानभरपाईसाठी प्रतिहेक्टर मर्यादेतील वाढीसह अवेळी पाऊस, गारपीट व दुष्काळासाठी भरीव मदत घोषित करण्यात आली आहे. कोकणातील नैसर्गिक आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पासाठी ३,२०० कोटी रुपयांची भरीव तरतूद नियोजित करण्यात आली आहे.

नैसर्गिक आपत्तींवर मात करण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर २४ तास नियंत्रण कक्ष सुरू आहे. मान्सूनमध्ये अतिपावसामुळे नद्यांना पूर येत असल्याचे लक्षात घेता पूरबाधित गावांना जिल्हा प्रशासनामार्फत सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य करण्यासाठी प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल व राज्य आपत्ती प्रतिसाद दलांना तैनात करण्यात येत आहे. अतिवृष्टी, पूर व धरणातील पाण्याच्या विसर्गाचे प्रभावी संनियंत्रण करून विभागांमध्ये समन्वय ठेवला जात आहे. यातून जीवित, वित्तहानी होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे. तसेच नुकसानीचे सर्वेक्षणदेखील करण्यात येत आहे.

## नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत

अवेळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट व दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसान भरपाईसाठी बाधित शेतकऱ्यांना वेळोवेळी शासनाने भरीव मदत केली आहे. शेतपिके, शेतजमिनीचे नुकसान याकरिता बाधित शेतकऱ्यांना जुलै २०२२ पासून ते आतापर्यंत १५,२४५ कोटी रुपयांची मदत वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सततचा पाऊस आता नैसर्गिक आपत्ती

राज्य शासनामार्फत 'सततचा पाऊस' ही नैसर्गिक आपत्ती घोषित करून शेतीपिकांच्या नुकसानापोटी शेतकऱ्यांना मदत देण्यात येत आहे. अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरितादेखील २४ तासांमध्ये ६५ मि.मी.पेक्षा जास्त पाऊस हा निकष कायम ठेवला आहे.

## नुकसानाची मदत थेट होणार वितरित

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानाची मदत पारदर्शी पद्धतीने मिळावी, यासाठी संगणकीय प्रणालीद्वारे आधार प्रमाणिकरण करून आपत्तीग्रस्तांच्या बँक खात्यात थेट वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मार्च २०२३ पासून आतापर्यंत ७,६०० कोटी रुपये इतका निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डिबीटीद्वारे वितरित करण्यात आला आहे.

## शेतजमिनीची नुकसानभरपाई वाढीव दराने

नैसर्गिक आपत्तीमुळे जिरायत पिकांची नुकसानभरपाई पूर्वी प्रतिहेक्टर ८,५०० रुपये २ हेक्टरच्या मर्यादेत दिली जात होती. आता ती प्रतिहेक्टर १३,६०० रुपये ३ हेक्टरच्या मर्यादेत दिली जाणार आहे. बागायत पिकांची नुकसानभरपाई पूर्वी प्रतिहेक्टर १७,००० रुपये २ हेक्टरच्या मर्यादेत केली जात होती, आता ती प्रतिहेक्टर २७,००० रुपये ३ हेक्टरच्या मर्यादेत दिली जात आहे. बहुवार्षिक पिकांची नुकसानभरपाई प्रतिहेक्टर २२,५०० रुपये २ हेक्टरच्या मर्यादेत दिली जात होती. आता ती प्रतिहेक्टर ३६,००० रुपये ३ हेक्टरच्या मर्यादेत दिली जात आहे.

## दुष्काळग्रस्तांसाठी भरीव मदत

जून ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत केंद्र शासनाच्या निकषानुसार ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला. या तालुक्यात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध ८ सवलती लागू करण्यात आल्या. या भागातील सर्व दुष्काळग्रस्तांसाठी २४४३.२२ कोटी रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली; परंतु केंद्र शासनाच्या निकषात न बसणाऱ्या राज्यातील काही भागात शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक होते. त्याकरिता राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलून ४० तालुक्यांव्यतिरिक्त सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि.पेक्षा कमी झालेल्या १,२४५ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली. या भागातील शेतकऱ्यांसाठी दुष्काळाच्या आठ सवलती लागू केल्या.

## ई-पंचनामा ॲप

शेतपिकांचे नुकसान व इतर पंचनामे करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित मोबाइल ॲप विकसित केले जात असून नुकसानाची माहिती या ॲपवर नोंदवण्यात येणार आहे. त्यामुळे पंचनाम्यात अधिक पारदर्शकता येणार असून शासनाकडून मिळणारी मदतीची रक्कम डिबीटीद्वारे जलदगतीने वितरित करण्यात येईल.

## आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम

केंद्र शासनामार्फत राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये राबवण्यात आलेल्या 'आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमा'च्या धर्तीवर राज्य शासनामार्फत राज्यातील उर्वरित १६ जिल्ह्यांत एकूण ५,४०० आपदा मित्रांना आपत्ती व्यवस्थापनासंबंधित १२ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रत्येक आपदा मित्राला १५ आपत्कालीन अत्यावश्यक वस्तूंची वैयक्तिक किट; तसेच ३ वर्षांकरिता ५ लाख रुपयांचा वैयक्तिक अपघात विमा देण्यात येणार आहे. या योजनेत समाविष्ट जिल्ह्यांना ३० आपत्कालीन अत्यावश्यक वस्तूंची किट देण्यात येणार आहे.

## उष्माालाट आपत्ती व्यवस्थापन कृतिआराखडा

महाराष्ट्र हे देशातील उष्णतेच्या लाटेसाठी अतिसंवेदनशील राज्यांपैकी एक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हवामान बदलामुळे उष्मालाटेची तीव्रता वाढत असल्याचे आढळून आले आहे. या उष्णतेच्या लाटेसंदर्भात राज्यस्तरावर कार्यशाळाही घेण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण यंत्रणेद्वारे राज्यामध्ये १५ अतिसंवेदनशील उष्मालाटप्रवण जिल्हे निर्देशित केले आहेत. महाराष्ट्र राज्याने पहिला उष्मालाट आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा सन २०२२-२३ मध्ये तयार केला. राज्य उष्मालाट आपत्ती व्यवस्थापन कृतिआराखड्याच्या धर्तीवर जिल्हास्तरावर उष्मालाट आपत्ती व्यवस्थापन कृतिआराखडा बनवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## सचेत प्रणाली

नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना नागरिकांना देण्यासाठी 'सचेत' ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली जागतिक स्तरावर स्वीकृत कॉमन अलर्टिंग प्रोटोकॉल मानकांवर आधारित असून याची संकल्पना राष्ट्रीय आपत्ती निवारण यंत्रणेद्वारे प्रत्यक्षात आणली आहे. सचेत प्रणालीद्वारे नागरिकांना स्थानिक भाषांमध्ये आपत्ती सतर्कतेचा संदेश प्रसारित केला जातो. या प्रणालीचा वापर करून आतापर्यंत सुमारे १७५ कोटी सतर्कतेचा इशारा देणारे संदेश प्रसारित करण्यात आले आहेत.

## समाजमाध्यमांचा वापर

आपत्ती व्यवस्थापन प्रभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती; तसेच विविध आपत्तींसंदर्भात नागरिकांना सतर्कतेच्या पूर्वसूचना देण्याबाबत प्रभावी माध्यम म्हणून समाजमाध्यमांचा वापर आपत्ती व्यवस्थापन प्रभागातर्फे करण्यात येत आहे. या माध्यमांमध्ये आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे फेसबुक, एक्स (ट्विटर), व्हॉट्सॲप, लिन्क्डइन या समाजमाध्यमांवर SDMAMaharashtra या नावाने स्वत:चे खाते कार्यरत आहेत.

## कोकणसाठी सौम्यीकरण प्रकल्प

कोकण भागात येणाऱ्या चक्रिवादळ, अवकाळी व संततधार पाऊस, समुद्राचे उत्थान इत्यादी आपत्ती निवारण कामांसाठी राज्य शासनाने ३,२०० कोटी रुपयांचा कोकण सौम्यीकरण प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

## आपत्कालीन प्रतिसाद सहायता प्रणाली

आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने प्रतिसाद मिळावा, यासाठी केंद्र शासनाने आपत्कालीन प्रतिसाद सहायता प्रणाली विकसित केली आहे. याअंतर्गत ११२ या हेल्पलाइन क्रमांकाद्वारे देशभरातील नागरिकांना पोलीस मदत, अग्निशमन, रुग्णवाहिका, महिला संरक्षण, बालसुरक्षा, आपत्ती व्यवस्थापनासंबंधित त्वरित मदतीची मागणी करता येणार आहे.



## राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनक संस्थेच्या धर्तीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था नागपूर येथे स्थापन करण्यात येणार आहे. या संस्थेत आपत्ती संबंधिची तयारी, सौम्यीकरण, आपत्ती प्रवणता, आपत्ती धोके निवारण; तसेच आपत्तीपश्चात मदत व पुनर्वसन, पुनर्बांधणी, प्रतिसाद, प्रशिक्षण या बाबींचे व्यवस्थापन करण्यात येणार आहे. या संस्थेसाठी मिहान येथे १० एकर जागा उपलब्ध झाली आहे. या संस्थेत अद्ययावत प्रशिक्षण संस्था, निवास व्यवस्था, सराव व रंगीत तालीम, क्रीडांगण उभारण्यासाठी सुमारे २६८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## अग्निशमन विभागाला साहित्य पुरवठा

आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन विभागाला २१४ वॉटर मीस्ट फायर एक्सिग्युशर बाईक, ३२१ रॅपिड फायर फायटिंग ॲण्ड इमर्जन्सी बाईक्स, ३२१ फायर ब्लँकेट, २७९ टेंट, १०९ मिनीफायर ॲण्ड रेस्क्यु व्हेईकल पुरवण्यात आले आहेत. आपत्तीवर मात करण्यासाठी साहित्याचा पुरवठादेखील करण्यात आला आहे. यामध्ये विविध जिल्ह्यांना एकूण १२१ बोटी, १०२ तात्पुरत्या निवारा केंद्रांचा पुरवठा करण्यात आला आहे.

नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीचे नुकसान होऊ नये, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. आपत्तींमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी राज्य शासनाकडून दीर्घकालीन उपाययोजना केल्या आहेत. यापुढील काळातही राज्य शासन प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे-खंडारे,** विभागीय संपर्क अधिकारी

**महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचे ध्येय ठेवून राज्य शासन काम करत आहे. गेल्या दोन वर्षांत अनेक विकासाची कामे राज्यात पूर्णत्वास आली. महाराष्ट्राचा सर्वच क्षेत्रात विकास हे ध्येय घेऊन राज्य शासन काम करत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने शिक्षण, आरोग्य, कृषी, सिंचन, पायाभूत सुविधा, परिवहन, ऊर्जा, पर्यटन, वने आणि पर्यावरण, सामाजिक न्याय, आदिवासी, अल्पसंख्याक, पायाभूत सुविधा, उद्योग, कौशल्य विकास, महिला व बालविकास, सामाजिक न्याय अशा विविध क्षेत्रांमध्ये घेतलेल्या निर्णयांनी महाराष्ट्राची घोडदौड सुरु आहे.**

# लोकाभिमुख आणि लोकहित

**वर्षा फडके-आंधळे**

गेल्या अडीच वर्षांत लोकाभिमुख आणि लोकहिताचे अनेक उपक्रम राबवले गेले. जनतेच्या आशा, आकांक्षा, अपेक्षांवर खरे उतरण्याचा, जनतेचा विश्वास सार्थ ठरवण्याचा निष्ठापूर्वक, प्रामाणिक प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राचे सर्वच क्षेत्रात अव्वल स्थान कायम राहावे, समाजात एकता, समता, बंधुतेची भावना वाढावी, सर्व समाजघटकांना विकासाची समान संधी उपलब्ध होण्यावर भर देण्यात आला आहे.

## महाराष्ट्राचा विकास हाच ध्यास

'सर्वसामान्य जनतेचे कल्याण' हे एकमेव ध्येय समोर ठेवून, राज्यातील जनतेला केंद्रबिंदू मानून अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. 'महाराष्ट्र गतिमान' ठेवण्यासाठी विविध निर्णय घेतले आहेत. 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून शासन खऱ्या अर्थाने लोकाभिमुख झाले आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देवून शासनाने बळीराजाला मदतीचा हात दिला आहे. महिलांना एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलत दिली आहे, तर ७५ वर्ष पूर्ण केलेल्या ज्येष्ठांना मोफत बस प्रवास सवलत दिली आहे, याचा कोट्यवधी महिला, ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलमध्ये साकारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम प्रगतिपथावर आहे. नागपूरच्या दीक्षाभूमी विकासासाठी २०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत, तर हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



राज्याचा समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वारसाही शासन जपत आहे. पंढरपूरच्या वारीत सहभागी झालेल्या दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपयांचे साहाय्य करून शासनाने विठ्ठलभक्तांना दिलासा दिला आहे. तीर्थक्षेत्र विकास योजनांसाठी ३,००० कोटी रुपये अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला आहे. ग्रामीण भागात तीर्थक्षेत्र विकासासाठी ५ कोटींचा निधी दिला जाणार आहे. पालखी मार्गावर सहा क्षेत्रांत मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कामे सुरू झाली आहेत. श्रीनगर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन उभारले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे साक्षीदार असलेल्या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी शासनाने ठोस प्रयत्न सुरू केले आहेत. प्राधिकरणांची स्थापना करून गडकिल्ल्यांना गतवैभव प्राप्त करून देण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय गुंतवणुकीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'ला बळकटी मिळतानाच राज्यात रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध होणार आहेत.

## थेट परकीय गुंतवणुकीत अग्रेसर

थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. दोन वर्षांत दावोसमध्ये ५ लाख कोटींच्या परदेशी गुंतवणुकीचे करार झाले असून ८० टक्के कार्यान्वित झाले आहेत. राज्याला १ ट्रिलियन डॉलर्स इकॉनॉमी बनवण्याचा निर्धार करण्यात आला आहे. काही महिन्यांपूर्वी डीपीआयआयटीने अहवाल जारी केला असून १ लाख कोटीपेक्षा अधिक थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) महाराष्ट्रात आली आहे.

८ लाख कोटी रुपयांची पायाभूत सुविधांची कामे राज्यात सुरू आहेत. पायाभूत सुविधा, निर्यात, स्टार्टअपमध्येही महाराष्ट्र नंबर वन आहे. देशातील सर्वाधिक लांबीचा सागरी सेतू आपण उभारला तिथेही महाराष्ट्र नंबर वन आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकचा टनेल उभारण्यातही महाराष्ट्र नंबर वन आहे. उद्योगस्नेही (इंडस्ट्री फ्रेंडली) ही महाराष्ट्राची ओळख जपली आहे. महिला लघुउद्योजकांसाठी या आर्थिक वर्षांपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरू करण्यात आली.

वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८ जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार अपेक्षित आहेत. कॅप्टिव्ह मार्केट योजनेमुळे सूतगिरणी, यंत्रमाग, प्रोसेसिंग, पॅकिंग; तसेच वाहतूक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार आहेत. खासगी गुंतवणूक वाढवण्यासाठी लघु-वस्त्रोद्योग संकुले; तसेच टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्याचे शासनाने ठरवले आहे.

## पायाभूत सुविधांचे जाळे

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचे प्रकल्प आणि राज्याचा विकासाचा वेग हे परस्परपूरक आहेत. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग त्याचे उत्तम उदाहरण आहे. समृद्धी महामार्ग विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्याच्या समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे. अटल सेतू या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसह मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडोर, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन, रेवस ते रेड्डी, सिंधुदुर्ग सागरी महामार्ग यासोबतच राज्यामध्ये ५ हजार किलोमीटरचे एक्सेस कंट्रोल महामार्ग तयार केले जाणार आहेत. मुंबई, नवी मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक ही महानगरेच नव्हे, तर राज्यातील खेड्यापाड्यांतील पायाभूत सुविधांचे जाळे भक्कम करण्यासाठीही ठोस आणि सर्वंकष प्रयत्न केले जात आहेत. नवीन माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण करण्यात आले. त्यातून ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित होणार आहे. राज्याचे पहिले निर्यात प्रोत्साहन धोरणदेखील आणण्यात आले असून त्याद्वारे अंदाजे रुपये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, भिवंडी, पुणे येथे ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येणार आहेत. जालना येथे 'मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क' उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार, रांजणगाव येथे महाराष्ट्रातील पहिला इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर प्रकल्प होत आहे. राज्य शासनाने घेतलेल्या महत्त्वांकाक्षी निर्णयांची माहिती पुढीलप्रमाणे:-

## नगरविकास

- नगरोत्थान महाभियानास मार्च, २०३० पर्यंत मुदतवाढ.
- राज्यात महास्वच्छता अभियानास प्रारंभ. मुंबई, ठाणे, मीरा भाईंदरमध्ये डीप क्लिनिंग सखोल स्वच्छता मोहीम.
- देशातील समुद्रावरच्या सर्वात मोठ्या अटल सेतूचे लोकार्पण.
- उत्तन ते विरार सागरी सेतू मार्गास मान्यता.
- स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० सुरू. १२ हजार ४०९ कोटी ३१ लाख रुपये खर्चणार.
- मुंबईत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १७,२०० कोटींच्या सात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पायाभरणी.
- केंद्राच्या अमृत अभियानाची अंमलबजावणी.
- बृहन्मुंबईमध्ये समूह पुनर्विकासास मोठे प्रोत्साहन.
- अधिमूल्य; तसेच विकास अधिभारामध्ये ५० टक्के सवलतीचा निर्णय.
- मुंबई सौंदर्यीकरणाच्या पहिल्या टप्प्यात विविध ५०० कामांचे भूमिपूजन. २०२२-२३ साठी ६३७ कोटी ७९ लाख रुपये; तसेच २०२३-२४ मध्ये ७२२ कोटी २७ लाख रुपये एवढी आर्थिक तरतूद.
- नवी मुंबई एकात्मिक औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय वैद्यकीय तसेच शैक्षणिक संस्थांना उद्योग क्षेत्र म्हणून परवानगी. अत्याधुनिक शैक्षणिक व संशोधन सुविधा उपलब्ध होतील. या प्रकल्पात ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व १ लाख रोजगाराची निर्मिती होणार.
- नगरपरिषदा व नगरपंचायतींचे अध्यक्ष यांची थेट जनतेमधून निवडणूक.
- नागपूर मेट्रो रेलचा पहिला टप्पा सुरू. नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी. नागपूर मेट्रो रेल टप्पा-२ प्रकल्पास सुधारित मान्यता. ४३.८० किमी मेट्रो मार्गिका उभारणार.



- मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता, १२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी सुरू.
- खडकवासला - स्वारगेट - पुलगेट - हडपसर - लोणी - काळभोर या मार्गावर मेट्रो रेल्वे प्रकल्प.
- 'महारेल'तर्फे महाराष्ट्रात ९ रेल्वे ओलांडणी उड्डाणपुलांचे लोकार्पण. ११ उड्डाणपूल आणि भूयारी मार्गांचे भूमिपूजन.
- हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग आता नागपूर-शिर्डी-भरवीरपर्यंत खुला.
- मुंबईतील कोळीवाड्यांच्या विकासासाठी विशेष विकास नियंत्रण नियमावली.
- औद्योगिक विभागांमधील नागरी जमीन कमाल धारणा अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनींसाठी अभय योजना.
- धारावी पुनर्विकासाच्या कामाला गती येणार. निविदा मागवून कंपनी निश्चित.

## सामान्य प्रशासन

- गेल्या दोन वर्षांत सुमारे एक लाख शासकीय पदभरती. पदभरतीसाठी टीसीएस, आयबीपीएससमार्फत परीक्षा.
- राज्यातील स्पर्धा परीक्षांतील गैरप्रकार थांबवण्यासाठी कायदा.
- छत्रपती संभाजीनगर शहर आणि विभागाचे नाव 'छत्रपती संभाजीनगर' आणि उस्मानाबादचे नाव 'धाराशिव'.
- अहमदनगर शहराचे नामकरण 'अहिल्यानगर' करण्यास मान्यता.
- नागरिकांची निवेदने, पत्रांवर तत्काळ कार्यवाहीसाठी मंत्रालयात सेंट्रल रजिस्ट्री सुरू. ई-ऑफिसवर भर दिल्याने कामकाजास वेग.
- शासन आपल्या दारी उपक्रमास प्रचंड प्रतिसाद. २० जिल्ह्यांतून २ कोटींपेक्षा जास्त लाभांचे वाटप.
- मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे भव्य स्मारक छत्रपती संभाजीनगर येथे उभारणार. १०० कोटी खर्चास मान्यता. मुक्तिसंग्रामाच्या कार्यक्रमांसाठी मराठवाड्यातील जिल्ह्यांना ४ कोटी रुपये निधी.
- मराठा समाजासाठी शैक्षणिक व नोकरीत १० टक्के आरक्षणाचा कायदा.
- मराठा आरक्षणासंदर्भात ज्येष्ठ विधिज्ञांचा विशेष कार्यगट. इतर मागासवर्गाच्या सर्व सोयीसुविधा आणि सवलती मराठा समाजास देण्यासाठी कार्यवाही.
- मराठा आरक्षणासाठी क्युरेटिव्ह याचिका दाखल. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू.
- मराठी समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने विक्रमी वेळेत ११ दिवसांत सर्वेक्षण करून इम्पेरिकल डेटा गोळा केला. ३ ते ४ लाख अधिकारी आणि कर्मचारी सहभागी.
- कुणबी दाखले देण्याकरिता कार्यपद्धती निश्चितीसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती. कुणबी नोंदींसंदर्भात अधिसूचनेच्या ६ लाख हरकती व सूचनांचे विश्लेषण सुरू.



- १,५५३ उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करून उमेदवार रुजू. त्याशिवाय इतर २००० विद्यार्थ्यांची रखडलेली नोकर भरती पूर्ण करणे सुरू. एकूण ४०५३ जण शासकीय सेवेत.
- मराठा आरक्षणाबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती.
- मराठा युवकांच्या शासकीय नोकरीत नियुक्तीसाठी अधिसंख्य पदे निर्माण. नियुक्ती प्रक्रिया सुरू.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध बँकांमार्फत सध्या ७० हजार लाभार्थ्यांना ५ हजार १४० कोटी रुपयांचे कर्ज.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के व कक्षेबाहेरील ५० टक्के पदांची भरती.
- आदिवासी गावांमध्ये १७ संवर्गातील सरळसेवेची १०० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरणार.

## जलसंपदा

- महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम - १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीची सुधारणा. येत्या ३ वर्षांत ४ लाख २८ हजार हेक्टर वाढीव क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ.



- वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसाहाय्य.
- मराठवाड्यात ११ जलसंपदा प्रकल्पांना मान्यता. १३,६७७ कोटींचा सुधारित वाढीव खर्च मंजूर.
- नांदुरा येथील जिगाव प्रकल्पाला गती देण्यासाठी अतिरिक्त १७१० कोटीच्या खर्चास मान्यता.
- भातसा तसेच वाघूर प्रकल्पांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता.

## परिवहन


- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ वर्षे पूर्ण ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत.
- महिलांना एस.टी. प्रवासात सरसकट ५० टक्के सूट.
- मुंबईतील ८ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावे बदलणार.
- जालना - खामगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग. २,४५३ कोटी राज्याच्या हिश्शास मान्यता.
- अहमदनगर- बीड- परळी वैजनाथ २६१ कि.मी. रेल्वे मार्गाचा पहिला टप्पा नवीन आष्टी - अहमदनगर ६६ कि.मी. मार्गाचे उद्घाटन आणि डेमू सेवेचा प्रारंभ.
- ४०० वंदे भारत ट्रेन सुरू करण्यात येत असून, त्यापैकी १२० गाड्या लातूरच्या कारखान्यात तयार.
- ऐच्छिकरीत्या वाहनांचे स्क्रॅपिंग करणाऱ्यांना व्याज व दंड माफ. भंगार वाहनांचा प्रश्न सुटणारा.
- ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करून ५० कोटी अनुदान.

## गृहनिर्माण

- यावर्षी १० लाख घरांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम.
- इतर मागासवर्गीयांसाठी ३ वर्षांत १० लाख घरांची ‘मोदी घरकूल योजना’.
- २०२४-२५ मध्ये विविध घरकूल योजनांकरिता ७,४२५ कोटींची तरतूद.
- बीडीडी चाळ पुनर्विकासात झोपडीधारकांची पात्रता निश्चित.
- रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनांना गती.
- २००० ते २०११ पर्यंत पात्र झोपडीधारकांच्या सदनिकेची किंमत २.५० लाख रुपये.
- झोपडपट्टी पुनर्वसनमधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात. सध्या १ लाख रुपये इतके हस्तांतरण शुल्क आकारले जाते, आता ते ५० हजार रुपये.
- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील लाभार्थींना पाच वर्षांच्या कालावधीनंतर त्यांची सदनिका विकता येणार. सध्या ही कालमर्यादा दहा वर्षांची आहे.
- बीडीडी चाळीत पोलिसांना १५ लाखात घर.
- बंद पडलेल्या ५८ गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी घरकुले.

## माहिती तंत्रज्ञान

- महाराष्ट्र युनिफाईड सिटिझन डाटा फॉर डिजिटल डिलिव्हरी ऑफ सर्व्हिसेस.
- सर्व ग्रामपंचायती उच्च क्षमतेच्या फायबर नेटवर्कने जोडणे सुरू.
- शहरी महानेटमध्ये २५ हजारांपेक्षा जास्त शहरी कार्यालये जोडणार.
- ५जी तंत्रज्ञानासाठी पायाभूत सुविधा वेगाने वाढवण्याकरिता राज्याचे दूरसंचार धोरण.
- राज्य शासनाची नवीन परिपूर्ण वेबसाईट सुरू.



## सामाजिक न्याय

- स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग स्थापन.
- मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना. ज्येष्ठ नागरिकांना ३० हजार रुपयापर्यंत लाभ देणार.
- राज्यात मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन. पंढरपूरला मुख्यालय.
- मुख्यमंत्री वयोश्री योजना राबवणार.
- लाड समितीच्या शिफारशींचा लाभ सर्वच सफाई कामगारांना.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक. १,०८९.९५ कोटी रुपये खर्च अपेक्षित. आजपर्यंत ३२२.१५ कोटी इतका खर्च.
- १५ संस्थांना कायमस्वरूपी विना अनुदान तत्त्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालयासाठी मान्यता.
- संजय गांधी निराधार / श्रावणबाळ योजनेत अर्थसाहाय्य आता १ हजाराहून १,५०० रुपये. २०२३-२४ मध्ये ४५ लाख ६० हजार लाभार्थींना ७,१४५ कोटी अनुदानाचे वाटप.
- राज्याच्या तृतीयपंथी धोरण २०२४ ला मान्यता.
- मराठा, कुणबी विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड - सारथी शिष्यवृत्ती योजना. दरवर्षी ७५ शिष्यवृत्ती देणार.
- राष्ट्रीय वयोश्री योजनेत वयोवृद्धांना वैद्यकीय उपकरणे, अन्य सुविधा उपलब्ध करून देणार.
- गुरव, लिंगायत, नाभिक, रामोशी, वडार समाजासाठी महामंडळे. प्रत्येकी ५० कोटींचे भागभांडवल.
- संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निवृत्तिवेतनात ५० टक्क्यांनी भरीव वाढ.
- बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत, टीआरटीआय या संस्थांच्या कार्यक्रम व योजनांमध्ये एकसमानता. अधिछात्रवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती या योजनांकरिता लाभार्थींची संख्या निश्चित.
- नाशिक येथे सारथीच्या विभागीय कार्यालय, सुसज्ज अभ्यासिका, मुला-मुलींचे वसतिगृहासाठी ५० कोटी रुपये.
- स्पर्धा परीक्षांमधील विद्यार्थी आणि उमेदवारांसाठी ‘महाज्योती’ला आर्थिक पाठबळ. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम.
- राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण आणि मुलाखतीस पात्र उमेदवारांना २५ हजार एकवेळ अर्थसाहाय्य देणार.
- व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी २० उमेदवारांना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन देणार.
- मातंग समाजासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था - आर्टीची स्थापना.
- चर्मकारांसाठी देवनार येथे लेदर पार्क, कोल्हापूर, गोवंडी येथे चर्मोद्योग प्रशिक्षण केंद्र.

## दिव्यांग कल्याण


- दिव्यांग व्यक्तींसाठी धर्मवीर आनंद दिघे घरकूल योजनेतून पहिल्या टप्प्यात ३४,४०० घरकूल बांधणार.
- दिव्यांग व्यक्तींना इलेक्ट्रिक वाहनाचे वाटप करणार.
- दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी ६६७ पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकानांची खरेदी करण्यास मान्यता.
- दिव्यांग व्यक्तींना स्वतःचे हक्काचे घर-नवीन घरकूल योजना - ३४,४०० लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभ.



- दिव्यांग जिल्हा समन्वयक, विशेष तज्ज्ञ शिक्षक व विशेष शिक्षकांना वाहतूक भत्ता लागू करणार.

## वित्त व नियोजन

- विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तीनही वैधानिक विकास मंडळांच्या पुनर्गठनासाठी केंद्राला विनंती.
- मराठवाड्याच्या विकासासाठी एकूण ४६ हजार ५७९ कोटी ३४ लाख खर्च करणार.
- नीति आयोगाप्रमाणेच राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र १ जानेवारी २३ पासून कार्यरत. पदांवर नियुक्त्या. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचीही स्थापना.
- नवीन पेन्शन योजनेतील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास कुटुंब निवृत्तिवेतन देण्याचा पर्याय.
- व्यापाऱ्यांना विवरण पत्रके भरतानाच्या अडचणी दूर. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियमात सुधारणा.
- विक्रीकर न्यायाधिकरणाच्या मुंबई, पुणे, नागपूर खंडपीठांना ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ.
- गतिमान ई-प्रशासनासाठी ई-बिल आणि व्हाऊचर प्रोजेक्ट्स प्रणाली.
- स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, ता. हवेली व समाधी स्थळ वढू बुद्रुक तालुका शिरुर, जिल्हा पुणे येथील स्मारक - २७० कोटी रुपये किमतीचा आराखडा, काम सुरू.
- १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, साडेतीन शक्ती पीठांपैकी एक श्रीक्षेत्र माहुरगड, जिल्हा नांदेड, आई एकवीरा देवी मंदिर, जिल्हा पुणे तीर्थक्षेत्र विकास प्राधिकरणांची स्थापना.



- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तृतीय जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम - २० कोटी रुपये निधी.
- धाराशीव जिल्ह्यात संत गोरोबाकाका महाराज यांच्या स्मारकासाठी शासकीय जमीन व निधी.
- प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवा महाला यांच्या स्मारकासाठी जागा, संगमवाडी, पुणे येथे लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक, अमळनेर, जिल्हा जळगाव येथे साने गुरुजींचे स्मारक, हुतात्मा श्री शिवराम हरी राजगुरू जन्मस्थळ परिसर विकासासाठी १०२ कोटी ४८ लाख रुपयांचा आराखडा, श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी गड, ता. कळवण स्थळाच्या ८१ कोटी ८६ लाख रुपयांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता.

## ऊर्जा

- मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना. साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज. १४ हजार ७६१ कोटी अनुदान.



- मागेल त्याला सौरऊर्जा पंप - शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जीकरण करण्याचा १५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प.
- शेतकऱ्याला दिवसा वीजपुरवठा - मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजनेंतर्गत ७ हजार मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट.
- हरित हायड्रोजन धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.
- डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेत १ लाख शेतकऱ्यांना सौर ऊर्जा कुंपणासाठी अनुदान.
- जलसिंचन ग्राहकांना वीज दर सलवत योजनेस मुदतवाढ.
- कृषिपंप ग्राहकांना दिलासा. अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना जून २०२१ पासून १ रुपया १६ पैसे प्रतियुनिट व स्थिर आकारामध्ये २५ रुपये प्रति केव्हीए इतकी सवलत कायम. यासाठी महावितरणला ३५१ कोटी ५७ लाख रुपये अनुदान.



- वीज मनोरे व वाहिन्यांसाठी जमीन मोबदल्याचे सुधारित धोरण. ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अतिउच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी वाढीव मोबदला.
- उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड तसेच टोरंट पॉवर लिमिटेड यांच्याशी अनुक्रमे ४४ हजार कोटी व २७ हजार कोटीचे सामंजस्य करार.

## गृह

- महाराष्ट्र कॅसिनो कायदा रद्द करण्याचा निर्णय.
- पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षकांच्या नैमित्तिक रजा १२ वरून २० इतक्या वाढवण्याचा निर्णय.
- पोलीस भरतीची प्रक्रिया वेगाने सुरू. ८ हजार पोलिसांचे प्रशिक्षण सुरु.
- मुंबईमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा टप्पा-१ पूर्ण. टप्पा-२ ची कार्यवाही सुरू.
- असुरक्षित सागरी तळावर सीसीटीव्ही व नवीन बोटी खरेदी करण्यासाठी कार्यवाही.
- राज्यात सायबर सुरक्षेसाठी ८३७ कोटींचा प्रकल्प. २४ तास कॉल सेंटर कार्यरत राहणार.
- शिपाई रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी पदभरती निर्बंधांतून सूट. २० हजार पोलीस शिपायांची पदे भरण्याचा मार्ग मोकळा.
- पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ. आता महिन्याला १५ हजार रुपये मिळणार.

## विधि व न्याय

- १३८ विशेष जलदगती न्यायालयांकरिता ४१४ नियमित पदे निर्माण करणार. ४७ कोटी २५ लाख इतक्या वाढीव खर्चास मान्यता.
- माणगाव, रामटेक, इगतपुरी, बेलापूर, कर्जत, वाई, येवला, परांडा, सिन्नर, औसा येथे विविध जिल्हा तसेच दिवाणी न्यायालये स्थापन करून पदनिर्मिती करण्याचा निर्णय.
- २०२२-२३ मध्ये न्यायालयीन इमारतीच्या बांधकामांना ८४५.४३ रुपये कोटी इतका निधी. न्यायाधीश निवासस्थानांच्या बांधकामांना २५० कोटी रुपये इतका निधी.
- दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारित वेतन.
- निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित जागा उपलब्ध करून देण्यासाठी कायद्यात सुधारणा.

## बंदरे

- बंदरे विकास धोरण २०२३ ला मान्यता.
- येत्या काळात 'प्रधानमंत्री गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन' कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील बंदरांचा विकास अधिक वेगाने.
- वाढवण बंदरास केंद्राची मान्यता. महाराष्ट्र सागरी मंडळाचा २६ टक्के सहभाग - किंमत ७६ हजार २२० कोटी रुपये.
- सागरमाला योजनेत मुंबईत गेट वे ऑफ इंडियालगत रेडिओ क्लब सुसज्ज जेट्टीचे बांधकाम.
- भगवती बंदर, रत्नागिरी - ३०० कोटी रुपये, सागरी दुर्ग जंजिरा, रायगड - १११ कोटी रुपये, एलिफंटा, मुंबई - ८८ कोटी रुपये बंदर विकासाची कामे.
- मिरकरवाडा, रत्नागिरी बंदराचे आधुनिकीकरण - २,७०० मच्छीमारांना फायदा.

## पर्यावरण व वातावरणीय बदल

- २० हजार ग्रामपंचायतीत सौरऊर्जा प्रकल्प.
- भुसावळ येथे ५०० किलोवॅटचा हरित हायड्रोजन प्रकल्प, सौरऊर्जेचा वापर करणार.
- जायकवाडी नाथसागर जलाशयात तरंगत्या सौरऊर्जा पॅनेलद्वारे वीजनिर्मिती.
- शैवाळ शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अभ्यासगट.
- हरित हायड्रोजन, हरित अमोनिया, सौर, पवन ऊर्जा क्षेत्रात ७५ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित.
- एसटी महामंडळात ५,१५० इलेक्ट्रिक बसेस. डिझेलवरील ५,००० बसेस द्रवरूप नैसर्गिक वायू इंधनावर परावर्तित करणार.





- १५ वर्ष जुनी शासकीय वाहने निष्कासित करणार. निष्कासित केल्यास नवीन वाहन खरेदीसाठी कर सवलत.
- नागपूर, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी आणि नाशिकमध्ये सर्क्युलर इकॉनॉमी पार्कची निर्मिती करणार. ग्रीन बॉण्डच्या माध्यमातून सन २०२४ पर्यंत ५ हजार कोटींचा निधी उभारणार.

वरिष्ठ सहायक संचालक (नवमाध्यम शाखा)

मुख्यमंत्री

# माझी लाडकी बहीण



योजना

**महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद, मंचासमोरील रांगोळीत साकारण्यात आलेली बहीण-भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेली भव्य राखी आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा, अशा उत्साहपूर्ण वातावरणात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.**

# वचनपूर्ती सोहळा...

**डॉ. किरण मोघे**

पुणे जिल्ह्यातून आलेल्या भगिनींनी गीत-संगीताच्या साथीने रक्षाबंधनाच्या दोन दिवसांपूर्वीच आनंद आणि चैतन्यदायी वातावरणात सण साजरा केला.

## महिलांसाठी सणच...

या कार्यक्रमासाठी एखाद्या सणाप्रमाणेच महिला भगिनी तयार होऊन आल्या होत्या. कार्यक्रमस्थळाकडे येताना आपल्या लाडक्या भावांचे छायाचित्र असलेल्या फलकाजवळ उभे राहून आवर्जून सेल्फीदेखील घेत होत्या. बँकेत तीन हजार रुपये जमा झाल्याचा संदेश कौतुकाने मैत्रिणींना दाखवत होत्या. झालेला आनंद जणू त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. क्रीडानगरीचा भव्य आणि सुंदर परिसरही त्या कौतुकमिश्रित कुतूहलाने न्याहाळत होत्या. सर्वत्र महिलांचे आनंदी आणि उत्साही चेहरे दिसत होते. संपूर्ण परिसर छानपैकी सजवण्यात आल्याने या कार्यक्रमाला आनंदसोहळ्याचे स्वरूप आले होते.

जिल्हा प्रशासनाने महिलांना कार्यक्रमस्थळी आणण्याची आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा केल्या. श्री शिवछत्रपती क्रीडानगरीतील बॅडमिंटन सभागृहात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. इतर काही सभागृहातही महिलांना मोठ्या स्क्रिनवर कार्यक्रम पाहण्याची सोय करण्यात आली. या सर्व ठिकाणी महिलांच्या मधोमध रॅम्पची व्यवस्था करण्यात आली होती. या रॅम्पवरून चालत मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या लाडक्या बहिणींची भेट घेतली. त्यांच्या भेटीने उपस्थित महिलाभगिनी भारावल्या. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मिळालेली रक्षाबंधनाची ओवाळणी कायम स्मरणात राहणार असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. सांस्कृतिक कार्यक्रमाच्यावेळी त्यांनी केलेल्या जल्लोषाने त्यांना झालेला आनंद प्रकर्षाने दिसून आला.

## सांस्कृतिक कार्यक्रमांनी आणली बहार

लोकप्रिय गायक अवधूत गुप्ते, स्वप्नील बांदोडकर, वैशाली सामंत, मुग्धा कराडे आदींनी सादर केलेल्या एकाहून एक सरस गीतांनी कार्यक्रमात बहार आणली. उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात, आपल्या जागी उत्स्फूर्त नृत्य करत या गीतांना आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना दाद दिली. वैशाली सामंत यांनी 'कार्यक्रमाला आलेल्या महिला खऱ्या अर्थाने आपल्या माहेरी आलेल्या माहेरवाशिणीसारख्या दिसत आहेत' ही व्यक्त केलेली भावना संपूर्ण वातावरण जणू डोळ्यासमोर उभे करणारी आहे. अभिनेता अभिजित खांडकेकर आणि अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांनी खुसखुशीत शैलीत केलेल्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाची रंगत वाढली.

देखणे आणि नेटके आयोजन असलेल्या या कार्यक्रमाचा शुभारंभही तेवढाच दिमाखदार झाला. सभागृहाच्या मध्यभागी येऊन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी कळ दाबताच संपूर्ण सभागृह रंगीत पताकांची वृष्टी आणि आकर्षक आतिषबाजीने भरून गेले. हा कार्यक्रमातील आनंदलहरींचा परमोच्च बिंदू ठरला. टाळ्यांच्या कडकडाटात संपूर्ण सभागृह दणाणले.



## महिलांच्या जीवनात सुखाचे दिवस आणणे हीच इच्छा

महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी



लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा आहेर मिळणार आहे, हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भावपूर्ण उद्‌गार शासनाचा योजनेमागचा प्रामाणिक हेतू स्पष्ट करणारे आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील विविध योजनांच्या माध्यमातून महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवण्याची ग्वाही दिली, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरिता योजना केल्याचे सांगितले.

## आईचे नाव लावलेली अभिनव निमंत्रणपत्रिका

कार्यक्रमाएवढीच कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिकाही अभिनव आणि देखणी ठरली. तीन दशकांच्या महिला धोरणाच्या इतिहासात या कार्यक्रमाच्या कार्यक्रमपत्रिकेत मान्यवरांच्या नावापुढे आईचे नाव लावल्याबद्दल समाधानाची भावना विधान परिषदेच्या उपसभापती



डॉ. निलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली. योजनेद्वारे २ कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचे महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे आणि जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या नेतृत्वात जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जिल्हा परिषद आदी विभागांनी अतिशय नेटके नियोजन केल्यामुळेच हा सोहळा दिमाखदार झाला.

## सण झाला गोड; महिला भगिनींच्या प्रतिक्रिया

शासनाने सांगितल्याप्रमाणे रक्षाबंधनापूर्वी योजनेतील रक्कम जमा झाल्याने महिलांच्या मनात निर्माण झालेली शासनाविषयीची विश्वासाची भावनाही कार्यक्रमात दिसून आली. आताप्रमाणे दर महिन्यात रक्कम जमा होईल याची खात्री आहे, अशा प्रतिक्रिया महिलांनी दिल्या. पिंपरीच्या संगीता विलास वाकोडे यांनी मुख्यमंत्र्यांनी रक्षाबंधन सण गोड केला, अशा शब्दांत उत्स्फूर्तपणे आपल्या भावना व्यक्त केल्या. कुटुंबातील आमची भूमिका मजबूत करण्यासाठी शासनाने महिलांना दिलेला हा आधार खूप मोलाचा आहे असेही महिलांनी सांगितले.

नांदगावच्या मनीषा भालेकर यांना स्वतःसाठीही काही खर्च करता येईल याचा आनंद होता, तर दर महिन्याला हक्काचे पैसे मिळणार असल्याने आमच्या संसाराला आधार झाल्याचे पेरणेगावच्या निर्मला वाळके यांनी सांगितले. रक्षाबंधनाला मुलांसाठी गिफ्ट घेता येणार याचा आनंद त्यांना होता.

रोहिणी गोणे यांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्याला भाऊ मिळाल्याचा आनंद साश्रूनयनांनी व्यक्त केला. शिवरीच्या मनीषा सावंत यांनीही योजनेमुळे मुख्यमंत्र्यांची बहीण झाल्याचा आनंद व्यक्त केला. रकमेचा उपयोग मुलांच्या शिक्षणासाठी करणार असल्याचे जांभेगावच्या रेश्मा मोहमद शेख यांनी सांगितले. जारकरवाडीच्या ममताबाई जारकड व रत्नाबाई भोजने या शेतात काम करणाऱ्या महिलांनी आदिवासी भागापर्यंत ही योजना पोहोचल्याचा आनंद व्यक्त केला.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'बाबत अशा अनेक चांगल्या प्रतिक्रिया कार्यक्रमाला आलेल्या महिलांनी व्यक्त केल्या. शासनाची ही भेट त्यांच्यासाठी अमूल्य असल्याचे दिसून आले आणि त्यामुळेच शासनाला त्यांनी धन्यवादही दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बहिणींसाठी योजना सुरू करण्याचे दिलेले वचन या सोहळ्याच्या निमित्ताने पूर्ण झाल्याने हा सोहळा खऱ्या अर्थाने वचनपूर्ती सोहळा ठरला.

**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस राज्यातून उदंड प्रतिसाद लाभला. या योजनेचा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील सर्व महिला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त करत आहेत. राज्यातील महिलांच्या काही निवडक प्रतिक्रिया...**

# आनंद, अश्रू आणि आभार...

## पुणे

### क्रांतिकारी योजना



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चे तीन हजार रुपये माझ्या खात्यावर जमा झाले आहेत. मला मिळालेल्या तीन हजार रुपयांचा लाभ माझ्या कुटुंबासाठी आणि माझ्या मुलीच्या भवितव्यासाठी व उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी निश्चित होणार आहे. माझ्यासारख्या लाखो महिलांच्या जीवनात परिवर्तन घडवून त्यांच्या अंगी आत्मविश्वास निर्माण करण्याकरिता एक क्रांतिकारी योजना ठरत आहे. योजनेबद्दल राज्य शासनाची मन:पूर्वक आभारी आहे.

**- ज्योती कुलकर्णी, म्हाळुंगे, पुणे**

### आत्मविश्वास वाढला

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिला वर्गात आत्मविश्वास निर्माण झाला आहे. कुटुंबाचे आरोग्य, मुलांचे शिक्षण; तसेच दैनंदिन आवश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी या पैशांचा उपयोग होत आहे. मुख्यमंत्री हे आमचे लाडके भाऊ असून त्यांनी आमच्यासारख्या बहिणींना रक्षाबंधनापूर्वी वचन दिले होते, त्याची पूर्तता केली आहे. सख्ख्या भावाप्रमाणे आमचे सरकार काळजी घेत आहे, यामुळे आमचा आत्मविश्वास वाढत आहे.

**- कविता सवंगडे, पाषाण, पुणे**

### पैसे मागावे लागणार नाहीत...



महिलांना संसाराचा गाडा हाकताना त्यांच्याकडे पैसे राहत नाहीत. आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दर महिन्याला पंधराशे रुपये मिळणार असल्याने महिला खूप खूश आहेत. मलाही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये मिळाले. त्यामुळे मी खूप खूश आहे. आता माहेरी जायलादेखील नवऱ्याकडे पैसे मागावे लागण्याची गरज राहिली नाही. मुलांना शाळेत जाण्यासाठी बसचे पैसे मागावे लागणार नाहीत. शासनाने लाडकी बहीण योजनेच्या रक्कम वितरणाचा कार्यक्रम छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे घेतला. तेथे आम्हाला पहिल्यांदाच मनाप्रमाणे व्यक्त होता आले.

**- मंगल ज्ञानेश्वर वाडकर, गवळीनगर, भोसरी, पुणे**

### आनंदाचा क्षण



सर्वसामान्य महिलांना रोजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पैसे नसतात. ते आम्हाला शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून उपलब्ध करून दिले. ज्या दिवशी मी छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे या योजनेच्या लाभ वितरण कार्यक्रमाला जात होते, त्याच क्षणी मला माझ्या बँक खात्यावर या योजनेचे पैसे जमा झाल्याचा एस.एम.एस. आला. हा मेसेज पाहून मला खूप आनंद झाला. मी सर्वांना तो दाखवत होते. इतर महिलांनी मला विचारल्यावर तुम्हालाही लवकरच योजनेचे पैसे येतील, असे त्यांना सांगितले. मला तीन मुली असून या पैशातून मी माझ्या मुलींसाठी आवश्यक गोष्टी घेऊ शकते, त्यांची हौस पूर्ण करू शकते, याचा खूप आनंद आहे!

**- अश्विनी संभाजी चौधरी, भोसरी, पुणे**

## सातारा

### आर्थिक स्थिरता



मी सर्वसामान्य कुटुंबातून आलेली महिला आहे. शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली. मी या योजनेचा अर्ज भरला. ऑगस्ट महिन्यात माझ्या खात्यावर तीन हजार रुपये जमा झाले. याचा आनंद मी शब्दात मांडू शकत नाही. यापुढे मला कोणाकडेही हात पसरण्याची गरज नाही. कोणाला एकही रुपया न मागता आता हे पैसे माझ्या कुटुंबासाठी व स्वत:साठी खर्च करणार आहे. या योजनेमुळे मला आर्थिक स्थिरता मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील गरजू महिलांचा विचार करून ही योजना सुरू केली आहे. यामुळे अनेक महिलांचे पैशांबाबतचे प्रश्न सुटणार आहेत. याबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे आमचे हक्काचे भाऊ आमच्या मदतीला धावून आले, यांचे खूप खूप आभार मानते.

**- आरती विजय वाघमारे, पिरवाडी, सातारा**

### आर्थिक बळ

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अत्यंत चांगली योजना आहे. यामुळे महाराष्ट्रातील गरीब व गरजू, कष्टकरी महिलांच्या

संसाराला मोलाची मदत होणार आहे. माझ्या बँक खात्यावर १५ ऑगस्ट रोजी जुलै व ऑगस्ट महिन्याचे १,५०० रुपयेप्रमाणे तीन हजार रुपये मिळाले आहेत. ही रक्कम माझ्या मुलांच्या शिक्षणासाठी, माझ्या आरोग्यासाठी उपयोगी येणार आहेत. आतापर्यंत आमचा फारसा कोणीही विचार केला नाही, परंतु पहिल्यांदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील बहिणींचा विचार करून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली. यामुळे महिला खूप आनंदी व खूश आहेत. या योजनेमुळे माझ्यासारख्यांना आर्थिक पाठबळ मिळाले आहे.

**- रूपाली विजय धुमाळ, रा. उतारे, ता. वाई, सातारा.**

## ठाणे

### कुटुंबाला हातभार लागणार...



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल मला माझ्या शेजारणीने सांगितले, त्यानंतर माझ्या शेजारणीने माझा फॉर्म मोबाइलवरून भरला. त्यांना आवश्यक असणारी कागदपत्र मी त्यांना दिली. आता महिन्याला १,५०० रुपये मिळत आहेत. त्यामुळे माझ्या घरचा खर्च भागवताना हातभार लागणार आहे. १४ ऑगस्ट २०२४ रोजी पैसे आले. खरंतर माझा विश्वासच बसत नव्हता. मोबाइलमध्ये मेसेज पाहिला आणि मला खूप आनंद झाला. ही योजना अशीच पुढे चालू राहावी जेणेकरून माझ्यासह अनेक गरजू कुटुंबांना हातभार लागेल.

**- राजेश्री हरिचंद्र मांजरेकर, ठाणे-दिवा (पूर्व)**

### माझे स्वप्न पूर्ण होणार



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' मला माझ्या मैत्रिणीकडून समजली. या योजनेचा अर्ज माझ्या मैत्रिणीने भरला. या योजनेचा अर्ज भरताना डोळ्यासमोर एकच होते की, अर्ज भरून तर बघू या. मिळाले तर मिळाले पैसे, म्हणून अर्ज भरला. असे वाटलेसुद्धा नव्हते की, आपल्याला खरेच पैसे मिळतील. प्रयत्न करायला काय हरकत आहे. या योजनेचे पैसे माझ्या बँक खात्यामध्ये १४ ऑगस्ट २०२४ रोजी जमा झाले. माझ्या बँक खात्यात पैसे आल्यावर माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. मला शिवणकाम करण्याची आवड आहे. पण माझ्याकडे शिलाई मशिन नाही. खूप दिवसांपासून माझे स्वप्न आहे की, आपण कपडे शिवून कुटुंबाला हातभार लावावा. हे स्वप्न आता पूर्ण होणार आहे.

**- निकिता अरुण मळेकर, लक्ष्मी नगर, ठाणे**

## हिंगोली

### अडचणीच्या काळात मोठी मदत



माझ्या कुटुंबांत चार जण सदस्य आहेत. माझे बारावीपर्यंतचे शिक्षण झाले आहे. मला शेती नसल्यामुळे माझ्या मुलांचे शिक्षण, घरगाडा चालवण्यासाठी मोलमजुरी करण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे माझे पती आडतीवर हमाली करतात. तर मी मोलमजुरी करून आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती वृत्तपत्र वाचून व टीव्हीच्या बातम्यांच्या माध्यमातून समजल्यानंतर मी तत्काळ अर्ज करण्याचा निर्धार करून ॲपमध्ये ऑनलाइन नोंदणी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन महिन्यांचे तीन हजार रुपये खात्यावर नुकतेच जमा झाले आहेत. खात्यावर पैसे जमा झाल्याचा मनाला खूप आनंद झाला आहे. बुडत्याला काडीचा आधार या म्हणीप्रमाणे मला योजनेमुळे माझ्या कुटुंबाच्या अडचणी सोडवण्यासाठी मदत झाली आहे.

**- शीतल शिलाजीत डोईबळे, मु. कारवाडी, ता.जि. हिंगोली**

### लाखमोलाची मदत



माझे पती बांधकाम क्षेत्रात मजूर म्हणून काम करतात. तर मी बचतगटाकडून ५० हजार रुपये कर्ज घेऊन छोटेसे कटलरीचे दुकान टाकून व्यवसाय करत आहे. आम्हा दोघांच्या उत्पन्नातून आमच्या कुटुंबाचा जेमतेम उदरनिर्वाह चालवतो. माझा मुलगा ११ वीमध्ये शिक्षण घेत आहे, तर मुलगी सातव्या वर्गात शिकत आहे. मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती मिळाल्यानंतर मी तत्काळ अर्ज करण्याचा निर्धार करून ॲपमध्ये ऑनलाइन नोंदणी केली. या योजनेचे दोन महिन्यांचे तीन हजार रुपये खात्यावर नुकतेच जमा झाले आहेत. खात्यावर पैसे जमा झाल्याचा मला खूप आनंद झाला आहे. मला या योजनेमुळे माझ्या कुटुंबाच्या अडचणी सोडवण्यासाठी मदत झाली आहे. ही मदत मुलाच्या शिक्षण आणि माझ्या संसारासाठी लाखमोलाची आहे. त्यामुळे मी या रकमेतून मुलाचे शिक्षण, बचतगटाचे कर्ज फेडण्यासाठी तसेच माझ्या घरगुती गरजा भागवणार आहे.

**- शालिनी राहूल अंभोरे, मु. कारवाडी, ता.जि. हिंगोली**

## नांदेड

### मदतीसाठी आभार

दीड हजार रुपये ही रक्कम कोणासाठी फार क्षुल्लक असू शकते. काहींना पैशातून खरेदी करण्याचा मोह होऊ शकतो. माझी



परिस्थिती मात्र जगावेगळी आहे. घरामध्ये दिव्यांग पती असल्यामुळे मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून मिळालेल्या दीड हजार रुपयांचे फार महत्त्व आहे. मी यासाठी मुख्यमंत्र्यांचे मनापासून आभार मानते. यामुळे मला कुटुंबाच्या रोजच्या गरजा भागवणे शक्य झाले आहे. दिव्यांग पती आणि कुटुंबाची जबाबदारी असताना ही मदत माझ्यासाठी खूप मोलाची आहे. माझी एकच विनंती आहे की, माझ्यासारख्या अशा असंख्य असाहाय्य महिलांना जगण्याची उमेद देणारी ही योजना यापुढेही सुरू ठेवावी. मुख्यमंत्र्यांनी माझ्या या आवाहनाची नोंद घ्यावी.

**- परवीन सुलताना, नांदेड**

### बचतगटाच्या अर्थकारणाला उभारी



एखाद्या निर्णयामुळे एखादी यंत्रणा आणखी बळकट होते. याचा प्रत्यय आम्हाला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून आला आहे. मी समृद्धी महिला बचतगटाची अध्यक्ष आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही योजना सुरू केल्यानंतर मी स्वतः सर्व महिलांचे अर्ज भरून घेतले. माझ्या गटातील सर्व महिलांच्या खात्यामध्ये तीन हजार रुपये आले आहेत. बचतगटामार्फत आम्ही काम करत असल्यामुळे आम्हाला या पैशांची किंमत आहे. या पैशांचा उपयोग बचत गटांच्या पुंजीला बळकटी आणण्यासाठी निश्चित होणार आहे.

**- दैवशाला धनराज जोगदंड, तरोडा खुर्द नांदेड**

## धाराशिव

### आर्थिक सक्षमता



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू झाल्याची माहिती अंगणवाडी सेविकेकडून मिळाली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे योजनेसाठी लागणारी सर्व कागदपत्रे जमा करून नारीशक्ती ॲपवर ऑनलाइन अर्ज दाखल केले. काही दिवसानंतर अर्ज पात्र ठरल्याचा संदेश त्यांच्या भ्रमणध्वनीवर आला. देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. मात्र खऱ्या अर्थाने स्त्रीला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून १४ ऑगस्ट रोजी लाभाचे ३ हजार रुपये आधारसंलग्न केलेल्या खात्यावर जमा झाल्याने आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. यामुळे योजनेबाबतचा विश्वास आणखीनच दृढ झाला. तसेच १४ ऑगस्टची ती सकाळ माझ्यासाठी आर्थिक सक्षमतेकडे जाणारी ठरली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे आता मला आर्थिक गरजेसाठी कोणावर अवलंबून राहावे लागणार नाही.

**- सौ.संघमित्रा दत्तात्रय अंकुशराव,**
**मु.पो.बामणी, ता.जि.धाराशिव**

### आर्थिक गरजा पूर्ण



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही संसारासाठी संजीवनी ठरली आहे. माझे पती सोलापूरच्या आडतीमध्ये मजुरी करतात. त्यांच्या एकट्यावर माझ्या कुटुंबाचा खर्च सुरू होता. त्यातच माझ्या पतीस कधी काम मिळते, तर कधी मिळत नाही. यामुळे दैनंदिन खर्च करताना आर्थिक अडचणी निर्माण होत होत्या. त्यातच दोन मुलांचा शैक्षणिक खर्च भागवणेही कठीण होते, परंतु १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा दोन महिन्यांचा ३ हजार रुपयांचा लाभ माझ्या खात्यावर जमा झाल्याने घर खर्च भागवण्यास मदत झाली आहे.

**- कोमल किरण गायकवाड,**
**आरळी, बु.ता.तुळजापूर, जि.धाराशिव**

### खांद्यावरचा भार कमी झाल्याचे समाधान



महिलांना आजपर्यंत आर्थिक निर्णय घेताना डावलले गेले आहे. मात्र, राज्य सरकारने हीच बाब ओळखून थेट महिलांना लाभ देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली असावी. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा दोन महिन्यांचा तीन हजार रुपयांचा लाभ माझ्या खात्यात जमा झाला आहे. या योजनेच्या लाभामुळे माझ्या कुटुंबास मोठा आधार मिळाला आहे. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी माझ्या खांद्यावर होती. कुटुंबाचा भार सांभाळताना प्रचंड आर्थिक ओढाताण होत असे. मात्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाल्याने खांद्यावरचा भार कमी झाला आहे. याचे मला समाधान आहे. तसेच या योजनेसाठी सरकारचे मनापासून आभार मानते.

**- अलका प्रकाश मगर, शिंगोली, ता.जि.धाराशिव**

## लातूर

### मुलाबाळांच्या शिक्षणाला मदत

मी गेली २० वर्षे झाली धुणीभांडी करते. दिवसाला १० ते १५ घरी जाऊन धुणीभांडी करावी लागतात. पती, तीन मुली आणि एक मुलगा आणि मी असे सहा जणांचे आमचे कुटुंब आहे. पतीही गवंड्याच्या हाताखाली मजुरी करतात. महिन्याला जेमतेम १२ ते १५ हजार रुपये घरात येतात. हलाखीची परिस्थिती असूनही दोन मुलींना दहावी-बारावीपर्यंतचे शिक्षण देऊन त्यांची लग्न लावून दिली. आता एक मुलगी अकरावीमध्ये शिकते आणि मुलगा आठवीमध्ये शिकतो. पैशांची अडचण असल्याने दोघांच्याही शाळेची यावर्षीची फी अजून भरली नव्हती. १५ ऑगस्ट रोजी मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून तीन हजार रुपये मिळाले.

या पैशातून मी माझ्या मुलांच्या शाळेची फी भरली आहे. आमच्यासारख्या हातावर पोट असलेल्या कुटुंबांसाठी ही योजना खूप फायद्याची आहे. यामुळे आमच्या संसाराला, मुलाबाळांच्या शिक्षणाला मदत होईल.

**- शेवंता मल्लिकार्जुन काटवटे, आनंद नगर, लातूर**

### मोठा आधार

आमच्या कुटुंबाची कोळपा तांडा येथे दोन एकर जमीन आहे. यामधून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे शक्य होत नसल्याने माझे पती शेळ्या चारण्याचे काम करतात. मीसुद्धा गंजगोलाई येथे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करते. माझा मोठा मुलगा ऊसतोड कामगार म्हणून काम करतो, तर लहान मुलाचे शिक्षण सुरू आहे. अशा परिस्थितीत मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला असून, माझ्या कुटुंबासाठी या रकमेमुळे फार मोठा आधार मिळणार आहे. दर महिन्याला मिळणारी ही रक्कम बचत करून माझ्या मुलाच्या शिक्षणासाठी वापरणार आहे.

**- यशोदा गोपीनाथ चव्हाण, कोळपा तांडा, लातूर**

### चिंता दूर झाली

माझा घरगुती पापड तयार करण्याचा व्यवसाय आहे. या व्यवसायातून माझ्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याचा माझा प्रयत्न असतो. या व्यवसायासाठी लागणारी मशीन आणि इतर कच्चा माल घेण्यासाठी मला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून मिळणाऱ्या पैशांमुळे माझी ही चिंता दूर झाली आहे. पापड व्यवसायासाठी लागणारी मशीन आणि इतर कच्चा माल विकत घेण्यासाठी मला आता कोणाकडे पैसे मागण्याची गरज नाही. हा व्यवसाय वाढवून इतर महिलांनाही रोजगार देण्यासाठी मी आता प्रयत्न करणार आहे.

**- संगीता सातप्पा शिंदे, साळे गल्ली, लातूर**

## छत्रपती संभाजीनगर

### शासनाच्या योजनेवर विश्वास



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'चा मला लाभ मिळाला असून माझ्या बँक खात्यात १५ ऑगस्ट रोजी तीन हजार रुपये जमा झाले. कधी अस वाटले नव्हते की, आमच्यासारख्या बहिणींसाठी शासन अशी योजना राबवेल. या योजनेतून आम्हाला रक्षाबंधनाच्या आधीच भेट मिळाली. आतापर्यंत सख्ख्या भावानेदेखील एक हजाराच्या वर पैसे दिले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी रक्षाबंधनाच्या आधीच तीन हजार रुपये खात्यात पाठवले. याबद्दल मी त्यांचे खूप आभार मानते. त्यांनी जो शब्द दिला तो पाळला आहे. माझ्या खात्यात पैसे आल्याचे पाहून शासनाच्या योजनेवर विश्वास बसला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून मिळालेल्या पैश्यातून घरखर्च, औषधी किंवा मुलांच्या शिक्षणासाठी याचा उपयोग होणार आहे. आम्हा महिलांना हा मदतीचा मोठा आधार झाला आहे.

**- ज्योती अण्णा रोठे, बडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर**

### महिलांच्या सन्मानासाठी मदत



मी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अर्ज केला होता तो मंजूर झाला. यामुळे माझ्या खात्यात तीन हजार रुपये जमा झाले आहेत. यामुळे मला खूप आनंद झाला आहे. माझ्या भागात राहणाऱ्या इतर महिलांनाही पैसे मिळाले आहेत. त्यामुळे त्यांनाही खूप आनंद झाला आहे. या पैशातून आम्हाला घर खर्चासाठी एक मोठी रक्कम मिळाली. महिलांच्या सन्मानासाठी ही शासनाने दिलेली मदत मोलाची आहे. यातून आम्हा महिलांना ज्या गोष्टीसाठी पैसे लागतात त्यावर त्या खर्च करू शकतात. हा हक्काचा पैसा आम्हाला मिळाला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली, याबद्दल मी महाराष्ट्र शासनाची आभारी आहे.

**- आलिया सुलताना, छत्रपती संभाजीनगर**

## गडचिरोली

### मुख्यमंत्री साहेब, खूप ऋणी आहे...



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू झाल्यानंतर त्याची माहिती मला मिळाली आणि या योजनेकरिता ६ जुलै रोजी ऑनलाइन फॉर्म भरला. १४ ऑगस्ट रोजी माझ्या बँक खात्यात तीन हजार रुपये जमा झाल्याचा मोबाइलवर मेसेज आला, तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा झाला. इतर महिलांना सांगितल्यानंतर त्यांचाही विश्वास वाढला की, ही योजना खरंच अमलात आली आहे आणि या योजनेचे पैसे आपल्याला अवश्य मिळणार आहेत. धन्यवाद मुख्यमंत्री साहेब, मी तुमची खूप ऋणी आहे. माझ्या आर्थिक परिस्थितीसाठी, घरगुती कामासाठी, मुलाच्या शिक्षणासाठी हे पैसे उपयोगी ठरतील.

**- पुनम श्रीनाथ लाडे, गडचिरोली**

### मुलाच्या प्रशिक्षणासाठी खर्च

सर्वप्रथम मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती आम्हाला अंगणवाडीच्या ताईंनी दिली. योजना जाहीर झाल्यावर त्यांनी गावात सभा घेऊन योजनेच्या लाभासाठी काय कागदपत्रे



लागतात त्याची माहिती दिली आणि आमच्याकडून फॉर्म भरून घेतला. मोबाइलवर फॉर्म भरला मात्र तो यशस्वी झाल्याचे दिसले नाही, असे ताईंनी सांगितले. त्यामुळे योजनेचे पैसे मिळणार नाही, असे वाटून आशा सोडली आणि परत दुसऱ्या टप्प्यात फार्म भरू असा विचार केला; पण माझ्या बँक खात्यामध्ये पैसे जमा झाले आणि मला खूप-खूप आनंद झाला. मला लाडकी बहीण योजनेचे मुख्यमंत्र्यांकडून पैसे मिळाले ही गोष्ट मी इतर महिलांनाही सांगितली. घरच्यांनाही खूप आनंद झाला. माझ्या मुलाची क्रिकेटमध्ये निवड झाली आहे. त्याच्या प्रशिक्षणाचा खर्च मी याच पैशातून केला. माझ्या मुलाला खेळाडू बनवण्यासाठी त्याच्या प्रशिक्षणासाठी हे पैसे कामात आले, याबद्दल मी मुख्यमंत्री साहेबांना धन्यवाद देते.

**- रूपाली नेताजी चौधरी, मु. चिंगली, पो. मोहली, ता. धानोरा, जि. गडचिरोली**

## नागपूर

### नव्या व्यवसायाचे बीजभांडवल !



घरातल्या कामासमवेत पतीला आर्थिक हातभार लावावा यासाठी माझी तळमळ सुरू होती. रोज हातावर असलेल्या संसाराला मार्ग दिसत नव्हता. बचतगटामार्फत व्यवसायाची चाचपणी मी सुरू केली होती. व्यवसायासाठी लागणारी छोटीशी गुंतवणूक हा प्रश्न मला भेडसावत होता. अशा स्थितीत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' याविषयी मला माहिती मिळाली. पंचायत समिती अंतर्गत अंगणवाडी पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविकामार्फत मी ऑनलाइन फॉर्म भरला. स्वातंत्र्यदिनी मोबाइलवर तीन हजार रुपये जमा झाल्याचा संदेश मला मिळाला. सुरुवातीला माझा विश्वास बसला नाही. दुसऱ्या दिवशी खातरजमा केल्यानंतर हे पैसे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे मिळाल्याचे स्पष्ट झाले. एक भाऊ म्हणून शासन आम्हा बहिणींची काळजी घेत आहे. माझ्यासारख्या असंख्य गरजू स्त्रियांनी पहिल्या हप्त्यातील हे तीन हजार रुपये नव्या व्यवसायाला सुरुवात करण्यासाठी लाख मोलाचे आहेत.

**- पूजा श्याम झरोंदे, कामठी, नागपूर**

### औषधोपचारासाठी विश्वास



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून माझ्यासह अनेक भगिनींना हक्काच्या आधारासह आर्थिक बळ मिळाले आहे. वाढत्या वयात विविध व्याधींनी त्रस्त असल्यामुळे सतत दवाखान्याचा खर्च असतो. त्यासाठी मुलावर अवलंबून राहावे लागते. आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभामुळे या पैशाच्या माध्यमातून स्वतःचे उपचार घेता येईल, अशा विश्वास मला आहे. यामुळे मी शासनाचे आभार मानते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमधून माझ्या बँक खात्यात १५ ऑगस्टपूर्वीच रक्कम जमा झाली, त्याबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभारी आहे. ही योजना सुरू करून मुख्यमंत्री साहेबांनी आम्हा सर्व महिलांना आधार दिला आहे.

**- अत्रीबाई हिवनाती, मु. चिचोली पो. पिपला, जि. नागपूर**

## परभणी

### शिक्षणासाठी लाखमोलाची मदत



माझ्या कुटुंबात चार सदस्य आहेत. पती शेती करतात. तसेच जोडधंदा म्हणून दुधाचा व्यवसाय आहे. या कामात मी त्यांना मदत करते. घरची परिस्थिती जेमतेम आहे. मुलगा नीट परीक्षेची तयारी करीत आहे. तर मुलगी अकरावीच्या वर्गात शिकत आहे. गावातील लोकांकडून मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची माहिती मिळाल्यानंतर मी अंगणवाडी ताईंशी संपर्क केला. त्यांनी मला अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन केले. या योजनेचे तीन हजार रुपये माझ्या बँक खात्यावर जमा झाल्यानंतर मला खूप आनंद वाटला. सुरुवातीला मला विश्वासच बसला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचे मी खूप आभारी आहे. राखी पौर्णिमेची त्यांनी आम्हाला दिलेली खूप छान भेट आहे. माझ्या संसारासाठी त्यांनी लावलेला हातभार लाखमोलाचा आहे. घरसंसार आणि मुलांच्या शिक्षणासाठी या पैशाचा मी उपयोग करणार आहे. मुख्यमंत्री साहेबांनी ही योजना कायम सुरू ठेवावी.

**- सीमा गजानन गव्हाळे, मु.पो. खांबेगाव, ता. पूर्णा, जि. परभणी.**

### मुख्यमंत्री साहेबांचे खूप आभार!



माझे छोटे कुटुंब आहे. एक मुलगी व दोन मुले शाळेत शिक्षण घेत आहेत. आम्ही दोघ पती-पत्नी दुकानामध्ये कामाला आहोत. आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. अंगणवाडी ताईंकडून मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती मिळाली. कागदपत्रांची जुळवाजुळव केल्यानंतर अर्ज भरला. कामातून सुट्टी घेतल्यानंतर त्यादिवसांचे पैसे बुडतात म्हणून अंगणवाडीताईंच्या मदतीनेच वेळ मिळेल तसा अर्ज दाखल केला. ज्यावेळी माझ्या खात्यावर तीन हजार रुपये जमा झाले, त्यावेळी आमच्या घरातील सर्वांनाच खूप आनंद झाला. त्या दिवशी घरामध्ये अक्षरशः सणासारखेच वातावरण होते. मुख्यमंत्री साहेब अशी काही आपल्याला भेट

देतील याचा स्वप्नातसुद्धा विचार केला नव्हता. मी साहेबांचे खूप आभारी आहे. त्यांनी बहिणीला दिलेली एवढी मोठी भेट आमच्यासाठी खूप मोलाची आहे. मुलांच्या शिक्षणासाठी मी या पैशाचा उपयोग करणार आहे. मिळेल ते काम कष्टाने करणाऱ्या आमच्यासारख्या माणसांना शासनाने दिलेला हा हातभार खूप मोलाचा आहे.

**- नागर महादेव सोनवणे,**
**रा. ब्राम्हणगाव, ता.जि. परभणी**

## धुळे

### 'लाडकी बहीण' अशी ओळख

मला राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती अंगणवाडी ताईकडून मिळाली. या योजनेसाठी ऑनलाइन फॉर्म भरला होता. माझ्या अर्जाची छाननी झाल्यानंतर मी या योजनेसाठी पात्र ठरल्याचे मला कळाले. माझ्या बँक खात्यात १४ ऑगस्ट रोजीच माहे जुलै व ऑगस्ट या दोन महिन्याचे प्रत्येकी १५०० याप्रमाणे तीन हजार रुपये जमा झाल्याचा संदेश माझ्या मोबाइलवर आला. याचा मला खूप आनंद झाला. या योजनेचे मिळालेले हे पैसे माझ्यासाठी खूप लाख मोलाचे असून हे पैसे मी दैनंदिन खर्च आणि औषधोपचारासाठी खर्च करणार आहे. तसेच या योजनेच्या माध्यमातून मला मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण ही नवीन ओळख मिळाल्याने खूप समाधान वाटत आहे.

**- रूपाली प्रकाश वारे, रा. जुने धुळे, ता. जि. धुळे**

### मुलांच्या शिक्षणासाठी हातभार लागणार

राज्य शासनाने राज्यातील महिलांसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती मला अंगणवाडी सेविकेमार्फत; तसेच वृत्तपत्र, सोशल मीडियामार्फत मिळाली. त्यानुसार या योजनेचा लाभ मिळण्यासाठी मी अंगणवाडी सेविकेकडे अर्ज दाखल करून अर्जासोबत आवश्यक ते कागदपत्रे जोडली. मी या योजनेसाठी पात्र असल्याचा मला भ्रमणध्वनीवर संदेश आला. त्यानंतर माझ्या बचतखात्यावर दोन महिन्यांची तीन हजारांची रक्कम जमा झाली आहे. या रकमेतून माझ्या कुटुंबाला आर्थिक मदत होणार असून मुलांच्या शिक्षणासाठी हातभार लागणार आहे.

**- करिष्मा योगेश आपटे, रा. यशवंत नगर, ता. जि. धुळे**

### रक्षाबंधनापूर्वीच ओवाळणी

माझे पती हे सलून व्यवसाय करतात. शासनाने महिलांसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती मला अंगणवाडी सेविकेमार्फत मिळाली. त्यांनी या योजनेचा अर्ज भरण्यासाठी खूप सहकार्य करून या योजनेचा अर्ज भरून घेतला. या योजनेचे जुलै व ऑगस्ट महिन्याची एकत्रित रक्कम तीन हजार रुपये हे राज्य शासन १७ ऑगस्ट रोजी जमा करणार होते; परंतु गतिमान शासनाने ही रक्कम माझ्या खात्यात १४ तारखेला म्हणजेच रक्षाबंधनापूर्वी जमा केली. त्यामुळे आम्हा लाडक्या बहिणींना रक्षाबंधनापूर्वीच भेट मिळाल्याने ही भेट मला माझ्या जीवनात आयुष्यभर आठवणीत राहणार आहे.

**- चंद्रकला नरेंद्र जगताप, देवपूर, ता. जि. धुळे**

## सांगली

### अश्रूंची झाली फुले !



आम्ही दुसऱ्याच्या शेतामध्ये रोजंदारीवर जाऊन आमचा उदरनिर्वाह करतो. आमचे कुटुंब लहान असून मला दोन मुले आहेत. त्यापैकी मुलगा प्रज्वल हा इचलकरंजी येथील डी.के.टी. अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रिकलच्या तृतीय वर्षात, तर कन्या सानिका ही नुकतीच १२ वी पास होऊन मिरज महाविद्यालय मिरज येथे बीएसस्सीच्या प्रथम वर्षात शिकते आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरला होता. त्यानंतर १४ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या पर्वावर त्यांच्या कन्येच्या मोबाइलवर या योजनेंतर्गत तीन हजार रुपये जमा झाल्याचा संदेश आला. माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या. क्षणभर माझा स्वतःवरच विश्वास बसेना, परंतु ही बाब सत्य असल्याची माहिती अंगणवाडी सेविका जयश्री शिंदे यांनी सांगितली. यावेळी जणू त्यांच्या अश्रूंची फुले झाल्याचा भास त्यांना झाला. माझ्यासारख्या राज्यातील अनेक भगिनीचे आर्थिक दारिद्र्य दूर करण्याकरिता महाराष्ट्राच्या या कनवाळू भावाला (मुख्यमंत्री) उदंड आयुष्य मिळावे, यासाठी मी पांडुरंगाकडे साकडे घालते.

**- वैशाली शंकर कमलेकर, नरवाड, ता- मिरज, जि- सांगली**

### हमारी दुवाँए सीएम साहब के साथ है !



मी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात अंगणवाडी क्रमांक ११६ मध्ये अंगणवाडी सेविका म्हणून काम पाहते. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ' या योजनेसाठी मी पात्र ठरले आहे. या योजनेची मी लाभार्थी ठरल्याने मला खूप आनंद झाला आहे. भविष्यात मला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.एड करायचे असल्याने हे पैसे मला अत्यंत उपयुक्त ठरतील. रक्षाबंधनापूर्वीच माझ्या बँक खात्यात तीन हजार रुपये जमा झाले. ही योजना निरंतर सुरू राहावी, त्यामुळे खऱ्या अर्थाने महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत होऊ शकेल. मुख्यमंत्री महोदयांसाठी मी इतकंच म्हणेन, हमारी दुवाँए हमेशा आपके साथ रहेगी.

**- वाहिदा मुजावर, मल्लेवाडी, ता. मिरज, जि. सांगली**

## कोल्हापूर

### दुहेरी आनंद मिळाला



मला माझ्या मोबाइलवर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाल्याचा संदेश आला. कोल्हापुरी भाषेत सांगायाचे तर लयं भारी वाटतंय. कारण हे पैसे माझे स्वत:चे आहेत. या योजनेसाठी मुख्यमंत्री साहेबांची मी खूप आभारी आहे. योगायोगाने मी त्याच दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जिल्हाधिकारी कार्यालयातून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बोलले. त्यांच्याशी संवाद साधल्याचा आनंद वेगळाच. खूप भारी वाटतंय की, रक्षाबंधनची भेट मला दोन दिवस आधीच मिळाली.

**- सरिता कांबळे, इस्पुर्ली गाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर**

### समाजात बरोबरीचे स्थान



'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे आभार मानते. या योजनेचा मला लाभ मिळाला असून दरमहा मिळणारे १५०० रुपये आमच्या संसाराला उपयोगी पडणार आहेत. यामुळे आमच्या थोड्या फार तरी गरजा पूर्ण होऊन स्वखर्चासाठी या पैशांचा चांगला उपयोग आम्हा महिलांना होईल. अंगणवाडी कर्मचारी सर्व गावांमध्ये चांगल्या प्रकारे महिलांना मदत करून या योजनेत महिलांचा सहभाग वाढावा म्हणून प्रयत्न करत आहेत. आमच्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना शासनाने कुठे तरी दखल घेऊन समाजात बरोबरीचे स्थान देण्यासाठी या योजनेतून प्रयत्न केला आहे.

**- माया सारंग, कुर गाव, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर**

## सिंधुदुर्ग

### मान-सन्मान वाढला...



शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केल्याबद्दल आम्ही सर्व महिला शासनाच्या आभारी आहोत. या योजनेमुळे आम्हाला दर महिन्याला हक्काचे असे १,५०० रुपये मिळणार आहेत. आम्हाला संसारात हातभार लागणार आहे. या पैशातून आम्ही आमच्या काही प्रमाणात का असेना गरजा पूर्ण करू शकणार आहोत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे आम्ही आभारी आहोत. पुन्हा एकदा शासनाचे आभार आणि ही योजना कायम सुरू राहावी, अशी शासनाला विनंती आहे.

**- आर्या अनिल पेडणेकर, मालवण, जि. सिंधुदुर्ग**

### संसारास हातभार...



मी सर्वसामान्य घरातली महिला आहे. मला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेविषयी माहिती मिळाली; परंतु अर्ज कुठे आणि कसा करावा, याविषयी माहिती नव्हती. आमच्या गावातील अंगणवाडी ताईंनी नारीशक्ती ॲपबद्दल माहिती सांगितली. मग मी अर्ज भरला आणि या योजनेसाठी पात्र ठरले. १४ ऑगस्ट रोजी माझ्या खात्यात लाभाचे पैसे जमा झाले. हे पैसे माझ्या संसारासाठी खूप हातभार लावणारे ठरणार आहेत.

**- शोभा दिलीप घोगळे, रा. कुंभारमठ, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग**

## बीड

### माहेरचा आधार मिळाला



माझ्या पतीचे वर्षभरापूर्वी निधन झाले. सध्या जाऊबाईसोबत पोळ्या लाटण्याचे काम मी करत आहे. तेवढ्याने पुरेसे होत नाही. मला दोन मुले आहेत. मुलगा तेजस ११ वर्षांचा असून तो पाचवीत शिकत आहे. मुलगी समृद्धी चार वर्षांची आहे. संसाराचा गाडा आता एकटीनेच पुढे न्यायाचा आहे. या कठीण समयी राज्य शासनाची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेमुळे माहेरचा आधारच मिळाला असे वाटत आहे. माझ्या खात्यात जमा झालेले पैसे मी सध्या काढले नाहीत. मुलांच्या शिक्षणासाठी बँकेत जमा ठेवले आहेत. जेव्हा मुलांना जास्त गरज भासेल, त्यावेळी मी ते पैसे काढणार आहे.

**-चंद्रभागा कोकाटे, बीड**

### मोठा आधार लाभला



मी खासगी ठिकाणी सफाईचे काम करते. अगदी जुजबी पगारावर काम करावे लागते. माझे पती दोन वर्षांपूर्वी हृदयविकाराच्या धक्क्याने दगावले. दोन मुली आणि एक मुलगा आहे. मुलीचे लग्न झाले आहे. मुलगा गॅरेजमध्ये काम करतो. पतीच्या आजारपणात बरेच कर्ज झाले होते. ते भागवणे सुरूच आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चे पैसे खात्यात जमा झाल्यावर मोठा आधार मिळाला. लोकांचे खूप देणे आहे. आता थोडे देता येईल.

**-पूजा साबळे, बीड**

*संकलन - **जिल्हा माहिती कार्यालय, पुणे, सातारा, ठाणे, हिंगोली, नांदेड, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, गडचिरोली, नागपूर, परभणी, धुळे, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, बीड.***

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत जळगाव येथे प्राईम इंडस्ट्रियल पार्कच्या विस्तीर्ण जागेवर ८ लाख ६ हजार चौरस फुटावर १ लाख २० हजारांपेक्षा अधिक महिलांच्या उपस्थितीत संपन्न झालेले लखपती दीदी संमेलन म्हणजे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठीच्या नव्या पर्वाची सुरुवात... त्या संदर्भातील थोडक्यात आढावा..

# नवे पर्व : लखपती दीदी

**युवराज पाटील**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे जळगाव विमानतळावर उतरल्यानंतर विमानतळ परिसरातच देशभरातून आलेल्या प्रातिनिधिक ८० लखपती दीदी यांच्या सोबत संवाद होता, तिथे पोहोचले. या 'लखपती दीदी' संवाद कार्यक्रमात देशातील वेगवेगळ्या राज्यांतील बँक सखी, ड्रोन सखी, पशुपालक सखी, कृषी सखी म्हणून नावारूपाला येऊन लखपती झालेल्या महिला उपस्थित होत्या. प्रधानमंत्री प्रत्येक लखपती दीदीशी बोलले. त्यांच्या सहज संवादामुळे सुरुवातीला महिलांच्या मनावर असलेले दडपण कमी झाले आणि त्यानंतर प्रधानमंत्र्यांशी प्रत्येकीने मुक्तसंवाद साधला.

## लखपती दीदी संमेलन

सव्वा लाख दीदी उपस्थितीत असलेल्या संमेलनस्थळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व दीदींचे स्वागत स्वीकारण्यासाठी ओपन जीपमधून संमेलनस्थळी फिरले. यावेळी त्यांच्यासमवेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार होते. सर्व दीदींनी उत्स्फूर्तपणे सर्वांचे स्वागत केले.

## फिरता निधी आणि बँक कर्ज वितरित

विद्यमान सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात नुकतेच लखपती झालेल्या ११ लाख नवीन लखपती दीदींचा त्यांनी प्रमाणपत्रे देऊन सत्कार केला. तसेच ऑनलाइन प्रणालीद्वारे २,५०० कोटी रुपयांचा



फिरता निधी जारी केला, ज्यामुळे ४.३ लाख स्वयं-सहायता गटांच्या सुमारे ४८ लाख सदस्यांना फायदा झाला. यावेळी ५,००० कोटी रुपयांचे बँक कर्ज ऑनलाइन प्रणालीद्वारे वितरित केले. त्यामुळे २.३५ लाख बचतगटांच्या २५.८ लाख सदस्यांना फायदा होईल, असे सांगण्यात आले.

## नेपाळ दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेपाळमधील तनाहुन येथे बस दुर्घटनेत बळी पडलेल्या लोकांप्रति शोक व्यक्त केला. ज्यात जळगावमधील अनेकांना जीव गमवावा लागला. ही दुर्घटना घडताच अधिकाऱ्यांनी नेपाळला संपर्क साधला आणि केंद्रीय मंत्री रक्षाताई खडसे यांना नेपाळला पाठवण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

## महाराष्ट्र संस्कृतीचा केला गौरव

महाराष्ट्रातील माता-भगिनी राज्याच्या वैभवशाली संस्कृती आणि परंपरांचे दर्शन घडवतात, असे प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी अधोरेखित करून महाराष्ट्राच्या परंपरा केवळ भारतातच नव्हे तर जगभरात ओळखल्या जातात, नुकत्याच झालेल्या पोलंड दौऱ्यात त्यांनी महाराष्ट्राची संस्कृती पाहिल्याचा उल्लेख करत पोलंडच्या नागरिकांना महाराष्ट्रातील लोकांचा खूप आदर असल्याचे सांगितले. पोलंडच्या लोकांनी कोल्हापूरच्या लोकांचा सेवाभाव आणि आदरातिथ्याला समर्पित असलेल्या कोल्हापूर स्मारकाविषयी ते बोलले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी घालून दिलेल्या परंपरेचे पालन करून पोलंडमधील हजारो स्त्रिया आणि मुलांना कोल्हापूरच्या राजघराण्याने आश्रय दिला, तेव्हा दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडाचे स्मरण करून प्रधानमंत्री यांनी अशा शौर्याच्या गाथा सांगितल्याबद्दल अभिमान व्यक्त केला. अशाच मार्गाचा अवलंब करून राज्याचे नाव जगात उंच करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे आवाहन केले. यावेळी त्यांनी आपले जळगाव हे वारकरी परंपरेचे श्रद्धास्थान आहे. ही थोर संत मुक्ताईंची भूमी आहे. तिचे कर्तृत्व आणि तपश्चर्या आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले, आजपर्यंत बहिणाबाईंच्या कविता समाजाला रूढींच्या पलीकडे जाऊन विचार करायला भाग पाडतात. महाराष्ट्राच्या मातृशक्तीबद्दल अधिक विशद करताना श्री. मोदी म्हणाले की, माता जिजाबाईंनी छत्रपती शिवरायांच्या जीवनाला दिशा दिली, सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाला ताकत दिली.

## महिला सक्षमीकरण

आतापर्यंत बांधलेल्या ४ कोटी घरांपैकी बहुतांश घरांची नोंदणी महिलांच्या नावाने झाली आहे. आगामी काळात ३ कोटी घरे बांधली जात असतानाही त्यातील बहुतांश घरांची नोंदणी महिलांच्या नावावर केली जाईल, असे आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिले.

बँकिंग क्षेत्रात केलेल्या सुधारणांवर भर देताना प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, प्रधानमंत्री जन धन योजनेतही बहुतांश बँक खाती महिलांच्या नावाने उघडण्यात आली. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे सुमारे ७० टक्के लाभार्थी देशाच्या माता-भगिनी आहेत, हे त्यांनी आवर्जून सांगितले.

## महाराष्ट्र सरकारच्या कामाचे केले कौतुक

प्रधानमंत्री यांनी ३ कोटी महिलांना लखपती दीदी करण्याची इच्छा व्यक्त केली होती, त्यावेळच्या महाराष्ट्र दौऱ्याचे स्मरण करून श्री. मोदी यांनी सांगितले की, गेल्या १० वर्षांत १ कोटी लखपती दीदी निर्माण करण्यात आल्या, तर ११ लाख महिला नवीन लखपती दीदी मागच्या दोन महिन्यांतच झाल्या आहेत. त्यात एकट्या महाराष्ट्राच्या १ लाख लखपती दीदी आहेत, हे सांगून त्यांनी राज्य सरकारच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि अनेक नवीन योजना आणि कार्यक्रम सुरू करून महाराष्ट्रातील महिलांचे सक्षमीकरण आणि बळकटीकरण करण्यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी संपूर्ण टीम एकत्र आणून काम करत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले.

राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी आपण 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' याअंतर्गत १ कोटी महिलांच्या खात्यात दोन हप्ते जमा करण्यात आले असून, 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत' तीन गॅस सिलिंडर देण्याची योजना सुरू केली. मुलींना उच्च शिक्षण मोफत, महिलांना प्रवासात सवलत या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम राज्य शासन करत आहे. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानातून प्रधानमंत्री महोदयांचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी नमूद केले.

देशाच्या ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल असे सांगून देशातील तीन कोटी दीदींमध्ये राज्यातील ५० लाख दीदींचा समावेश राहील. अनेक भगिनी पुढाकार घेऊन छोटे-छोटे उद्योग करून कुटुंबाला पुढे नेत आहेत. राज्यात २५ हजार स्वयंसहायता गटांना ३० कोटींची कर्जे देण्यात आली असून, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

देशाला महाशक्ती बनवण्यासाठी महिलांची भागीदारी आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र शासनाचे सहकार्य मिळत आहे. केंद्र शासनाने ७६ हजार कोटींच्या वाढवण बंदर विकासाला साहाय्य केले. मेट्रो प्रकल्पाला मदत केली. राज्यातील कांदा, कापूस, दूध, सोयाबीन यांना चांगला दर मिळण्याच्या दृष्टीने आणि सिंचन प्रकल्पांना निश्चितपणे मदत करेल, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

महिला विकासाच्या प्रवाहात आल्यास देशात प्रभावी आणि विकासात्मक बदल घडू शकतो. त्यामुळेच विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या नारीशक्तीच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्य शासन सर्वतोपरी साहाय्य करत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मनोगतात सांगून नारीशक्ती विविध क्षेत्रात आपले नाव कमावत आहे. देशाच्या या विकासाच्या भागीदारीत

महाराष्ट्र कुठेच कमी पडणार नाही. संत मुक्ताई आणि कवयित्री बहिणाबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. अशा ठिकाणी हे लखपती दीदीचे संमेलन होत आहे. राज्यात बचतगटामार्फत ७५ लाख कुटुंबे जोडली गेली असून, दोन कोटी कुटुंबे जोडण्याचा संकल्प सरकारने केला आहे. जळगाव जिल्हा सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या नार-पार सिंचन योजनेचा उल्लेख करून या कामाला गती दिली असून मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निविदा आणि इतर प्रक्रिया सुरू होणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



केळी, कांदा उत्पादनासाठी जळगाव जिल्हा प्रसिद्ध आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याचा संकल्प केला आहे. राज्यात ५० लाख लखपती दीदी बनवण्यात येणार आहे, त्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

राज्य शासनाचे प्राधान्य नेहमीच महिलांना सजग, सक्षम आणि सुरक्षित बनवण्याचे राहिले आहे. राज्य शासन नेहमीच महिलांच्या पाठीशी राहील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

## लखपती दीदी संमेलनाच्या नियोजनाविषयी

जळगाव शहरापासून ९ किलोमीटर अंतरावर अजिंठा रोडवर विमानतळ आहे. त्या विमानतळाच्या समोर प्राईम इंडस्ट्रियल पार्कच्या सिमेंट रस्त्यासह असलेल्या शेकडो एकर मोकळ्या जागेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या 'लखपती दीदी संमेलना'साठी निवडली गेली होती.

केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री रक्षाताई खडसे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनीही वेळोवेळी आढावा घेतला. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी अत्यंत सूक्ष्म नियोजन केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी श्री. अंकित यांच्या नेतृत्वात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजीव लोखंडे, जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी रणधीर सूर्यवंशी, गटविकास अधिकारी नंदकुमार वालेकर आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

## कॉम्युनिटी रेडिओचा वापर

एक लाखापेक्षा अधिक महिला २,१०० बसेसमधून आणायच्या त्यांना पाणी, नाष्टा, जेवण यासह स्वच्छतागृह हे सगळे करताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या कल्पनेतून एक अभिनव कल्पना साकारली गेली. जळगावमधील 'मनभावन' या कॉम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून सर्व गाड्यांना रेडिओच्या माध्यमातून उद्घोषणा करायची. त्यांचे पार्किंग कुठे असणार आहे, नाष्टा करून झाल्यानंतर कचरा कुठे टाकावा यासह सर्व सूचना दिल्या गेल्या. यासाठी मनभावन केंद्राचे अमोल देशमुख यांचे सहकार्य झाले.

## पावसातही सार्वजनिक बांधकाम विभागाने पेलले शिवधनुष्य

एक सव्वा लाख महिलांची सुरक्षितपणे बसण्याची व्यवस्था करणे अशा पावसाळ्याच्या दिवसात खूप जिकिरीचे काम होते; पण सार्वजनिक बांधकाम विभागाने राष्ट्रीय स्तरावर आयोजन असलेल्या कार्यक्रमासाठी ८ लाख ६ हजार चौरस फूट एवढा मंडप, एक लाख २० हजार खुर्च्या, १०० स्क्रिन बसवली. कार्यक्रमाच्या पूर्वी एक दिवस जळगावमध्ये मोठा पाऊस होता; पण या अडचणींवर मात करून सर्व मानके पूर्ण करून भव्य संमेलन स्थळ उभे केले, यासाठी अधीक्षक अभियंता प्रशांत सोनावणे, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनावणे, उपअभियंता गिरीश सूर्यवंशी आणि विमानतळ परिसरातील जबाबदारी अभियंता प्रांजळ पाटील यांनी जबाबदारी पार पाडली. जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांना विविध जबाबदाऱ्या दिल्या होत्या, त्या त्यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडल्या आणि एक अत्यंत उत्तम नियोजन झालेल्या या कार्यक्रमाचे सर्वदूर कौतुक होत आहे.

जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव



वंदनाताई पाटील

**जळगाव येथे प्राईम इंडस्ट्रिअल पार्क या ठिकाणी लखपती दीदी संमेलन आयोजित केले होते. त्यात देशभरातील सात वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या महिलांचा गौरव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. त्या सात महिलांमध्ये महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथील वंदनाताई पाटील होत्या. त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाविषयी..**

# प्रेरणादायी प्रवास

जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात असलेल्या पळासखेडा येथील रहिवासी वंदनाताई पाटील यांनी सुरुवातीला गावातील महिलांना एकत्र आणत बचतगटाची सुरुवात केली. 'उमेद' अभियानाच्या सहकार्याने सर्वसामान्य बचतगटांच्या बिजनेस प्लॅनप्रमाणे उडीद पापड, लिंबु क्रश लोणचे, भाजणी चकली, आवळा पावडर, आवळा अर्क असे पदार्थ बनवायला सुरुवात केली. जळगाव जिल्ह्यातील विविध प्रदर्शनांसोबतच मुंबई, नाशिक, पुणे इ. मेट्रो शहरांमध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले पदार्थ विक्री सुरू केली. ग्राहकांना कोणते पदार्थ हवे आहेत आणि मार्केटमध्ये नेमके काय विक्री होईल, याचा अंदाज घेऊन सातत्याने अभ्यास चालू ठेवला. यातूनच मग पुढे जाऊन भाजीपाला डिहायड्रेशनसारखा नवा व्यवसाय त्यांनी सुरू केला. आज रोजी त्यांचे हे सर्व डिहायड्रेटेड प्रोडक्ट ऑनलाइनसोबतच शहरी बाजारपेठेत विकले जात आहेत. आता त्यांच्या बचतगटाची वाटचाल ही फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापनेपर्यंत पोहोचली आहे.

## पापड उद्योग

वंदनाताई व त्यांच्या गावातील महिलांनी मिळून कायमस्वरूपी रोजगाराचे साधन हाताशी असावे म्हणून उडीद पापड निर्मिती सुरू केली. सोबतच लिंबु क्रश लोणचे, भाजणी चकली, आवळा पावडर, आवळा अर्क असे पदार्थ बनवायचा व्यवसाय पळासखेडा गावात सुरू केला. त्यांच्याकडील हाताने तयार केलेल्या पापडांना स्थानिक पातळीवर चांगली मागणीदेखील होती. आपल्या उत्पादनांना ठिकठिकाणी भरणाऱ्या प्रदर्शनांच्या माध्यमातून चांगली मोठी बाजारपेठ मिळण्याची खात्री झाल्यावर त्यांनी अशा प्रदर्शनात सहभागी होण्याचा सपाटाच लावला. जळगाव जिल्ह्यातील विविध प्रदर्शनांसोबतच मुंबई, नाशिक, पुणे इत्यादी मेट्रो शहरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले पदार्थ विकणे सुरू केले. यातून उत्पादनांच्या विक्रीसोबतच विविध मार्केटचा अभ्यास होऊ लागला. ग्राहकांना कोणते पदार्थ हवे आहेत आणि मार्केटमध्ये नेमके काय विक्री होईल, याचा अंदाज आल्याने नव-नवीन उत्पादने तयार करण्याची त्यांना प्रेरणा मिळू लागली.




## जिल्ह्यात फळभाज्या निर्जलीकरणाची मुहूर्तमेढ

साधारणपणे महिला बचतगट हे पारंपरिक पदार्थ तयार करून त्यांची विक्री करण्यावर भर देतात. मात्र सुरुवातीपासूनच वंदनाताईंनी स्थानिक बाजारपेठेतील ग्राहकांपेक्षा मेट्रो शहरातील मार्केटमध्ये कोणता माल खपतो व त्या ग्राहकांना नेमकी कोणती उत्पादने हवी आहेत, यानुसार आपल्या बचतगटाद्वारे उत्पादने तयार करण्यावर भर दिला. यातूनच काळाची गरज ओळखून त्यांनी आपल्या भागात सहज उपलब्ध असलेल्या फळे व भाजीपाला यावर प्रक्रिया करण्यासह निर्जलीकरण अर्थात डिहायड्रेशन प्रोजेक्ट सुरू केला. अशा प्रकारचा महिला बचतगटामार्फत सुरू झालेला हा जिल्ह्यातील पहिलाच प्रकल्प ठरला. त्याचवेळी अनेकांनी या प्रकल्पातून निर्माण झालेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळणार नाही, अशी शंका व्यक्त केली. मात्र मार्केटचे निरीक्षण व बाजारपेठेचा सूक्ष्म अभ्यास असल्यामुळे वंदनाताई आपल्या ध्येयापासून जराही विचलित झाल्या नाहीत. कृषी विज्ञान केंद्राकडून रीतसर प्रक्रिया उद्योगाचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी सोलर ड्रायरच्या माध्यमातून भेंडी, टोमॅटो, ताकात भिजवलेली हिरवी मिरची, कारली आदींचे फ्लेक्स तयार करून निर्जलीकरणास सुरुवात केली. याचबरोबर आले, बीट, शेवगा, कांदा, पुदिना, लसूण पावडर आणि शेवगा शेंगांचे निर्जलीकरण केलेले तुकडे इ. पदार्थ बनवायला सुरुवात केली. लोणचे व पापड विक्रीमुळे राज्यभर झालेला थेट ग्राहकांचा संपर्क या नवीन उत्पादनांच्या विक्रीसाठी कामी आला. बघता-बघता डिहायड्रेटेट उत्पादनांचे मार्केट निर्माण होत गेले. उत्पादन प्रक्रियेत सातत्य आणि गुणवत्ता राखल्यामुळे ग्राहक जुळत



गेले. मार्केटिंगसाठी सोशल मीडियाबरोबरच विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मची मदत त्यांनी जाणीवपूर्वक घेतली.

## शेतमालाची बांधावर खरेदी

फळभाज्या निर्जलीकरण प्रक्रिया उद्योगासाठी लागणारा कच्चा माल हा स्थानिक शेतकऱ्यांकडूनच खरेदी केला जातो. मार्केटमधील प्रचलित दरानुसार थेट बांधावर खरेदी केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च तर वाचतोच, सोबतच बाजार समितीमधील अडत, हमाली हा खर्चदेखील वाचतो. शिवाय शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाचा पूर्ण मोबदला मिळतो. वंदनाताईंनी आपल्या प्रक्रिया उद्योगाच्या गरजेनुसार लागणाऱ्या शेतमालाची शेतकऱ्यांकडे आगाऊ नोंदणी करायलादेखील आता सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ निर्माण होत आहे.




## शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना

फळभाज्या निर्जलीकरण प्रक्रिया उद्योगातून वंदनाताईंनी आपल्या बचतगटाचा आर्थिक पाया मजबूत केला असून, सध्या दर महिन्याला २ ते २.५ लाख रु.ची उलाढाल केली आहे. यातून महिन्याला खर्च वजा जाता सरासरी ४० ते ५० हजार रु. निव्वळ नफा त्यांना मिळतो. या प्रकल्पामुळे गावातील १० ते १५ महिलांना कायमस्वरूपी रोजगार मिळाला आहे. व्यवसायवाढीला












गती देण्याची आवश्यकता असल्याने त्यांनी ३०० महिला सभासद घेऊन गावातच गायत्री शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना नुकतीच केली आहे.

## डिहायड्रेटेड भाजीपाला पावडर व फ्लेक्स

शेवगा, टोमॅटो, अद्रक, लसूण, कांदा, बिट, कढीपत्ता, पुदिना, केळफुल पावडर आणि फ्लेक्स ग्राहकांना कोणते पदार्थ हवे आहेत आणि मार्केटमध्ये नेमके काय विक्री होईल, याचा अंदाज घेऊनच उत्पादने तयार करायला हवीत. गरजेनुसार नवीन उत्पादने तयार करायला शिकणे गरजेचे आहे. गावातच विकेल अशी मानसिकता न ठेवता जगात विकले जाईल असे प्रोडक्ट बनवायला हवे, अशी मानसिकता वंदनाताईंनी तयार केली आहे.

आपली उत्पादने विक्रीसाठी केवळ जनसंपर्क, प्रदर्शने, कार्यक्रम इ.वर अवलंबून न राहता सोशल मिडिया व ऑनलाइन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचा वापर वंदनाताईंनी सुरू केला आहे. त्यातूनच नवनवीन ग्राहक जोडले जात आहेत.

प्रक्रिया उद्योगातील संपूर्ण प्रक्रियेमध्ये स्वच्छता ठेऊन दर्जेदार उत्पादन निर्मिती केली जाते. सोबतच प्रत्येक उत्पादनाचे पॅकेजिंग हे आकर्षक व मोठ्या बाजारपेठेतील उत्पादनांप्रमाणे स्टँडर्ड असेल अशी काळजी वंदनाताई घेतात. खरे तर हेच वंदनाताईंच्या यशाचे रहस्य आहे.

## महिलांना रोजगार देण्याचे ध्येय

गावातील सर्व महिलांना सुरुवातीला बचतगटाच्या व आता आपल्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून एका छताखाली आणून हक्काच्या रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न वंदनाताई करत आहेत. आता हा बचतगट व शेतकरी उत्पादक कंपनीच गावाच्या अर्थकारणाचा मुख्य कणा झाला आहे. या बचतगटाचे गेल्या काही वर्षांमध्ये अत्यंत वेगवान व देदीप्यमान अशी कामगिरी केली आहे. याचे संपूर्ण श्रेय हे वंदनाताईंच्या गतिशीलतेला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्य शासनाच्या अहिल्यादेवी होळकर पुरस्कारासह असंख्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

'उमेद' अभियानाच्या माध्यमातून त्यांच्या गटाला बीज भांडवल मिळाले असून, कृषी विभागाच्या केंद्र शासन साहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेत गटाची निवड झाली आहे. 'बचतगट ते फार्मर प्रोड्युसर कंपनी' अशी अविरत वाटचाल व 'अखंड गतीतून सार्थकता' हे ब्रीद लक्षात घेऊन चालणाऱ्या वंदनाताईंची ही यशोगाथा नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

**सिंचन क्षेत्राचा जलदगतीने विकास होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने गेल्या दोन वर्षांत धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची सक्षमपणे अंमलबजावणी केली. राज्यात सिंचन क्षेत्र वाढीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतल्याने राज्याच्या सिंचन क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे.**

# जलसंपत्तीचा शाश्वत विकास

**दीपक कपूर,** भा.प्र.से.

जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागामार्फत विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्रातील रु. १.९६५ लक्ष कोटी रुपयांच्या १३६ प्रस्तावांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामुळे राज्यात सुमारे २१.०४ लक्ष हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. यामध्ये विदर्भामधील अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना वरदान ठरणारा वैनगंगा-नळगंगा या प्रकल्पाचा समावेश आहे. उत्तर महाराष्ट्र प्रदेशातील उर्ध्व गोदावरी प्रकल्प, नांदूर मधमेश्वर, निम्न तापी, पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना, टेंभू उपसा सिंचन, मराठवाड्यातील कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प, गंगापूर उपसा सिंचन योजना, बाभळी मध्यम प्रकल्प या प्रमुख प्रकल्पांचा समावेश आहे.

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ

या महामंडळांतर्गत २२ प्रकल्प पूर्ण झाले असून ९३,५७० हे सिंचन क्षमता व ५७.१० दलघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाद्वारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून तापी खोऱ्यातील बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळवणे प्रस्तावित आहे. ४२६.५२ कि.मी. जोड कालव्याद्वारे विदर्भ प्रदेशातील ६ जिल्ह्यांतील (नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा) १५ तालुक्यांतील ३,७१,२७७ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पाच्या ८८५७४.९२ कोटी रुपये किमतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. गोसीखुर्द प्रकल्पावर जागतिक दर्जाच्या जल पर्यटनाच्या दृष्टीने प्रकल्प उभारणीस एमटीडीसी व महामंडळांतर्गत करारनामा करण्यात आला. आंभोरा, ता. कुही, जि. नागपूर या पर्यटन स्थळाच्या विकास आराखड्यास २४८ कोटी रुपयांस प्रशासकीय मान्यता दिली आहे. गोसीखुर्द जलाशय, मौजा मौदी, जि. भंडारा येथे जागतिक दर्जाचे पर्यटन विकास पीपीपी तत्त्वावर विकसित करण्यास १०१.९५ कोटी रुपये किमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत मागील दोन वर्षांत ७ प्रकल्पांची घळभरणी पूर्ण करून ३८.४८ दलघमी पाणीसाठा निर्माण केला आहे. अवर्षण प्रवण क्षेत्रातील कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, गंगापूर उपसा सिंचन योजना, नांदुर मधमेश्वर प्रकल्प, निम्न दुधना प्रकल्प, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प या महत्त्वाच्या प्रकल्पांना चालना दिली. मध्य गोदावरी उपखोऱ्यात शासनाने अनुज्ञेय केलेल्या पाण्यातून मराठवाड्यात ४०३.६३ दलघमी पाणी वापराचे १२२ प्रकल्प नियोजित आहेत. पूर्णा नदीवरील पाच उच्चपातळी बंधाऱ्यांतर्गत ७,३८० आणि पेनगंगा नदीवरील सात उच्चपातळी बंधाऱ्यांतर्गत ४,३२० हे सिंचन क्षेत्रासाठी १२ बंधाऱ्यांना मान्यता दिली आहे.

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात महापुरादरम्यान झालेल्या नुकसानीचा विचार करून अशा आपत्तींना रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील हवामान, पूर, दुष्काळ प्रतिरोधक सुधारणा या प्रकल्पाच्या आनुषंगाने जागतिक बँकेने सहमती दर्शवलेल्या प्रस्तावाच्या मसुद्यास शासन मान्यता देण्याबाबतची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची ऊर्जा कार्यक्षमता सुधारणे व प्रकल्प सौर ऊर्जेवर चालवण्याबाबत केएफडब्ल्यू, जर्मनी यांच्याकडून कर्ज प्रस्तावावर मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार, केएफडब्ल्यू बँकेकडून १३० मिलियन युरो (अंदाजे ११२० कोटी) इतके बाह्य कर्ज आणि ३.२५ मिलियन युरो इतके तांत्रिक साहाय्य मिळणार असून, राज्य शासनाचा हिस्सा प्रकल्प कामांसाठी रु.२८० कोटी + करांसाठी रु.१९४ कोटी असे एकूण ४७४ रु. कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत दोन वर्षांत हिंगणी को.प. बंधारा पूर्ण झाला असून बांधकामाधीन प्रकल्पांची ६०,७०४ हेक्टर सिंचन निर्मिती व १७.६८० दलघमी पाणीसाठा निर्माण झाला. कृष्णा-कोयना, टेंभू, निरा देवघर, पुरंदर उसियो, चिल्हेवाडी, उचंगी, दिंडलकोप आणि चासकमान या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. दूधगंगा प्रकल्पांतर्गत फेरजल नियोजनामुळे वसुदेव-भुजाई उपसा जलसिंचन योजनेंतर्गत अंदाजे ४१८९ हेक्टर क्षेत्रास अंदाजे ०.९४ अघफु पाण्यातून सिंचन करणे शक्य झाले. खडकवासला धरण समूह प्रकल्पांतर्गत २०२ कि.मी. लांबीच्या नवीन मुठा उजवा कालव्याद्वारे पुणे जिल्ह्यातील हवेली, दौंड, इंदापूर आणि बारामती तालुक्यातील ६२,१५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. कालव्याचा प्रारंभीचा १ ते ३४ कि.मी. लांबीचा खडकवासला ते फुरसुंगी हा भाग पुणे महानगरपालिका हद्दीतून जात असल्यामुळे त्यात दोन्ही बाजुकडील झोपडपट्टी, अतिक्रमणे व पर्यायाने जलप्रदूषण, राडारोडा टाकणे यामुळे कालव्याची वहनक्षमता जवळपास अर्ध्याने कमी झाली. यावर उपाय म्हणून नवीन मुठा कालव्याच्या १ ते ३४ कि.मी. खडकवासला-फुरसुंगी बोगदा तयार करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

### महत्त्वपूर्ण निर्णय

- कोयना जलाशयावर मौ. मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या दरम्यान सामंजस्य करार.
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत सद्य:स्थितीत २८ मोठे/मध्यम प्रकल्प सुरू आहे. २८ पैकी १६ प्रकल्प पूर्ण झाले असून, उर्वरित प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन. आजतागायत ३.८२ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती.
- राज्यात तरंगते सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण व अन्वेषण संदर्भात रोडमॅप तयार करण्याची कार्यवाही.
- ऑगस्ट २०२२ पासून ७८ पूर संरक्षक भिंत बांधणे कामांच्या अंदाजित २१७.११ कोटी रुपये खर्चास प्रशासकीय मान्यता. तसेच विशेष दुरुस्तीअंतर्गत ९७२.१२७ कोटी रुपयांच्या १२७ कामांना प्रशासकीय मान्यता.

### तापी पाटबंधारे विकास महामंडळ

या महामंडळांतर्गत २९ बांधकामाधीन प्रकल्पांद्वारे दोन वर्षांत ६०.९७१ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे. उकई धरणाच्या पश्चिम जलाशयातून ५ अघफु पाणी उपसा सिंचनाद्वारे वापरण्याबाबतची सर्वेक्षणाच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली. देहली मध्यम प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवून घळभरणीचे काम पूर्ण करून १९.०८ दलघमी पाणीसाठा निर्माण केला. त्यामुळे ३५ गावांतील ३१६५ हे जमीन सिंचनाखाली येणार आहे.

श्रीभुवन, लेंडी, चव्हाणवाडी, अंबोली, तळेरे, नामपाडा, नाधवडे, डोमिहिरा ओटाव, शेलारवाडी व हेटवणे या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अतिवृष्टीमुळे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्टी व सावित्री नदीतील १८.९९ दलघमी, तर सावित्री नदीतील १७.५४ दलघमी गाळ काढण्यात आला. त्यामुळे २०२४ च्या पावसाळ्यात या शहरांत पूरपरिस्थिती निर्माण झाली नाही.

मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात 'बळीराजा जलसंजीवनी' ही केंद्र पुरस्कृत योजना राबवण्यात येत आहे. योजनेत ८ मोठे/मध्यम आणि तसेच ८३ लघु प्रकल्प असे ९१ प्रकल्पांच्या समावेश आहे. प्रकल्पांची उर्वरित किंमत १३,६५२ कोटी आहे. आजतागायत ५९ प्रकल्प पूर्ण झाले असून, उर्वरित प्रकल्प मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सार्वजनिक खासगी भागीदारीद्वारे उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी)आणि उदंचन जलविद्युत प्रकल्प सौर/इतर अपारंपरिक संकरित प्रकल्पांच्या धोरणास मान्यता देण्यात आली आहे. या धोरणास शुद्धीपत्रक काढून सामंजस्य करार जलसंपदा विभागामार्फत स्वाक्षांकित करण्याची तरतूद करण्यात आली. या क्षेत्रातील नामांकित १० अभिकरणांसमवेत उदंचन जलविद्युत प्रकल्प संदर्भात सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्यानुसार हे उदंचन जलविद्युत प्रकल्पांद्वारे ४०,८७० मेगावॅट वीजनिर्मिती उद्दिष्ट असून या प्रकल्पांच्या माध्यमातून राज्यामध्ये रु.२,१३,३८१ कोटी इतकी गुंतवणूक व ७१,९५० इतकी रोजगार निर्मिती प्रस्तावित आहे. विहित आयुर्मान पूर्ण झालेल्या जलविद्युत प्रकल्पांचे नूतनीकरण, आधुनिकीकरण, क्षमतावाढ व आयुर्मान वृद्धी तत्त्वावर करणेबाबतच्या धोरणास मंत्रिमंडळांने मान्यता दिली. राज्यातील सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करण्याकरिता (ऊर्जा विभाग) ४,२०८ कोटी रुपये इतक्या खर्चासही मान्यता देण्यात आली. त्याद्वारे १,०५२ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारले जाणार आहेत.

जलसंपदा विभागांतर्गत ७५ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे व १५५ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी रु. १५ हजारपैकी प्रथम टप्प्यातील ७,५०० कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसाहाय्य नाबार्डकडून घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. राज्यामध्ये पूर्ण झालेल्या राज्यस्तरीय प्रकल्पांची संख्या ३,७७८ एवढी आहे. या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता सुमारे ५५ लक्ष हेक्टर, तर प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र सुमारे ४२ लक्ष हेक्टर इतके आहे.

महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यांमधील तफावत दूर करण्याच्या दृष्टीने राज्यातील पूर्ण झालेल्या १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याच्या कामासाठी ५०३६.०२ कोटी रुपये किमतीच्या प्रस्तावावर एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यामध्ये प्रथम टप्प्यात ६० प्रकल्पांसाठी २,४९७ कोटी रुपये व द्वितीय टप्प्यात ९५ प्रकल्पांसाठी २,५३९.०२ कोटी रुपये किमतीचा समावेश आहे. या निर्णयामुळे सुमारे ४.२८ लक्ष हेक्टर इतकी निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यांमधील तफावत दूर होणार आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेच्या ८८,५७४.९२ कोटी रुपये किमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली. या योजनेमुळे गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा उपखोऱ्यात पावसाळ्यात उपलब्ध होणारे ६२.५७ टीएमसी पाणी ४२७ कि.मी. लांबीच्या कालव्याद्वारे बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा उपखोऱ्यात वळवणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३,७१,२७७ हेक्टर असून ते सहा जिल्ह्यांतील १५ तालुक्यांत विभागले आहे.

नार-पार-गिरणा नदी जोड योजनेस ७,४६५.२९ कोटी रुपये किमतीच्या प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. नार, पार व औरंगा वाहिनी नदी खोऱ्यातील २६०.३० दलघमी पाणी नाशिक व जळगाव जिल्ह्यातील गिरणा उपखोऱ्यात वळवणे प्रस्तावित आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी या योजनेद्वारे दमणगंगा नदीवर १.१६ टीएमसी क्षमतेचे एकदरे धरण बांधून ३.५५ टीएमसी पाणी ३५१ मीटर उपसा करून गोदावरी खोऱ्यातील वाघाड धरणामध्ये व त्यापुढे जायकवाडी धरणात सोडण्यात येईल. योजनेमुळे नाशिक व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १२,९९८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड योजनेच्या १३,४९७.२४ कोटी रुपये किमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रस्तावित केली असून, या योजनेमुळे पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील दमणगंगा व वैतरणा उपखोऱ्यातील १६०.९७ दलघमी पाणी नाशिक जिल्ह्यातील गोदावरी खोऱ्यात; तसेच मराठवाडाकरिता गोदावरी नदीमार्फत वळवणे प्रस्तावित आहे. पश्चिम वाहिनी वैतरणा व उल्हास उपखोऱ्यातील अतिरिक्त ५४.७० टीएमसी पाणी मराठवाडा प्रदेशात वळवण्यासाठी प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरू आहे.

**अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग**

**प्रत्येक युवक–युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात, यासाठी युवा पिढीसह त्यांचे पालकदेखील जागरूक असतात. राज्य शासनदेखील रोजगार निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असतेच. प्रत्येक युवकाचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना योग्य मार्गदर्शन आणि व्यवसायासाठी विविध योजनांच्या माध्यमातून शासन भांडवल उपलब्ध करून देत आहे. रोजगारइच्छुक युवक–युवती आणि उद्योजक अथवा आस्थापना यांच्यामध्ये संवाद, समन्वय साधून उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. युवांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' ही योजना सुरू केली आहे.**

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण

**निधी चौधरी,** भा.प्र.से.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत १२वी पास, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या युवांना कार्य प्रशिक्षणाची संधी मिळून अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी त्यांना विद्यावेतनदेखील मिळणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला जगात अग्रेसर बनवण्यासाठी कौशल्य विकासाच्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. केंद्र शासनाने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पातही आगामी पाच वर्षांत ४.१ कोटी अधिक युवकांना रोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी देशात निर्माण करण्यासाठी दोन लाख कोटी रुपयांची तरतूद केली गेली आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने प्रसिद्ध केलेल्या भारताच्या रोजगार २०२४ अहवालानुसार, भारत हा २०२६ पर्यंत सर्वाधिक तरुणांचा देश असेल. ग्रामीण व शहरी विकासातील दरी दूर करून प्रत्येक युवांना हाताला काम देण्यासाठी हे शासन तत्पर असून देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असा ठरणार आहे.

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जाणार आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि उद्योजक; तसेच रोजगार देणाऱ्या विविध आस्थापनांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय गेल्या दोन वर्षांत घेण्यात आले. त्यातील कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी मिळून प्रत्येक हाताला काम देणारी व प्रत्येक कुटुंबाचा विकास हाच ध्यास पूर्णत्वास नेणारी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' ही महाराष्ट्र राज्याच्या विकासात योगदान देऊन आमूलाग्र बदल घडवेल आणि कुशल व रोजगारक्षम महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदत करेल अशी मला आशा आहे

**- मंगल प्रभात लोढा**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री**



## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जाणार आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना ८ हजार रुपये, तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने देण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत १२वी, आय.टी.आय.,

पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या रोजगारइच्छुक उमेदवारांनी व रोजगार देणाऱ्या विविध आस्थापनांनी, उद्योजकांनीही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे.

## योजनेचे निकष व पात्रता

या योजनेकरिता उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे. किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा. योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दरमहा दिले जाईल. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना, उद्योग ऑनलाइन पद्धतीने घेतील. या ऑनलाइन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या थेट बँक (डीबीटी) ऑनलाइन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल.

विद्यावेतनामध्ये संबंधित उद्योजकामार्फत जाहीर केलेली सुट्टी व अनुज्ञेय रजा याचा अंतर्भाव राहील. उद्योजक उमेदवारांना या विद्यावेतनाव्यतिरिक्त अधिकचे विद्यावेतन देऊ इच्छित असेल, तर वाढीव रक्कम उमेदवारांना अतिरिक्त स्वरूपात देऊ शकेल. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला, तर संबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही. प्रशिक्षणार्थीने वरील अटींची पूर्तता केली असली; परंतु सदर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही. या योजनेदरम्यान प्रशिक्षणार्थीस कायम, नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS /MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत. एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.



राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (एनईपी-२०२०) अंतर्गत नवीन अभ्यासक्रम आराखड्यांतर्गत एकूण सहा व्हर्टिकल्स पैकी पाचव्या आणि सहाव्या व्हर्टिकल्समध्ये कौशल्य आधारित अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग आणि ॲप्रेंटिसशिप या नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे. युवकांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, सॉफ्टस्किल ट्रेनिंग, लाईफस्किल ट्रेनिंग, तांत्रिक प्रशिक्षण देऊन तरुणांची रोजगारक्षमता वाढवणे; तसेच शिक्षण घेताना कामाच्या ठिकाणी कामाशी संबंधित कार्यकौशल्य आत्मसात करणे, या उद्देशाने ज्या अभ्यासक्रमात कमीत कमी सहा महिन्यांचे ऑन जॉब ट्रेनिंग किंवा ॲप्रेंटिसशिपचा समावेश आहे. अशा अभ्यासक्रमांतील विद्यार्थीदेखील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी पात्र ठरतील.

## रोजगाराच्या संधी

लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, स्टार्टअप्स, सहकारी संस्था, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, सामाजिक संस्था (कंपनी कायदा २०१३ मधील सेक्शन-८) आणि विविध आस्थापना इत्यादींना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंदवतील. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्य प्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या आस्थापना व उद्योगामध्ये सध्याच्या मनुष्यबळावर आधारित सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणाच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील.

## खासगी व शासकीय आस्थापनासाठी निकष

आस्थापना व उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा. आस्थापना, उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. आस्थापना, उद्योगाची स्थापना किमान तीन वर्षांपूर्वीची असावी. कार्य प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने असून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल. या योजनेच्या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार संबंधित उद्योग, आस्थापनांना योग्य वाटल्यास व उमेदवाराची इच्छुकता असल्यास त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील. योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसानभरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही. या योजनेंतर्गत खासगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय या आस्थापना, उद्योग, महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या पाच टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.


या योजनेसाठी 'राज्यस्तरीय सनियंत्रण समिती' व जिल्हास्तरावर 'कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता जिल्हा कार्यकारी समिती' या योजनेचा वेळोवेळी आढावा घेऊन योजनेसंबंधित स्थानिक स्तरावरील अडीअडचणींचे निराकरण केले जाईल. जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता हे या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.

(लेखिका कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागात आयुक्त पदावर कार्यरत आहेत.)

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे वर्णन भारतीय राज्यक्रांतीचे जनक, भारतीय असंतोषाचे जनक, आधुनिक भारताचे शिल्पकार असे साधारणपणे केले जाते. लोकमान्य टिळक प्रामुख्याने ओळखले जातात ते त्यांच्या राजकीय विचारसरणीमुळे. त्यांचे राजकीय जीवन हे भारतीय राजकारणातील टिळक युग ठरले आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.**


# टिळक युग

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे श्रेष्ठ पुढारी, गणिती तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म दापोली तालुक्यातील चिखलगाव या गावी २३ जुलै १८५६ रोजी झाला. टिळकांच्या वडिलांचे नाव गंगाधरपंत, तर आईचे नाव पार्वतीबाई होते. या उभयतांचे टिळक हे चौथे अपत्य होते. टिळकांचा जन्म झाला, तेव्हा गंगाधारशास्त्री हे रत्नागिरी येथे राहत होते. टिळकांचे शालेय शिक्षण रत्नागिरीला झाले. १८६६ साली गंगाधरपंतांची पुण्याला बदली झाली आणि ते रत्नागिरीहून पुण्याला आले. टिळकांचे इंग्रजी शिक्षण रत्नागिरीला झालेले. पुण्यात आल्यानंतर थोड्याच दिवसांत टिळकांच्या आईचे निधन झाले. आपल्या मुलाला इंग्रजी शिक्षण घेता यावे याची पुरेपूर काळजी गंगाधरपंतांनी घेतलेली होती. डेक्कन कॉलेजमध्ये टिळक आणि आगरकर यांचा स्नेह जमला. विष्णूशास्त्री चिपळूणकर पुण्याला नवी शाळा काढण्याच्या विचारात असल्याची बातमी टिळक-आगरकरांच्या कानी आली. त्यानुसार चिपळूणकरांना भेटून त्यांनी आपली योजना सादर केली. १ जानेवारी १८८० रोजी 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. शाळा स्थापन केल्यानंतर एका वर्षामध्ये केसरी (मराठी) व मराठा (इंग्रजी) ही दोन वर्तमानपत्रे सुरू केली. वृत्तपत्रांद्वारे लोकशिक्षण, राजकीय जागृती व शासकीय अन्यायाचा प्रतिकार हे त्यांचे ऐतिहासिक कार्य येथूनच सुरू झाले. १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. टिळक गणित व संस्कृत विषय शिकवत. पुढे टिळकांचे संस्थेतील एकंदर धोरणासंबंधी मतभेद झाले. आपल्या चाळीस पानी राजीनाम्यात टिळकांनी 'निर्वाहापुरते वेतन' या तत्त्वाऐवजी 'सांपत्तिक स्थितीनुसार



वेतन'; तसेच 'राष्ट्रीय शिक्षण संस्थे'च्या उद्दिष्टाविरुद्ध 'सरकारच्या मदतीवर चालणारी संस्था' हे धोरण संस्थेच्या मूळ धोरणाला धक्के देणारे आहे, असे आग्रहाने सांगितले. या प्रश्नावर त्यांचा आगरकरांशी वाद झाला. याशिवाय दुसरा वाद 'आधी कोण? राजकीय की सामाजिक?' या विषयावर झाला होता. आगरकरांना सामाजिक सुधारणा महत्त्वाच्या वाटत होत्या आणि देश सुधारण्यासाठी किंवा स्वातंत्र्यासाठी ते सामाजिक सुधारणांना प्राधान्य देत. मात्र आगरकरांची भूमिका याच्या बरोबर विरुद्ध होती. परकीय सरकारने लोकमताची पर्वा न करता सुधारणेसाठी योग्य ते कायदे करावेत, असे आगरकरांचे मत होते. टिळकांचे म्हणणे असे होते की, 'आमच्या सुधारणा आम्हीच करू, परकीय सत्तेची ढवळाढवळ आमच्या सामाजिक वा धार्मिक बाबतीत होऊ नये. मात्र लोकमत अनुकूल असेल आणि धर्मवचनांच्या बाबतींत तडजोड होत असेल, तर असा कायदा करण्यास आमची काही हरकत नाही.' डेक्कन एज्युकेशन संस्था सोडल्यानंतर १८९०-९७ या प्रारंभीच्या काळात टिळकांनी केलेले कार्य त्रिविध स्वरूपाचे होते. या काळात पुढील प्रकरणे उद्‌भवली : (१) संमती वयाचा कायदा, (२) ग्रामण्य प्रकरण, (३) रमाबाईंचे शारदासदन, (४) हिंदु-मुसलमानांचे दंगे, (५) सार्वजनिक समाजकार्य इत्यादी. या सर्व प्रकरणांत त्यांची भूमिका राजकारणी पुरुषाची होती आणि स्वराज्य हा त्यांचा प्रधान हेतू होता. याकरिता ब्रिटिश सरकारच्या राज्यकारभारातील दोष व अन्याय यांवर वृत्तपत्रांतून उघड टीका करून त्यांनी कायद्याची मर्यादा प्रथम सांभाळली. तसेच प्रांतिक परिषदा व काँग्रेसच्या कार्यात भाग घेऊन त्याचे स्वरूप जहाल राष्ट्रवादी बनवले व जनतेच्या मनात ज्वलंत देशाभिमान व स्वातंत्र्यप्रेम चेतवून, स्वातंत्र्यासाठी प्रत्यक्ष संघर्ष करण्यास लोकांची मनोभूमिका तयार करण्याचा प्रयत्न केला, स्वातंत्र्याची भावना वृद्धिंगत करण्यासाठी त्यांना अर्जविनंत्यांचे राजकारण करणाऱ्या नेमस्त पक्षाविरुद्ध सतत संघर्ष करावा लागला. पंडिता रमाबाईंनी स्त्रीशिक्षणासाठी 'शारदा सदन' ही संस्था काढली होती. पं. रमाबाई मूळच्या हिंदू; पण पुढे ख्रिस्ती झाल्या होत्या. यामुळे ही संस्था म्हणजे प्रौढ मुलींच्या अगर विधवांच्या बौद्धिक आणि व्यावहारिक उन्नतीसाठी निघालेली नसून तिचा मूळ उद्देश ख्रिस्ती धर्मप्रसाराचा आहे, असे टिळकांचे मत होते. शारदा सदनमधील दोन मुलींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्या वेळी टिळकांनी कडक शब्दांत टीका केली होती. हिंदू-मुसलमानांचे अनेक ठिकाणी १८९३ मध्ये दंगे झाले. या संघर्षात हिंदू आणि मुसलमान असे दोनच

पक्ष नसून सरकार हा एक तिसरा पक्ष आहे, हे लक्षात घेतल्याशिवाय दंग्यांच्या कारणांची उपपत्ती लागणार नाही, असे टिळकांचे मत होते. सरकारचे पक्षपाती धोरण, म्हणजेच 'फोडा आणि झोडा' ही नीती, दंग्यांस कारणीभूत होते अशी टीका ते करीत. नेहमी सर्वांनी सुख-संतोषाने राहून एकमेकांच्या हक्कांस जपावे, असे ते म्हणत. या दंग्यांनंतरच लोकजागृतीची साधने म्हणून गणपती व शिवजयंती या उत्सवांना सार्वजनिक स्वरूप देण्याची कल्पना पुढे आली. १८ सप्टेंबर १८९४ आणि १५ एप्रिल १८९६ या अनुक्रमे केसरीच्या दोन अंकांत त्यांनी या उत्सवांचे उद्देश स्पष्ट केले: राष्ट्रीय जागृती करणे, स्वातंत्र्याकांक्षा वृद्धिंगत करणे, महापुरुषांचे स्मरण करणे आणि धर्म व संस्कृतीचे ज्ञान सामान्यजनांस करून देणे. १८९६ च्या दुष्काळात शेतकऱ्यांना त्यांनी सांगितले की, 'पीक कमी असेल, तर सारामाफी हा तुमचा हक्क आहे, तो मागून घ्या. सरकारच्या धोरणानुसार लोकांनी हक्काने मदत मागावी.' दुष्काळाच्या पाठोपाठ प्लेग आला. त्या वेळी प्लेग प्रतिबंधासाठी नेमलेल्या कमिशनर रँड याच्या हाताखालील गोऱ्या अधिकाऱ्यांनी धुमाकूळ घातला, तेव्हा


केसरी.
वर्ष १. पुणें:—मंगळवार तारीख ४ जानेवारी १८८१. अंक १.




टिळकांनी टीकेची झोड उठवली. आपद्ग्रस्तांसाठी स्वस्त धान्य दुकाने काढली व सार्वजनिक रुग्णालये उघडली. २२ जून १८९७ रोजी चाफेकरबंधूंनी रँडचा खून केला. त्या वेळी सरकारने पुण्यावर अनन्वित जुलूम केला. टिळकांनी 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे', 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असे एकापाठोपाठ एक प्रखर लेख लिहिले. टिळकांच्या खऱ्या कारकिर्दीला आणि अखेरपर्यंत चालवलेल्या त्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामाला १८९९ नंतरच अधिक तेज चढले. लॉर्ड कर्झन याने २० जुलै १९०५ रोजी बंगालची फाळणी जाहीर केली. सर्व देशभर प्रक्षोभ उसळला आणि उग्र आंदोलन सुरू झाले. टिळकांनी बंगालमधील चळवळीला पाठिंबा दिला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतुः सूत्रीचा त्यांनी हिरिरीने पुरस्कार केला. आपली उन्नती करून घ्यावयाची, ती स्वदेशी आणि बहिष्कार यांसारख्या मार्गांनीच केली पाहिजे. स्वदेशी हतभागी झालेल्या आमच्या लोकांस वर येण्याचा जर काही मार्ग असला, तर तो स्वावलंबन व स्वार्थत्याग हाच होय, असा संदेश देऊन ते आता लोकांना प्रतिकाराचे आवाहन करू लागले. बारिसाल येथे प्रांतिक परिषदेच्या निमित्ताने निघालेल्या मिरवणुकीत वंदेमातरम्‌च्या घोषणा देण्यात आल्या, म्हणून पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला आणि लोकांची डोकी फोडली. काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी टिळकांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात ठेवण्यात आले. मंडालेच्या तुरुंगात असताना टिळकांच्या जीवनात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. या बंदिवासात त्यांनी आपला 'गीतारहस्य' हा अत्यंत मौलिक ग्रंथ लिहिला, तर पुण्यास त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांचे १९१२ मध्ये निधन झाले. भारतमंत्री सर एडविन मॉँटेग्यू यांनी २० ऑगस्ट १९१७ रोजी भारताला भेट देऊन अनेक संस्थांचे चालक, विविध शिष्टमंडळे व पुढारी यांच्या भेटी घेतल्या. त्यांनी टिळकांचीही व्यक्तिशः भेट घेतली. टिळक इंग्लंडमध्ये असताना रौलट कायदा जाहीर झाला होता व त्याच्या निषेधार्थ महात्मा गांधींच्या आदेशानुसार झालेल्या हरताळातून जालियनवाला बागेतील हत्याकांड घडले होते. 'गांधीच्या सत्याग्रहात व नंतर घडलेल्या भयंकर प्रसंगात मी तुमच्याबरोबर नव्हतो, याचे मला वाईट वाटते' असे उद्‌गार टिळकांनी मुंबईस उतरल्याबरोबर काढले. टिळकांना १९१६ च्या जून महिन्यात ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पुण्याला मोठा समारंभ होऊन त्यांना एक लाखाची थैली अर्पण करण्यात आली. ती सर्व रक्कम राष्ट्रकार्यासाठी वापरण्याची घोषणा करून ते म्हणाले, 'आपली मातृभूमी आपणा सर्वांस या उद्योगास लागण्याबद्दल आवाहन करत आहे. मातृभूमीच्या या आवाहनाकडे लक्ष देऊन कोणताही भेदभाव मनात न ठेवता, आपण सर्व राष्ट्रदेव होऊ या'.

या राजकीय कार्याबरोबरच टिळकांची अनेकविध सामाजिक कार्ये चालू होती. आपल्या देशाच्या औद्योगिक प्रगतीचा विचार टिळक सदैव करत होते आणि थोड्या भांडवलात कोणते धंदे काढता येतील याची चर्चा ते प्रसंगपरत्वे करत असल्याची पुष्कळ उदाहरणे 'आठवणी-आख्यायिकां'च्या स्वरूपात आढळतात. आपल्या 'गीतारहस्या'तून ज्या कर्मयोगाचा पुरस्कार टिळकांनी केला, तोच कर्मयोग प्रत्यक्ष जीवनात आचरून दाखवला. लोकसंग्रहाची दृष्टी राखून लोकमान्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीला समाजाच्या सर्व थरांतील लोकांचे अधिष्ठान मिळवून दिले. 'गीतारहस्य' हे त्यांचे अक्षय विचारधन असून ते आधुनिक भारतातील एक श्रेष्ठ तत्त्वज्ञान होय. गांधींच्या सर्वांगीण व सर्वंकष राजकीय-सांस्कृतिक कार्याला अनुकूल अशी पार्श्वभूमी निर्माण करण्याचे श्रेय लोकमान्यांना द्यावे लागते. म्हणून आधुनिक भारताच्या इतिहासात टिळकयुग हा फार महत्त्वाचा टप्पा मानण्यात येतो.

**संदर्भ : मराठी विश्वकोष**

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून कामगार, शाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चळवळीतील कार्यकर्ता, संघटक, अभिनेता आणि माणसांवर नितांत प्रेम करणारा कलावंत असे विविध पैलू या व्यक्तिमत्त्वाला आहेत. त्यांच्या जीवनप्रवासाचा थोडक्यात आढावा...**



# बहुआयामी व्यक्तिमत्त्व

सांगली जिल्ह्यातील वाटेगावमध्ये १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे. आईचे नाव वालूबाई. १९३२ साली वडिलांसोबत ते मुंबईला आले. फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले. १९३६ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. पक्षाचे कामही ते करत होतेच, तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलत भावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. तमाशातून जुन्या चालीचा सुरुवातीचा साठा अण्णा भाऊ साठे यांनी आत्मसात केला. मुंबईत परतताच त्यांना मॅक्झिम गॉर्कीचे साहित्य वाचायला मिळाले. लिखाणाची उर्मी त्यांना याच साहित्याने दिली. तो काळ १९४२ च्या चळवळीचा. ते स्वातंत्र्य समरांगणात सहभागी झाले, म्हणून इंग्रज सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. पोलिसांना चुकवत ते मुंबईला आले, त्याच काळात त्यांची भेट शाहीर अमर शेख, द. ना. गव्हाणकरांशी झाली. मॅक्झिम गॉर्कीच्या साहित्याने प्रभावित झालेल्या त्यांच्या अंतरीच्या उर्मी प्रतिभेला बहर आला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णा भाऊ साठे यांचेही नाव 'लोकशाहीर' म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्तालिनग्राडचा पोवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लाल बावटा' कलापथक स्थापन केले. या कलापथकावर सरकारने बंदी घातली. 'अमळनेरचे अमर हुतात्मे' आणि 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या त्यांच्या काव्यरचना १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींना एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

वर्गीय क्रांतीची उकल करण्यासाठी त्यांनी तमाशाचा बाज नेमकेपणाने उचलला. तमाशातल्या नृत्यांगनेचे चाळ काढून टाकले आणि वीररसाच्या अंगाराचे चाळ चेतावणारा बंडखोर बंडागळी उभा केला. जुन्या कथेचा ढाचा ठेवून नव्या युगाचा अकलेचा मोर्चा बांधला. तमाशात परंपरेने चालत आलेला गण बदलून टाकला. त्या जागी श्रमशक्तीला अभिवादन करणारा गण मोठ्या तडफेने साकारला. अण्णा भाऊ साठे यांनी अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या महाराष्ट्राच्या परंपरेचे स्मरण देऊन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनासाठी उभ्या महाराष्ट्राला प्रेरणा दिली. शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकरांसमवेत 'माझी मैना गावावर राहिली', 'माझ्या जीवाची होतेया कायली' ही लावणी अजरामर केली.

अकलेची गोष्ट (१९४५), देशभक्त घोटाळे (१९४६), शेटजींचे इलेक्शन (१९४६), बेकायदेशीर (१९४७), पुढारी मिळाला (१९५२), लोकमंत्र्यांचा दौरा (१९५२) ही त्यांची काही लोकनाट्य होत. जिवंत काडतूस, आबी, खुळंवाडी, बरबाद्या कंजारी (१९६०), चिरानगरची भुतं (१९७८), कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह. त्यांनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा (१९४५) ही त्यांची पहिली कादंबरी. त्यानंतर ३४ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यात फकिरा (१९५९, आवृ.१६ - १९९५), वारणेचा वाघ (१९६८), चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ (१९६३), वैजयंता यांसारख्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. सत्प्रवृत्तीचा, माणुसकीचा विजय हे अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचे मुख्य सूत्र होय. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले : वैजयंता (१९६१, कादंबरी - वैजयंता), टिळा लावते मी रक्ताचा (१९६९, कादंबरी - आवडी), डोंगरची मैना (१९६९, कादंबरी - माकडीचा माळ), मुरली मल्हारीरायाची (१९६९,कादंबरी - चिखलातील कमळ), वारणेचा वाघ (१९७०,कादंबरी -वारणेचा वाघ), अशी ही साताऱ्याची तऱ्हा (१९७४, कादंबरी - अलगूज), फकिरा (कादंबरी - फकिरा). या शिवाय इनामदार (१९५८), पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली.

रशियाच्या इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटीच्या निमंत्रणावरून ते १९६१ साली रशियात गेले. त्यावर त्यांनी लिहिलेले प्रवासवर्णन लोकप्रिय झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व विविध कलागुणांनी भरलेले होते. ते उत्तम अभिनय करत. हातात डफ घेऊन शाहिरी कवने मोठ्या तडफेने गात. बुलबुल, बासरी, हार्मोनियम अशी वाद्येही ते वाजवत. दांडपट्टा फिरवीत. शिवाय स्वतःच्या लिखाणाव्यतिरिक्त त्यांनी नवयुग, युगांतर आणि आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' वर्तमानपत्रातून अनेक लेख व पुस्तकांची परीक्षणे लिहिली.

अनेक विद्यापीठातून अण्णाभाऊ साठे यांच्यावर अनेक प्रबंध सिद्ध केले आहेत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

**संदर्भ : मराठी विश्वकोष**

**नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या खांद्याला खांदा लावून महाराष्ट्राच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलणारे हरितक्रांतीचे प्रणेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे केवळ आमचे पूर्वज नसून हा अखंड जनसेवेचा वारसा अबाधित ठेवण्यासाठी प्रेरणा देणारे ऊर्जास्रोत आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासन राबवत असलेले कार्यक्रम शेतकऱ्यांना नक्कीच लाभदायी ठरत आहे.**

# अखंड जनसेवेचा वारसा

**इंद्रनील नाईक**

माजी मुख्यमंत्री दिवंगत दादासाहेब कन्नमवार यांच्या दु:खद निधनानंतर महाराष्ट्राची धुरा वसंतराव नाईक यांच्या खांद्यावर आली. त्यांनी ५ डिसेंबर १९६३ रोजी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यावेळचे राज्यपाल एच. के. चैनानी यांनी त्यांना शपथ दिली होती.

मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी आकाशवाणीवरील भाषणातून संबोधित केले होते. त्यात ते म्हणतात, 'काळाचे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे. आपल्याला कोणते लक्ष्य गाठावयाचे आहे व त्यासाठी आपली साधने काय आहेत. त्याचे चित्र आपल्या मनापुढे स्वच्छ असावयास पाहिजे. शेती व औद्योगिक उत्पादन वाढवण्याचा प्रश्न हा या संदर्भात फार महत्त्वाचा ठरतो. शेतकऱ्यांच्या कष्टाचे फळ त्यांच्या पदरात पडावे आणि शेतीचे उत्पादन वाढून सहकारी तत्त्वावर उद्योगधंद्याच्या वाढीस चालना मिळणे गरजेचे आहे. म्हणून कृषी औद्योगिक अर्थव्यवस्थेचा एक अभिनव प्रयोग आपल्या राज्यातील काही कर्तृत्ववान शेतकरी आज यशस्वीपणे करत आहेत, ही खरोखरच महाराष्ट्राच्या गौरवाची गोष्ट आहे. त्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन व साहाय्य देणे महाराष्ट्र शासनाचे धोरण राहील, असे उद्‌गार त्यांनी काढले होते. यातून त्यांची कृषी क्षेत्रातील दूरदृष्टी दिसून येते.

## वसंतरावांची कृषिवलप्रेमी भूमिका

'शेतकरी हा महाराष्ट्र राज्याच्या सामर्थ्याचा कणा आहे. मूठभर उद्योगधंदे हे महाराष्ट्र राज्याचे खरे स्वरूप नव्हे' अशी कृषिवलप्रेमी भूमिका बाळगून वसंतराव नाईक यांनी शेती आणि शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवले. आपल्या समाजकारणाला राजाश्रयाची जोड देत महाराष्ट्राच्या तमाम शेतकऱ्यांना सन्मानाने उभे करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. शेती क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल म्हणून त्यांची जयंती महाराष्ट्र शासनाच्या वतीने कृषी दिन म्हणून मोठ्या गौरवाने राज्यभर साजरी होते. हा त्यांनी केलेल्या हरितक्रांतीचा व कृषिक्रांतीचा गौरव आहे, याचा मनस्वी अभिमान वाटतो.

वसंतराव नाईक यांनी नवमहाराष्ट्राच्या जडणघडणीच्या प्रतिकूल काळात एखाद्या तटस्थ तपस्वीप्रमाणे एका तपापेक्षा अधिक काळ महाराष्ट्राचे यशस्वी व लोकाभिमुख नेतृत्व केले. राज्याच्या उभारणीच्या काळात अनेक मोठ्या संकटांच्या मालिकेचा सामना वसंतराव नाईक यांना करावा लागला; परंतु भगवान बुद्धांना अपेक्षित असलेल्या 'स्थितप्रज्ञता' हा वसंतराव नाईक यांच्या स्वभावाचा स्थायिभाव होता. कुठल्याही कठीण प्रसंगांमध्ये विचलित न होता संयम आणि कार्यकुशलतेने उभ्या महाराष्ट्राचे यशस्वी नेतृत्व वसंतराव नाईक यांनी केले. त्यांचा हा जनसेवेचा वारसा अनुभव आणि संघर्षासह जनतेच्या आशीर्वादाने सांभाळत आहे.

वसंतराव नाईक यांनी शेती, शिक्षण, औद्योगिकीकरण, साहित्य, क्रीडा, ग्राम विकास, नागरी विकास, स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती अशा अनेक आघाडीवर भरीव कामगिरी करून भारतातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राला वेगळी ओळख प्राप्त करून दिली. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत आज अनेक आघाड्यांवर प्रथम क्रमांकाचे राज्य म्हणून सन्मानाने महाराष्ट्राची पताका फडकत आहे. या शाश्वत विकासाच्या प्रक्रियेचा पाया नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांनी घालून दिला आहे. याचा सार्थ अभिमान वाटतो.



महाराष्ट्र ही नररत्नांची खाण आहे. संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेक महापुरुषांचा वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. तुकोबा-शिवबा-ज्योतिबा-बाबा अर्थात शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारधारेने महाराष्ट्र धर्माची पताका देशभर गौरवाने फडकावली आहे. या विचारधारेवरच कृषी संस्कृतीचा सन्मान करत वसंतराव नाईक यांनी सामाजिक जीवन समर्पित

केले आहे. त्यामुळे नाईक परिवार आणि पुरोगामी विचारधारा त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांशी बांधिलकी बाळगून सामाजिक मार्गक्रमण करणे ही माझी नैतिक जबाबदारी समजतो.

वसंतराव नाईक हे लोकशाहीचा नितांत आदर करणारे होते. लोकशाहीच्या माध्यमातून समूहशक्ती विकसित करण्यावर त्यांनी कायम भर दिला. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सत्तेचे विकेंद्रीकरण गरजेचे असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती केली. ज्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकाला सत्तेचा वाटेकरी होता आले. विकासापासून वंचित असलेल्या प्रत्येक जाती समूहांचा लोकशाहीवरील विश्वास सुदृढ झाला. या पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व लक्षात घेऊन देशातील अनेक प्रगत राज्यांनी या व्यवस्थेचा स्वीकार केला. जलक्रांतीचे प्रणेते सुधाकरराव नाईक, श्रद्धेय विलासराव देशमुख यांच्यासारखे प्रगल्भ नेतृत्व याच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून निर्माण झाले. ज्यांनी नंतरच्या काळात वसंतराव नाईक यांच्या स्वप्नांना न्याय देण्याचा सचोटीने प्रयत्न केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निर्मितीमुळे वसंतराव नाईक यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण किती महत्त्वाचे आहे हे अधोरेखित केले होते.

वसंतराव नाईक यांच्या राजकीय वाटचालीमधील दुष्काळ एवढे भयाण होते, ज्याचे वर्णन करताना एका कवीने अगदी मोजक्या शब्दांत, त्या भीषण दुष्काळाचे वर्णन केले आहे.

या भूतलावरचे पाणी कुठे गेले..?

ज्याच्या त्याच्या डोळ्यात आले, ज्याच्या त्याच्या डोळ्यात आले..!!

हा दुष्काळ किती भयावह स्वरूपाचा होता, याची सहज कल्पना या छोट्याशा कवितेच्या दोन ओळींवरून येते. हा दुष्काळ जेवढा सामान्य जनतेला जीवघेणा होता, तेवढाच शासन आणि प्रशासनासाठी कठीण काळ होता. राज्याचे प्रमुख म्हणून वसंतराव नाईक यांच्यासाठी हा अत्यंत कसोटीचा काळ होता; परंतु या कठीण काळातसुद्धा संकटात संधी शोधण्याची सकारात्मक वृत्ती महानायक वसंतराव नाईक यांनी दाखवली आणि रोजगार हमी सारख्या योजना आणून शासनाच्या पालकत्वाच्या भूमिकेला न्याय दिला.

शेतकरी, शेतमजुरांच्या हाताला काम आणि त्या माध्यमातून विकासाचे शाश्वत काम ही किमया या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून वसंतराव नाईक यांनी साधली. पुढील काळात या योजनेचा आदर्श घेत देशातील अनेक प्रगत राज्यांनी महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेचा स्वीकार केला. तो केवळ रोजगार हमी योजनेचा स्वीकार नसून वसंतराव नाईक यांच्या कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा सन्मान होता. त्यांच्या कार्याविषयी माजी राष्ट्रपती भारतरत्न प्रणव मुखर्जी यांनी वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपुत्र आहेत, या शब्दांत त्यांचा गौरव केला होता.

तद्नंतर केंद्र सरकारला या अभिनव योजनेचे महत्त्व लक्षात येताच वसंतराव नाईक यांच्या या अभूतपूर्व योजनेला कायद्याची जोड देऊन केंद्र सरकारने शेतमजूर आणि कामगारांचे पालकत्व कायद्याने स्वीकारले. त्याचे श्रेय वसंतराव नाईक यांना आपणा सर्वांना द्यावेच लागेल. या योजनेला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे नाव दिले हे स्वागतार्ह आहे; परंतु या योजनेला वसंतराव नाईक यांचे नाव देण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र सरकारला दिल्यास योजनेचे जनक म्हणून महाराष्ट्राचे नाव देशभरात अजरामर होईल, याची मला खात्री आहे.

त्याकाळी विदर्भातील अतिमागास असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील दुर्गम भागातील गहुली या बंजारा लोकवस्तीच्या तांड्यामध्ये वसंतराव नाईक यांचा १ जुलै १९१३ रोजी जन्म झाला. बालपण तांड्यावर गेल्यामुळे बंजारा समाजातील प्रबोधनाचे साधन म्हणून बंजारा भजनांचा मोठा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होता. समाजप्रबोधनाशिवाय समाजमन उन्नत होणार नाही, यावर वसंतराव नाईक यांचा ठाम विश्वास होता. म्हणून राज्याचे प्रमुख म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासत त्यांनी संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विनोबा भावे यांच्यासारख्या प्रतिभावंत समाजसुधारक आणि समाजप्रबोधनकारांच्या प्रत्यक्ष भेटी आणि त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य केले. या समाज सुधारकांची विचारधारा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे. तसेच संत, महापुरुषांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या आजच्या समाजप्रबोधनकारांचा यथोचित सन्मान करणेही शासनाचे कर्तव्य आहे. याच विचारधारेचा धागा पकडून समाज प्रबोधन करणारे विदर्भातील सत्यपाल महाराज यांच्यासारख्या समाज प्रबोधकांना राज्य शासनाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केल्यास समाजात नवा आदर्श शासनाने प्रस्थापित करणे गरजेचे आहे. कारण समाजप्रबोधनकारांना राजाश्रय आणि त्यांचा योग्य सन्मान करणे ही शिकवणच आम्हास नाईक साहेब यांनी दिली आहे.

## विरोधकांनाही आपलेसे वाटणारे वसंतराव

विधिमंडळाच्या अधिवेशनात विरोधी आणि सत्ताधारी पक्षांमध्ये अनेकदा आपण टोकाचा विरोध पाहिला आहे. त्या काळीही विरोध होत असत, मात्र महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी विरोधकांच्याही सूचना, मते लक्षात घेऊन त्यावर कार्यवाही करणे हे वसंतराव नाईक यांचे कौशल्य होते. आपुलकी आणि कार्यकौशल्यातून त्यांनी विरोधकांचीही मने जिंकली होती. विरोधासाठी विरोध न करता किंवा आकस बाळगत सुडाचे राजकारण करणे हा वसंतराव नाईक यांच्या नीतितत्त्वाचा भाग नव्हता. विरोधकांनाही आपलेसे वाटणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन चालणे हा सर्वसमावेशक आणि व्यापक विचार आम्हाला नाईक साहेबांनी दिला आहे. विदर्भवीर दिवंगत जांबुवंतराव धोटे यांनी वसंतराव नाईक यांना टोकाचा विरोध सर्वश्रुत होता; परंतु विरोध करूनसुद्धा धोटे परिवाराच्या सुख-दुःखामध्ये जातीने सहभागी होऊन वसंतराव नाईक यांनी राजकारणाच्या क्षेत्रात आदर्श स्वरूपाचा पायंडा घालून दिला आहे. ही मोलाची शिकवण माझ्यासाठी कायम सामाजिक जीवनात आदर्श म्हणून स्मरणात राहील, असे वसंतराव नाईक हे राजकारणातील अजातशत्रू होते.

शेती आणि शेतकऱ्यांवर नि:स्वार्थ प्रेम करणारे वसंतराव नाईक हे शेतकऱ्यांचे दैवतुल्य होते. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कठीण काळातही क्रांतिकारी कार्य त्यांनी केले होते. त्यामुळे त्यांना 'शेतकऱ्यांचा जाणता राजा', 'हरितयोद्धा' म्हणूनही संबोधतात. धो-धो पडणाऱ्या पावसामुळे आनंदी होऊन वर्षा बंगल्यामध्ये पेढे वाटणारा मुख्यमंत्री महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांचा कैवारीच म्हणावे लागेल. अनेक धरणे, कृषी विद्यापीठे, कारखाने,

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, कापूस एकाधिकार योजना, औष्णिक विद्युत केंद्राची निर्मिती, शेतकरी हिताचे निर्णय, कायदे, योजना आणि धोरणांच्या माध्यमातून वसंतराव नाईक यांनी आपली राजकीय कारकिर्द शेती आणि शेतकऱ्यांना समर्पित केल्याचे सिद्ध होते, म्हणूनच उभा महाराष्ट्र त्यांना सन्मानाने हरितक्रांतीचे जनक संबोधून त्यांचा गौरव करतो. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा सिंचनाचा मूलमंत्र आणि पाण्याचे महत्त्व महाराष्ट्राला सांगणारे वसंतराव नाईक खऱ्या अर्थाने हरितक्रांतीचे नायक आहेत.

१९५७ मध्ये इंडिया काऊंसिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्चच्या स्थायी वित्तीय समितीचे सभासद म्हणून निवडून आले होते. त्यावेळी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारच्या केंद्रीय अभ्यास गटामध्ये वसंतराव नाईक यांची आंतरराष्ट्रीय राईस कमिशनच्या शिष्टमंडळात निवड करण्यात आली होती. त्यांनी जपान, युगोस्लाव्हिया, चीन, अमेरिका आणि सिंगापूर या देशांच्या कृषी क्षेत्राचा अभ्यास करून कृषी औद्योगिकरणाचा प्रसार केला. आधुनिक शाश्वत शेतीला चालना देत विविध संकरित वाणांचीही निर्मिती केली. त्यांचे हे कृषी क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहेत.

वसंतराव नाईक यांनी जेवढे प्रेम महाराष्ट्रातील माणसांवर केले तेवढेच प्रेम मराठी भाषेवरही केले. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळावा म्हणून दिल्ली दरबारी मराठीचा आवाज बुलंद करणारे वसंतराव नाईक हे मराठी माणसाच्या चिरकाल स्मरणात राहतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, म्हणून नाईक साहेबांनी संघर्ष केला. मुंबईमध्ये मराठी माणूस टिकावा म्हणून नाईक साहेबांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मराठी माणसांच्या संघटनांना सहकार्य केले. मराठी भाषा अधिकाधिक समृद्ध व्हावी, म्हणून पुढाकार घेणाऱ्या वसंतराव नाईक यांच्यावर मात्र मराठी साहित्य जगताने कायमच आखडता हात घेतल्याचे जाणवते. मराठी साहित्य संमेलनामध्ये सामान्य मराठी माणसासारख्या वावरणाऱ्या त्या दिलखुलास मुख्यमंत्र्यांवर महाराष्ट्रातील लेखणीबहाद्दर मंडळींनी आता तरी त्यांच्या कार्याला साहित्याच्या माध्यमातून व्यापकतेने लोकाभिमुख करावे, असे नम्र आर्जव साहित्यिक मंडळीला करावेसे वाटते.

११ वर्षांपेक्षा अधिक काळ वसंतराव नाईक यांनी उभ्या महाराष्ट्राची सेवा केली. म्हणून महाराष्ट्र आणि मराठी माणसांनी त्यांना दिलेल्या सन्मान आणि जिव्हाळ्याबद्दल मराठी माणसांच्या कायम ऋणात आहोत. त्यांनी सुरू केलेल्या जनसेवेचा हा वारसा मायबाप जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने अखंड स्वरूपाने आजवर सुरू आहे. नाईक साहेबांनी तुकोबा, शिवबाच्या महाराष्ट्राला कृषिनीती देऊन सुजलाम् सुफलाम् करण्याचा अट्टाहास केला. जनसेवेचा हा अखंड वारसा पुढील काळातसुद्धा अशाच स्वरूपाने तेवत ठेवण्याचा प्रयत्न मायबाप जनतेच्या आशीर्वादाने करत राहण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

येत्या दोन वर्षांत महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण न केल्यास शनिवारवाड्यासमोर फाशी घेईन, अशी भीष्मप्रतिज्ञा करून महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करणाऱ्या महानायक वसंतराव नाईक यांना तमाम शेतकऱ्यांच्या वतीने व नाईक परिवाराच्या वतीने त्रिवार अभिवादन करतो.

**(लेखक हे विधानसभा सदस्य व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे नातू आहेत.)**

# क्रांतिसिंह नाना पाटील

(३ ऑगस्ट १९०० - ६ डिसेंबर १९७६)



नाना पाटील हे महाराष्ट्रातील एक देशभक्त. झुंझार नेते आणि क्रांतिसिंह म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील येडेमच्छिंद्र या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. नानांचे वडील रामचंद्र हे गावचे पाटील होते. नानांचे प्राथमिक शिक्षण गावी झाले आणि ते (१९१६) मध्ये मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले. यानंतर त्यांना तलाठ्याची नोकरी मिळाली. पुढे सत्यशोधक चळवळीकडे ते आकृष्ट झाले. त्यांनी ग्रामीण भागातून दौरे काढून तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा व चालीरीती यांविरुद्ध लोकमत जागृत केले. अनेक अनिष्ट चालीरीतींविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. १९३० साली महात्मा गांधींजींनी सुरू केलेल्या असहकारच्या चळवळीत ते सहभागी झाले. पुढे महाराष्ट्र काँग्रेस कमिटीवर ते निवडून आले. १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात भूमिगत राहून कार्य करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यानुसार सातारा जिल्ह्यात काही सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले व ब्रिटिश शासन बंद पाडण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. सरकारी बँका, पोस्ट व तारखाते, पोलीस ठाणी यांवर छापे घातले. सरकारतर्फे हेरगिरी करणाऱ्यास; तसेच जबरीने सारा वसूल करणाऱ्या पाटील-तलाठ्यांस पायांवर काठीचे तडाके मारण्यात येत आणि पत्रेही ठोकण्यात येत. यावरून त्यांच्या या प्रतिसरकारला पत्रीसरकार हे नाव रूढ झाले होते. ब्रिटिश सरकारने नाना पाटलांना पकडून देणाऱ्यास १०,००० रुपयांचे बक्षीसही जाहीर केले.

या आंदोलनकाळातच नानांनी ग्रामराज्याची स्थापना करण्याचे कार्य हाती घेतले. खेड्यातील परकी सत्ता नामशेष करून त्यांना स्वयंपूर्ण बनवावे व त्यांचा सर्व कारभार ग्रामस्थांच्या हाती द्यावा, अशी त्यांची ग्रामराज्याची कल्पना होती. लोकनियुक्त पंचांनी खेड्याचा कारभार पाहावा व आवश्यक वाटल्यास भूमिगतांनी त्यांना मदत करावी, अशी एकूण ग्रामराज्याची कार्यपद्धती होती. कराड, वाळवे, तासगाव इ. ठिकाणी पंचसभा स्थापन झाल्या. न्यायदान समित्याही स्थापन करण्यात आल्या. कोरेगाव, पाटण, सातारा इ. गावी, वर्षानुवर्षे बेकायदेशीरपणे गाळली जाणारी हातभट्टीची दारू चार महिन्यांमध्ये क्रांतिकारकांनी बंद केली. काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर (१९४६) त्यांच्यावरील पकड वॉरंट रद्द करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला व ते शेतकरी कामगार पक्षात गेले. अखेरच्या दिवसांत त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. ते दोन वेळा लोकसभेवर निवडून आले (१९५७-६७). त्यांनी भारतीय सांस्कृतिक मंडळातून रशियाचा दौरा केला. नाना पाटील प्रभावी वक्ते म्हणून प्रसिद्ध होते. पैलवानाच्या आविर्भावात अत्यंत रांगड्या भाषेत ग्रामीण दाखले देऊन आपला विषय ठामपणे प्रतिपादीत. अस्पृश्यतेला त्यांचा विरोध होता. अज्ञानी, दुर्बल घटकांचे त्यांनी खंबीरपणे नेतृत्व केले. ते महात्मा गांधीचे अनुयायी होते. तथापि सशस्त्र क्रांतिमार्गाने ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जनसेवा व देशसेवा हे त्यांचे जीवितकार्य होते. सत्यशोधक चळवळ, भारतीय स्वातंत्र्यसंग्राम, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन या सर्वांना महाराष्ट्रात नाना पाटलांचे नेतृत्व लाभले. मिरज येथे त्यांचे निधन झाले.

**संदर्भ : मराठी विश्वकोष**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र वन विभाग



**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

# महाराष्ट्र हरित करूया "अमृतवृक्ष" लावूया



QR कोड स्कॅन करा
"अमृतवृक्ष" मोबाईल ॲप डाउनलोड करा

योजनेचा कालावधी
**१५ जून २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४**

त्वरा करा, आजच हरित चळवळीत सहभागी व्हा

सन २०२२ मध्ये आपल्या स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण होऊन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला.

मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील **"एक पेड माँ के नाम (plant for mother)"** या हरित चळवळीला गती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वन विभागाने **"अमृत वृक्ष आपल्या दारी"** ही योजना सुरू केली आहे.

शासकीय यंत्रणा, शाळा, नागरिक, स्वयंसेवी संस्था यांनी या योजनेंतर्गत लागवड केलेल्या रोपांची फोटोंसह माहिती वन विभागाने विकसित केलेल्या **"अमृत वृक्ष मोबाईल ॲप"** वर भरण्यात यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. सदर ॲपद्वारे आपल्याला प्रमाणपत्र प्राप्त होईल.



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

सुधीर मुनगंटीवार
मंत्री वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय

## वन विभाग, महाराष्ट्र शासन

@mahaforestofficial @MahaForest @mahaforestpublicity | निः शुल्क (टोल फ्री) क्रमांक १९२६ (२४ तास सेवा)


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

**CHIEF MINISTER HELPLINE**

For any **Grievance** or **Query** call on

Toll Free Number
1800 120 8040

or lodge grievance on this portal
grievances.maharashtra.gov.in





# लोकराज्य

**अधिकृत • विश्वासार्ह • वस्तुनिष्ठ**

## अंक ऑनलाइन उपलब्ध

संकेतस्थळ :

https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in




Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह